शिक्षा

कान्हुचरण महांति

अनुवाद

मंजू गुप्ता

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली

1981 (शके 1902)

रु. 14·25

Original Title : SHASTI *(Oriya)*
Marathi Translation : SHIKSHA

This book has been printed on the paper made available by the Govt. of India at concessional rates.

प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली 110016
मुद्रक : दि. भि. धाक्रस, नाग मुद्रणालय, रुईकर मार्ग, नागपूर 440 002

गुणपुर (कोरापुट—ओडिसा)
6–10–1945

निराकारा !

वंशधारा नदीपलीकडून सायंकाळचा गार वारा तुमचीच वाणी घेऊन येतो— "अजून संपलं नाही बेटा ?"

दुमजली इमारतीची ही खोली अगदी निर्जन आहे—तरीदेखील आवाज कुणाचा येतोय ? कोण बोलतंय—"संपलं नाही बेटा ?"

वाटतं अजून तुम्ही इथंच कुठंतरी आहात.

पण हे कसं शक्य आहे ? हे व्रजसुंदर ! तुमच्या मृत देहाला मी स्वतःच तर कटकच्या सतीचौरा स्मशानात घेऊन गेलो होतो, स्वतः अग्नी दिला होता आणि स्वतःच्या डोळ्यांनी जळून राख होताना पाहिलं होतं. फार दिवस नाही झालेत. जणू कालचीच तर घटना.

कित्येक सोनेरी सांध्या मी तुमच्या सहवासात घालविल्या होत्या. तुमची प्रेमळ हाक पुन्हा पुन्हा ऐकली होती—"बाळ...!"

मी आहे एक नगण्य, सामान्य माणूस. पण अशा एका माणसासमोर तुम्ही का म्हणून कथन करताय...आपल्या मनीची व्यथा...आपल्या अपुऱ्या आशेची कथा ? तुम्ही सांगत होताना..."बाळ, माझा देश भग्न आहे...माझं साहित्य अपूर्ण आहे...माझ्या देशाची लेकरं उपाशी आहेत..." आणि अशाच असंख्य इतर गोष्टी.

डोळे भरून यायचे...अंतरात्मा तळमळायचा..."माझं आयुष्य व्यर्थ गेलं...माझी अखेरची वेळ येऊन ठेपली आहे...मी काही करू शकलो नाही."

देशाच्या गौरवशाली महापुरुषा ! तुम्ही स्वत:शी बोलायचे पण मला साक्ष ठेवायचे. आज मला ठाऊक आहे की तुम्ही परत आला आहात. एकाच रूपात नव्हे, तर माझ्या मातेच्या दीड कोटी लेकरांच्या रूपात **तुम्ही** पुन्हा जीवंत झाला आहात. आज जग जागृत आहे. तुम्हीदेखील जागृत आहात. तुम्हीच अर्धवट राहिलेली कामं पुरी कराल, माझ्या दीडकोटी बहीणभावांच्या ओठांवर हसू खेळवाल आणि मग त्यांच्याच भाषेत सांगाल—" बेटा, संपलं नाही ना ? कुठं आहे गंगा ? कुठं आहे गोदावरी ? कुठं आहे माझी सिंहभूमी ?"

हे साहित्यरथी, तुम्ही तुमचं अवघं प्रेम देऊन मला कृतार्थ केलं होतं. तेवढी माझी पात्रता होती का ? आज तुम्ही आला आहात...माझ्या या एकांत खोलीत...सायंकालीन वाऱ्यासंगे...खरंच का माझ्यावर इतकं प्रेम आहे ?

मी तुमचं एक अधम लेकरू आहे. मी साहित्य नव्हे, दुसरंच काही लिहिलं आहे. तुम्हाला ही ' शिक्षा ' (शास्ति) अर्पण करायचा धीर मला होत नाही आहे. माझ्यावर इतकं प्रेम असेल तर, हे पिता ! तुम्ही हे स्वीकार करा व त्याचबरोबर माझा नमस्कारही !

—कान्हुचरण

प्रस्तावना

ओडिआ कादंबरीचा गेल्या शंभर वर्षांचा इतिहास पाहू जाता, त्यात कान्हुचरण यांनी फार मोलाची भर घातल्याचे दिसते. 'सौदामिनी' ही पहिली ओडिआ कादंबरी 1877–78 साली 'उत्कल मधुप' या मासिकात प्रसिद्ध झाली होती. पण ते मासिक अचानक बंद पडल्याने 'सौदामिनी' कादंबरीचे लेखक रामशंकर यांचा तो पहिलावहिला प्रयत्न वाया गेला. त्यानंतर 1885 मध्ये 'प्रदीप' या ओडिआ मासिकात 'मठर संवाद' (मठाचे समाचार) व 'अनाथिनी' या दोन कादंबरीसदृश रचना प्रकाशित झाल्या होत्या. तरी पण ओडिआ भाषेची पहिली संपूर्ण कादंबरी 'पद्ममालि' प्रसिद्ध व्हायला 1888 साल उजाडावे लागले. त्या कादंबरीचे लेखक होते उमेशचंद्र सरकार. दोन वर्षांनी रामशंकर यांचा दुसरा प्रयत्न यशस्वी होऊन 1891 साली त्यांची 'बिवासिनी' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबऱ्यांनी ओडिआ कादंबरीची मुहूर्तमेढ रोवली. ओडिआचे कादंबरीसम्राट म्हणून ख्यातनाम असलेले फकीर मोहन सेनापती याच क्षितिजावर उदयास आले. फकीर मोहन यांची पहिली कादंबरी 'छ माण आठ गुंठ' (सहा एकर व आठ गुंठे जमीन) ही 1898 मध्ये 'उत्कल साहित्य' या मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली होती. फकीर मोहन असमान्य लेखक व जीवनाचे समर्थ भाष्यकार होते. त्यांनी केवळ चार कादंबऱ्या लिहिल्या. पण बंदिस्त कथानक, पात्रांचे व्यक्तिचित्रण आणि भाषाशैली या दृष्टींनी आपल्या या चारही कादंबऱ्यांतून त्यांनी ओडिआ कादंबरीला नवा आदर्श घालून दिला. त्यांच्या समकालीन व नंतरच्या कादंबरीकारांनी त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून ओडिआ कादंबरी समृद्ध केली.

फकीर मोहन 1918 साली कैलासवासी झाले. त्यानंतर हळूहळू फकीर मोहन यांचे युग अस्तास गेले. या शतकाच्या तृतीय दशकात ओडिआ कादंबरीसाहित्याच्या क्रमशील विकासात थोडे परिवर्तन घडून आले. वासंती (1924–26) मध्ये सात लेखकांच्या सहकार्याने निर्माण झालेली एक नावीन्यपूर्ण ललितकृती प्रसिद्ध झाली. त्यानंतर 'मने मने' (1928) ही मनोविश्लेषणात्मक कादंबरी व 'माटिर मणिष' (मातीचा माणूस, 1931) ही सामाजिक राजकीय पार्श्वभूमीवर आधारलेली, राष्ट्रीय जागृतीची द्योतक कादंबरी प्रसिद्ध झाली. 'मुकुर कादंबरी माला' व 'आनंद लहरी कादंबरी माला' इत्यादी

प्रकाशनसंस्थांच्या सुसंघटित प्रयत्नांनी ओडिआ कादंबरीची गुणात्मक व संख्यात्मक वाढ झाली. परिणामी, ओडिआ कादंबरीने रसिक वाचकांची मने जिंकून घेतली. ओडिआ कादंबरी लोकप्रिय होऊ लागली. ओडिआ कादंबरीच्या विकासाच्या या दुसऱ्या टप्प्यात जे यशस्वी कादंबरीकार पुढे आले त्यांत नव्या दमाचे तरुण कादंबरीकार कान्हुचरण हेदेखील होते.

त्यांची पहिली कादंबरी 'उत्सवे व्यसन' (ही कादंबरी अप्रकाशित आहे) ही 1924 साली लिहिली गेली होती. त्यानंतर सतत पन्नास वर्षे त्यांनी अव्याहत लेखनकार्य चालू ठेवले आणि सुमारे पन्नास कादंबऱ्या लिहिल्या. आज जागतिक कीर्तीच्या लेखकांमध्ये त्यांची गणना होते.

कान्हुचरणचा जन्म 1906 सालचा. बी. ए. झाल्यावर 1930 मध्ये त्यांनी सरकारी नोकरी पत्करली. सामान्य कारकून म्हणून नोकरीस सुरुवात केली पण सेवानिवृत्त झाले ते मात्र डेप्युटी कलेक्टर म्हणून. एकदा कुणी तरी आधुनिक ओडिआ साहित्यावर मर्मभेदक टीका करीत म्हटले होते की 'ओडिआ भाषेत एकही चांगली कादंबरी नाही.' त्या वाक्याने कान्हुचरणच्या मनाला कायमची घरे पाडली. साहित्याविषयी पूर्वीपासूनच असलेली ओढ त्या उपरोधाने अधिकच दाट झाली आणि ओडिआ कादंबरीला मानाचे स्थान पटकावून देण्याच्या निर्धारापायी त्यांनी एकही दिवस लेखणी खाली ठेवली नाही. दिवसभर ते सरकारी व घरगुती कामात गुंतलेले असायचे. रात्री मात्र सुखाची झोप घ्यायची सोडून ते लिहायला बसायचे. त्यांच्या निरलस नैष्ठिक साधनेमुळेच ओडिआ कादंबरी समृद्ध झाली. दर एक दोन वर्षांनंतर त्यांची कुठली ना कुठली नवी कादंबरी प्रसिद्ध होऊ लागली. 1926 मध्ये 'तथास्तु,' 1929 मध्ये 'बलिराजा,' 1930 मध्ये 'अरुणा' व 'पलातक,' 1931 मध्ये 'निष्पत्ति,' 1933 मध्ये 'स्वप्न ना सत्य' व 'झडर शेष,' 1934 मध्ये 'दुनियार दाऊ,' 1935 मध्ये 'हा अन्न,' 1937 मध्ये 'उलटपालट', 1939 मध्ये 'परकिया' व 'उद्दंडी', 1940 मध्ये 'अदेखा हात,' 1943 मध्ये 'तुड बाइद,' 1945 मध्ये 'भलपाइवार शेष कथा,' 'एपारी सेपारी,' व 'शास्ति,' 1947 मध्ये 'अभिनेत्री' व 'भूलि हुए ना,' 1948 मध्ये 'अंतराय,' 1950 मध्ये 'मिलनर छंद' व 'झंझा,' 1953 मध्ये 'शर्वरी,' 1954 मध्ये 'परी,' 1955 मध्ये 'का' (साहित्य अकादमीचे पारितोषिक), 1959 मध्ये 'बज्रबाहू,' 1963 मध्ये 'ढेउ ढेउका,' 1966 मध्ये 'इतिह,' 1968 मध्ये 'तमसा तीरे' आणि 1969 मध्ये 'मन जाणे पाप' या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. याखेरीज 'मन गहनर तले,' 'बग बगुली,' 'प्रतीक्षा,' 'काडाका लेलि' ही पुस्तकेही नंतर प्रकाशित झाली.

कान्हुचरणचा 'मानसी' नावाचा एक काव्यसंग्रहदेखील आहे. 'नामटि तार चंपा,' 'चोरा चाहाणी' इत्यादी त्यांचे काही कथासंग्रहही आहेत. ओडिआ साहित्यभांडारात त्यांच्या लेखनाची यापुढेही सतत भर पडत राहील यात शंकाच नाही.

कान्हुचरणच्या लेखनाचे वैपुल्य हेच फक्त नव्हे तर वैचित्र्य, विविधता हेदेखील वैशिष्टच आहे. आपल्या प्रत्येक कादंबरीतून त्यांनी नव्या माणसाची नवी गोष्ट सांगितली आहे—त्यातून जग व जीवनाच्या नव्या समस्या पुढे आणल्या आहेत. आपल्या कादंबरीचे विषय व त्यांच्या आकृतिबंधाविषयी त्यांनी स्वतःच म्हटले आहे की प्रत्येक कादंबरीला एका हेतूची बैठक आहे. तो हेतू कथेच्या माध्यमाने मूर्त होतो आणि कथापात्रांच्या माध्यमाने सजीव होतो. एखाद्या विचाराचे वा प्रथेचे खंडन-मंडनच कथेचे आदर्श बनते आणि या आदर्शाचे सृजन होते पात्रांकडून (ओडिआ कादंबरी साहित्य-परिचय, 1966). सामाजिक जीवनात 1930 नंतर जे बदल घडून आले, पारंपरिक मूल्ये जी बदलली, ज्या आशंका व विसंगती दिसून आल्या त्यांचे प्रतिबिंब कान्हुचरणच्या कादंबऱ्यांतून उमटले. त्यांनी या समस्यांचे विश्लेषण केले आणि सामाजिक पार्श्व-भूमीवर व्यक्तीच्या संघर्षाचे कारुण्यपूर्ण चित्र रेखाटले. अशिक्षित, अस्पृश्य, गरीब गावकरी, शिकलेले धनवान, आभिजात्य संप्रदायाचे नागरिक इत्यादी सर्वांचा त्यात समावेश आहे. अंधविश्वासू, रूढिवादी समाजाच्या अनुशासनापासून त्यांनी आत्म्याच्या मुक्तीची मागणी केली आहे. जाती, धर्म, धन, मान इत्यादींचे भेदभाव नसलेली अशी आत्म्याची प्रतिष्ठा त्यांना हवी आहे. समाजाची विभिन्न पातळी असलेली जडणघडण फोडून व्यक्तीच्या जाणिवेची व्याकुळ तळमळ त्यांच्या कादंबऱ्यांतून बाहेर पडली आहे. समाज व व्यक्ती यांच्यात असलेले आदर्श व यथार्थ तसेच लालसा व संयम यांच्यातील संघर्षक्षेत्र हेच कान्हुचरणचे शिल्पक्षेत्र आहे.

पण आपला आदर्श सिद्ध करण्यासाठी कान्हुचरणनी वास्तवाचे विकृत वा भ्रामक चित्र रेखाटलेले नाही. माणसात कित्येक प्रकारचा नैसर्गिक कमकुवतपणा असतो. समाजाचे किती तरी कठोर नियम आहेत, बंधने आहेत, ती ओलांडून पुढे प्रगती करणे, आपले ध्येय गाठणे माणसाला इतके सोपे नसल्याचे त्यांनी जाणले आहे. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्यांतून आदर्श ध्येय व वस्तुस्थिती यांच्यात संघर्ष होत असल्याचे आढळते. त्या संघर्षाच्या परिणामी, माणसालाच त्याग करावा लागतो. संघर्षाचा एक स्वाभाविक परिणाम आहे—त्याग. पण असे असले तरी त्यांचे कुठलेही पात्र अवास्तव नाही. कादंबरीत कथावस्तू व पात्रांचे वास्तव व्यक्तिचित्रण अतिशय महत्त्वाचे असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. म्हणूनच या गोष्टीकडे त्यांनी विशेष कटाक्षाने लक्ष पुरविले आहे. याच संदर्भात त्यांनी म्हटले आहे—"माझ्या मते कथानक हाच कादंबरीचा प्राण असतो. कथानकात जर दम नसेल तर नायक, नायिका व अन्य पात्रांचे रेखाटन सजीव

होऊनही कादंबरी मनोवेधक होऊ शकणार नाही. काल्पनिक कथा असूनही हृदयाला हात घालील अशी कादंबरी वाचकांना हवीशी वाटते. आपल्या स्वतःला आपल्या नात्यागोत्याच्या, ओळखीपाळखीच्या आणि अनोळखी असूनही आपल्याशा वाटणाऱ्या लोकांना वाचक कथेच्या पात्रांमध्ये पाहू इच्छितो (ओडिआ कादंबरी साहित्यपरिचय 1966). कान्हुचरण वास्तववादी आहेत. त्यांच्या या दृष्टिकोणाने त्यांच्या कादंबऱ्यांचे सौंदर्यच केवळ वृद्धिंगत केले नाही तर त्यांच्या आदर्शवादी उद्देशांना प्रमाणित करण्यासाठी एक मार्मिक वातावरणही उभे केले आहे.

सामाजिक व वैयक्तिक जागृतीच्या संघर्षातून निर्माण झालेली निरर्थकता व विटंबना यांची चित्रे कान्हुचरणच्या कादंबऱ्यांतून मिळतात. या चित्रांतून वैयक्तिक जीवनातील प्रेम, प्रणय, विवाहातील खंत व वैफल्य यांचे प्रतिबिंब उमटले आहे. आपल्या समाजरचनेत वर्ण, धर्म, जाती व संप्रदाय यांचे भेद तर आहेतच; खेरीज हुंडाप्रथा, बालविवाह, विधवांसाठी असलेले नीतिनियमवगैरे अनेक धार्मिक कर्मकांडे आणि पुरुषाचे वर्चस्व या सर्व गोष्टी स्त्री-पुरुषांच्या दाम्पत्य जीवनात मोठाच अडसर निर्माण करतात. मनासारखा पती वा पत्नी न मिळाल्याने स्त्री व पुरुषाचे कौटुंबिक जीवन विस्कळित आणि भ्रष्ट व जड ओझ्यासारखे होऊन जाते. या परिस्थितीत पुरुषापेक्षा कमी स्वावलंबी व दुर्बल असलेली स्त्रीच अधिक लांछित व अपमानित होते. पुरुष अन्यायाशी झगडतो, तर्क करतो, बंडही करतो पण घराच्या चार भिंतीआड राहणारी स्त्री बिचारी कुठे जाणार ? कुणाला आपल्या मनीच्या व्यथा—वेदना सांगणार ? युगानुयुगे उपेक्षित, पददलित, लांछित असलेल्या अबलेची मूक कहाणी कान्हुचरणच्या लेखनातून मूर्त झाली आहे. ओडिआ शिल्पकलेतून व साहित्यातून सुपरिचित असलेल्या 'लावण्यवती'सारख्या लाडक्या कन्यकांना सोडून या दुर्दैवी मुलींच्या अश्रुभरल्या कथा कान्हुचरणनी लिहिल्या आहेत.

कान्हुचरणच्या प्रत्येक कादंबरीचे मध्यवर्ती पात्र आहे—एक स्त्री ! या स्त्रियांमध्ये आहेत—गरीब हरिजनाची लेक, सुशिक्षित, सुंदर आधुनिक महिला, कुरूप, विकलांग बाई, अल्लड बालिका, विवाहित प्रौढा इत्यादी. या सर्वजणी प्रेमिका आहेत. पण त्यांच्या प्रेमात कुठलाही रोमान्स नाही. फक्त समस्या आहेत. त्यांच्या मनात आहे प्रेम व वात्सल्य आणि शरीरात आहे वासना व उत्तेजना. पण समाजाचे नीतिनियम व परंपरेची बंधने कशी तोडायची ? ते शक्य होत नाही. परिणामी, वस्तुस्थिती व आदर्शाच्या ओढाताणीत त्या नुसत्या मांसाचा गोळा होऊन राहतात, जगाच्या दृष्टीने त्या आदर्श पत्नी, माता व बहीण असल्या तरी प्रत्यक्षात मात्र त्या निष्फळ प्रेमाचे मूर्तिमंत रूप असतात. त्यांच्यावर पुरुषाचे वर्चस्व राहावे, अधिकार राहावा हीच समाजाची इच्छा असते. पण त्यांना आपल्या मनीचा प्रियकर कधी मिळत नाही. दारिद्र्य, वैधव्य, जाती–

पातीचे भेदभाव आणि वेश्यावृत्तीस बळी पडून कुमार्गाला लागणे त्यांना भाग पडते. कित्येक जणी तर मूग गिळून सारे काही सहन करत राहतात व अखेरीस आत्महत्या करतात. पण कुणीही अन्यायाचा प्रतिकार करीत नाही, त्याविरुद्ध आवाज उठवत नाही. प्रत्येक स्त्रीमध्ये असलेल्या मातृत्वाच्या निखाऱ्यावर कुणी फुंकर घातला नाही. ती आग कुणी चेतविली नाही. 'स्त्रीजन्म सृजनासाठी आहे, विध्वंसासाठी नव्हे—' हाच आहे कान्हुचरणचा आदर्श. 'स्त्री विश्वाला जन्म देते. ती जननी आहे. जननी होण्यासाठीच ती पुरुषाला शोधत असते. माता होण्यासाठी तिला शक्तीची गरज असते. तिची कोमलताच तिची शक्ती आहे', (शास्ति–शिक्षा). म्हणून कान्हुचरणनी आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटलेली स्त्री ही अन्याय सहन करणाऱ्या आणि त्याग, पातिव्रत्य, धर्म, पितृभक्ती, वात्सल्य, प्रेम इत्यादी महान गुण असलेल्या भारतीय नारीचेच प्रतीक आहे.

कान्हुचरणचे ध्येय आहे—समाजाची पुनर्रचना, जाती, धर्म, वर्ण, वर्ग यांचा भेदभाव नसलेल्या आणि दोन प्रणयी जीवांचे मीलन हाच स्त्री-पुरुषांच्या विवाहाचा मुख्य आधार असलेल्या महान समाजाची कल्पना त्यांच्या नजरेसमोर आहे. त्या आदर्श समाजावर हुंड्याचे वा धनदौलतीचे वर्चस्व नसावे, विधवांचा पुनर्विवाह त्यात सहज करता यावा, गरीब व दुर्दैवी लोकांविषयी सर्वांना सहानुभूती वाटावी, अपंग व रोग्यांना सेवासुश्रूषा मिळावी, श्रमाची लाज न वाटता सन्मान वाटावा आणि सर्वांप्रती समान भाव असावा असे त्यांना वाटते. कान्हुचरण हाडाचे लेखक आहेत, पुढारी वा प्रशासक नाहीत. म्हणून आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांनी समाज भग्न करायचा प्रयत्न केला नाही. समाजभंगासाठी त्यांनी कुठल्याही प्रकारचे बंडखोर लेखन केले नाही. त्याउलट, आपल्या महान आदर्शाला मूर्त रूप देण्यासाठी त्यांनी संवेदनशील लेखन केले. त्यातून सामाजिक अन्याय सोसणाऱ्या कित्येक दुर्दैवी स्त्री पुरुषांची करुण जीवनगाथा व्यक्त झाली आहे. शिक्षा (शास्ति) कादंबरी याच करुण जीवनगाथेचा करुणतम अध्याय आहे. यात अतिशयोक्ती मुळीच नाही.

शिक्षा (शास्ति) ही कान्हुचरणची एक आदर्श कृती आहे. 1867–68 च्या 'नऊ अंक दुष्काळा'च्या पार्श्वभूमीवर याचे कथानक रचलेले आहे. दुष्काळाच्या वेळच्या 'अन्न–अन्न'च्या करुण आक्रंदनाच्या वस्तुस्थितीवर ते आधारलेले आहे. ओडिसामध्ये त्या दुष्काळाने जो हाहाःकार उडवून दिला होता त्याचे भयंकर चित्रण फकीर मोहनच्या चक्षुर्वै सत्य. वर्णनातून मिळते, ते असे.

"हातावर पोट असणाऱ्या मजुरांनी घरात जे एखाद पितळीवगैरे धातूचं भांडं होतं ते विकून त्यावर काही दिवस घालवले. कार्तिक महिना उलटण्याच्या आत ते

घरदार सोडून देशोधडीला लागले. नवरा, बायको, मुलं सर्वजण वाट फुटेल तिकडे चालू लागले. त्यांची पुन्हा भेटसुद्धा झाली नाही. पण फाल्गुनानंतर मात्र शेती करणारे शेतकरी व कारागीर मंडळी गाव सोडून पळाली. गवत व पानं चावून काही दिवस जगले. चिंचेच्या झाडांना नवी पालवी फुटली तेव्हा लोक झाडांवर चढून पालवी व पानं खाऊ लागले. दहा दहा, वीस वीस माणसं माकडासारखी एकेका झाडावर चढून बसायची. प्रत्येक माणूस म्हणजे हाडांचा नुसता सांगाडा. चांगल्या घराण्यातल्या तरुणी, लेकी, सुना जुन्या फाटक्या वस्त्रांत रस्त्यातून भटकत होत्या. स्तनांच्या जागी निर्जीव शुष्क कातडी त्यांच्या छातीवर लोंबत होती. कित्येक जणींनी आपापली पोरं कडेवर घेतली होती. ती पोरं ती शुष्क कातडी लुचत होती. चैत्रापासून मृत्युसंख्येत वाढ होऊ लागली. रस्त्याकाठी, झाडीत, तलावांच्या घाटांवर, जावं तिकडे सर्वत्र प्रेतंच प्रेतं दिसू लागली. बैलगाड्यांतून प्रेतं नदीकडे वाहून न्यायचे काम दोन महिने भंगी करीत राहिले. हे दृश्य लेखकाने स्वतःच्या डोळयांनी पाहिले आहे." (आत्मकथा)

कान्हुचरणनी आपल्या 'हा अन्न' कादंबरीत या नरमेध यज्ञाचे वर्णन केले आहे. रजवाड्यातील 1915–16 च्या दुष्काळाचे दृश्य त्यांच्या लक्षात होते. तारुण्यात त्यांनी जेव्हा 'नऊ अंक दुष्काळा'चे हृदय हेलावून सोडणारे वर्णन वाचले तेव्हा त्या काळाची करुण दृश्ये त्यांच्या नजरेसमोर साकार झाली. त्याच विचारांना 'हा अन्न' कादंबरीत मूर्त रूप लाभले. 'हा अन्न' (चतुर्थ आवृत्ती)च्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे—

" मी संपूर्ण वर्णन वाचले. माझ्या तनमनाचा थरकाप उडाला आणि नकळत डोळे भरून आले. माझ्यासमोर उभे राहिले दुष्काळाचे करुण चित्र. फॅमिन कमिशन (1866–68) ने आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला होता. तीन मोठमोठे ग्रंथ आहेत त्याचे. मी ते तिन्ही वाचले. मनातल्या विचारांची नोंद केली. 1915–16 च्या दुष्काळाची दृश्ये जणू प्रत्येक पानावर साकार झाली असावीत. मला जे काही जाणवलं होतं आणि ज्यामुळे माझ्या मनाचा थरकाप झाला होता, माझे रक्त तापले होते व डोळे भरून आले होते, ते सारे स्वतःच्या भाषेत साकार करायचा मी प्रयत्न केला. माझ्या मनात एक अज्ञात प्रेरणा होती. तिनेच माझी लेखणी पुढे चालवली आणि माझ्याकडून 'हा अन्न' कादंबरी लिहून घेतली."

'हा अन्न'चा नायक जगू व नायिका उमा भुकेपायी परस्परांपासून वेगळे झाले आणि भटकत राहिले. एका मठाच्या भावी महंताची उमाकडे नजर गेली आणि त्या महंता-बरोबर नवजीवन जगायची स्वप्ने उमा बघत असतानाच अचानक एक दिवस तिला सेवासदनात जगू मरणासन्न अवस्थेत दिसला. इथेच 'हा अन्न' कादंबरी संपते. जगू बरा झाला की नाही, उमासह त्याने संसार थाटला की नाही ते काही आपल्याला ठाऊक नाही. पण शिक्षा (शास्ति) कादंबरीतही जगूसारखाच सनिया दुष्काळाच्या तावडीतून

सुटून परत गावी आला होता. धोबीबरोबर नवीन आयुष्य सुरू करायची स्वप्ने त्यानेही पाहिली होती. पण ते काही झाले नाही. आपल्या प्रेयसीच्या कुटुंबाचे आणि समाजाचे सहकार्य काही सनियाला मिळाले नाही, उलट शिक्षाच मिळाली. तत्कालीन समाजाची ही प्रतिक्रिया होती. पण ज्या लोकांविषयी कान्हुचरणना सहानुभूती होती, त्यांच्यासाठी त्यांनी अश्रू ढाळले होते, त्यांना अशा प्रकारे शिक्षा देणे त्यांना कसे शक्य होते ? म्हणून 'हा अन्न' नंतर शिक्षा (शास्ति)च्या निर्मितीला दहा वर्ष लागली होती. फकीर मोहनप्रमाणेच त्यांनाही जाणवले होते—"हिंदू समाजाने कंगालांना समाजाबाहेर हाकलून दिलं असलं तरी त्यास हिंदू समाज जबाबदार नाही, जबाबदार आहे एक अविवेकी समाज." (आत्मकथा.) अविवेकी समाजाच्या अत्याचारापासून सनियासारख्या लोकांना कसे वाचवायचे ? एका लेखकाच्या नात्याने बहुधा दहा वर्षे ते याचा विचार करीत असावेत. म्हणून शिक्षा (शास्ति) ही 'हा अन्न'ची पुनरावृत्ती फक्त नसून 'हा अन्न'च्या स्मशानावर एक नवे विश्व उभारण्याचा तो एक महान प्रयत्न आहे.

कान्हुचरणच्या सामाजिक आदर्शामागे हीच विचारसरणी होती की—नैसर्गिक आपत्तीमुळे देशात दुष्काळ पडला. भुकेपायी लोकांना वेड लागायची पाळी आली. म्हणून जीव बचावण्याच्या प्रयत्नात तो समाजाचे पारंपरिक नियम विसरला. एका वाईट स्वप्नासारखेच हे वाईट दिवसही निघून गेले. दुष्काळातून जे वाचले ते नव-जीवनाची नवी आशा घेऊन घरी परतले. झाले गेले होऊन गेले. त्याला आवर घालणे कुणाच्याच आवाक्यात नव्हते पण समाजाने ते ऐकले नाही. परत आलेल्या लोकांना शिक्षा करायचा प्रयत्न समाजाने केला. चिंतेई सोईसारख्या समाजधुरीणांच्या व प्रहराजसारख्या पुरोहितांच्या मनालामुद्धा हा विचार शिवला नाही की का म्हणून सनिया गरीब, निराधार झाला होता ? का म्हणून पुनी अस्पृश्य जातीच्या माणसाची बायको झाली होती ? कई कशासाठी पतिता झाली ? धोबी विधवा व्हायचे कारण काय ? चिंतेई सोई वा प्रहराज याचा विचारच करू शकले नाहीत. त्यांनी तर या लोकांच्या असाहाय्यपणाचा, निरुपायाचा फायदा स्वतःची तळी भरण्याकडे घेतला होता. धोबीच्या सासरची मालमत्ता लुबाडण्याची आणि सनियाच्या वडिलांचा उच्च जातिविषयक गर्व हरण करायची संधी चिंतेई सोईना मिळाली होती. पुरोहित म्हणून प्रहराजना दक्षिणा मिळाली होती आणि लोकांना दुसऱ्यांच्या संकटांची कीव करण्याची व उसासा टाकण्याची संधी मिळाली. नीती व धर्माच्या नावाखाली इतका मोठा अन्याय सहन करणे कान्हुचरणना एक लेखक म्हणून शक्य झाले नाही. त्यांना जाणवले की, समाजव्यवस्थेत जात, धर्म, वर्ण, वर्ग इत्यादीचे भेदभाव हेच हरतऱ्हेच्या अन्यायाच्या बुडाशी आहेत. हा भेदभाव निपटून काढण्यासाठी त्यांनी सनियाच्या चरित्रात बंडाची आग भडकावून दिली. त्याचबरोबर समाजधुरीणांची विवेकशक्ती जागृत करण्यासाठी

त्यांनी धोबीच्या रूपात नि:शब्द सत्याग्रहाची भावना निर्माण केली.

मनात खूप आशाआकांक्षा घेऊन सनिया स्मशानातून गावी परत आला होता. धोबीने मोठ्या आशेने त्याला आधार दिला होता. पण समाजाचे क्रूर नियम त्या दोघां-मध्ये पहाडासारखे उभे राहिले. समाजाच्या चालीरीती, वडिलांची इच्छा, सांपत्तिक स्थितीतील वैषम्य, धर्माच्या नावाखालील कित्येक नियम दोघांमध्ये बाधक असल्याचे धोबीला दिसले तेव्हा सनियाचा हात धरून ती नम्रपणे म्हणाली, " सनिया, मी तुझा अपराध केला आहे. क्षमा कर मला. मी एक विधवा. समाज, धर्म, जातीपातीचा भेद-भाव व हजारो तऱ्हेच्या बंधनांत अडकले आहे. या परिस्थितीत एखाद्या कैद्यासारखी मी मनातल्या मनात तळमळत राहीन, सनिया त्यातून मला कुणीही सोडवू शकत नाही." धोबीच्या या करुण-कातर शब्दांनी सामाजिक बंधनांचे वास्तव चित्र सनियाच्या डोळ्यांसमोर रेखाटले. त्याने पाहिले की धोबीने जे काही सांगितलं ते सत्य आहे. या रूढिग्रस्त समाजात त्यांच्यासारख्या दुर्दैवी लोकांसाठी सुटकेला जागा नाही. त्यांच्या मुक्तीची दारे बंद आहेत. उत्तेजित होऊन त्याने जाहीर केले की, " हे घर सर्वांचं आहे. इथे जात, धर्म वा रंगाचा भेदभाव राहणार नाही. याच झोपडीत आम्ही नवे जग निर्माण करू. माणसाचा नवा समाज स्थापन करू." परिणामी, पतिता कई त्याची गृहिणी झाली, मुसलमान मुलगा रहीम त्याचा भाऊ व ख्रिश्चन जॉन त्याचा काका बनला. याखेरीज लंगडा चांभार भरतिया व आंधळा काशी हे त्याचे वारस बनले. ओस जमिनीत सोने उगवून त्यांनी एक नवे जग निर्माण केले.

संघर्षाच्या या अखेरच्या क्षणी, पुनी वा टिमीप्रमाणे समाजाची सारी बंधने तोडून जर धोबी बाहेर पडली असती तर कान्हुचरणचा आदर्श एक क्रांतिकारी आदर्श ठरला असता. पण त्याचा परिणाम काय झाला असता ? प्रतिक्रियावादी समाजाला त्या बंडाने ढवळून काढले असते खरे. पण त्याने समाजाची विवेकबुद्धी जागृत झाली नसती की हृदयपरिवर्तन झाले नसते. म्हणून कान्हुचरणनी धोबीच्या प्राणाची कुरबानी देऊन तिच्याच अश्रू व रक्ताने समाजाच्या ठेकेदारांच्या पाषाणहृदयात परिवर्तन घडवून आणले. शिक्षा (शास्ति) कादंबरीत सामाजिक विचारशून्यतेची शिक्षा जर कुणाला मिळाली असेल तर ती धोबीला. कान्हुचरणच्या असाहाय्य, पददलित नायिकांपैकी एक आहे ती ! सनियाच्या वडिलांना, बनेई परिडाला आपल्या उच्च जातीचा फार गर्व होता. त्याने धोबीला सून करून घ्यायला नकार दिला होता. संपत्तीच्या मोहाने चिंतेई सोईंनी आपल्या एकुलत्या एका मुलीचे धोबीचे लग्न धनवान नायकाशी लावून दिले. त्यात नशिबाने हात दिला नाही. थोड्याच महिन्यांत धोबी विधवा झाली. तिला काय गवसले व तिचे काय हरपले ? दुष्काळाचे वाईट दिवस आले होते आणि एखाद्या वाईट स्वप्नासारखे तिचे कौटुंबिक जीवन संपले होते. तिच्या मनात जी नवी आशा पालवली

होती ती सनियाच्या रूपात मूर्त झाली होती, सनियाला पाहून गतकाळातल्या कित्येक स्मृती पुन्हा तिच्या मनात उफाळून आल्या होत्या. पुन्हा एकदा तिने भविष्यकालाची सोनेरी स्वप्ने पहिली होती. पण धोबीच्या या नव्या स्थितीविषयी कुणीही सहानुभूती दर्शविली नव्हती. थंड ज्वालामुखीप्रमाणे धोबीने आपल्या सर्व अभिलाषा, आशाआकांक्षा आपल्या मनातच दडपून टाकल्या होत्या आणि हीच इच्छा व्यक्त केली होती की तिच्या मृत पतीच्या आत्म्याला शांती लाभावी. तिच्या बाबांचा मानसन्मान, धनसंपत्ती वाढावी आणि सनियाने स्वाभिमानाने पुन्हा घरसंसार थाटावा. ती एक भारतीय स्त्री होती. भारतीय स्त्रीच्या महान आदर्शानुरूपच तिने काम केले होते. जगाचे वाटोळे झाले तर होऊ देत पण माझा स्वार्थ सिद्धीस गेला पाहिजे असे चुकूनही कधी तिच्या मनात आले नव्हते. आपल्या हक्कासाठी तिने बंड केले नाही. पण समाजधुरीणांना बदलण्यासाठी तिने शांततापूर्ण सत्याग्रह केला होता. तिच्या प्रेमळ आईचे हृदय परिवर्तन तर झालेच होते आणि आई जेव्हा कायमची निघून गेली तेव्हा वडिलांचेही हृदयपरिवर्तन झाले. धोबीची साधना अशा प्रकारे सफल झाली होती. पण या साफल्यापूर्वीच, अन्य परिस्थितिवश सनियाने दुसरी वाट धरली होती. धोबी ते सहन करू शकली नाही. सर्व सुखांपासून ती वंचित होती. तिच्या विरक्त आत्म्याची कातर प्रार्थना होती—" मला दगडासारखं घट्ट करून टाक देवा—मला मूक करून टाक...अगदी तुझ्यासारखं..."

'शिक्षा'च्या अखेरच्या शब्दांतून फक्त धोबीचाच नव्हे तर आपल्या रूढिग्रस्त समाजाच्या बंधनात जखडलेल्या, अवमानित झालेल्या पददलित स्त्रीचा करुण स्वर प्रतिध्वनित झालेला आहे. सामाजिक कठोरपणा व धर्मांधता टाकून देण्यासाठी कान्हु-चरणनी दिलेली हाक, विध्वंसात्मक क्रांतीची सनियाची घोषणा आणि धोबीची कातर प्रार्थना यांच्या माध्यमातून विलक्षण परिणामकारकरीत्या कानावर येते.

असे वाटते की 'हा अन्न'च्या पार्श्वभूमीवर, 'शिक्षा' ही वास्तवाच्याऐवजी आदर्शाची कथा आहे. मृत्यूवरील जीवनाच्या विजयाची आणि समाजाच्या अंधविश्वासातून माणसाच्या मुक्तीची कथा आहे. सर्वांना आपलं करण्याचा सनियाचा आदर्श विफल झाल्याचे त्याने मान्य केले. धोबीने दिलेले सारे काही त्याने तिला परत देऊन टाकले. परिणामी धोबीलाही आपला आदर्श असफल झाल्याचे जाणवले हे सारे खरे, तरीदेखील चिंतेई सोईच्या गर्वोद्धत वक्षावर सनियाने जो कायमचा, कधीही न पुसता येणारा डाग लावला होता तीच त्याच्या आदर्शाच्या विजयाची खूण होती.

—डॉ. खगेश्वर महापात्र

पहाट झाली होती. पण सूर्य अजून उगवला नव्हता. पौषातली कडाडून टाकणारी थंडी होती. तरी सनिया चालतच होता. रात्रीचं दव त्याच्या अनवाणी पायांना बोचत होतं. नुसतं शरीरच नव्हे तर अंगातली हाडंदेखील कुडकुडत होती. अंग झाकायला एखादा कुडताही नव्हता. फक्त एक छोटंसं फडकं होतं. ते त्यानं कमरेभोवती लपेटलं होतं. या फाटक्या फडक्याची लक्तरं गुडघ्यापर्यंत लोंबत होती. अंगावर वरून जो कपडा घातलेला होता तो पण खूप जुना, दहा जागी फाटलेला होता. त्यानं अंग झाकलं जात नव्हतं. तरी सनिया पुढे जातच होता—अनवाणी, उघडया अंगानं !

सनियाला झालं तरी काय ? त्याच्या अंगात रक्त नव्हतं की मांस. कातडी जेमतेम हाडं झाकत होती. तरी हाडं मोजता येत होती. डोळे निस्तेज होते. केस विखुरलेले होते. अशक्तपणामुळे धड चालवत नव्हतं. पाय अडखळत, ठेचाळत होते. मान खाली होती. जणू जरासा हात लावताच तो खाली कोसळेल. हातातल्या काठीचं ओझं वाटत होतं. पण ती टाकून देणंही शक्य नव्हतं. आता या काठीशिवाय दुसरं काय आधारा-माठी राहिलं होतं ? हातातली काठीच त्याची मित्र होती, त्याच्या वडिलांची स्मृती.

समोर दिसणारा गाव—सनियाची ती जन्मभूमी होती. गाव दिसू लागताच तो खुलला. त्यानं दीर्घ श्वास घेतला. त्याचाच तर गाव होता तो ! त्याचा आवडता गाव, त्या गावावर त्याचं मनापासून प्रेम होतं. तोच गाव—जिथं त्याच्या पूर्वजांनी जन्म घेतला, संसार थाटला, मजेत हसत खेळत जगले आणि अखेरची वेळ आली तशी याचं गावच्या मातीत मिसळून गेले. गावच्या स्मशानात पूर्वजांचे निराकार आत्मे भेटतात.

आपला आवडता गाव !

सनिया खूश झाला. तो बहाद्दर होता. तो सतत मृत्यूशी झगडत राहिला. पण आजपर्यंत हारला नाही. **1890** सालचा (पुरीच्या महाराजांची नववी पिढी) दुष्काळ-देखील त्याला गिळू शकला नाही. जणू तो दुष्काळाच्या तोंडून निसटून पळून आला

होता. तीनच वर्षांपूर्वीची तर गोष्ट ! स्वत:चा जीव वाचवायला सनियानं काय केलं नव्हतं ? आजही तो विचार मनात येताच त्याचा थरकाप होतो आपली अस्वस्थता कुणी पाहत तर नाही ? सनियाने चहूबाजूला नजर टाकली. पोटाची खळगी भरणं अशक्य झालं तेव्हा नाइलाजानं सनियानं आपला जमीनजुमला, भांडीकुंडी सारं काही विकून टाकलं होतं. जे विकता आलं नव्हतं ते गहाण ठेवलं होतं. तरी सनिया पोट भरू शकला नव्हता.

भुकेपायी लोक गाव सोडून पळून गेले. सनियाचे आईवडीलदेखील पळून गेले होते. मग त्याचा धाकटा भाऊ मनिया पण पळून गेला. अखेर दहा आणि बारा वर्षांच्या आपल्या कुनी आणि पुनी या दोन बहिणींबरोबर त्यानंही गाव सोडलं. तेही फार दिवस एकत्र राहू शकले नव्हते. जीवनाची आसक्ती—स्वत: जगण्याची इच्छा बलवत्तर झाली तेव्हा नात्याच्या मायेची सारी बंधनं आपोआप तुटून गेली. एके दिवशी काय झालं, सनियाचे वडील काही खात होते. अचानक सनियाने जबरदस्तीने त्यांच्या हातून खायचे पदार्थ हिसकावून घेतले. प्रतिकार करायची ताकद सनियाच्या वडिलांमध्ये नव्हती. तो तर नुसता हाडांचा सांगाडा होता. त्यांचा एकमेव आधार होता त्यांची काठी. त्यांनी काठी उचलली पण ती हातातून खाली पडली. त्यानंतर तो सांगाडादेखील कायमचा.... ...

त्या दिवशी कुणी रडलं होतं का ? सनियाला आता आठवत नाही. मृताच्या हातून त्यानं काठी काढून घेतली आणि तो चालू लागला. त्याची म्हातारी आई, धाकट्या बहिणी आणि भाऊ स्मशानात रडत बसले. पण सनियानं मागं वळून काही पाहिलं नव्हतं.

एक दोन नव्हे, हजारो संकटं आली. पूर, अवर्षण, दुष्काळ यांच्या आघातांनी तो पार खचून गेला. काय योग्य व काय अयोग्य हेदेखील तो विसरून गेला. मनात एकच इच्छा प्रबळ होती—जगायचंय. भीक मागत मागत त्यानं सारा देश पालथा घातला. अंगात जेव्हा थोडीशी ताकद आली तेव्हा तो आपल्या गावाकडे वळला.

अन्नछत्रात तो जेवला होता. जरा आरामात थोडं खाता यावं म्हणून शेतांमध्ये मजुरी केली होती आणि बऱ्याच शेठसावकारांचे उपदेशही ऐकले होते. पण कशातच त्याचं मन रमलं नव्हतं. गावच्या मातीची ओढही तो टाळू शकला नव्हता. संधी मिळताच तो गावाकडे निघाला होता.

सनियाच्या समोर सर्वत्र हिरवळ होती. धानाच्या शेतीनं संपूर्ण प्रदेश बहरला होता. पण तिकडे त्याचं लक्ष नव्हतं. एखादं स्मशान कुठं दिसताच तो थबकत होता. आई, धाकट्या दोघी बहिणी, पंधरा वर्षांचा भाऊ मनिया–सर्वांची आठवण ताजी व्हायची, डोळे भरून यायचे. स्मशानातील हाडांच्या ढिगाऱ्यात कदाचित त्यांचीही हाडे असतील. सनियाचा थरकाप व्हायचा.

आज सनिया उसासा टाकत आहे. पण त्या दिवशी नव्हता टाकला. त्या दिवशी, लाखो स्त्रीपुरुष जेव्हा भिकेची झोळी हातात घेऊन मृत्यूशी झुंजत होते तेव्हा सनिया जगण्याच्या इच्छेनं पछाडला होता. त्या दिवशी त्याच्या डोळ्यात पाणी तरारलं नव्हतं. पण सर्वांनीच जणू जगण्यासाठी कंबर कसली होती, शपथ घेतली होती. ते सारे मृत्यूच्या तडाख्यातून बचावले का ? छे ! कित्येक जण मृत्युमुखी पडले आणि कायमचे निश्चेष्ट झाले. बाकी जे उरले त्यांच्यात जगण्याची इच्छाच उरली नव्हती. आपल्या कुटुंबातील लोकांच्या आठवणी सनियाला बेचैन करीत होत्या. तो स्वत:लाच विचारीत होता, 'का म्हणून मी जगतोय ? कशासाठी ? कुणासाठी ? कोणत्या सुखाच्या आशेनं ? कोणत्या इच्छापूर्तीसाठी ?' आपल्या सुखाचं चित्र इतरांच्या, आपल्या नातेवाईकांच्या ओठांवरच पाहण्याची माणसाची इच्छा असते.

सनिया का जगला ?

सनियाच्या सांगाड्याच्या आत जे एक दुबळं, अशक्त मन होतं त्यात भयंकर उलथा-पालथ होत असल्याचं त्याला जाणवलं. आपली आई, भाऊ, बहिणी सर्वांना सोडून कोणत्या आशेवर तो जगणार होता, तग धरणार होता ? मातृभूमीच्या ओढीनं त्याला दूर राहू दिलं नव्हतं. तो परत आला होता. कदाचित तेसुद्धा परतले असतील.

आपला गाव ! आता समोर दिसू लागलाय, तो आपला आवडता गाव. सकाळचा सूर्य आता वर येऊ लागला होता. नारळी-पोफळींच्या व देवदारांच्या उंच वृक्षांची दंव-बिंदूंनी भिजलेली पानं सूर्याच्या प्रकाशानं चकाकू लागली होती. सनिया पुढे चालत होता. हळूहळू तो पाऊल टाकीत होता.

सनियाच्या समोर होती धानाची पिकली सोनेरी शेतं. दूर क्षितिजापर्यंत नजर पोचत होती तिथवर धानाची तयार शेतंच शेतं पसरली होती. जणू कुणी पिवळ्या रंगाचा गालिचाच अंथरला होता. कापणी करणाऱ्यांची गर्दी दिसत होती. ऊन जरा डोक्यावर आल्यावर कापणी सुरू होईल. ओळखीचेच लोक आहेत वाटतं, हाक मारावी का ? तसं वाटतंय खरं पण हाक मारण्याइतकं बळ कुठाय अंगात ? त्यानं जोर लावून हाक मारायचा प्रयत्न केला. पण आवाज उमटला नाही.

सनिया चालत राहिला. पुढे जात राहिला.

गावच्या रस्त्याच्या दुतर्फा ओळीनं बरीच घरं होती. पण ती सर्वच्या सर्व घरं गेली कुठं आता ? गावाजवळच एक आंबराई होती. बालपणी त्या आंब्यांच्या फांद्यांवरच तो 'डालिमा कुडि' खेळ खेळायचा. झाडांच्या सावल्यांत 'बहूचोरी'चा खेळ आणि 'किया,' झाडाच्या आड 'लुचकालि' (लपंडाव) खेळ तो खेळायचा. आंब्याची झाडं जशीच्या तशी उभी होती. काहीसुद्धा बदललं नव्हतं. एकही झाड मेलं नव्हतं की एकही फांदी सुकली नव्हती. आंब्यांच्या झाडामागे लतावेलींची जी दाट झाडी होती

तीदेखील जशीच्या तशी होती. गावच्या अखेरच्या टोकाला असलेला वडदेखील अजून तसाच उभा होता. त्याच्याखालची एक धोक्याची जागा. एक नाग राहायचा तिथं. तोसुद्धा अजून होता. सनिया त्याला लहानपणापासून ओळखतो.

सारं जिवंत होतं—गावचे प्राणी, लतावेली, झाडं, हवा, पाणी, शेतं, पठार—फक्त माणसंच काय ती जिवंत नव्हती. हो, या जमिनीवर गाऊन नाचून बागडून तिला हिरवीगार बनवणारी, या प्राण्यांना ताब्यात ठेवणारी या गावची माणसंच आज नव्हती. गेले कुठे सर्वजण ? जगाची रीत ही अशीच आहे.

गावची पाऊलवाट सुरू झाली. सनियानं नजर टाकली. एक मोडकळलेली भिंत होती. वर छत नाहीच. खालची जमीन रानगवतानं भरून गेलेली. देवा देवा रे ! कुणीच नाही का वाचलं ? कुणीच का घरी परतून आलं नाही ?

घरांच्या दोन रांगा चांगल्या होत्या. पण आता त्यातली बहुतेक घरं पडली होती. काही घरांची डागडुजी झाली होती. घरातून जे लोक बाहेर पडत होते, सनिया त्या सर्वांना ओळखत होता. पण त्याला मात्र कुणीच ओळखत नव्हतं. कुणी देखील त्याची विचारपूस करीत नव्हतं.

सनियाच्या मनात आलं, का म्हणून कुणी कुणाला विचाराव ? ही काय नवी गोष्ट थोडीच आहे ? असे तर शेकडो सांगाडे, भिकारी दररोज यायचे—मूठभर भात वा थोड्याश्या ' तोराणि '(भाताची पेज) साठी हात पसरायचे. याच गावच्या पाऊलवाटे-वरून असंख्य सांगाडे नेहमी जायचे. कुत्र्यांच्या, लांडग्यांच्या तावडीत सापडायचे. त्यांचे भक्ष्य बनायचे. माणूसच बदलला होता. त्याच्या मनात दया, सहानुभूतीचा लवलेश उरला नव्हता. सनियादेखील दगडासारखा कठोर नव्हता का झाला ? चहूकडे एकच दृश्य होतं. भूक, संकटं, दुःख, लाचारी यांची करुण कहाणी. जे लोक जगले वाचले होते त्यांचे कान या करुण कथा ऐकून ऐकून अगदी संवेदनाशून्य, निर्जीव झाले होते.

सर्वजण सनियाकडे बघत होते. पण असं वाटत होतं जणू कुणीच त्याला बघत नाही आहे. वीस वर्षांचा तरुण आज सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्यासारखा दिसत होता. चार वर्षां-पूर्वी त्याच्यात जो जोम होता तो आज उरलेला नव्हता. सनिया त्या वेळी होता एक तगडा जवान—त्याची रुंद आणि भरदार छाती, मजबूत बाहू, वाटोळा चेहरा पाहून शत्रूलादेखील भय वाटायचं. कांद्याच्या शेताला पाणी द्यायचा—सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत त्या वेळी कसलीच काळजी नसायची. पाणी देता देता कधी कधी ' तेंडा ' (मजबूत लाकडी अवजार) मोडायचा पण सनियाची दमछाक होत नसे. पाहणाऱ्याला प्रशंसा केल्यावाचून राहवत नसे. म्हणत, ' बनेई ' (वनमाली) परिडाची दोन मुलं—सनिया व मनिया खरंच कर्तबगार, हुशार, रूप तसे गुण ! शिकले सवरले पण आहेत. ' गोपीभाषा,' ' मथुरामंगल,' ' विधि रामायण ' इत्यादी ग्रंथ मुखोद्गत आहेत. बनेई

परिडा भाग्यवंत आहे. त्याच्या कुळाचं नाव ही पोरं जरूर उजळ करतील.'

बनेई परिडाच्या वडिलांचं नाव होतं कनेई (कन्हाई) परिडा. मरताना कनेईने दोन गुठे जमीन आणि गवताची ही लहानशी झोपडी एवढंच काय ते मुलासाठी मागे ठेवलं होतं. जन्मभर मोलमजुरी करून त्यानं पोट भरलं. पण कनेई परिडाचं घराणं हलकं नव्हतं. लोक म्हणायचे, कनेई आत। गरीब झाला असला तरी त्याचे वडील बनेई परिडा या इलाख्यात सर्वांत श्रीमंत होते. लोकांमध्ये त्यांचा दबदबा होता. लोक त्यांना खूप मान देत.

बनेई परिडा मोलमजुरी करून जे काही मिळवीत त्यावर कधी पोटभर जेवायला मिळायचं तर कधी उपाशी राहावं लागायचं—असे दिवस जात होते. पण त्यातूनही ते जमेल तशी थोडी शिल्लक हमखास मागे टाकीत. अशा तऱ्हेनं थेंबे थेंबे करून त्यांनी छोटंसं तळं साचवलं. उभ्या आयुष्यात एकूण दहा एकर जमीन खरेदी केली. ज्या 'चनी'शी त्यांनी लग्न केलं, तीदेखील त्यांच्या हाताखाली चांगली तयार झाली. सुगृहिणी बनली. नवरा बायको दोघे तहान-भूक विसरून कामात गुंतून राहत. चार मुलांना त्यांनी वाढवलं. ती सर्व होती धरतीची लेकरं. धरतीवरच त्यांचं आयुष्य अवलंबून होतं. सर्व कामकाज—मग ते चांगले असो वा वाईट. मातीशी जोडलेलं असे. मातीशी त्यांचं नातं असे. दोन जोडी बैल आणि दोन दुभत्या गायी त्याच्यापाशी होत्या. चनी आणि बनेई दोघांचा आपल्या मुलांपेक्षाही गावावर अधिक जीव होता. कुणाशी त्याची जिवश्च मैत्री नव्हती की वैर नव्हतं. दोन मुलं, दोन मुली, दोन गायी, दोन जोडी बैल, आपल्या शेतातलं धान, मूग—बस्स, हाच होता त्यांचा संसार, त्यांचं जग !

लोक म्हणायचे, 'बनेई परिडाच्या शेतात सोनं उगवतं.' कुणीही त्यांच्या शेतांच्या बाजूला गेलं की दोन मिनिटं नजर खिळवून तसाच पाहत उभा राही. 'वा ! काय दाणेदार, नमुनेदार पीक आहे.' तोंडून नकळत उद्‌गार बाहेर पडे. पण त्याचं पीक पाहून लोकांना आनंद होत नसे. मनातल्या मनात ते मत्सराने जळफळत. पण बनेई परिडाला नीट ओळखणारे मात्र म्हणायचे, 'अरे, हे पीक नाही, हे समोर जे दिसतं ते बनेई व चनीच्या कष्टांचं फळ आहे. दोघांनी जणू आपल्या रक्तानं या शेताचं सिंचन केलंय.'

आपल्या दोन मुलांवर बनेई परिडांच्या फार मोठ्या आशा आकांक्षा होत्या. त्यांना वाटायचं—माझं आयुष्य ढोरासारखं कष्ट उपसण्यात गेलं. पण मुलांनी मात्र माणूस म्हणून जगावं. तेव्हा कुठं चार पिढ्यांपूर्वीची आपल्या घराण्याची प्रतिष्ठा पुन्हा परतून येईल. लोक निदान एवढं तरी म्हणतील की बनेई परिडानं कोसळलेलं घर पुन्हा उभं केलं, घराण्याला पुन्हा नावलौकिक मिळवून दिला.

मान आणि प्रतिष्ठा ! एका भोळ्याभाबड्या शेतकऱ्याला या शब्दांचा अर्थ काय

माहीत असणार ? मान प्रतिष्ठा या गोष्टी अशा आहेत की सागरातील लाटांप्रमाणे एका पाठोपाठ एक मान उंचावून येतात आणि मग मान खाली घालून काठावरच लीन होऊन परत जातात. त्यानंतर त्याहून आणखी मोठी एक लाट येते. किती वेळ ती लाट तग धरू शकणार ? गावापासून दूर शेतात रक्त-घाम गाळून काम करणाऱ्या माण-साला साप चावला. गेला बिचारा पण तो होता अमुक व्यक्तीचा नातू. ज्या व्यक्तीला फक्त आपल्याच गावात नव्हे तर इतरही दहा गावात मान होता, त्या व्यक्तीचा नातू काम करता करताच देवाघरी गेला. पण दुसरा माणूस ज्याला अजून दहा गावची माणसं ओळखतात, मान राखतात, तो मात्र 'गोटिपुअ'चा नाच बघता बघता भांगेच्या नशेत झोपी गेला—कायमचा. कोण होते हे महाशय ? पाच, सात पिढ्यांपूर्वी यांचे पूर्वज भिकारी म्हणून या गावात आले होते. यालाच म्हणतात मान, प्रतिष्ठा आणि कुळाच्या नावलौकिकाची दीर्घ कथा, पण बनेई परिडासारख्या साध्या, सरळ, निष्कपट, भाबड्या शेतकऱ्याला या साऱ्या गोष्टी कशा समजणार ?

अनंत अंतराळात आपलं हे सूर्यमंडळ खरंच किती लहान आहे. त्यातही आपली ही लहानशी पृथ्वी, या पृथ्वीवर आपला प्रिय भारत देश, भारतात आहे आमचा आणखी एक प्रदेश—उत्कल, या उत्कल प्रांतात आहे छोटासा जिल्हा. त्याचे मोज ना माप, आणि या जिल्ह्यात आहे बनेई परिडाचा अनोळखी गाव, या गावात बनेई परिडासारखा एक माणूस होता. त्याचं जणू काही अस्तित्वच नव्हतं. पण आयुष्यात काही करून दाखवायची, प्रगती करायची, घराण्याचं नाव उज्ज्वल करायची उमेद त्यानं धरली आणि त्यासाठी जिवापाड प्रयत्न केले होते.

देशात दुष्काळ पडला. महाराज खारबेल आणि पुरुषोत्तमदेवच्या लोकांवर उपास-मारीची पाळी आली, मूठभर अन्नाला ते महाग झाले. आणि माशांप्रमाणे ते रस्त्यांवर मरून पडले. असे हाल होतील, दुर्दशा होईल—असं स्वप्नातही कधी कुणाला वाटलं नव्हतं. बनेई परिडा तर मोठं होण्यासाठी, धनवान होण्यासाठी, घराण्याचं नाव उज्ज्वल करण्यासाठी धडपडत होते. जे काही धान त्यांनी साठवून ठेवलं होतं ते श्रीमंत होण्याच्या लालसेपायी विकून टाकलं होतं. परिस्थिती इतकी गंभीर होईल याची त्यांना काय कल्पना ? पण अखेर अशी वेळ येऊन ठेपली की त्यांना आपली धनदौलत, जमीन, घरदार सारं काही फुंकून टाकावं लागलं होतं. तरी प्राण काही वाचवू शकले नव्हते.

चिंतेई (चिंतामणी) सोईची मुलगी धोबी सनियासाठी सांगून आली होती. हे स्थळ सांगून आलं तेव्हा बनेई परिडानं गावच्या चार प्रतिष्ठित, वयस्क लोकांसमोर नाक मुरडून म्हटलं होतं—"आम्ही गरीब असलो म्हणून काय झालं ? खालच्या जातीत का लग्न लावणार ? वेळ आली तर मोलमजुरी करू, ओलीसुकी मिळेल ती खाऊन राहू. पण असलं हलकं कृत्य करणार नाही. आता तुम्हीच बघा. चिंतेई सोई कुणाचा

मुलगा आहे ? लोक म्हणतात, त्याच्या आजोबांनी ज्या मुलीशी लग्न लावलं होतं तिचा बाप तर खंडायत (खड्गायत) जातीचा होताच पण आईदेखील तांतियाई (कोष्टी) जातीची होती. आता काय झालंय ? चार पैसे गाठीला लागलेत हे खरं. पण तेवढयानं खंडायत रक्त का बदलणार आहे ? विचार करून बघा. अशा त्या माणसाचा हा नातू-चिंतेई सोई. त्याच्या मुलीशी धोबीशी मी माझ्या पोराची सोयरीक करू होय ? छे, प्रहराजजी, तुम्हीच सांगा, बनेई परिडाच्या वंशाला मुद्दाम कलंक लावू होय ?"

प्रहराजजी तपकीर ओढत होते. बनेई परिडाकडे टक लावून बघत राहिले. मग म्हणाले, " हे पाहा, त्यांनी चांगल्या चांगल्या लोकांशी लग्नसंबंध जुळवले आहेत. आता झाल्या गेल्या गोष्टी कोण इतकं बघतंय ?" बनेई परिडानं यावर काहीच उत्तर दिलं नव्हतं.

चिंतेई सोईची मुलगी धोबी अतिशय देखणी होती. गोरीपान, कमलाच्या फुलासारखी सुदर आणि मुलायम. अवघी तेरा चौदा वर्षांची तर होती. हसरी, हुशार आणि थोडी-फार शिकलेलीदेखील. तिचा निष्पाप चेहरा सर्वांचंच लक्ष वेधून घेई. बघणाऱ्याला लगेच तिच्याविषयी आपुलकी वाटू लागे. पण बनेई परिडाला मात्र तिच्याकडे बघून तांतियाई जातीच्या तिच्या पणजीची आठवण व्हायची. त्याच्या मनात यायचं– " या सुरेख मुलीत तिचं रक्त आहे. देवा देवा रे ! हिचं हे दूषित रक्त मी जाणूनबुजून आमच्या शुद्ध पवित्र रक्तात मिसळायचं होय ? आमचं रक्त बाटगं करायचं ! छे, छे, हे शक्य नाही."

दिसायला चांगली आहे म्हणून काय झालं ? घरात नाहीतरी शेणामातीतच राबावं लागणार आहे. कडक उन्हात शेताच्या बांधावर गुडघ्यावर बसून शेतातून तण काढावे लागतील. पावसाळयात डोक्यावर ओझं घेऊन भिजत शेतातून घरी यावं लागेल. ज्याला रोज काबाडकष्ट करावे लागतात त्याला लोण्यासारखं मऊ होऊन कसं चालेल ? संसार कसा रेटणार मग ? माधो राऊतची मुलगी त्या दृष्टीनं चांगली आहे. असेल अकरा बारा वर्षांची, नाव आहे कई. गोरीगोमटी नाही. पण कामाला हुशार आहे. कबुतरासारखी सतत इकडे तिकडे करणारी, चपळ, तल्लख. माधो राऊत गरीब आहे, पण त्यानं काही बिघडत नाही. त्याचं घराणं तर उच्च आहे, अस्सल आहे, कई त्याच उच्च कुळातली लेक आहे." बनेई परिडाच्या मनात हेच स्थळ भरलं होतं. सनियासाठी तीच मुलगी योग्य राहील—या सोयरिकीनं घराण्याची मानमर्यादा वाढेल.

बनेई परिडाचं गोत्र होतं—' भारद्वाज ' बिनी कांडी जुलाहा, निलू साहू हलवाई, राम आचार्य ब्राह्मण, श्याम धल क्षत्रिय, हे सर्वदेखील ' भारद्वाज ' गोत्राचेच. अनादि-काळी भारद्वाज वंशाच्या अनेक शाखोपशाखा झाल्या आणि आता, बनेई परिडा, बिनी

कांडी, निलू साहू, राम आचार्य ही सर्व वेगवेगळ्या जातीची मंडळी भारद्वाजाचीच वंशज आहेत. या सर्वांमध्ये भारद्वाज वंशाचंच रक्त आहे. पण हे सर्व ठाऊक असूनसुद्धा या गोष्टीकडे कुणी नीट लक्ष दिलं नाही. रक्ताचा अस्सलपणा बघण्याच्या पाठी सर्वजण लागले.

माणसाचं रक्त नेहमीच निर्मल असतं. सदोदित पवित्र असतं. कामकाजावरून माणसाचे वेगवेगळे विभाग तयार झाले होते. त्या विभागातून तयार झाल्या विभिन्न जाती. या ' जाती ' ला वास्तविक काही अर्थच नव्हता. ती निव्वळ स्वार्थी गरज होती. आणि ती अजून आहे. या जातींतूनच संस्कृतीचा जन्म झाला. या संस्कृतीच्या मूल्यांचं मूल्यमापन कसं करायचं ? त्यासाठी काही मानदंड नाही. माणूस आपल्या कल्पनेनंच आपलं मूल्यमापन करतो. स्वत:ला श्रेष्ठ समजतो–मी आहे आचार्य–लोकांचा गुरू. मी आहे सूर्यवंशी. मी आहे श्रीमंत–कुबेराचा वंशज. मी आहे यादव वंशी इत्यादी.

हे सारं बनेई परिडाला उमजलंच नाही. मानव येथून तेथून सारखाच आहे. प्रत्येकाला तेच दोन हात, दोन पाय, दोन डोळे ... पण त्याचा अर्थच बनेई परिडाच्या लक्षात येत नव्हता. सनियालादेखील तो उमगला नव्हता. पण धोबीच्या तारुण्याकडे जेव्हा त्याचं लक्ष जायचं, धोबीच्या चंचल डोळ्यांत जेव्हा तो डोकावून पाहायचा तेव्हा बाह्य भेदभाव सारे खोटे, मिथ्या असून माणुसकी नावाची त्याहून अधिक उच्च अशी काही गोष्ट मानवात असल्याचं त्याला जाणवायचं. खरंच धोबीच्या लालचुटुक ओठांवरचं निर्मल हास्य किती सुंदर होतं. सनिया शहारून जायचा. अंगावर काटा उभा राहायचा. त्याला वाटायचं, जगात जाती फक्त दोनच–स्त्री आणि पुरुष. एकाखेरीज दुसरा अपूर्ण राहील. जगासाठी स्त्री आणि पुरुष या दोनच जातीची फक्त गरज आहे. बाकी इतर सर्व जाती माणसानं निर्माण केलेल्या आहेत. या मानवनिर्मित जाती नसल्या तरी त्यामुळं जगाचं कोणतंही काम अडून बसणार नाही, अर्धवट राहणार नाही.

सनियाला अजून तो दिवस आठवतो. त्या दिवशी सनियाचं हृदय धोबीसाठी तळमळत होतं आणि धोबीचं मन सनियासाठी व्याकुळलं होतं. बनेई परिडाने जेव्हा या सोयरिकीला नकार दिला तेव्हा सनियाच्या हृदयावर मोठाच आघात झाला. पण प्रत्यक्ष वडिलांच्या विरुद्ध कसं जायचं ? त्याला वाटलं, ' आपण जर असं काही केलं तर ते लज्जास्पद नाही का होणार ? वडिलांनी जे काही केलंय ते योग्यच आहे. मान तुकवून ते मान्य करायलाच हवं. तोंड वर करून बोलायचा हक्क आपल्याला नाही. आपल्या नशिबी असलेली मुलगी म्हणजे–कई. प्रत्यक्षात आता कईच आपल्या घरची गृहिणी होणार. ती पुरुषी, थाटात हॅं हॅं करते आणि कुरूपदेखील आहे.'

सनिया मनातल्या मनात तडफडत होता. एके दिवशी कई आणि दुसऱ्या मुली जेव्हा ' मुदुरकुणी ' (भाद्र महिन्यात पूजिली जाणारी देवी) साठी फुले वेचत वेचत तलावा-

पर्यंत गेल्या तेव्हा धोबी आंबराईपाशी रेंगाळली होती. सनियाला बोलायची संधी सापडली होती. त्यानं धोबीपाशी जाऊन हळूच म्हटलं होतं, " काय करू धोवी ? बाबांनी नकार देऊन टाकला."

धोबीनं हसून उत्तर दिलं होतं, " अरे, असे उभे का ? जाऊन कई (कुमुद–पांढरं कमळ) तोडून घ्या की !"

सनियानं धोबीचा मऊ हात धरायचा प्रयत्न केला होता. पण धोवी तिथून पळून गेली होती.

त्यानंतर धोबीला भेटायचे आपले प्रयत्न सनियानं जारी ठेवलं होते. पण धोबीनं त्याला दाद दिली नव्हती. सनिया दिसला की ती तोंड फिरवून घ्यायची. पण कई मात्र सनिया भेटला की घुंगट काढून एका बाजूला उभी राहायची. घुंगटाआडून ती मंदसं स्मित करीत सनियाकडे बघत राहायची. पण सनियानं मात्र कधीच तिच्याकडे वळून बघितलं नाही.

प्रहराजकडून चितेई सोईला साऱ्या बातम्या कळत होत्या. ते पण गप्प बसले नव्हते. बनेई परिडाची घमेंड बघून ते म्हणाले होते–" अरे, बन्याचा बाप कनेई आमच्याच शेतात तर मजुरी करायचा. आमचा गोठा स्वच्छ करायचा. आता इतका गर्व झाला होय ? कुठवर टिकणार ही घमेंड ? गर्वाचं घर नेहमी खालीच होतं."

प्रहराज उद्गारले होते, " ही जगाची रीत आहे बाबा ! जग नेहमी बदलत असतं."

अखेर तच झालं. जग पुन्हा बदललं. अजून जेमतेम वर्ष उलटलं असेल नसेल तव-ढ्यात आपल्या पोरांच्या तोंडी दोन घास घालण्यासाठी भांडीकुंडी गहाण ठेवायची पाळी बनेई परिडांवर आली. पण भांडी गहाण ठेवणारा तर तोच काय तो होता– चितेई सोई. त्यांच्याच दारी जावं लागलं. चितेईपाशी भरपूर धान होतं. घरच्या लोकांनी तलवार हाती घेऊन त्याच चोरांपासून रक्षण केलं होतं. धानावर देखरेख करायला इमानदार नोकरचाकरदेखील खूप होते.

चितेई सोईच्या दारी एकच गर्दी उसळलेली होती. कुणाच्या हाती भांडी होती तर कुणाच्या हाती सोन्याचे दागिने. विकत घ्या नाहीतर गहाण ठेवा. पण पोटासाठी काही द्या. सारं काही गेलं तरी चालेल. पण जीव वाचू देत. बस्स. त्या सर्वांची एवढी एकच विनंती होती.

पण त्या वेळी सोईनं परिडाविषयी फारशी सहानुभूती दाखवली नाही. एक तोळा सोन्याच्या बदली पाच गौणी (सुमारे वीस किलो) धान मिळेल आणि एक एकर जमिनीच्या बदली दहा गौणी धान मिळेल, हाच भाव त्यांनी जाहीर केला होता. अशा

परिस्थितीत भांड्याकुंड्यांना कोण विचारतं ? त्यातूनही पुन्हा माणसाचा चेहरा बघून ते धान द्यायचे. माणूस कामाचा असेल तर धान द्यायचे नाहीतर नाही. बनेई परिडांचा त्यांच्यासमोर काय पाड ? कुठली काही गणती नसलेला तो एक सामान्य माणूस होता.

बनेई परिडाच्या घरात जे काही दागदागिने होते, गायीवासरं होती, ते सारं कधीच विकलं गेलं होतं आणि अजून कितीतरी काळ जायचा होता. कितीतरी दिवस जायचे होते. उपाशीपोटी किती दिवस घालवणार ? कसे घालवणार ? चिंतेई सोईनंपण आपला भाव आणखी चढवला. आता एक एकर जमिनीच्या बदल्यात फक्त तीन गौणी धान मिळत होतं. तेसुद्धा सर्वांना नाही. चिंतेई सोईच्या दृष्टीनं जे कामाचे होते, उपयोगी होते, त्यांनाच फक्त धान मिळत होतं. त्याचंही बरीक खरं होतं ! त्याच्याकडे लक्ष्मीचं भांडार थोडीच होतं ? कुणीही यावं, कितीही घ्यावं तरी संपूच नये ! त्याच्या धानाच्या भांडाराला पण गळती लागली होती. ते कमी कमी होत चाललं होतं.

तऱ्हेतऱ्हेची पानंमुळं खाऊन आणि पाण्यातले प्राणी खाऊन बनेई परिडानं तीन दिवस कसेबसे रेटले. पण पोराबाळांच्या तोंडात दोन घास घालायला हवेत ना ? ते कुठवर असे राहणार ? अखेर त्यांचं उपाशी पोटी रडणं सहन होईना तेव्हा जमिनीचे कागदपत्र घेऊन बनेई परिडा चिंतेई सोईच्या घरी गेले. ज्या जमिनीतून ते सोनं पिकवीत तीच आज विकून वीस गौणि फक्त धान घेऊन आले. तोवर निम्मा गाव रिकामा झालेला होता. लोक घरदार सोडून निघून गेले होते. जीव वाचवण्यासाठी वाट फुटेल तिथं परागंदा झाले होते. घरच्या लेकीसुनांनी अब्रू वाचवण्यासाठी आत्महत्या केल्या होत्या.

चिंतेई सोईचं धानाचं भांडार संपुष्टात येऊ लागलं होतं. पण त्यांच्या घरात सोन्या-चांदीचा ढीग लागला होता. गावात जितकी जमीन होती त्यापैकी निम्म्या जमिनीचे दस्तऐवज, विक्रीखतं त्यांच्या पेटीत दाखल झाली होती.

धान संपलं. अखेरीस ज्या लोकांना भुकेची व्यथा सहन होईना ते सर्व चिंतेई सोईच्या अंगणात येऊन थडकले. पण आता आपल्यापाशी धान किंवा भात काहीसुद्धा नसल्याचं आणि जे थोडंसं उरलं आहे ते आपल्या पोराबाळांसाठी असल्याचं चिंतेईनं सर्वांना स्वच्छ सांगून टाकलं.

बनेई परिडानंदेखील धान संपल्याचं चिंतेई सोईच्या तोंडून ऐकलं होतं. आता बनेईपाशी तीन एकर जमीन आणि आपलं राहतं घर एवढंच काय ते राहिलं होतं. सारं काही घेऊन टाका पण मला धान किंवा भात द्या म्हणून त्यांनी खूप विनंती केली, हातापाया पडले, पण चिंतेई सोईचं एकच उत्तर होतं–– "धान संपलं."

बनेई परिडाने गयावया करीत म्हटलं होतं— "तुमच्या घरी इतके नोकरचाकर आहेत. माझ्या दोन मुलींना तुमच्या घरी आसरा नाही का देता येणार ? यांना ठेवून घ्या. तुमच्या घरची सारी कामं करतील. धुणंभांडी, केरवारा, शेणगोठा सारं काही

करतील आणि त्याच्याबदली जी काही उरलीसुरली पेज द्याल ती पिऊन राहतील. नाहीतर इतक्या मोठ्या मुली कुठं दारोदार भटकत फिरतील ?"

" ते माझ्या हातात नाही परिडाजी, किती थोरमोठे लोक खलास झाले. आम्ही तर फार लहान आहोत. काळ बदलला आहे." सोईनं रोखठोक सांगून टाकलं.

चितेई सोईनं दार लावून घेतलं. परिडा कुटुंबाची मंडळी हताश, निराश होऊन परत फिरली. सनियानं एकदाच फक्त मागे वळून पाहिलं होतं. चितेई सोईच्या अंगणा-लगतच्या खोलीत धोबी होती. धोबीचा सारा चेहरा त्याच्या नजरेस पडला. चेहरा पार सुकून गेला होता. आणि त्यावर अश्रुधारा वाहत होत्या.

एवीतेवी गाव सोडून जावंच लागणार आहे, तर मुलींची काही ना काही सोय करायलाच हवी. बनेई परिडाचं वय झालं होतं. त्यांची घरधनीण चनीदेखील म्हातारी झाली होती. तिचं वाटेत कुठं काही बरंवाईट झालं तर म्हणता येईल–सुटली बिचारी, वय झालं होतं तिचं. दोन मुलं—सनिया आणि मनिया पुरुष आहेत. जीव वाचवायला ते काय वाटेल ते करतील–मग भीक मागायला लागो नाहीतर चोरी करायला लागो. पण पुनी व कुनीचं काय ? त्या कुठं जाणार ? त्यांचा जीव कसा बचावणार ?

परिडा मोठ्या आशेनं माधो राउतच्या घरी गेले होते. त्यांचं म्हणणं होतं की ' ही तीन एकर जमीन घ्या. पण पुनी आणि कुनीला आपल्या घरात थारा द्या. तुमची मुलगी कई जशी घरात राहतेय तशाच या दोघी पण राहतील. नशिबानं मी जगलो वाचलोच तर परत येऊन मुलीना घेऊन जाईन. पण जर मेलो तर मात्र या दोघी मुलीची जबाबदारी तुमच्यावर राहील."

पण परिडाच्या मनातली गोष्ट मनातच राहिली. मोठ्या आशेनं सर्वजण राउतच्या घरी पोचले तेव्हा दिसलं की राउत कपाळाला हात लावून बसला आहे. चेहरा पार पडलेला, डोळे डबडबलेले. परिडाला बघताच राउतनं त्याला मिठीच मारली. " माझा सर्वनाश झाला. सर्वस्व गेलं. आता तरी कईला कसं समजावू ?" राउतने म्हटलं.

माधो राऊतच्या घरात इनमीन तीन माणसं. स्वत: तो, त्याची बायको आणि मुलगी कई. दोन मुलं-मुली गेल्यावर उतार वयात कईचा जन्म झाला होता. मजेत दिवस चालले होते. जमिनीतून तांदूळ, मूग वगैरे जे काही पिकायचं त्यावर वर्षभर गुजराण व्हायची. पण दोन वर्षं पीकच आलं नाही तर गुजराण कशावर व्हायची ? आता काळ कठीण आला आहे, फार दिवस रेटता येणार नाही हे राउतच्या म्हाताऱ्या बायकोनं नीट ओळखलं आणि कुटुंबातील बाकीच्या दोन लोकांचं जिणं सुसह्य व्हावं म्हणून अखेर एक दिवस तिनं गळ्याला फास लावून आत्महत्या केली.

माधो राउत शोक करीत होता–" देवा, देवारे, हे काय झालं ? आता मी

काय करू ?"

परिडांनी त्याला समजावलं. ते स्वत: दु:खी होते. ते तर गेले होते आपली कर्मकथा सांगायला. पण अशा परिस्थितीत काय बोलणार ? गप्प राहिले. कईच्या मस्तकावर हात फिरवून तिचं सांत्वन केलं–" रडू नकोस बाळ. जे व्हायचं ते होऊन गेलं. गेलेलं माणूस आता परत का येणार आहे ? रडून काय उपयोग ? उगी. डोळे पूस." मग सनियाच्या आईकडे निर्देश करून ते म्हणाले, " आजपासून हीच तुझी आई."

माधो राउतच्या घरून बनेई परिडा स्वत:च्या घरी नाही परतले. ज्या वाटेवरून हजारो स्त्री-पुरुष निघाले होते तीच वाट त्यांनीपण धरली. स्वत:च्या कुटुंबासह तेपण पुढे निघाले, अनिश्चित भविष्याकडे. ...

कुठे गेले बनेई परिडा ? अनोळखी स्मशानात कायमचे झोपी गेले. आणि मुलं ? देवाला ठाऊक कुठे गेली ती ! पण सनिया मात्र जगला, वाचला. आपला हाडांचा सांगाडा घेऊन तो गावी परतला. जन्मभूमीची ओढच त्याला खेचून घेऊन आली. गावच्या लोकांना त्याचा मत्सर वाटायचा. धोबीनं तोंड फिरवलं. कईनं वेड्यासारखं त्याच्याकडे नुसतं बघितलं. सर्वात जास्त वेदनादायक तर आईचा मृत्यू होता. सनियाच्या मनात येत होतं. मनात आतून आईची हाक, धाकट्या बहीणभावाची माया जाणवत होती. तेदेखील परत आले असते तर ?

पण त्याचाच का होता हा गाव ? गावचा चेहरामोहराच बदलून गेला होता. हा त्याचा गाव वाटत नव्हता. त्याचा गाव तर सुखीसमाधानी लोकांच्या आनंदानं, हसण्या-खेळण्यानं गजबजलेला असायचा. त्या गावची समृद्धी संपुष्टात आलेली होती. गावावर स्मशानकळा आलेली होती. लोक ओळखू येत नव्हते. ती काय माणसं होती ? नुसते सांगाडे. सुकलेले चेहरे, विखुरलेले केस, प्रत्येक जण उदास, दु:खी.

ऊन तळपू लागलं होतं. सनिया गावात पोचला होता. कदंबाच्या झाडापाशी तो पोचला. झाडाखाली गोपीनाथाचं एक छोटं देऊळ होतं. समोर होता एक पक्का बांधलेला चौथरा. चौथऱ्यापाशीच होता एक मोठा तलाव—'गोपीसागर.' देवळाच्या भिंतीतून पिंपळाचं एक झाड उगवलं होतं. ते झाड आता चांगलंच मोठं झालं होतं. भिंतीला पडलेली फट आणखीन रुंद झाली होती. पूर्वी ती निम्म्या बोटाइतकी होती. वाढत वाढत ती दोन बोटं रुंद होईलसं वाटत होतं. तलावाच्या पाण्यापर्यंत ज्या दगडी पायऱ्या होत्या त्या ओबडधोबड झाल्या होत्या.

सनिया दमून गेला होता. काही गावकरी तलावापाशी ऊन खात बसले होते. सनिया त्यांच्यातच जाऊन बसला.

बिशी जेनानं तोंड वाकडं करून मनियाला म्हटलं, "ए, जरा सरकून तिकडं बस की ! कुठून आला कुणास ठाऊक, भिकारडा कुठला ?"

मनिया सरकून बसला. समोरच बसला होता बिशी काका. त्याच्याजवळ बसला होता राम ओझा, परि दलाई. ओळखीचे तर होते सारे. पण मनियाला मात्र कुणीच ओळखलं नव्हतं.

अखेर मनियाचनं आपली ओळख करून दिली, "बिशी काका, ओळखलं नाही ? मी मनिया आहे—मनिया. —"

या गावाला झालं तरी काय ? त्याला सतत ओढ वाटणारा गावच आज त्याला दूर ढकलतोय. गावची ओढ तो मनातून दूर करू शकला नव्हता. आपल्या गावी परतण्याचा एकाच इच्छेपायी त्याची तहान, भूक, झोप सारं हरपलं होतं. खूपच त्रास सहन करून तो आपल्या आवडत्या गावी परतला होता. पण त्याचा गाव आज त्याला जवळ घ्यायला तयार नव्हता. आज तो होता कंगाल—दरिद्री, भिकारी. त्याचं शरीर अपवित्र होतं, आत्मा अशुद्ध, भ्रष्ट होता. तो होता हीन, दीन, पतित. जातीत त्याला स्थान नव्हतं आणि समाजातदेखील. ...

त्या दिवशी गोपीनाथाच्या मंदिरासमोर खूप लोक जमले होते. चौथऱ्यावर चितेई मोई, राम प्रहराज, बिशी जेना, हरि महांति बसले होते. खालच्या बाजूला होते राम ओझा, परि दलाई, भगी साहू, बगी कांडी वगैरे. किडकिडीत पोरंपण जवळपास हुंदडत होती. थोड्या अंतरावर उभ्या होत्या—गावच्या काही लेकीसुना. मनिया परिडा हात जोडून जरा दूर बसला होता. आज त्याच्या पापाचा पाढा वाचला जाणार, त्यावर विचार केला जाणार, त्याला शिक्षा होणार.

त्यानं कोणतं पाप केलं होतं ? त्याचा अपराध काय ?

पोटासाठी त्यानंही इतरांसारखाच गाव सोडला होता. भिकाऱ्यांच्या तांड्यात सामील झाला होता आणि भिकाऱ्यांसाठी पोट भरायची जिथं व्यवस्था होती तिथं जाऊन इतरांबरोबर आपल्याही पोटाची खळगी भरली होती. पोटापुढं जातीबितीचा विचार मनाला शिवलासुद्धा नव्हता आणि तसा विचार मनात येणं शक्यही नव्हतं. जिथं दोन घास खायला मिळत—मग ते ब्राह्मणाचं घर असो नाही तर भंग्याचं—मनिया ते आनंदानं खाऊन आपलं पोट भरायचा. जीव वाचवण्यासाठी त्यानं कुत्र्याचं मांस शिजवून खायलाही मागंपुढं बघितलं नव्हतं गायीचंही खाल्लं होतं. ...

मनियाचे वडील वारले होते. पण त्यानं त्यांचं काही क्रियाकर्म केलं नव्हतं. त्याचं सुतक अजून फिटलं नव्हतं. त्याची आई, वहीण, भाऊ कुठे भटकत राहिले असतील कोण

जाणे ? त्यांनी कदाचित कुणा परधर्मीय माणसाचा आसरा घेतला असेल. त्यांची पण जात गेली असेल. पण आता प्रायश्चित्त मात्र सनियालाच करावं लागणार.

सनियानं सर्व कबूल केलं होतं. कितीही झालं तरी गावचे लोक ते आपलेच आहेत ना ? त्यांची सहानुभूती मिळवण्यासाठी त्यानं सारं काही स्पष्ट, खरं सांगून टाकलं होतं. गावकरी त्याच्या सुखदु:खाचे वाटेकरी होते. त्यांच्याचसाठी तर तो दुरून धावत आला होता. ...

जवळ जवळ सारेच लोक गाव सोडून पळून गेले होते. काही लोक मेले होते. काही बेपत्ता झाले होते. सनियाच्या अगोदर जे लोक गावी परतून आले होते त्यांच्यापैकीसुद्धा कित्येक मेले होते. जे उरले होते त्यांनी आपापल्या कुटुंबात दाखल होण्यासाठी प्रायश्चित्त म्हणून एकेक 'होम हवन' फक्त केला होता. त्यांना वेळेवर सल्ला मिळाला होता. म्हणून त्यांनी सनियासारखा आपल्या साऱ्या गुन्ह्यांचा पाढा सर्वांसमोर वाचला नव्हता. आपले अपराध मान्य केले नव्हते. त्यांनी हेच सांगितलं होतं की, लोकांकडे मजुरी करून त्यांना जे तांदूळ मिळायचे तेच त्यांनी झाडाखाली शिजवून खाल्ले होते. पर-जातीच्या लोकांच्या हातचं त्यांनी काही खाल्लं नव्हतं. त्यामुळे त्यांची जात भ्रष्ट झाली नव्हती. त्यांना प्रायश्चित घ्यायची गरज राहिली नव्हती.

गावकऱ्यांचा विचारविनिमय करून झाला. प्रहराजनी आपला निर्णय सांगितला—"होमहवन, शुद्धी, प्रायश्चित्त इत्यादी अनेक कार्ये करावी लागतील. ब्राह्मणभोजन घालावं लागेल. याखेरीज गोपीनाथाची पूजा होईल. अष्टौप्रहर चालणारे अखंड कीर्तन होईल. ही सारी कार्ये केली तरच सनियाला जातीत व समाजात पुन्हा घेतलं जाईल आणि जर त्यानं हे सर्व केलं नाही तर तो जातिबहिष्कृत राहील. समाज त्याला वाळीत टाकील. मग त्याला अस्पृश्यांबरोबर राहावं लागेल."

सनिया काय अस्पृश्य होईल ? तो जर अस्पृश्य झाला तर त्याला कुणाच्याही ओसरीवर बसता येणार नाही, विहिरीतून पाणी घ्यायचं तर दूरच राहिलं, विहिरीला शिवतासुद्धा येणार नाही. त्याला शिवणाऱ्याला त्याचा विटाळ होईल. त्याचं तोंड पाहणंसुद्धा लोकांना अमंगल वाटेल. अशा परिस्थितीत त्याला देवळात जाता येणार नाही. देवाचा प्रसादही घेता येणार नाही. माणसाच्या नावाखाली त्याला नुसतं भुताचं आयुष्य कंठावं लागेल.

सनिया मुकाट्यानं सर्व काही ऐकत होता. या लोकांना झालंय तरी काय ? दोन दिवसांपासून त्याच्या पोटात अन्नाचा कण नाही. पोटात भुकेचा आगडोंब उसळलाय. दोन घास जर मिळाले तर जीव वाचेल. गावचे लोक त्याच्या खाण्याविषयी तर काही बोलत नाहीयेत. नुसतं जात, समाज यांच्याविषयीच तर्कट चाललंय. सनिया टक लावून सर्वांकडे बघत होता. त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. खरंच काय झालंय या

लोकांना ? किती बदललेत सर्वजण ?

हरि महांति गावचा एक जाणता माणूस होता. " अरे सनि " त्यानं म्हटलं, " जो देवाघरी गेला तो सुटला. पण जो हयात आहे त्याला तर जातीपातीचे नियम पाळायला हवेतच ना ? समजलं ?" त्यानं पुढं म्हटलं, " अरे वेड्या, प्रहराजजी सांगताहेत त्याप्रमाणं सारं काही कर. मग आणखी काही करावं लागणार नाही. जोवर तू हे सर्व करणार नाहीस तुला कुणाच्या घरात शिरता येणार नाही. काय समजलं ना ?"

बगी कांडीनंदेखील हरि महांतीचीच री ओढली. " हो, शरीर तर पवित्र करायलाच हवं. शुद्धी आवश्यक आहे. शरीर जर बाटलेलं राहिलं, तर तुला कुत्रंसुद्धा विचारणार नाही, बाळ !"

इतरांनीदेखील असंच काही म्हटलं होतं. सनिया निमूटपणे ऐकत होता. त्याच्या तोंडून शब्दच फुटत नव्हता. आपले दोन्ही दुबळे हात जोडून त्यानं नमस्कार फक्त केला. अखेर सनियानं मान्य केलंच ना ? सर्वजण हेच म्हणत होते की सनियानं सर्वांचं ऐकलं, कबूल केलं. त्याच्या शहाणपणाची प्रशंसा केल्यावाचून त्यांना राहवलं नाही. सभा संपली. सर्वजण आपापल्या घरी निघून गेले. सनिया काही खाणार की नाही याची साधी चवकशीसुद्धा कुणी केली नाही. तो बापडा दोन दिवसांपासून उपाशी होता.

सुमसाम, स्तब्धता !

तीन प्रहर रात्र. आकाशात चंद्र उगवला होता. भुकेमुळं सनियाच्या शरीराला कंप सुटला होता. रक्त मांस तर नव्हतंच. कातडीचाच थरकाप होत होता. परदेशात झाडाखाली राहायची वेळ अनेकदा आली होती. पण आज आपल्याच गावी कदंबवृक्षाखाली रात्र घालवायचा प्रसंग यावा ? उपाशी पोटी त्याला जगता येईल ? काय करावं ? थोड्याशा भातासाठी वा ' पेजे ' साठी दुसऱ्यांपुढे हात पसरावा ? छे, तसं करायला आता मन तयार नाही. मोठा धीर करून तो गावी परतला होता. अनेक आशाआकांक्षा मनात होत्या. पण त्या सर्वांचा पार चुराडा झाला होता. मन निराशेनं भरून गेलं. सनियाच्या जिवाची नुसती तगमग चालली होती.

त्याला जगायचं आहे. पण का ? कुणासाठी ? कोणत्या आनंदासाठी ? आयुष्यात आता आणखी कोणतं सुख मिळणार आहे ? आई, बहीण, भाऊ,—कुठे गेले, काय झालं त्यांचं—देवालाच ठाऊक. जिवंत आहेत की मेले त्याचाच पत्ता नाही. घरच्या लोकांना सोडून जगणंच मुळातच किती कठीण आहे ? या समाजात जन्म घेणं हे जितकं सोपं आहे, तितकंच किंबहुना त्याहून अधिक पाप आहे जगणं. इतक्या मोठ्या गावच्या लोकांनी लाथ मारून त्याला हाकलून दिलं. तो काय करील काय नाही, जगेल की मरेल एवढंसंदेखील कुणाला विचारावंसं वाटलं नाही. लोकांना काळीजच राहिलेलं नाही. सगळे नुसते फत्तर झालेत.

फार विचार करायचं त्राण सनियात राहिलं नव्हतं. तो कदंबाच्या झाडाच्या आणखी जवळ सरकला. देवळाच्या जवळ जाऊन पडला. अति थकल्यामुळं त्याचे डोळे आपो-आप मिटले.

अरे वेडचा, धर्म सोडून कसा जगशील ? प्रहराज जे काही सांगताहेत ते मान्य कर. जोवर हे काम करणार नाहीस, कुणाच्या घरी जाता यायचं नाही—हो !

चिंतेई सोई आणि निधेई सोई (निधिराम सोई) दोघं भाऊ होते. चिंतेई मोठा होता. राजीव सोईच्या पहिल्या बायकोचा तो मुलगा. चिंतेई सात दिवसांचा असतानाच त्याची आई हे जग सोडून गेली. राजीव खूप निराश झाला होता. चिंतेईला कसं जगवावं—याचाच तो नेहमी विचार करायचा. गावच्या बायका आपुलकीनं चिंतेईची देखरेख करायच्या. पण कितीही झालं तरी तो दुसऱ्याचा मुलगा होता, त्यांचा पोटचा पोर थोडीच होता ? परक्या मुलावर करायची तितकी माया त्यांनी केली. मग तीही हळूहळू कमी होत गेली. आता राजीव सोईनं काय करावं ? त्यानं ठरवलं की दुसरं लग्न करायचं. चिंतेईचं पालनपोषण करण्यासाठी ते करायलाच हवं. वयाच्या चाळिसाव्या वर्षी तो तेरा वर्षांच्या एका मुलीला बायको म्हणून घरी घेऊन आला. ती मुलगी लहानच होती. पण राजीवच्या घरी पाय ठेवताच बायका तिला म्हणू लागल्या, " चिंतेईची आई !"

" चिंतेईची आई ?"

" हो, हो. तू चिंतेईची आई नाहीस तर काय ? बघ तर किती लहानसं बाळ केव्हाची तुझी वाट बघतंय."

हळूहळू चिंतेई मोठा झाला. राजीव सोईला नव्या बायकोपासून एक मुलगा झाला— निधेई. निधेईखेरीज आणखी काही मुलीही राजीव सोईला झाल्या. पण चिंतेईच त्यांचा सर्वात जास्त लाडका होता. मुली लग्न होऊन आपापल्या घरी, सासरी गेल्या. चिंतेईचं पण लग्न झालं. काही दिवसांनी राजीव सोईनी राम म्हटला.

आता घरची सारी जबाबदारी आपल्यावरच असल्याचं चिंतेई सोईनं ओळखलं. त्याने ती पेलण्यासाठी कंबर कसली. मी कष्ट करीन. याच गावात नव्हे तर आजू-बाजूच्या पंचक्रोशीत नाव मिळवीन. मी परिस्थितीपुढं हात टेकणार नाही—चिंतेईनं विचार केला.

धन–संपत्ती–आणखी संपत्ती–बस. चिंतेई सोईचं एकच ध्येय होतं. तो पैसे जमवू लागला. हळूहळू त्यांनी खूपसं धन गोळा केलं—विकलं—पुन्हा खरेदी केलं आणि विकलं. त्यांनी लोकांपासून—त्यातल्या त्यात लाचार झालेल्या विधवांकडून जमीन विकत घेतली. दागदागिने गहाण ठेवले. लोकांना रुपये पैसे व्याजावर उधार दिले. धूमधडाक्यात सावकारी सुरू केली. लोकांना ठाऊक होतं की चिंतेई सोई कुणाचा गैरफायदा घेत

नाहीत. कुणाचे पैसेदेखील जास्त घेत नाहीत पण—आपलं हक्काचं असेल ते अजिबात सोडत नाहीत. दयामाया न दाखवता पुरेपूर वसूल करतात.

हळूहळू चितेई सोईची ख्याती पसरली, संपत्ती वाढली आणि ते त्या प्रदेशातली एक विख्यात आसामी बनले. धाकटा भाऊ निधेईदेखील मोठा झाला. चितेईनी त्याचं लग्न लावून दिलं. शेतीवाडी, घरदारची सारी जबाबदारी त्याच्यावर सोडून चितेईनी फक्त सावकारीकडे लक्ष देणं सुरू केलं. तरी पण त्यांनी निधेईला अगदीच मोकळं रान दिलं नाही. वेळप्रसंगी गरज पडली की ते निधेईला बोलावून कारभाराची चौकशी करीत.

चितेई सोईला एकच मुलगी—धोबी. गावच्या बायका चेष्टा करायच्या—धोबीची आई वांझ आहे, वांझ. जिला मुलगा नाही ती वांझ नाहीतर दुसरं काय ? चितेई सोई सारं ऐकायचे. पण उत्तरादाखल म्हणायचे— "मला मुलगा नसला म्हणून काय झालं ? निधेईला तर आहेत. आपल्या बायकोला पण हेच उत्तर देऊन ते तिला गप्प बसवायचे—" निधेईची मुलं तुझीच तर आहेत." चितेई सोईची बायको वरून हसायची पण आत हृदयात खोलवर कुठेतरी एक जखम भळभळत राहायची. व्रत-वैकल्यं, उपासतापास करीत ती वेळ घालवायची. आई अंबाबाई प्रसन्न झाली तर कदाचित मुलगा होईलही. पण तिची कूस उजवली नाही, मुलगा झाला नाही.

आजीपाशी सारी पोरं हुंदडायची, दंगामस्ती करायची. खेळायची. आजी लाडाने सर्वांची देखरेख करायची, सर्वांवर माया करायची. पण धोबीवर तिचं सर्वांत जास्त प्रेम होतं. नेहमी ती धोबीला आपल्याजवळ बसवून घ्यायची. तिच्या तोंडावर जरा-देखील धूळ लागली तरी आपल्या पदराने पुसून ती स्वच्छ करायची. तिला मांडीवर बसवून गोष्टी सांगायची.

त्या प्रदेशात दुष्काळ पडला. परिणामी गावकऱ्यांची धनदौलत चितेई सोईच्या घरात आली. जी मंडळी पोट भरण्यासाठी विष्णुपुर गाव सोडून बाहेर निघून गेली, त्यांचे दागदागिने, भांडीकुंडी सारं चितेई सोईच्या घरी आलं. गावकऱ्यांचा जमीन-जुमला, गायीम्हशी, बैलजोडया, आता चितेईच्या झाल्या होत्या. गावाबाहेर दृष्टीच्या टप्प्यापर्यंत दिसणारी जमीन आज फक्त एकाच्या मालकीची होती—चितेई सोईच्या ! गावात राहणारे सर्वजण चितेई सोईच्या घरी मजुरी करीत होते.

एका गरिबाघरी जन्मलेले चितेई सोई आज सर्वांत धनवान बनले होते. गावात त्यांचा एकाधिकार होता. त्यांच्या मर्जीने पान हलत होतं. त्यांच्या इशाऱ्यावर प्राण द्यायला लोक तयार होते. ते समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती होते—समाजाचे अध्वर्यू. त्यांनी काही म्हटलं की प्रहराज पंडित लगेच शास्त्रातून त्याचा दाखला काढून देत—एक दोन श्लोक ऐकवीत आणि त्यांच्याच बोलण्यास पुष्टी देत. शास्त्रात जर काही सापडलं नाही तर स्वतःच मनातल्या मनात एखादा श्लोक रचून तो सुनावीत आणि

सांगत, " चिंतेईजी सांगताहेत तेच खरं आहे. शास्त्रात हेच तर म्हटलं आहे की. ..."

दुष्काळ ! घोर दुष्काळ ! गावोगावी लोकांचे संसार उधळले गेले, उद्‌वस्त झाले. पण त्याचबरोबर काही लोकांनी वाहत्या गंगेत हात धुऊन घेतले. त्यांना सुवर्ण संधी मिळाली. दुष्काळ हे त्यांच्यासाठी देवाचं वरदान ठरलं. लोकांच्या घामानं, रक्तानं यांची नवी घरं उभी राहिली. नवे तलाव खोदले गेले. नवी मंदिरं बांधली गेली. मंदिरातल्या टाळमृदंगांच्या गजरात मरणासन्न लोकांचं विव्हळणं ऐकू येईनासं झालं.

दोन वर्षांपूर्वी, उपाशी पोटी लोक माश्याचिलटांसारखे रस्त्याच्या कडेला पटापट मरत होते तेव्हा चिंतेई सोईची इस्टेट सारखी वाढत होती. कंगालांच्या कातर स्वराने गावच्या वातावरणाचा थरकाप उठत होता. भुकेची आग विझवण्यासाठी लोक काय वाटेल ते खात होते. विषारी रानपालादेखील गिळत होते. तशाही परिस्थितीत चिंतेईनं आपल्या लाडक्या मुलीचं, धोबीचं, लग्न करायचं ठरवलं होतं.

धोबीचं लग्न झालं होतं.

दुर्गापुर गाव विष्णुपुराहून फक्त दोन कोसांवर होतं. वाटेत 'खरसुआं' नदी लागायची. जितेई नायक दुर्गापुरचा मोठा माणूस होता. नितेई हा त्याचा एकुलता एक मुलगा होता. नितेईशी धोबीचं लग्न झालं. लोक खूष झाले. 'मणिकांचन योग' जुळून आला म्हणू लागले. थोरामोठ्यांची थोरामोठ्यांशीच मैत्री होते. सर्वांनाच हे आवडलं. चिंतेई सोईनंदेखील भरपूर हुंडा दिला होता. लोक म्हणत होते, चिंतेईनं लेकीला सोन्यानं मढवून टाकलं.

प्रहराज पंडितानं धोबीच्या हातावर नितेई नायकचा हात ठेवून म्हटलं होतं.

" यथा रावणस्य मंदोदरी

यथा धृतराष्ट्रस्य गांधारी

यथा रामचंद्रस्य सीता..." इत्यादी. त्यांना खूप आनंद झाला होता. आपली विद्वत्ता दाखवण्यासाठी ते म्हणाले होते, " सोईजी, देवाची करणी अगाध आहे. जितेई नायक लक्षाधीश आहे. त्यांच्याशी संबंध जुळून आला, किती छान झालं. कुठं लक्षाधीश जितेई नायक आणि कुठे कंगाल बनेई परिडा. जरा विचार करून पाहा..."

पंडितजींचं बोलणं धोबीच्याही कानांवर आलं होतं. ती विवाहवेदीवरच बसली होती. तिचं अंग शहारलं होतं. दोन वर्षांपूर्वीची गोष्ट आठवली होती. बनेई परिडानं भुकेपायी चिंतेई सोईच्या दारी येऊन भीक मागितली होती. त्याची पोरंबाळं त्याच्या बरोबरच होती. सनिया पण उभा होता. पण चिंतेई सोईनं अखेरचं सांगून टाकलं होतं की काहीसुद्धा मिळणार नाही. सर्वजण निघून गेले होते. सनियानं परत जाताना एकदाच मागे वळून पाहिलं होतं—धोबीच्या डोळ्यांकडे. तो अतिशय निराश झालेला होता. त्याला काही बोलायचं होतं. पण बोलू शकला नव्हता. मनातली गोष्ट मनातच राहिली.

त्या दिवशी जर बनेई परिडानं आपली चूक कबूल केली असती आणि चिंतेई सोईशी नातं जुळवायला ते तयार झाले असते तर पारडंच फिरलं असतं. चिंतेई सोईनं परिडा घराण्याला कंगाल होऊ दिलं नसतं. पण असं झालं असतं तर आज धोबीचं कुणाशी लग्न लागलं असतं ?

ओढणीच्या आत धोबीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. अश्रूंनी अंधुक झालेल्या नजरेनं ती बघू लागली. एका तरुणाचं चित्र—सनिया—एक देखणा चेहरा—बळकट बाहू—पण डोळ्यांत नीरसतेची छाया—काय सांगायचं आहे सनियाला ? त्याला काही सांगायचं होतं. पण सांगू शकत नव्हता.

धोबीचे डोळे मिटले. आपल्या कठोर वडिलांच्या अंगावर ती कोसळली. चिंतेई सोईनी मुलीच्या पाठीवर हात फिरवला. न्हाव्याला धमकावलं, " अरे ए फगू ! इकडे तिकडे काय बघतो आहेस ? वारा घाल लवकर. दिसत नाही होमाच्या धगीनं मुलीला घाम फुटलाय. भिजून चिंब झालीय."

पित्यानं मुलीच्या शरीराचं दुखणं ओळखलं. पण मनाचं दुःख ? ते फक्त धोबीलाच जाणवत होतं.

लग्नानंतर धोबी मेण्यात बसून सासरी निघाली. दाराच्या चौकटीतून तिची नजर भिरभिरत होती. रस्त्याच्या दुतर्फा भिकारी उभे होते—कंगाल. पण सनिया ? सनिया पण यांच्याचपैकी आहे ? कुठं उभा आहे सनिया ? धोबीचा थरकाप होत होता.

दुर्गापूरमध्ये कंगालांची गर्दी होती. जितेई नायकानं अन्नछत्र घातलं होतं. त्याच्या कुळाची लक्ष्मी धोबी कंगालांना बघून अश्रू ढाळीत होती. भिकारी उपाशी असला तर तीदेखील उपाशी राहत होती. बिछान्यावर पडली की भान हरपून जात होती. जितेई नायकाला हे कुठवर सहन होणार ? धोबीचे पती नितेईदेखील जवळ बसून तिची प्रेमानं विचारपूस करायचे. तिच्या दुःखाचं कारण विचारायचे. पण उत्तरादाखल धोबी नुसतं जरासं स्मित करायची. तिच्या तोंडून शब्द फुटत नसे.

अखेर एके दिवशी धोबीनं सांगून टाकलं. गोरगरिबांची ही हीनदीन अवस्था तिच्यानं बघवत नव्हती. जितेई नायक धनवान होता. गरिबांसाठी एक अन्नछत्र घालणं त्याला काही फारसं अवघड नव्हतं.

नितेईनं देखील आपल्या वडिलांना हाच सल्ला दिला होता. लाडक्या सुनेच्या इच्छेचा अवमान जितेई नायकाला करता आला नाही. त्यानं एक अन्नछत्र घातलं.

दूरदूरहून भुकेकंगाल येऊ लागले. समुद्राच्या लाटांसारखे अगणित भिकारी आले. एका पाठोपाठ एक. दुर्गापूरचे बरेच लोक गाव सोडून गेले होते. त्याच्या रिकाम्या घरांत भिकारी भरले. पण सर्वांना जेवण घालणं शक्य नव्हतं. दररोज काही लोक मरत होते. प्रेतं उचलण्यासाठीदेखील कुणी पुढे होत नव्हतं. माश्याचिलटांसारखे लोक

जिथे मेले तिथेच पडल्या पडल्या सडून गेले. प्रेतांच्या दुर्गंधीने दुर्गापूरचं वातावरण दूषित झालं.

जितेई नायकानं हे काय केलं ? इतक्या लोकांना जेवण घालायची त्याची कुवत नव्हती. आता काय करावं ? त्याला काही सुचत नव्हतं. त्याच वेळी पंडित प्रहराजला बरोबर घेऊन चितेई सोई दुर्गापूरला पोचले. त्यांनी जितेई नायकाला खूप समजावलं. " व्याहीजी, इतक्या लोकांना जेवण घालून त्यांना जगवणं तुम्हाला शक्य नाही. धोबी अजाण आहे. इतक्या मोठ्या जबाबदारीचा अर्थ तिला काय कळणार ? दिवसेंदिवस कंगालांची संख्या वाढत जाईल. तुमच्या आटोक्याबाहेर जाईल."

जितेईनं म्हटलं—" देवावर भरवसा आहे. नितेई काय वेडा आहे. आम्ही कशा-साठी हे सारं कमावलं आहे ? इष्टेट राहिली तरी उद्या हेच मालक होतील. नाही राहिली तर यांनाच त्रास होईल. इष्टेट जातेय तर जाऊ द्या. या इतक्या सर्व लोकांचा आशीर्वाद त्यांच्यापाशी राहील. त्याच शिदोरीवर हे घर संसार उभारतील."

पंडित प्रहराजनी थोडीशी तपकीर ओढली—म्हणाले, " कलियुगात दुष्टांच्या विनाशार्थ देव स्वतः थोडीच पृथ्वीवर अवतरतात ? त्यांनी सुदर्शनचक्र पाठवलं आहे. आता जगात जितके म्हणून महापापी आहेत ते सर्व रस्त्याच्या काठी मरून जातील. देव स्वतःच्या हातांनी दुर्जनांचा संहार करीत नसतो. तो लोकांना अन्नपाण्यापासून वंचित करून मारतो. नायकजी, कलियुग संपत आलंय. पापीजनांप्रती सहानुभूती दाखवणे ठीक नव्हे."

चितेई सोई आणि पंडित प्रहराज निराश होऊन घरी परतले. जितेई नायकानं अन्नछत्र बंद केलं नाही. नितेई नायक काही तरुणांना घेऊन पुढे सरसावला. जितकी प्रेतं कुजत पडली होती ती सर्व खांद्यांवर उचलून दूर एके ठिकाणी टाकून आले.

संकटं कधी एकेकटी येत नाहीत असं म्हणतात. दुष्काळाबरोबरच कॉलऱ्याची साथ पसरली. रोज शेकडो कंगाल मरू लागले. नितेईनं आता काय करावं ? दररोज मेलेल्यांना उचलून दूरवर टाकून येणं—हेच त्याचं काम होतं. धोबी हे सर्व पाहात होती. कॉलऱ्यानं मेलेल्या लोकांना असं खांद्यावरून घेऊन जाण्यात धोका होता. तिनं नितेईचा हात धरून म्हटलं, " मी नाही जाऊ देणार. आता या गावात राहाणं ठीक नाही. चला आपण विष्णुपूरला जाऊ या. तिथे काही दिवस राहून परत येऊ."

" ए, हा काय वेडेपणा ? भीती वाटतेय तुला ? इथे देव नाही का ? तो तर सर्वत्र आहे. प्रेतं उचलली नाहीत तर बाकीच्या लोकांनाही वाचवता यायचं नाही. तुला समजतं ना हे सारं ?" नितेईनं धोबीच्या मस्तकावर हात ठेवला होता. मधून मधून तिच्या केसांवर तो हात फिरवीत होता.

नितेईनं कमरेला पंचा बांधला आणि तो निघून गेला. धोबीनं पदर डोक्यावर घेऊन

देवापुढे डोकं टेकलं.

नितेईचं साहस बघून त्याच्या वडिलानं पण प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी कंबर कसली. दिवसेंदिवस कॉलऱ्याचा जोर वाढू लागला. पोटाची आग शमवणं लोकांना शक्य नव्हतं. भलतं सलतं घाणेरडं खाण्याचा परिणाम असा झाला की घरोघरी कॉलरा फैलावला. गावच्या देवतांना लोकांचं रक्षण करता आलं नाही. अखेर एक दिवस उजाडला—जितेई नायक व त्याचा मुलगा नितेई नायक दोघेही एकाच वेळी कॉलऱ्यानं आजारी पडले. धोबी आणि तिची सासू दोघी रात्रभर रडत राहिल्या. सकाळी चिंतेई सोईला बातमी मिळाली की जितेई नायक व त्याचा मुलगा नितेई नायक दोघांना देवाज्ञा झाली. घरात कंगाल घुसले होते आणि हाती लागेल ते घेऊन पसार झाले होते. घर लुटून गेले होते.

धोबी विधवा झाली. लग्नाला अजून पुरतं वर्षसुद्धा उलटलं नव्हतं. ती वडिलाच्या घरी माघारी आली. का दैवानं तिचा असा घात केला ? याला जबाबदार कोण ? का म्हणून तिचा सोन्यासारखा संसार उद्‌वस्त झाला ? मनात हे विचार येऊन धोबी तळमळत होती. भुकेकंगालांचं दुःख तिला पाहवलं नव्हतं. सहानुभूती दाखवण्यासाठी तिनं अन्नछत्र घालायचा सल्ला दिला होता. अखेर पदरी काय पडलं ? तिच्याच संसाराचा सर्वनाश झाला.

दोन महिने धोबी बिछान्यावर पडून राहिली. अश्रू ढाळण्यात तिचा सारा वेळ जात होता. आईनं खूप समजावलं पण तिला काही उमजेल तर ना ? आईनं म्हटलं, "बाळ, का असं जिवाला लावून घेतेस. जे व्हायचं होतं ते होऊन गेलं. ते एक वाईट स्वप्न होतं असंच समज. तू माझी लाडकी लेक आहेस. अजून काही वेळ गेलेली नाही. मी तुझं दुसरं लग्न लावून देईन. चल, ऊठ बघू."

हे ऐकताच धोबी आणखी रडू लागली होती. बराच वेळ ती ओक्साबोक्शी रडली होती.

आजीपण येऊन सांत्वन करायची. कधी कधी थट्टा पण करायची, "अग एक गेला म्हणून काय झालं ? दुसरा येईल." मग धोबीचं मस्तक मांडीवर घेऊन ती तिला धीर द्यायची. "विसर सगळं. अग वेडे ! तो भातुकलीचा खेळ होता समज. असं वैतागून जायची काही जरूर नाही. मी पुन्हा तुझ्यासाठी सोन्याची बाहुली आणून देईन."

धोबीला हे सर्व पसंत नव्हतं. ती आपला हात सोडवून आजीपासून दूर व्हायची.

धोबीचे काका निधी सोई धोबीपाणी वरचेवर यायचे. धोबीच त्याचं जीवनधन होती. लहानपणापासून ती त्यांच्या अंगाखांद्यावर वाढली होती. त्यांनाच काय ते धोबी आपल्या मनातलं सांगायची, दुसऱ्या कुणाला नाही. कित्येक गोष्टी तर ती आपल्या मैत्रिणींना पण सांगू शकत नसे. पण तेच काकांपाशी सांगायला मात्र तिला संकोच वाटत नसे.

निधी सोईदेखील धोबीला योग्य तो सल्ला देत. इतकी पोरंबाळं असूनही धोबी त्यांना आपल्या एकुलत्या मुलीसारखी वाटायची.

आज धोबीला हे काय झालंय ? काकाचं हृदय आक्रोश करायचं. धोबीकडे बघताच त्यांना रडू अनावर होई. धोबी त्यांच्यापाशी येताच रडू लागायची. काका तिला छातीशी कवटाळून तिच्या पाठीवर मायेनं हात फिरवायचे. " धोबी हे काय लावलं आहेस ? अग तुझा काका अजून जिवंत आहे. जोवर माझ्या जिवात जीव आहे मी तुला अश्रू गाळू देणार नाही. उगी, सारं काही ठीक होईल."

धोबी गप्प व्हायची. काकू जाता जाता थबकायची आणि तोंड फिरवून निघून जायची. लहान भावंडांना धोबीचा लळा होता. ती धोबीपाशी यायची. तिच्या पाठीवर चढायची.

गावातले हरी महांती कोर्टकचेऱ्या करण्यात वस्ताद होते. चितेई सोईनी हरी महांतीला बोलावलं. विचारलं, " जितेई नायक व नितेई नायकांनी मागे बराच जमीन-जुमला ठेवला आहे. त्याचं काय होणार ? त्यांचे नातलग लुबाडणार का ?"

हरी महांतीनी मिशीवर हात फिरवला. मग चितेई सोईच्या कानाशी येऊन म्हणाले, " सोईजी, नातलगांनी जर त्यांचा जमीनजुमला लुबाडला तर मी लेखणी सोडून हमाली करायला लागेन. समजलं ? या कागदावर कुणाचा अंगठा आहे माहीत आहे ? हा आहे जितेई नायकांचा आणि हा आहे नितेई नायकांचा. हा कागद नीट सांभाळून ठेवा. याचा मोठा उपयोग होईल. ठाऊक आहे मी काय केलं ते ? तुम्ही जेव्हा लेकीला समजावीत होता तेव्हा मी दोन्ही प्रेतांपाशी जाऊन त्यांचे अंगठे या कागदावर लावून घेतले. काय समजलं ?"

हरी महांतीने हेसुद्धा सांगितलं की, " जोवर धोबी दुसरं लग्न करीत नाही तोवर तीच साऱ्या इष्टेटीची मालकीण होईल. तिनं दुसरं लग्न केलं तर मात्र संपत्तीवरचा तिचा हक्क जाईल. या कागदानं धोबीला दत्तक घ्यायचा अधिकार मिळेल. त्यासाठी परवानगी देणारे असतील खुद्द जितेई नायक आणि नितेई नायक. मागल्या तारखेवरून हा कागद लिहिला जाईल. धोबी कुणाला दत्तक घेईल माहीत आहे ? आपल्या धाकट्या भावाच्या, निधी सोईच्या मधल्या मुलाला विदेई (विद्याधरा) ला !"

" स्वतःच्या भावाला ?"

" हो, हो, भावाला. कायदा काही का म्हणेना. पण असं होत असतं. देशात तशी पद्धत आहे. सोईजी, मी लेखणी चालवतो, नांगर नाही म्हटलं. दोन्ही कुळांची मालमत्ता एक होईल. आजपासूनच संपत्तीवर नजर ठेवा. संपत्ती आपल्या ताब्यात ठेवा. देखरेखी-साठी माणूस नेमा. एकदा स्वतः जाऊन डोळ्यांखाली घालून या."

" ठीक आहे महांतीजी ! तुम्ही काय आपले घरचेच आहात. एकदा तुम्हीच जाऊन

या बघू. धोबी तुमच्या नावे तसं मुखत्यारपत्र देईल."

" हे पाहा, मला काही वेळ नाही. पण तुमचा आग्रहच असेल तर जाईन बापडा."

हरी महांतीच्या नावे धोबीनं मुखत्यारपत्र दिले. ते अधिकारपत्र रजिस्टरही करण्यात आलं. राम प्रहराज, बिशि जेना आणि नीलू साहू हे साक्षीदार बनले. आता कुठे चिंतेई सोई निश्चित झाले. हरी महांती मिशीवर ताव देत होते. म्हणाले, " सोईजी, अक्कल असली म्हणजे पाण्यातूनही लोणी काढता येतं."

चार महिने उलटले. धोबीनं सुटकेचा श्वास टाकला. घरच्या कामकाजात ती दंग राहू लागली. आता ती विधवा होती. दर महिन्याला व्रतवैकल्यं करणं तिचा धर्म होता. गोपीनाथ, नीलकंठेश्वर महादेव, आणि रामचंडी देवीच्या आराधनेत ती आपला वेळ घालवू लागली. एकटं राहणं तिला अधिक पसंत होतं. आपल्या खोलीत ती पुराणं वाचीत बसायची. वाचता वाचता अचानक तिला रडू कोसळायचं. मग स्वतःच डोळे पुसायची.

आजी आत आली म्हणजे थट्टा करायची. आई येऊन अश्रू पुसायची. म्हणायची, " अग वेडे, हे काय चालवलं आहेस ? ये, तुला हे दागिने घालते. अग आज तुझी झाली आहे तशी अवस्था कित्येक जणींची झाली आहे. पण सतत थोडीच कुणी रडत बसतं. त्या सर्व जणी आपलं दुःख विसरून पुन्हा आपलं नवं घर उभारतात."

धोबी काही बोलत नसे. दागिने घालायची आणि काकूसमोर जाऊन उभी राहायची. काकू म्हणायची, " नितेई किती चांगला मुलगा होता. जसे रूप तसे गुण." धोबीला पुन्हा रडू यायचं.

वडील नेहमी कामकाजात गुतलेले असायचे. धोबीला भेटायला त्यांना कधी सवडच मिळत नसे. पण काका मात्र घरी आले म्हणजे अगोदर धोबीलाच हाक मारायचे, "धोबी बाळ, जरा तेलाची वाटी आण बघू. मला आंघोळीला जायचंय." असं वाटायचं, जणू घरात दुसरं कुणी नाहीच. धोबीलाच सारं काही करायचं आहे. धोबीनंच वाढायचं आहे, सोबत जेवायला बसायचं आहे आणि नंतर भागवत पुराण वाचून दाखवायचं आहे.

काकू म्हणायची, " हे काय, धोबी का मासे खाणार ? विधवांनी सामिष भोजन करणं वर्जित आहे."

निधी सोई म्हणायचे, " डॉक्टरांनी मला मासे खायला मनाई केली आहे. माझं डोकं दुखतं ना म्हणून !"

काकूला हे पसंत नव्हतं. ती पुन्हा तोंड फिरवायची.

एके दिवशी आईनं वडिलांपाशी आपल्या मनातलं बोलून दाखवलं, " धोबीची काय दशा झाली आहे बघितलं ना ? तिच्यासाठी एखादं चांगलं स्थळ पाहा, गरीब असला तरी हरकत नाही. मात्र चांगला देखणा असला पाहिजे. इतकी मोठी मालमत्ता असून

काय उपयोग ? धोबीचा तर निम्म्यावर फक्त अधिकार आहे."

चितेई सोई हां हूं करायचे. पण म्हणायचे, " या घराण्यात आजवर जी गोष्ट घडली नाहीं ती मी कशी करू ? लोक काय म्हणतील ? विधवा होण्यात जगावेगळं थोडीच काही आहे ? दुसऱ्या विधवा मुली जसे दिवस घालवतात तसेच धोबीसुद्धा घालवील. जितेई नायकच्या साऱ्या संपत्तीची ती मालकीण आहे. तिला कसला त्रास आलाय ? तिला तर एक मुलगा दत्तकसुद्धा घेता येईल. आपला विदेई तिचा मुलगा होईल. त्याच्याबरोबर धोबीला सुखासमाधानात राहता येईल. तिला काय कमी ?"

" छे, छे, असं नका बोलू. चुलीत जावो तुमची ती मालमत्ता. माझ्या धोबीला आणखी नका छळू. तिच्यासाठी तुम्ही एक स्थळ बघा. तो मग मूर्ख असो नाहीतर मजूर. मुलगा चांगला असला म्हणजे झालं. लोकांनी नावं ठेवली तरी चालेल. पण धोबी तर मार्गाला लागेल."

बायकोचं बोलणं ऐकूत चितेई सोई तोंड फिरवून निघून जायचे. त्यांना वाटायच, कितीही झालं तरी ही बायकांचीच जात. जगरहाटी म्हणजे काय ते हिला काय समजणार ? किती बायका विधवा होऊन मरून गेल्या आहेत ? धोबीनं जर लग्न केलं तर नायक घराण्याची संपत्ती हातातून निसटून जाईल. इतकी मोठी इस्टेट. सात पिढ्यांना सहज पुरेल अशी. ती काय अशी सुखासुखी सोडून द्यायची ?

निराश होऊन धोबीची आई निधी सोईकडे धाव घ्यायची. " ऐकलंत भावजी ? तुमचे दादा काय म्हणताहेत ते ?" मग ती सारं काही आपल्या दिरालादेखील सांगून टाकायची.

निधी सोई म्हणायचे, " वहिनी ! तू का धोबीची काळजी करतेस ? हे सारं दादाला सांगायची काय गरज आहे ? धोबी माझी मुलगी आहे. मी तिची जबाबदारी घेईन. काही दिवस जाऊ देत. तिचं वेड आपोआप संपेल. ती नीट बरी झाली म्हणजे मग मी दादाचं काही एक ऐकणार नाही. तू आणखी काही दिवस थांब."

" दादाचं ऐकणार नाही म्हणे ? मला काय ठाऊक नाही ? भावानं निखारे गिळायला सांगितलं तरी तुम्ही गिळून टाकाल. तुम्ही तर त्यांच्यासमोर उभं राहायलादेखील घाबरता आणि म्हणे त्यांचं ऐकणार नाही. मला सारं काही ठाऊक आहे म्हटलं."

" खरंच सांगतो वहिनी. विश्वास ठेव माझ्यावर. धोबीसाठी मी सारं काही करायला तयार आहे. दादालासुद्धा नाही घाबरणार."

दोन महिन्यानंतर धोबीचं दुःख कमी होत गेलं. पूर्वी ती नेहमी खोलीची दारं लावून बिछान्यावर गप्प पडून रडायची. पण आता ती हिंडू फिरू लागली होती. काम

करू लागली होती. देवासाठी हार गुंफणे, पुराण वाचणे इत्यादी कामे ती करायची आणि दुपारी जेव्हा आजीबरोबर ' कांजिगात 'चा खेळ व्हायचा तेव्हा त्यातही भाग घ्यायची. थट्टा मस्करी होत असली तर त्यातही ती लक्ष घालायची.

जगाचा नियमच आहे—कुणाचंही दुःख, शोक कायम राहत नाही. काळाने दुःखाची धार बोथट होत जाते. कधी कधी तर भविष्यकाळ दाट अंधकारमय वाटू लागतो. पण तेही दिवस जातात. समुद्रातील प्रचंड लाटा वादळानंतर पुन्हा शांत होतात.

भल्या पहाटेच धोबी गोपीनाथ देवाच्या आराधनेसाठी बाहेर पडायची. गंध, पुष्प वगैरे पुजाऱ्याहाती देवाला वाहायची. तासभर तिथे बसून काहीतरी गुणगुणायची. पुन्हा पुन्हा साष्टांग नमस्कार घालायची. घरी परतल्यावर धाकट्या बहीण भावांची देखरेख करायची. पाच वर्षांचा विदेई तिचा सर्वात जास्त लाडका होता. विदेई अजिबात धोबीची पाठ सोडत नसे. धोबी त्याला कडेवर घेऊन कुरवाळायची. त्याचं कोडकौतुक, लाड करायची.

" धोबीनं विदेईलाच दत्तक घ्यावं. त्यासाठी तिचे सासरे व पती यांची अगोदरच संमती घेऊन ठेवली आहे. तो साऱ्या संपत्तीचा मालक होईल." ही गोष्ट आठवताच धोबी चमकायची. विदेईला कडेवरून दूर करायची. त्याच्या चेहेऱ्याकडे टक लावून बघायची. जणू तो कुणी परकाच आहे.

विदेईला धोबीच्या मनातल्या खळबळ समजणं शक्यच नव्हतं. तो तिच्या पाठीवर स्वार होऊन म्हणायचा, " टुआंटुईची गोष्ट सांग ना ग ताई."

धोबी त्याला टाकून पळून जायची. विदेई रडू लागायचा.

काकू धावत यायची. विदेईला कडेवर घ्यायची. पण विदेई हट्ट धरायचा, " मी ताईपाशी जाणार."

काकू त्याला दटावून गप्प करायचा प्रयत्न करायची. पण विदेई कसला गप्प बसतो ? मग चिडून त्याला खाली आदळून बडबडत काकू तिथून निघून जायची.

धोबीला विदेईचं रडणं कुठवर सहन होणार ? ती आपल्या खोलीतून धावत बाहेर यायची. विदेईला पुन्हा कडेवर घेऊन त्याला प्रेमानं कुरवाळायची. विदेई गप्प व्हायचा. धोबी त्याला 'टुआंटुई'ची गोष्ट सांगायची.

संध्याकाळी धोबी महादेवाच्या देवळात जायची. नीलकंठेश्वर महादेवाचं मंदिर गावच्या दुसऱ्या टोकाला होतं. जुनं देऊळ होतं. देवळाच्या चारी बाजूला वेल, देवदार, नारळी वगैरेची तऱ्हेतऱ्हेची झाडं होती. एक प्राचीन तळंदेखील होतं. ते आता आटलं असलं तरी त्यात भरपूर पाणी होतं आणि कमळंदेखील होती. त्यात सापही खूप होते.

देवळाच्या वाटेवरच बनेई परिडाचं घर लागायचं. शेतातून ते घर दिसायचं. पडझड झाली होती. तरी ओक्याबोक्या भिंती तग धरून उभ्या होत्या.

बनेई परिडाचं घर दिसताच धोबी दचकायची. आठवायचं—बनेई परिडाचा मुलगा सनिया इथंच राहायचा. सनिया कुठं गेला ते देव जाणे. कोणत्या स्मशानात कुत्र्या गिधाडांनी त्याच्या शरीरावर ताव मारला असेल कुणाला ठाऊक !

किती देखणा, किती कर्तृत्ववान होता सनिया ! पण आता तो कुठंय ? विचार करीत करीत धोबी पुढे चालू लागायची.

एखादा कंगाल दृष्टीस पडताच धोबी संतापायची, यांच्याचमुळे तिचा सत्यानाश झाला. कंगालांचं दु:ख बघवत नसे, सहन होत नसे म्हणून तर तिनं अन्नछत्र घातलं होतं. पण यांना शिक्षा करायची बहुतेक देवाचीच इच्छा असावी. का तिनं ईश्वरेच्छेत मोडता घातला ? देवाची मग तिच्यावरच खप्पा मर्जी झाली.

संध्याकाळची वेळ होती. महादेवाच्या मंदिरातून धोबी परत येत होती. बनेई परिडाचे शेजारी—बाम ओझाची मुलगी टिमी धावत धावत आली आणि म्हणाली, " धोबी ताई, अग ऐकलंस का ? बनेई परिडाचा मुलगा सनिया परत आलाय. शी, शी, काय चेहरा करून आलाय ? त्याला ओळखणं कठीण आहे ताई. जणू स्मशानातून मृत्यूच्या तावडीतून सुटून परत आलाय."

धोबी दचकली. तिचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना. टिमीचा हात आपल्या हातात घेऊन तिला गदागदा हलवीत तिनं विचारलं, " कोण परत आलंय ?"

" सनिया दादा ! सनेई परिडा—बनेई परिडाचा मुलगा. गोपीनाथजीच्या देवळापाशी बसलाय. त्याच्याभोवती खूप गर्दी जमलीय. त्याला काहीतरी विचारताहेत. मी त्याच वाटेनं येत होते. जरा लपून मी त्यांचं बोलणं ऐकलं. माझे बाबा म्हणत होते—अरे सनिया, तुझ्या घरावर तर छप्परच नाही. कुठं राहशील ?"

धोबीला पाऊल उचलेना. झाडंझुडपं, गवत यांनी भरलेल्या सनियाच्या घराकडे तिनं नजर टाकली. एक दीर्घ उसासा सोडला. विचारलं, " टिमी, सनियादादानं काय उत्तर दिलं ग ? सांग ना !"

" मला नाही ठाऊक. लोक खूप गोंगाट करीत होते. त्यामुळे त्याचं उत्तर काही मला ऐकायला आलं नाही. एक लहानसा मुलगा सनियापाशी गेला होता. तेवढ्यात गावचा परिया केवट ओरडला होता, ' अरे ए, त्याला शिवू नकोस. देव जाणे अन्नछत्रात कुणाकुणाच्या हातचं तो जेवला आहे. आता त्याची जातपात राहिलेली नाही. धर्म बुडालाय. सनिया आज जातीबाहेर आहे. अस्पृश्य आहे, अस्पृश्य !' "

" अस्पृश्य ?"

" होय, धोबी ताई, हेच तर ते बोलत होते. पण मला फार वेळ तिथं थांबता आलं नाही. तो विशी जेनाचा मुलगा चंदरा आहे ना तो माझ्याकडे तिरप्या नजरेने बघत होता. हळूहळू माझ्यापाशी सरकत होता. म्हणून मी तिथून धूम ठोकली."

टिमीचं बोलणं जणू धोबीला समजलंच नाही. ती आपल्याच विचारांत स्वतःला हरवून बसली होती. सनियाला बघायला ती आतुर झाली. मुकाट्यानं पुढे निघाली.

टिमीनं आणखी माहिती दिली, " त्याच्याबरोबर दुसरं कुणी नाही. एकटाच परत आलाय."

" दुसरं कुणी नाही " याचा अर्थ धोबीला समजला. सहानुभूतीनं तिनं विचारलं, " काय ग, त्यांची काही बातमी कळली ?"

टिमी उत्तरली, " काही नाही ताई. लोक म्हणतात ते वारले. काही जणांचं म्हणणं आहे की ते मुसलमान नाहीतर ख्रिश्चन... पण हो, माझी आई म्हणत होती की नीलकंठेश्वर महादेवाला अभिषेक केला म्हणजे तो आपलं गाऱ्हाणं ऐकतो. तो मोठा देव आहे. सर्वांचं दुःख दूर करतो."

धोबी निघाली होती—स्वतःच्या घराकडे. पण तिनं बेत बदलला. सनिया जिथं बसला होता त्या गोपीनाथजीच्या देवळाकडे जायचं तिनं ठरवलं. तिकडून खूप गडबड गोंधळ ऐकू येत होता.

टिमीनं सांगितलं, " खूप लोक जमलेत ताई !"

दोघी तिकडेच निघाल्या.

.

अंधारी रात्र होती. अजून चंद्र उगवला नव्हता. धोबी घरी परत निघाली होती—एकटी. सनियाची करुण कथा तिचं मन व्यथित करीत होती. सनियाच्या जीवनात एका पाठोपाठ एक किती संकटं आली होती. तो मृत्यूशी झगडला होता. पण गावची विलक्षण ओढ तो टाळू शकला नव्हता. कित्येक दिवसांनंतर तो गावी परतला होता. गावच्या मातीनं त्यास स्वीकारलं होतं, पण गावकरी स्वीकारायला तयार नव्हते. त्याला प्रायश्चित्त घ्यावं लागेल. प्रायश्चित्त घेतल्यावरच तो समाजात दाखल होऊ शकेल. जोवर हे काम करणार नाही त्याला गावकऱ्यांकडून पाणीसुद्धा मिळणार नाही. कुणाच्या ओट्यावर, कुणाच्या अंगणात सावलीत विसावा घ्यायचा हक्कही त्याला राहणार नाही.

जगणं पाप आहे का ? जगण्यासाठी माणसाला काय काय करावं लागतं ! तो काय अपराध आहे ? माणसाच्या अंतरात्म्यासमोर तो गुन्हेगार नाही. ज्या दिवशी माणूस या पृथ्वीवर अवतरला त्याच दिवसापासून त्याला जगण्याचा हक्क लाभला. त्याच दिवसापासून, खायचा ल्यायचा अधिकार त्याला मिळाला.

धोबी अस्वस्थ झाली. काहीही असो सनिया कंगाल आहे. कंगालांसाठी तिनं आपलं सर्वस्व गमावलं होतं. कित्येक कंगाल रस्त्याच्या काठी पडल्या पडल्या कायमचे झोपी जातात. सनियादेखील त्याच कंगालांपैकी आहे. ती कंगालांविषयी मुळीच सहानुभूती

दाखवणार नाही.

पण सनिया आपल्या गावचा मुलगा होता. म्हणून त्याच्याविषयी धोबीच्या मनात आपुलकी होती. सनियाची स्मृतीच तिला सतावीत होती.

धोबीनं विदेईला मांडीवर झोपवलं. त्याला गोष्ट सांगितली. गोष्ट सांगता सांगता दोघांचाही डोळा लागला.

काकू आली. दोघांना उठवीत म्हणाली, "काका वाट बघताहेत, धोबी जवळ बसली नाही तर त्यांना घास कसा जाणार ?" काकूनं तोंड फिरवलं. म्हणाली, "ढोंग आहे ढोंग... विचित्र ढोंग... हूं..."

धोबीला जेवण गेलं नाही. ती एकाच गोष्टीवर विचार करीत होती. 'सनिया कंगाल आहे... सनिया कंगाल आहे.' जणू सनिया आतुरपणे तिच्याचकडे पाहात होता.

जणू तो आपल्या थरथरणाऱ्या हातांनी धोबीचा हात धरून तिला म्हणत होता, "मला मूठभर तांदूळ दे... मी उपाशी आहे. पोटात अन्नाचा कण नाही." धोबीला आपल्या सासऱ्याची व पतीची आठवण झाली. कंगालांची सेवा करण्यात त्यांनी आपले प्राण खर्ची घातले. सनिया कंगालांपैकी एक आहे, कंगाल आहे.

पण सनिया उपाशीतापाशी तसाच पडून राहणार काय ? खुल्या आभाळाखाली या कडाक्याच्या थंडीत, गावच्या पाऊलवाटेवर तो तसाच कुडकुडत पडून राहणार ? अशा परिस्थितीत जितेई नायकच्या सुनेला, नितेई नायकच्या पत्नीला स्वस्थ झोप कशी येणार ? या प्रश्नचिन्हांनी धोबीला भंडावून सोडलं.

धोबीच्या मनात आलं— माझ्या सासऱ्यांनी व पतीनं कशासाठी इतकी संपत्ती मागे ठेवली आहे ? पतीच्या घरून शेकडो मण धान इकडे आणलं आहे. कशासाठी ? सासरे व पती जे काम अर्धवट टाकून गेले ते काम मला पुरं करता येईल ? कुणाला सांगावं ? बाबा कदाचित रागावतील. बाबांच्या भयानं काकादेखील चकार शब्द बोलणार नाहीत. सासरच्या मंडळीचा इकडे काही हक्क नाही. काय करावं आता ? कुणाला सांगावं मनातलं ?

धोबीला जेवण जाईना. अन्नावरची वासनाच गेली. ती पुरतं न जेवताच उठली. काका म्हणाले— "बाळ, आणखी काही घे. रोज रोज तुझं जेवण कमी कमीच होत चाललं आहे. किती सुकून गेलीस ठाऊक आहे ? झालय तरी काय ?"

धोबीला उत्तर देता आलं नाही. पण काकूनं गुळमुळीत उत्तर देऊन टाकलं, "संध्या-काळी गार भात खाऊ नकोस म्हणून मी सांगितलं होतं. पण माझं कुणी ऐकेल तर ना ?"

काका निश्चित झाले. पण काकू खोटं का बोलली ते काही धोबीला उमजलं नाही.

मध्यरात्र. थंडी जरा जास्तच होती. धोबी अंथरुणातून बाहेर पडली. आजी स्वस्थ घोरत होती. धोबीनं चहूकडे पाहिलं. सूमसाम, नीरवता. रातकिडयांच्या किरकिरीने रात्रीची निःशब्दता भंग पावत होती. आकाशात चंद्र वर आला होता. वातावरण स्वच्छ दिसत होतं. धोबीच्या डोळयांत झोपेचा लवलेश नव्हता. तिला सारखी सनियाची आठवण छळत होती. तो झोपला असेल, झाडाखाली उपाशी पोटी, उघडया अंगानं, त्याला झोप मुळीच येत नसेल ? काय बरं करीत असेल तो ?

बालपणाच्या कितीतरी गोष्टी तिला आठवल्या. सनिया खरंच तिच्यावर खूप प्रेम करायचा. धोबी जे काही सांगेल ते करायला तो नेहमी एका पायावर तयार असायचा आणि करूनही दाखवायचा. सनियाला पण आशा होती की एके दिवशी तो धोबीचा हात धरून तिला आपल्या घरी घेऊन जाईल. तिला आपली बायको करील. पण बनेई परिडाने त्यात मोडता घातला होता. बनेई परिडाची घमेंड धोबीच्या वडिलांनाही सहन झाली नाही. त्यांनी सूड घेतला. पण या सर्व गोष्टींना सनिया जबाबदार नाही. त्याचा यात काहीच कसूर नाही.

धोबीला एक दिवस आठवला. त्या दिवशी सनियानं तिचा हात धरून म्हटलं होतं, " धोबी, बाबांनी नकार दिला. पंडित प्रहराजदेखील हात हलवीत परत गेले. आता आपण काय करायचं ते तूच सांग."

धोबीनं थट्टेत उत्तर दिलं होतं, " जा कई (श्वेतकमळ) तोडून घे."

बस ! त्या दिवशीचं बोलणं, तेच अखेरचं बोलणं. त्यानंतर पुन्हा भेट होऊ शकली नव्हती.

आज कई नाही. बाप लेक दोघे गाव सोडून निघून गेले होते. अजून परतले नव्हते. धोबी पण त्या दिवसासारखी राहिली नव्हती. ज्या दिवशी विष्णुपूर सोडून ती दुर्गा-पूरला गेली त्याच दिवशी ती धोबी मेली होती. तिचं कलेवर फक्त उरलं होतं. आजची धोबी ही दुसरीच कुणी आहे.

सनिया अजून जिवंत आहे. या अफाट विश्वात तो एकटा आहे. त्याचं नशीबच फुटकं. देवालादेखील त्याची कणव आली नाही. तो याच गावचा लेक आहे. गावच्या देवादेखत तो तळमळत प्राण सोडणार का ?

धोबीचा थरकाप झाला. तिनं शेकडो लोकांचा मृत्यू आपल्या डोळयांनी बघितला होता. काय भयंकर होते ते मृत्यू ! माणसाच्या सोनेरी स्वप्नांना मृत्यू उद्‌वस्त करून टाकतो. या जगात माणूस जगतो तो आशाआकांक्षांच्या बळावर. भविष्यकाळाच्या सुखासाठी तो उत्साहानं काम करीत राहतो. पण सारं अर्धवट राहतं. माणूस का म्हणून

मरतो ? स्वतःच्या बेपर्वाईमुळे की देवाच्या इच्छेमुळे ? कुणास ठाऊक ?

धोबीच्या डोळयांतून अश्रू वाहत होते.

रात्र गहिरी झाली होती. दुरून लांडग्यांचं ओरडणं कानावर येत होतं. धोबी बेचैन झाली. एके दिवशी आपल्या पतीच्या तोंडून तिनं ऐकलं होतं, "एका अर्धमेल्या भिकाऱ्याला एका लांडग्यानं धरलं होतं आणि मग त्या दोघांत झुंज सुरू झाली होती—जीवन आणि मृत्यूची झुंज. कंगालाचं विव्हळणं किती भयंकर असतं ते त्या दिवशी तिनं पतीच्या तोंडून ऐकलं होतं. लोक काठ्या घेऊन गेले होते. पण त्या भिकाऱ्याला वाचवू शकले नव्हते. त्याच्या शरीरभर जखमा झाल्या होत्या. तो अतिशय घायाळ झाला होता.

सनियाची पण तीच दशा होणार का ? धोबीला मनातसुद्धा हा विचार सहन होईना. नाही, मी त्याला वाचवीन. कसंही करून वाचवीन. तिनं निश्चय केला. यामुळे बदनामी होईल. बाबा रागावतील. जे काही व्हायचं ते होऊ दे. देव तर आहे. तो सारं काही वरून बघत असतो.

धोबीनं आकाशाकडे नजर टाकली. मेघांनी चंद्राला झाकून टाकलं होतं आणि तऱ्हेतऱ्हेचे आकार धारण करून आकाशात विहरत होते. धोबीच्या मनात नाना तऱ्हेचे भावतरंग उठत होते. पण एक भावना मात्र उज्ज्वल चंद्रासारखी तिच्या मनाच्या आकाशात ठाण मांडून बसली होती. ती हीच की सनियालादेखील जगायचा हक्क आहे. हो, सनिया जगणार, नक्कीच जगणार. समाजाच्या नजरेला तो पतित, कंगाल वा अस्पृश्य असेना का ! पण आत्म्याच्या दिव्य दृष्टीला तो आहे जगातला एक श्रेष्ठ जीव—माणूस.

धोबी उठली. तिचं स्त्रीत्व आणखी उजळ झालं. ती एक स्त्री आहे. सृजनासाठी तिचा जन्म झालेला आहे. विध्वंस करण्यासाठी नव्हे. तिला ठाऊक आहे. ती माता आहे. जननी होण्यासाठी स्त्री एका पुरुषाचा आधार घेते. माता बनण्यासाठी तिला जरूर आहे शक्तीची. कोमलपणाच तिची महान शक्ती आहे.

धोबीनं मग आणखी उशीर केला नाही.

घरात काका आणि काकू घोरत पडले होते. आईच्या बडबडीचा आवाज समोरच्या खोलीतून येत होता. धोबीने दिवा लावला. पेटीतून कपडे काढले. एक चांगलासा 'माठ' (रेशमी वस्त्र) देखील काढला. हे कपडे तिच्या नवऱ्याचे होते. ते आज हयात नव्हते. त्यांची अखेरची खूण— हे कपडे, आज एका कंगालाला उपयोगी पडले तर उत्तमच आहे.

धोबी स्वैपाकघरात गेली. तिनं ठरवलं. कुणाला उठवायचं नाही. जे काही करायचं ते स्वतः करायचं. कुणाला पत्ता लागायचा नाही. स्वतःच त्या कंगालाला वाचवायचं.

दाट अंधार आणि गारठून टाकणारी कडाक्याची थंडी असूनही धोबी घराबाहेर पडली. गावचे लोक घरात स्वप्नं बघत होते. भुताखेतांच्या भीतीनं दार नुसतं उघडाय-

लाही लोक घाबरायचे. अशा अपरात्री त्या भयंकर वातावरणात धोबी निर्भीकपणे घराबाहेर पडून गावच्या पायवाटेवर आली. तिच्या खाद्यांवर होते कपडेलत्ते आणि हातात होता पाण्याचा तांब्या.

धनवान सोई घराण्यातली लाडकी मुलगी धोबी आजवर कधी एकटीदुकटी बाहेर पडली नव्हती. तिच्या मागेपुढे गडीमाणसं असायची. मैत्रिणींचा तांडा असायचा. पण आज तीसुद्धा एकटी होती. थंडीतल्या गहन रात्री एका कंगालाच्या सेवेसाठी तिनं पुढे पाऊल टाकलं होतं. आपल्या पतीचं अर्धवट राहिलेलं काम आपणच पुरं करायला हवं हे ती ओळखून होती. त्यासाठी मग प्राण गेला तरी बेहत्तर !

देवळाच्या चबुतऱ्यापाशी, जिथे झाडांआडून चंद्र लपंडाव खेळत होता. सनिया खाली जमिनीवर मातीत पडलेला होता. त्याचं सारं शरीर थंडगार झालं होतं. वरून दवबिंदू बरसत होते. खालची माती बर्फासारखी गार होती. सनियानं एक छोटासा फाटका कपडा अंगावर घेतलेला होता. तो त्याचं अंग झाकण्याइतकाही मोठा नव्हता. पोटात कावळे ओरडत होते. दोन दिवसांपासून काही खाल्लं नव्हतं. अशा स्थितीत झोप कशी लागणार ? हो, एवढं वरीक खरं की अशा स्थितीत काळझोप यायला काही अडचण नाही.

सनिया उठला. मध्यरात्र—निःशब्दता. त्यानं चहूकडे नजर टाकली. समस्त चराचर जणू त्याची चेष्टा करीत होते. त्याला हसत होते आणि खुणावून सांगत होते, जा, इथून परत निघून जा. घरदार, बंधुबांधव इत्यादींची सारी बंधने झूठ आहेत. मातृभूमीची ओढ ही निव्वळ नशा आहे, अवघं जग हीच तुझी मातृभूमी आहे. अवघी पृथ्वी तुझी आई आहे. दुसऱ्या लोकांना तुझ्या अस्तित्वाची जाणीव जिथं होईल तोच तुझा देश आहे. तुला सोडून जे राहू शकणार नाहीत तेच तुझे नातलग आहेत. जातपात, धर्म ? फसवणूक आहे—फसवणूक !

समोर होतं—गोपीनाथाचं देऊळ. कित्येक युगांचं प्राचीन. सनियाच्या पूर्वजांनी याच गोपीनाथाची पूजा केली होती. पुनःपुन्हा हात जोडून प्रार्थना केली होती. पण दगडी मूर्तीतून देव काही कधी बाहेर आला नव्हता. लाखो माणसे रस्त्याच्या कडेला उपाशी-तापाशी तडफडत मेली. पण गोपीनाथ काय कोणताच देव त्यांचं रक्षण करू शकला नव्हता. तर मग धर्म हे कोणत्या रोगावरचं औषध आहे ? ही पूजाअर्चा, व्रतवैकल्ये या साऱ्यांचा उपयोग काय ? कशासाठी हे सारं ? कित्येक मंदिरे—किती तरी गोपीनाथ भग्न झाले. विध्वंस होऊन धुळीस मिळाले. पण एकानंदेखील सजीव होऊन स्वतःचा बचाव केला नाही.

सब झूठ आहे. खोटं आहे. माणसानं निर्माण केलेला देव माणसाचं काय रक्षण करणार ? माणसाचं जीवन-मरण त्याच्याच हातात आहे. तो हरला की मृत्यू ओढवतो. पराभूत झाला की मरण येतं. जगात सत्य फक्त दोनच—जीवन आणि मृत्यू. जो समर्थ आहे, ज्याच्या अंगी बळ आहे तोच जगू शकतो, खाऊ शकतो, पोट भरू शकतो. ताकदवान माणूस दुसऱ्याच्या हातचं हिसकावूनदेखील खाऊ शकतो. जगू शकतो. बळ नसतं त्याला मरावं लागतं.

सनियाच्या अंगात बळ नव्हतं. तो मरणार. त्याला मरावं लागणार.

मृत्यूनं चहूबाजूनं त्यास गराडा घातला होता. आपले पाश त्याच्याभोवती टाकले होते. मृत्यूनंच त्याला आपल्या घरी आमंत्रण दिलं होतं. जगण्यासाठी त्याच्या मनात कसलाच उत्साह नव्हता. कसलीच इच्छा नव्हती. त्याच्या सर्व आशाआकांक्षा छिन्न-भिन्न झाल्या होत्या. आई, बहीण, भाऊ—कुणीदेखील परतून आलं नव्हतं. बहुतेक कुणीच जिवंत राहिलं नव्हतं. गावच्या लोकांना तो स्वकीय समजला, आपलेच नातेवाईक समजला. पण त्यांना त्याच्याविषयी काहीही वाटत नव्हतं, कसलीही आपुलकी वाटत नव्हती. माणूस स्वतःसाठी जगत नसतो. तो जगतो दुसऱ्यांसाठी, त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांसाठी, त्यांच्या सुखदुःखात त्यास सोबत करणाऱ्यांसाठी !

धनियाचं आपलं म्हणता येईल असं कुणी नव्हतं. गावच्या लोकांना त्याच्याविषयी काही वाटत नव्हतं. कुणी सहानुभूतीच्या नजरेनं त्याच्याकडे साधं पाहतही नव्हतं. तो अस्तित्वातच नसल्यासारखे लोक त्याच्याशी वागत होते. त्यानं जन्म घेतला त्या आपल्याच गावात आज तो अनोळखी, परका ठरला होता. अशा परिस्थितीत त्यानं कुणासाठी जगावं ? समोर एक मोठा तलाव होता. त्याच्या खोल पाण्यात गावच्या कित्येक लोकांनी आपली दुःखदैना कायमची बुडवून टाकली होती. सनियादेखील तोच मार्ग घेणार, तसंच करणार. शारीरिक कष्ट आता सहन होईनासे झालेत.

देवळासमोर एक पडकी धर्मशाळा होती. एक कुत्रं खुसफुस करीत होतं. झाडावरून एक वटवाघूळ फडफडत उडून गेलं. एक भटक्या ढग चंद्रावर आपलं रूप पालटत होता. गार वाऱ्याच्या एक झुळुकीनं सनियाच्या हाडांचा थरकाप झाला. आभाळात चांदण्या लपंडाव खेळत होत्या. वातावरण मृत्यूचं नव्हे तर जीवनाचं होतं.

अनंतकालापासून हे वातावरण जिवंत आहे. सर्वांचा मृत्यू झाला आहे, सर्वांचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. पण जगातले हे वातावरण—जीवनाचे हे सौंदर्य जारी आहे. सनिया मरणार—जसं झाडाचं पान गळून पडतं तसं. पण पान मेलं तरी झाड काही मरत नसतं. जग इतक्या लवकर काही मरणार नाही, बदलणार नाही. विश्वचक्र, जगरहाटी चालूच राहणार. सनियासारखी लाखो माणसे जगोत वा मरोत, जग त्याची दखल घेणार नाही. जग आपल्या मार्गाने पुढे जातच राहणार.

सनियाच्या आयुष्याचा दीप विझत चालला होता. दिव्याचा क्षीण प्रकाश फुंकर घालून विझवून टाकण्याइतकी ताकद सनियाच्या अंगात नव्हती—समोर तलाव होता—पाण्याने तुडुंब भरलेला. पण पाण्यापर्यंत तरी जायचं कसं ? उठण्याइतपत बळ कुठं होतं ?

सनियाचं निर्बल मस्तक पुढच्या बाजूला झुकलेलं होतं. त्यानं मान वर केली. दिसलं—समोर तलावाच्या काठानं कुणी येतंय—त्याच्याचकडे.

तो टक लावून बघू लागला. कुणाची छाया आहे ही ? कोण आहे ? धोबी ?

देवळासमोरच्या पडक्या धर्मशाळेत कुत्र्यांना स्थान होतं. पण जातिबहिष्कृत, समाजानं वाळीत टाकलेल्या पतित, दलित अस्पृश्यांना मात्र नव्हतं. गरुडखांबाच्या मागचा चौथरा धोबीनं आपल्या पदरानं झाडूनपुसून स्वच्छ केला. तिथं झोपलेले दोन कुत्रे भो भो करीत पळून गेले. स्वच्छ चंद्रप्रकाश पसरलेला होता. सनियाचा हात धरून धोबीनं त्याला त्याच जागी बसवलं. चालायची ताकद त्याच्यात नव्हती. धोबीनं त्याचं अंगही पुसून स्वच्छ केलं. बरोबर आणलेले नवे कपडे त्याला घातले. 'माठ'च्या कपड्यानं त्याचं शरीर लपेटून टाकलं. स्वतःच्या बोटांनी त्याचे केस नीट केले.

सनिया व्यवस्थित बसून आराम करीत होता. तेवढ्यात धोबीनं आपला डबा उघडला. आणि आई जशी मुलाला भरविते तसं आपल्या हातांनी सनियाला जेवू घातलं.

अजून बोलणं काही सुरू झालं नव्हतं. सनियाला अशक्तपणामुळं बोलवत नव्हतं आणि धोबी काही बोलत नव्हती. सनिया जणू स्वतःला विसरून गेला होता. धोबीनं दर्शविलेल्या दया व सहानुभूतीप्रती त्याचा आत्मा तिचा कृतज्ञ होता. पण ती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. डोळे कोरडे पडले होते. त्यातून अश्रुबिंदू काही ओघळत नव्हता. तो निर्बल, निराश्रित होता. समाजानं तिरस्कृत केलेला, अपमानित केलेला होता. पण आता त्याच्या आत्म्याला जाणवत होती जगाची एक उज्ज्वल बाजू, एक आगळे माधुर्य, जगण्याची नवी आकांक्षा. मृत्यूचा निःस्तब्धपणा सोडून पुन्हा या गुतागुंतीच्या जगात परत यावं, जीवनाची वाट पाहावी असं त्याला वाटू लागलं. आपल्या दुबळ्या शरीरात त्याला महान शक्ती जाणवली. ती शक्ती होती—एक... धोबी ! धोबी ! !

सनियाच्या उघड्या अंगावर हात फिरवता फिरवता धोबीचे डोळे पाणावले. गतकाळातल्या गोष्टी आठवल्या. बालपणीचे खेळ, तारुण्यातील स्वप्ने. दुष्काळाच्या कराल दाढेतून सनिया बचावला होता. परत आला होता. पण समाजानं त्यास क्षमा केली नव्हती. आज तो पतित ठरला होता. आणि समाजाबाहेर त्याची हकालपट्टी झाली होती. कुठंही त्याला आश्रय मिळाला नव्हता. आश्रय मिळणारही नाही. ज्या गावात त्याचा जन्म झाला होता तिथेच तो आज परदेशी ठरला होता. स्वजन होते ते परके झाले होते. मूठभर तांदळाला तो महाग झाला होता. उपाशी पोटी, गावच्या पायवाटेवर

पडल्या पडल्या कायमचं निद्रित व्हायची वेळ त्याच्यावर आली होती.

धोबी दचकली. नाही, नाही, मी त्याला मरू देणार नाही. सनिया भुकेपायी प्राण देणार नाही. सनियाचे वडील बनेई परिडा यांनी थोड्याशा धानासाठी आपली सारी जमीन धोबीच्या वडिलांना देऊन गाव सोडलं होतं. त्या अखेरच्या प्रसंगीदेखील ते आले होते आपली तीन एकर जमीन विकायला. भीक मागायला नव्हे. सनिया आज वाटेवरचा भिकारी नाही. तो निदान तीन एकर जमिनीचा मालक आहे. त्या जमिनीतून तर बनेई परिडा सोनं उगवायचे.

मागचा एक प्रसंग धोबीला आठवला. रात्रीची वेळ होती. चिंतेई सोईंच्या अंगणात छोटीशी बैठक भरली होती. चिंतेई सोईं, राम प्रहराज, हरी महांति, बाम ओझा, बिशि जेना इत्यादी कित्येक लोक हजर होते. चिंतेई सोईंनं म्हटलं होतं की महादेव चौकात बनेई परिडाची तीन एकर जमीन आहे. ती अजूनपर्यंत कुणाला विकलेली नाही. परिडा घराण्यातले तर सर्वजण मरण पावले. कुणीसुद्धा घरी परतून आलं नाही. ही जमीन कशासाठी पडीत ठेवायची ? या जमिनीजवळच बिशि जेना आणि बाम ओझाची जमीन आहे. दोघांनी मिळून ती जमीन घ्यावी आणि शेती करावी. जे काही पीक येईल त्याचा निम्मा भाग दोघांनी वाटून घ्यावा. उरलेला निम्मा भाग पंडित प्रहराजच्या हस्ते देवाच्या चरणी रुजू करावा. गावात जेव्हा 'जात्रा' (धार्मिक लोकनाटच) होईल तेव्हा त्याचा खर्च त्यातून निघेल.

त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला तेव्हा धोबी तिथेच हजर होती. तिनं सारं काही ऐकलं होतं. याचाच अर्थ असा की सनियाचं धान इत्यादींचं पीक पंडित प्रहराजच्या घरात जमा आहे. सनियाचं स्वतःचं पीक अन्यत्र जमा असताना त्यानं का म्हणून उपाशी राहावं ? का म्हणून उपाशीपोटी मरावं ?

धोबीनं हे सारं काही सनियाला सांगितलं नाही. विचारपूर्वक काही करण्याच्या मनःस्थितीत तो नव्हता. दृढपणे काही करायचं साहसदेखील त्याच्यात नव्हतं. तिनं विचार केला, सनियाला अगोदर जगू दे. त्याची तब्येत सुधारू दे. मगच काही निर्णय घेता येईल.

हळू हळू अतिशय भावभिजल्या स्वरात धोबीने म्हटलं, " सनिया दादा, जा जाऊन झोप. जरा विश्रांती घे. तब्येत सुधार. खूप दिवसांनी घरी परत आला आहेस. गावातलं कुणी ना कुणी नक्कीच सहानुभूती दाखवील. जगात सुख दुःख दोन्ही चालूच असतात. हातपाय गाळल्यानं थोडीच भागतं ? तू आराम कर."

दगडाच्या बर्फाळ चौथऱ्यावर एक फाटकं कापड अंथरून धोबीनं सनियाला त्यावर झोपवलं. म्हटलं, " सनिया दादा, दिवस उजाडताच जाग आली म्हणजे या देवळाबाहेर निघून जा. नाहीतर उगाच लोक घोळ घालायचे. हजार प्रश्न विचारून भंडावून सोडायचे. त्यापेक्षा गप्प राहणंच श्रेयस्कर !"

कंगालाला वाचा फुटली, " धोबी."

त्याचा हात आपल्या हातात घेऊन धोबीनं उत्तर दिलं, "काय आहे सनिया दादा ?"

" मला मरायचं नाही, जगायचं आहे, धोबी !"

धोबी हसली. म्हणाली, " सनिया दादा, कुणालाच मरावंसं वाटत नाही. तरीदेखील माणूस मरतो नक्कीच."

धोबीच्या हातातील सनियाचे हात शहारले. तासापूर्वी ज्याच्या मनात तलावात आत्महत्या करायचे विचार आले होते, तोच आता मृत्यूच्या नुसल्या उल्लेखानंच दचकला का ? धोबीच्या मऊ हाताचा स्पर्श त्याच्या देहाला होताच त्याच्या जीवनात नवी उमेद आली, जगण्याची नवी आशा निर्माण झाली. अर्धमेल्या सांगाड्याच्या हाडां-मध्ये नवचैतन्य सळसळू लागलं.

सनियानं म्हटलं, " नाही, नाही, मी मृत्यूची कितीतरी रूपं बघितली आहेत. वाटलं होतं, वेळ आली म्हणजे मृत्यू येईलच. पण धोबी, तू मला जीवदान दिलंस. माझ्या मनात जगायची नवी आशा जागृत झाली, ती फक्त तुझ्यासाठी."

धोबीचं उभं शरीर थरारलं—लज्जा आणि भीतीमुळं. अस्थिपंजरालासुद्धा प्रेम करता येतं तर ! त्याच्या हाडांमध्ये प्रेम आणि उत्साहाची बिजली आहे. पतित, अस्पृश्यालादेखील आशाआकांक्षा आहे—जगण्याकरता सुख व आनंदाची अपेक्षा आहे.

धोबीनं सनियाचे हात सोडून दिले. तोच एक जुनी भावना विजेसारखी तिच्या मनात लकाकून गेली. कैलासवासी सासरे व पती यांचं अपुरं राहिलेलं काम पुरं करायचं आहे. एका मरणासन्न कंगालाला वाचवण्यासाठी ती त्या भयाण रात्री धावून आली होती—कंगालाच्या तोंडून प्रेमाच्या गोष्टी ऐकण्यासाठी नव्हे !

पण... तिच्या मनात दुसरा विचार आला—पण गावच्या वाटेवर कितीतरी कंगाल उपाशीपोटी कायमचे निद्रित झाले होते. त्यांच्यासाठी काही धोबीनं टिपं गाळली नव्हती. त्यांना काही सहानुभूती दाखवली नव्हती. पतीच्या मृत्यूनंतर नुसत्या रडण्यात ती आपला वेळ घालवीत होती. त्या वेळी मृत सासरे व पती यांचं अर्धवट राहिलेलं कार्य पुरं करायची इच्छा का नाही तिला झाली ? आज, सनिया कंगालाच्या रूपात गावात परत आला तेव्हा तिचं मन पालटलं. का म्हणून हे असं ? का ? का ? का ?

धोबीचे डोळे भरून आले. मनातल्या मनात ती रडत होती. वाटलं, आपल्या हातून फार मोठी चूक झाली. अन्याय झाला. तिचे पती स्वर्गात होते. त्यांना धोबीच्या भावनांचा पत्ता लागला असेल. त्यांच्यापासून कसं काय लपवणार ? त्याना फसविणं शक्य नाही. एका कंगालाला नुसती सहानुभूती दाखवण्यासाठी आपण मध्यरात्री एकटे आलेलो नाही हे तिला ठाऊक होतं. ती आली होती फक्त सनियासाठी. हो, हो, सनियासाठीच फक्त !

धोबी बेचैन झाली. आपल्या भावना तिच्या तिलाच अमंगल वाटल्या. जगाच्या दृष्टीनं कदाचित तिचा अपराध नसेलही. पण स्वतःच्या दृष्टीनं ? आपल्याच नजरे-पासून ती कशी काय बचावणार ?

गहन रात्र, निःस्तब्धता. धोबी परत निघाली होती.

घरासमोर—

धोबीला दिसलं. कुणाची तरी सावली दाराआड लपली. कुणी तरी उभं आहे वाटतं.

"—धोबी ! !"

हाक होती धोबीचे काका निधी सोईची ! धोबीनं उत्तर दिलं—" काय काका ?"

—" इतक्या दाट रात्री असं एकटं बाहेर जाऊ नये, बाळ. तुला ठाऊक नाही. या वेळी देवी देवता संचार करीत असतात. चल, आत चल."

निधी सोईंनी धोबीच्या हातून तांब्या व डबा घेतला. धोबी स्तब्ध झाली होती.

काही दिवस उलटले. देवळाच्या धर्मशाळेत सनियाला रोज रात्री जेवण मिळत होतं. पण धोबीच्या मऊ हातांचा स्पर्श मात्र त्याला मिळत नव्हता. धोबीकरताच त्यानं मृत्यूचा विचार मनातून काढून टाकला होता आणि नव्या उत्साहानं जगायचं ठरविलं होतं. मध्यरात्री खुद्द निधी सोई जेवण घेऊन यायचे आणि सनियाला प्रेमानं खाऊ घालायचे याचा पत्ताच कुणाला नव्हता. त्यांनीही कुणाला काही सांगितलं नव्हतं.

गावच्या लोकांना दिसत होतं की दिवसेंदिवस सनियाची तब्येत सुधारत चालली आहे. छातीचा खोका पूर्वी अगदी सहज मोजता यायचा. तो आता भरला होता. सनिया राहतो कुठं, खातो काय, काम काय करतो हे जाणून घ्यायचा प्रयत्न कुणीच केला नाही. गावकऱ्यांच्या दृष्टीनं सनिया फक्त एक कंगाल होता आणि त्यानं अन्नछत्रात खालच्या जातीच्या लोकांबरोबर खाऊन आपली जात बुडविली होती. त्याला पाहताच लोक तोंड फिरवून निघून जात. त्याच्या सावलीपासूनही दूर राहत.

सनिया स्वतःदेखील सर्वांपासून दूर राहायचा. त्याला जातीबाहेर व्हावं लागलं यास दुष्काळाचा दुष्परिणामच कारणीभूत आहे असं त्याला वाटायचं. पण यासाठी जबाबदार कोण ? कुणाला त्यानं अपराधी मानावं ?

हळूहळू सनिया सशक्त होऊ लागला. आता त्याला मजुरी करून आपलं पोट भरता येईल. निधी सोईंच्या दयेची आता काय जरूर आहे ? का म्हणून विष्णुपूर गावात राहायचं ? ज्या गावात त्याचे वडील बनेई परिडा मजुरांकडून आपल्या शेतीची कामं करवून घ्यायचे त्याच गावात तो स्वतः दुसऱ्यांच्या शेतावर मजुरी करणार ? दुसऱ्यानं दिलेला भात अस्पृश्यांसारखा घराबाहेर, पायरीखाली बसून खाणार ? छे, हे शक्य

नाही. त्याला हे जमणार नाही. नदीपलीकडे दुर्गापूर वगैरे कित्येक गावं आहेत. तिथं त्याला कुणी ओळखत नाही. तिकडे जाऊन तो मजुरी करील आणि आपलं पोट भरील.

आपल्या मनातली गोष्ट त्यानं निधी सोईला सांगून टाकली—" निधीकाका, त्या गावात मला कुणीही ओळखत नाही. तिथं थोडे कष्ट करून मला सहज आपलं पोट भरता येईल. पण आपल्याच गावात, आपल्याच लोकांसमोर कुत्र्यासारखं शेपूट हलवीत, अस्पृश्यासारखं जगणं मला योग्य वाटत नाही. परदेशात कोणत्याही कामाला लाजसुद्धा वाटणार नाही."

निधी सोईनं समजावलं, "हा तुझा गैरसमज आहे सनिया ! तुझं कुणी नाही हे खरं आहे. पण सात पिढ्यांची घरची जमीन तर आहे. तू जर निघून गेलास तर या गावातून परिडा घराण्याचं नाव कायमचं पुसलं जाईल. जगात सुख काय नि दुःख काय कधीच कायम टिकत नाहीत. सुखदुःखाचा फेरा नेहमी जात येत असतो. याच गावात मेहनत करून तू थोडे पैसे मिळव मग प्रायश्चित्त घे. त्यानंतर सारं काही ठीक होईल."

" पण निधीकाका, मी राहणार कुठं ? मला घर कुठंय ?"

निधीकाका काही सांगणार होते. पण शब्द ओठांतच अडकले. झाडाआडून परि दलेई आणि राम प्रहराज त्याच बाजूला येताना त्यांना दिसले. त्यांनी म्हटलं, " अरे, जरा दम धर. सारं ठीक होईल."

निधी सोई आपल्या वाटेनं निघून गेले.

सनिया पंडित प्रहराजची वाट पाहत बसला. ते जवळ आले तशी त्यानं त्यांना नमस्कार केला. प्रहराजनी जरासं स्मित करून मान डोलवली. मग जरा खाकरून म्हणाले, " काय रे, अंगानं बराच सुटत चाललाय ? काय, आहे काय ? परि दलेई काय सांगतोय ठाऊक आहे ?" परि दलेईनं म्हटलं, " स्वतःच जाऊन का नाही पाहून येत ? माझी आई पोहे विकायला दुर्गापूरला गेली होती. तिकडे तुझी बहीण पुनी दिसली होती. निताई नायकच्या शेतात काम करणाऱ्या मधु भोई बाउरी (अस्पृश्य जात)च्या घरात राहते. छान चाललंय तिचं, तुझी चौकशी करीत होती."

प्रहराजनं म्हटलं, " अरे सनिया, तू प्रायश्चित्त घेतलं तरी आता काही तुला जातीत येता येणार नाही. घराण्याची अब्रू असलेली घरची मुलगी एका अस्पृश्य बाउरी मुला-बरोबर राहू लागली. याहून वाईट ते काय असणार आहे ? असं कर, तूदेखील आता बाउरी जातीत जा. काही झालं तरी कुठल्या एखाद्या जातीत राहणं उत्तम !"

प्रहराज आणि परि दलेई बोलत होते आणि सनियाच्या काळजाला घरं पडत होती. सनियाला विद्ध करून ते दोघे निघून गेले. सनिया उठून नदीकडे चालू लागला. बांधावरच्या पिंपळाच्या वृक्षाखाली बसून त्यानं दुसऱ्या गावाकडे नजर टाकली. सकाळची वेळ होती. अरुणप्रभा सर्वत्र पसरली होती.

सनियाच्या मनात असंख्य भावना उचंबळल्या. परि दलेई खोटं तर नाही बोलत ? पण का म्हणून खोटं सांगेल ? पुनीनं अखेरीस अस्पृश्य बाउरीच्या घरात आश्रय घेतला. बाकीचे लोक कुठं गेले ? पुनी हयात आहे—या बातमीनं सनियाला आनंद झाला नाही. पुनी जिवंत असूनही जिवंत नसल्यासारखीच आहे. तिनं कुळाला बट्टा लावला आहे. पोटासाठी माणसाला बरंच काही करावं लागतं. भुकेपायी माणसानं कुत्र्याकडून अन्न हिसकावून घेतलं आहे. रस्त्याच्या कडेला कायमची झोप घेतली आहे. पण अस्पृश्य बाउरीच्या घरात कुणीही आश्रय घेतला नव्हता.

पुनीनं चांगलं केलं की वाईट याचा विचार करायच्या मन:स्थितीत तो नव्हता. पुनी काही का करीना, तिला एकदा बघायची अनिवार इच्छा सनियाच्या मनात निर्माण झाली. आपण जायचं. आपल्या डोळ्यांनी बघून यायचं आणि शक्य झालं तर पुनीला बाउरीच्या घरातून काढून स्वत:बरोबर घेऊन यायचं त्यानं ठरवलं.

पायवाट पिंपळाच्या झाडाखालूनच शेतापर्यंत जात होती. त्याच्यापुढे नदीचा काठ, रेती आणि पाण्याचा प्रवाह. गावकरी तिथंच स्नान करायचे.

पौष महिना होता. सकाळी खूप थंडी होती. कुळीथ आणि उडदाची रोपं शेतात डुलत होती. शेतं हिरवीगार होती. जणू मैलोगणिक कुणीतरी हिरवा गालिचा अंथरला असावा. ऊन खात बसायची वेळ झाली होती. पण अजून बांधावर कुणीच आलं नव्हतं. घराघरातून मलेरिया फैलावला होता. लोकांना खूप त्रास होत होता. मलेरियाने काही लोक तर मृत्युमुखी पडले होते. गावचा वैद्य जे काही औषध देत होता त्यानं अजिबात गुण येत नव्हता. पण लोकांना उपचार चालू आहेत याचंच समाधान वाटत होतं. अखेरचा उपाय म्हणून देवाची करुणा भाकली जात होती आणि देवावर भरवसा ठेवून लोक निश्चित राहत होते.

' बउल ' (आंब्याचा मोहोर) अमावास्या होती. आंब्याला मोहोर येऊ लागला होता. काही लोक तर असंही म्हणायचे की स्वर्गात आंबा होत नाही. म्हणून आंब्याच्या मोहोराच्या सुवासानं आकृष्ट होऊन देवी-देवता या पृथ्वीलोकावर येतात. म्हणून घरोघरी ' बउल'ची पूजा व्हायची. ' गंइठा,' ' मंडा ' इत्यादी तऱ्हेतऱ्हेची स्वादिष्ट पक्वान्नं करण्यात यायची. सूर्योदयापूर्वीच गावच्या बायका स्नानासाठी नदीवर जायच्या.

काही बायका नदीवरून परतत होत्या. सनियाकडे ओझरती नजर टाकून त्यांनी आपापली वाट धरली. सनिया सर्वांना ओळखत होता. त्या सर्वजणी सनियाला ओळखत होत्या. तो याच गावचा पोर होता. पण कुणीही त्याची साधी चवकशीसुद्धा केली नाही. जणू तो या गावचाच नव्हता. सनियानेदेखील कुणाला हाक मारली नाही. तो आपल्याच विचारांत दंग होता.

तेवढयात धोबी नदीत स्नान करून वर आली.

धोबीबरोबर बाम ओझाची मुलगी टिमीदेखील होती. हसत खिदळत दोघी मैत्रिणी बांधावर आल्या. हिरव्यागार शेतांमध्ये दोघी उठून दिसत होत्या, शोभून दिसत होत्या. दोघींच्या हास्याच्या लहरी शेताची नीरवता नाहीशी करीत होत्या.

सनियासमोर होतं एक स्वप्न, तो नेहमी पाहत असलेलं. ती धोबी होती. तिच्यासाठी तो जगत होता, तिच्यासाठीच जगण्याची इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली होती. धोबीचंही पाऊल पुढे पडलं नाही. ती झाडाखालीच थांबली. टिमीनं तिचा हात धरून म्हटलं, " चल की धोबीताई ! त्या अस्पृश्य सनिया बाउरीकडे काय बघत राहिलीस ? तुला ठाऊक आहे...?"

धोबीनं तिच्या तोंडावर आपला हात ठेवून म्हटलं, " गप्प ग टिमी ! मी सारं ऐकलं आहे. पुनी बाउरीच्या घरी राहिली तर त्यात सनियाचा काय अपराध ? तो जर पुनी-बरोबर राहिला नाही आणि त्यानं प्रायश्चित्त घेतलं तर त्याला पुन्हा जातीत येता येईल की."

सनियानं मान वर करून धोबीकडे पाहिलं. दु:ख आणि बेचैनीची जी लाट धोबी-वरून गेली होती त्याविषयी निधी काकांकडून सनियाला सारं काही समजलं होतं. आज तर धोबी एखाद्या नवोढेसारखी भासत होती. बालपणाच्या गोष्टी त्याला आठवल्या. त्या वेळी धोबीची नजर पाखरासारखी सतत भिरभिरत असायची, विजेसारखी ती चपल होती. हात पुढे करताच खळाळून हसत ती भुर्रकन पळून जायची. आज ती समोर उभी आहे—तारुण्याने मुसमुसलेली. पहाटेच्या सौम्य प्रकाशानं तिच्या गोऱ्यापान चेहऱ्याला आणखीनच उजळ करून टाकलं होतं. त्या दिवशीसारखं ती आता जीभ काढून वेडावत नव्हती. डोंगरदऱ्यातून वाहणाऱ्या निर्झरासारखी ती आता खटयाळ राहिली नव्हती.

ओलेती धोबी समोरच उभी होती. तिच्या चेहऱ्यानंच सनियाला प्रभावित केलं होतं. तिच्या डोळ्यातील आसवांनी या अस्थिपंजराच्या मनात जगण्याची उमेद जागवली होती. मरणासन्न होऊनही त्याच्या अस्थींमध्ये संचारली होती—नवीन शक्ती ! धोबीचा कोमल स्पर्श, तिची कोमल कथा, सनियासाठी जगण्याचा खुराक होती. तीच ती धोबी सनियासमोर उभी होती.

किती उज्ज्वल होते धोबीचे डोळे. त्यात होती अपार करुणा, अनंत गांभीर्य, गहनता. तिचे गोबरे गाल आणि लाल कमळाच्या पाकळ्यांसारखे असलेले मऊ मऊ ओठ हलकेच थरारत होते. तारुण्याच्या वैभवाने उंचावलेली वक्षावरची वस्त्रं जणू तालावर वरखाली होत होती.

क्षणभर सनिया सारं काही विसरला. स्वत:लाही विसरला. त्याचं भान हरपलं.

—" सनिया दादा, आता कशी आहे तब्येत ?"

" दुसऱ्यांनी दिलेल्या भातावर जगतोय झालं."

" दुसऱ्यांनी दिलेला भात ? का म्हणून दुसऱ्यांचा ? तो तर तुझा स्वतःचा भात होता."

धोबी कदाचित आणखी काही बोलणार होती. पण टिमीकडे लक्ष जाताच गप्प बसली. मग हसत हसत म्हणाली, " सनिया दादा, तब्येत तर छान सुधारलीय. आता दुसऱ्याच्या तोंडाकडे बघायची काय गरज ? कष्ट केले तर काय पोट भरता येणार नाही होय ? तुझं घर जिथं होतं ती वाडवडिलांची जमीन आहे की. काही बांबू, लाकडं घेऊन एखादी झोपडी का नाही टाकत तिथं ? दुसऱ्यांच्या ओसरीखाली का पडून राहतोस ? आपल्या घरात राहणं केव्हाही जास्त चांगलं नाही का ?"

" ती जमीन दिसली की मन भरून येतं धोबी ! तिच्या दिशेनं पाऊल उचललं की असं वाटतं जणू कुणी अंगावर धावून येतंय. सारं काही सोडून निघून जावं असं वाटतं. ज्यांच्यामुळं घराला घरपण होतं ते सर्व आज कुठं आहेत...?"

आता टिमीनं तोंड उघडलं. म्हटलं, " तुझी बहीण एका अस्पृश्य बाउरीशी लग्न लावून दुर्गापूरला राहतेय ते तर तुला ठाऊक असेलच. हळूहळू इतरांचाही पत्ता लागेल."

" होय टिमी !" सनिया उत्तरला, " कदाचित इतरांचाही पत्ता लागेल. तू जशी माझी चेष्टा केलीस तशी इतर लोकही माझी चेष्टा करतील, माझा अपमान करतील. मला खाली पाहायला लावतील. मी कुणालाच बोल लावत नाही. कुणावरही माझा राग नाही. देवानंच ज्याला शिक्षा केलीय तो काय कुणाला दोष देणार ? त्यानं ओळखीपाळखीच्या लोकांपासून दूर राहावं हेच भलं."

धोबी म्हणाली, " ओळखीच्या लोकांनी चेष्टा केली तरी सहानुभूतीदेखील तेच दाखवतील. कधी ना कधी त्यांचं मन पालटेल. सनिया दादा, तू हा वेडेपणा सोड. परिडा वंश संपुष्टात यावा अशी बहुधा देवाचीच मर्जी नसावी. म्हणूनच कदाचित तू परत आला आहेस. आता गाव सोडून, ही माती सोडून जाऊ नकोस. हेही दिवस जातील. नशीब फळेल. धीर धर. माझं ऐकशील ना ?"

सनियानं स्मित केलं. धोबीच्या गोऱ्या चेहऱ्याकडे एकटक पाहत तो म्हणाला, " गावच्या मातीतच राहू ? इथंच राहू ? अस्पृश्य म्हणून ? ज्यांना मी अस्पृश्य म्हणत असे आज तेच मला अस्पृश्य म्हणणार ? हे सर्व मला कसं सहन होणार धोबी ? इथून लांबच्या एखाद्या गावी जाऊन तिथल्या अनोळखी लोकांना जर मी सांगितलं की मी 'पाण' वा 'हाडी' वगैरे अस्पृश्य जातीचा आहे तर कदाचित मला इतका त्रास होणार नाही. ते एकवेळ सहन करता येईल. जगायचंच असेल तर तसं मला जगता येईल. ते जिणं जास्त सुकर होईल."

तिरस्कारानं धोबीच्या नाकपुड्या फुगल्या. तिनं टिमीला म्हटलं, "टिमी, चल घरी जाऊ या. प्रत्येकजण आपापल्या मर्जीप्रमाणं करायला मोकळा आहे. आपल्याला काय

करायचं त्याच्याशी ? आपण कोण लागून गेलोत ? चल...''

दोघी निघून गेल्या. कुणीसुद्धा एकदाही मागं वळून बघितलं नाही. पण त्या बांधा-आड दिसेनाशा होईपर्यंत सनिया मात्र पाठमोऱ्या धोबीकडे एकटक बघत राहिला.

दुर्गापूर ! निताई नायकचा इतका मोठा वाडा आज सुना झालेला होता. जितेई नायक व निताई नायकच्या मृत्यूनंतर चितेई मोईं जेव्हा आपल्या विधवा मुलीला—धोबीला—परत आपल्या घरी घेऊन गेले तेव्हापासून नायकांच्या वाड्याला टाळं लागलेलं होतं. वाड्यातल्या धनाची रखवाली करण्यासाठी विष्णुपुराहून लोक आले होते. अन्नछत्र बंद झालं होतं. बैलगाड्या भरभरून धान दुर्गापूरहून विष्णुपुराला नेण्यात आलं होतं. कंगाल निराश होऊन पळून गेले होते. निघून जाण्याइतपत ताकद ज्यांच्या अंगात नव्हती ते रस्त्याच्या काठी मरून गेले होते.

जितेई नायक जिवंत होते तोवर ते कुणाला गाव सोडून जाऊ देत नसत. काही लोक लाजेमुळे मागायला येत नसत. जितेई नायकांना हे ठाऊक होतं. ते गावात घरोघरी जाऊन लोकांची विचारपूस करायचे. त्यांनी काही मागण्यापूर्वीच स्वतः जाऊन धान-तांदूळ वगैरे देऊन यायचे. ते म्हणायचे, ''मी जर हे यापूर्वीच केलं असतं तर इतके लोक असे गाव सोडून गेले नसते. मला हे फार उशिरा सुचलं.'' त्यांना वाटायचं, पूर्वजांच्या पुण्याईनंच आपण इतक्या मोठ्या मालमत्तेचे मालक झालो आहोत. पण आपल्याला इतकी मोठी संपत्ती मिळाली याचा हा अर्थ नव्हे की आपण इतरांना छळायला हवं.

जितेई नायकांनी आपल्या मुलाचं लग्न लावून दिलं होतं. लक्ष्मीसारखी सून घरी आणली होती. धोबी सून म्हणून घरी आली तेव्हापासून जितेई नायकाचं औदार्य अधिकच वाढलं होतं. ते दुसऱ्यांना भरभरून देत होते. इतकं देऊनही त्यांचं भांडार कधी रितं झालं नव्हतं. नायक घराण्याचा सर्वनाश झाला आणि दुर्गापूरहून विष्णुपूरला धान जाऊ लागलं तेव्हा लोकांनी थोडी ओरड केली होती. पण त्यांचं कुणीही ऐकलं नव्हतं. परिणामी दुर्गापूरचे काही भले लोकही कंगाल झाले होते. तेदेखील अन्य कंगालांसमवेत मागणाऱ्यांच्या रांगेला जाऊन उभे राहिले होते. कारभारी हरी महांति तर साक्षात यमराजासारखे होते. गळ्यात त्यांनी तुळशीची माळ घातलेली होती. कपाळी चंदनाचा टिळा पण लावायचे. डोकीवर लांबलचक शेंडीही होती. पण धर्मात्मा बनण्यासाठी रचलेलं हे सर्व ढोंग होतं. लोकांना फसवण्यासाठी हे सर्व रूप घेतलेलं होतं. हात जोडून दीनपणे लोक त्यांच्यापाशी काही मागू लागले की अगदी मऊ मवाळ आवाजात ते म्हणायचे, अरे बाबा, मी आहे एक सामान्य चाकर ! एका विधवेचं मीठ खातोय. तिचं धान तांदूळ द्यायचा मला काय हक्क ? मी देणारा कोण ? तुम्ही

जाऊन चितेई सोईंच्या कानावर गाऱ्हाणं घाला."

लोक चितेई सोईंपाशी जायचे. तीच रडकथा ऐकवायचे. नायक घराण्याची जी लक्ष्मी समजली जात होती ती तर अंथरुणावरून उठतसुद्धा नव्हती. कुणाच्या कानी तक्रार घालायची, कुणाला विनंती करायची ? लोक निराश होऊन परत जायचे.

हरी महांतीनीदेखील ' सहानुभूती ' दाखवली होती. काही लोकांची घरंदारं वगैरे गहाण ठेवून किंवा अतिशय स्वस्त किंमतीला विकत घेऊन त्यांनी गुपचूप धान तांदूळ वगैरे दिलं होतं. कित्येक लोकांचा अंगठा लावून घेतला होता नाहीतर कोऱ्या कागदा-वर त्यांच्या सह्या घेतल्या होत्या. अशा तऱ्हेनं विधवेचं धान भुकेल्यांना देऊन ते पुण्य कमावीत होते.

आपल्या मालमत्तेविषयी धोबीला काहीच कल्पना नव्हती. त्या बाबतीत तिनं कधी विचारच केला नव्हता. कधी कधी हरी महांति कागदपत्रं घेऊन यायचे, चितेई सोईं धोबीला बोलवायचे. हरी महांति कागदावर दाखवायचे त्या त्या जागी धोबी सही करायची. सही केल्यानं जमीनदारी चालते अशी तिची समजूत होती. चालो न चालो तिला काय त्याचे ? मालमत्ता राहिली तरी कोण घेणार आहे ? संपत्तीला वारस उरला नव्हता. तिला एकटीला काय पोटभर अन्न मिळालं की झालं. याहून जास्त हाव नव्हती. घेऊन करायचं तरी काय ? चुलीत गेली ती संपत्ती. ज्यांनी मिळविली होती तेच आज कुठे आहेत ? आज जे लोक गरिबांचं रक्त शोषून कपटानं, फसवणुकीनं संपत्ती मिळवतात आणि दोन दिवस ताठ मानेनं चालतात त्यांचं उद्या काय होणार आहे ? भविष्याच्या गर्भात काय लपलंय ते कुणी पाहिलं आहे ? किती अनिश्चित आहे हे जग !

हा विचार मनात येताच धोबीला हसू यायचं.

हरी महांतीवर चितेई सोईंचा फार विश्वास होता. हरी महांति अतिशय प्रामाणिक आहे असं त्यांना वाटे. ते कागदपत्र नीट ठेवत. हरी महांतीनं तयार केलेले कागदपत्र ते कधी तपासून बघत नसत. ते निश्चिंत राहायचे. दुर्गापूरला गेले की एखाद दिवसातच चितेई सोई परत यायचे. सारं ठीक ठाक, व्यवस्थित चाललंय असं त्यांना वाटे. नोकर-चाकर, ठेक्यावर काम करणारे मजूर सारे नीट काम करताहेत. बागबगीच्याची छान देखरेख चाललीय.

कामकाज थोडं जास्तच असल्यानं हरी महांति आपला भाचा नदिया याला घेऊन आले होते. पंधरा वर्षांचा देखणा तरुण होता तो. खोटंनाटं करण्यात स्वारी मामाच्या वर ताण होती. सध्या तो मामांकडून धडे घेत होता. हरी महांति त्याच्यावर खूष होते. नदिया आपला वारसा पुढे चांगला चालवील याची त्यांना खात्री वाटत होती.

जे लोक दुर्गापूर सोडून गेले होते, ते परत आले. त्यांनी आपले नातेवाईक गमावले

होते खरे. पण गावची ओढ त्यांना सुटली नव्हती. इकडे हरी महांति पण आपले पाश फैलावत होते. जे कंगाल घरी परतले त्यांच्या पाठीवर हात फिरवून जगण्यासाठी त्यांनी त्यांना थोडं अन्न दिलं. पण त्या बदल्यात त्यांची जमीन कवडीमोलानं घेतली. कंगालांचे प्राण वाचले. पण ते जेव्हा उभे राहिले तेव्हा त्यांना दिसलं की आपलं आता काहीच उरलेलं नाही. शेती करायला जमीन नाही की राहण्यासाठी घर नाही. जगाच्या पाठी-वर आपण अगदीच असहाय्य असल्यासारखं त्यांना वाटू लागलं.

काय करावं ? हरी महांतीना जितकी जमीन दिलेली आहे ती परत मिळणे अशक्य. कायदा इतका बळकट आहे की जी जमीन बेइमानीनं गेली ती परत मिळणं शक्य नाही, ती कायमची हातातून गेली. काही घेऊन दांडगाईनं काही करायला गेलं तर आपलंच डोकं फुटणार दुसरं काय ! यातून मार्ग कसा काढायचा ?

काही लोकांनी आपल्याच जमिनीवर हरी महांतीचा मजूर म्हणून काम करून पोट भरलं. जे लोक स्वाभिमानी होते ते गावच्या देवाला अखेरचा नमस्कार करून गाव सोडून निघून गेले. गावाशी असलेलं त्यांचं नातं कायमचं तुटलं.

काही लोक राहिले. पण त्यांना तरी शांती कुठे होती ? सनियासारखेच ते पण पतित, अस्पृश्य ठरले होते. जमीनदाराला शेतसारा द्यावा लागला नाही. पण ज्या धर्मध्वजी ब्राह्मण, गुरव, पुजाऱ्यांनी या मानवदेहांचे मालक होऊन स्वर्ग वा नरकाची पायरी आपल्या ताब्यात ठेवली होती, धर्माची चावी ज्या लोकांपाशी होती, युगानुयुगं ज्यांनी आत्म्याच्या मुक्तीसाठी कायदेकानू, नियमावली तयार केली होती, शेतसारा घेऊनसुद्धा त्यांचं मन बदललं नाही.

जे अस्पृश्य झाले त्यांना ब्राह्मणांच्या देवांपर्यंत पोचून पूजा करायचा अधिकार-देखील मिळाला नाही. पैसे खर्च करून ब्राह्मणांना खाऊ-पिऊ घालता येईल, दक्षिणा देता येईल आणि कायाशुद्धी करून घेता येईल इतके धन त्या बिचाऱ्यांपाशी कुठं होतं ? भावी काळात कदाचित आपला गेलेला हा पूजेचा अधिकार पुन्हा मिळवता येईल याच एका आशेनं त्यांनी रक्त आटवून काबाडकष्ट केले, पोटाला चिमटा घेऊन पैसे वाचवले.

परतल्यावर कंगाल पुन्हा शेतात गुंतले. ते नांगर ओढायचे, माती वाहायचे आणि पीक काढायचे. पूर्वी आपल्या जमिनीत हेच करायचे. आता दुसऱ्यांच्या जमिनीत करू लागले. दुसऱ्यांच्या सुखासाठी राबू लागले. ज्यांच्यापाशी जास्त पैसा होता, मजूर आपसूक तिकडे ओढले गेले. लहान ओढा मोठ्या नदीला जाऊन मिळतो आणि मग दोघेही समुद्राकडे धावू लागतात.

मजूर असो नाहीतर अस्पृश्य, शरीरात जी सृजनात्मक शक्ती होती ती नाहीशी झाली नाही. उलट वाढतच गेली. समाजात अनुशासन राहिलं नाही तेव्हा समाजानं

वाळीत टाकलेले स्त्रीपुरुष कुठेही का भेटेनात, मीलनोत्सुकता वाढली. परिणामी, मानवानं घडविलेल्या दगडांच्या मूर्तीची भीती कमी झाली. नीतिनियम मागे पडले. लोक आपल्या मर्जीप्रमाणं जगू लागले. अर्धमेला समाज किंचाळला— " अरे, हे तर पतित आहेत... अस्पृश्य आहेत... "

पुनीच्या आयुष्यातही हेच घडलं.

पुनीनं खूप कष्ट भोगले होते, खूप सहन केलं होतं. आपल्या माणसांची ताटातूट झाल्यावरही तिनं आपला जीव वाचवला होता. दुष्काळात तिनं भीक मागून पोट भरलं होतं. गावची ओढ तिलाही वाटायची. कित्येकांकडे आसरा घेत घेत तिनं कसाबसा आपला जीव जगवला होता. कधी कधी उफाळणाऱ्या तारुण्याला आवर घालणं तिला जड जाई. क्षणभर ती कुणा माणसावर ओणवली होती. पण मग पुढे चालू लागली होती. कुणीही तिला आपल्या बंधनात बांधू शकलं नव्हतं. क्षणिक सुखासाठी ती आपल्या गावचं बंधन विसरली नव्हती. पुनी सतत पुढे जात राहिली होती.

दुर्गापुरात...

नायक घराण्यानं घातलेल्या अन्नछत्रात पोट भरण्यासाठी ती खूप लांबून आली होती. दुर्गापूरला पोचल्यावर दिसलं की नायक नव्हते नि त्यांचं अन्नछत्रही नव्हतं. कंगाल सारे निघून गेले होते. पण पुनी आणखी पुढे जाऊ शकली नाही. विष्णुपूरला परत जावंसं वाटलं. विष्णुपूर तीन कोसांवर होतं. आपल्या कुटुंबातील बाकीचे लोक परत आले असतील असं तिला वाटलं होतं.

पण दुर्गापूरलाच तिला कॉलरा झाला. मृत्यूची वाट पाहत ती रस्त्याच्या कडेला पडली होती.

त्या दिवशी पावसाची रिप रिप चालू होती. संध्याकाळी जोरात पाऊस आला. पुनी रस्त्याच्या कडेला, अर्धनग्न शरीरानं पडली होती. पाऊस तिच्यावर कोसळत होता. पोटात भयंकर दुखत होतं. ओकाऱ्यापण येत होत्या. खोल गेलेल्या आवाजात ती म्हणत होती, " तहान लागलीय, पाणी—पाणी... "

योगायोगानं मधुआ भोई त्याच वाटेनं चालला होता. हरी महांतीची एक गाय हरवली होती. मधुआ भोईनं ती कुठून तरी शोधून काढली होती. ताडपत्रीची एक छत्री घेऊन तो चालला होता.

मधुआ पंचवीस वर्षांचा चांगला धट्टाकट्टा, तगडा जवान होता. लोकांमध्ये अफवा होती की 'मधुआ अडाणी आहे, चोरीदेखील करतो. दोनदा तुरुंगाची वारी करून आला आहे.' रात्रीच्या दाट अंधारात तो नारळीच्या झाडावर चढून नारळ तोडायचा आणि खोबरं खायचा. नारळाचा काथ्या तो तोंडानंच काढायचा. स्वतःच्या हातानं नारळ फोडून तो आतलं खोबरं खायचा.

गावात महामारी आली की लोक 'मरीआई'ला प्रसन्न करण्यासाठी अन्न व गोड 'पोय' गाडग्यांमध्ये भरून ती गाडगी ओस जागी ठेवून यायचे. पण मधुआ लपतछपत जाऊन ते सर्व खाऊन टाकायचा. तोंड पुसून 'हरि बोल'चा गजर करून तो परत यायचा. एके दिवशी तो आंब्याच्या झाडाखाली झोपला होता. एका वानरानं येऊन त्याच्या कानशिलावर एक थप्पड लावली होती. मधुआ बडबडत उठला होता. पण ती गोष्ट त्याच्या चांगल्या लक्षात राहिली होती. एके दिवशी चोर पावलांनी बांधावर झाडीपाशी जाऊन त्यानं त्या वानराला पकडलं होतं. वानरासह त्यानं नदीत उडी घेतली होती. आणि दहादा त्या वानराला पाण्यात बुचकळलं होतं. त्याला विचारलं होतं, "बोल, करशील पुन्हा असं ? करशील ?..."

मधुआच्या ताकदीचे असे कित्येक किस्से होते. तो नाग, साप सहज हातानं धरायचा, मस्त रेड्यावर स्वार व्हायचा, नदीला पूर आलेला असला तरी पोहून नदी पार करायचा. लोक म्हणायचे तो स्मशानात जाऊन भुताला पकडतो. एकदा एका हडळीला धरायला म्हणून गेला नि एका जित्याजागत्या बाईला घेऊन आला. ती बाई होती गंधिया पालची म्हातारी आत्या. ती मुकी होती आणि रात्री तलावाच्या बाजूला गेली होती.

पुनीचं विव्हळणं ऐकून मधुआ चपापला. गाय सोडून तो झाडाखाली आला. संध्या-काळ झाली होती पण अजून अंधारलं नव्हतं. क्षणभर त्यानं पुनीच्या चेहऱ्याकडे पाहिलं. ती ओक्साबोक्शी रडत होती.

मधुआ कधी विचारपूर्वक काम करीत नसे. मनात आलं नि झटपट उरकून टाकलं हा त्याचा खाक्या होता. भलं काय नि बुरं काय याचा विचार करायच्या भानगडीत तो कधीच पडत नसे.

सात वर्षांपूर्वीची गोष्ट. मंगल घोष हा खंडायत (खड्गायत) जातीचा माणूस होता. विकेई पुष्टीच्या बागेतील रसरशीत केळी बघून त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. त्यानं मधुआला बोलावून म्हटलं, "जर केळी खाऊ दिलीस तर मी तुला पोटभर खिचडी खायला घालीन." मधुआनं ते मान्य केलं. आणि केळी चोरताना तो पकडला गेला. त्यासाठी त्याला पंधरा दिवस तुरुंगाची हवा खावी लागली. पण मग पोटभर खिचडी देखील खाल्ली. मंगल मात्र खोटं बोलून सुटला होता.

तुरुंगातून परत आल्यावर एके दिवशी मधुआनं मंगल घोषला बोलावलं आणि लोकांसमोरच त्याच्या डोक्यावर काठी हाणली. परिणाम ? पुन्हा दोन महिने तुरुंगात जावं लागलं. मंगलनं पंच बोलावले, शे सव्वाशे रुपये खर्च केले.

पुनीनं पुन्हा हाक मारली, "पाणी !"

मधुआनं चहूकडे नजर टाकली. पाणी आणायचं कसं ? थोड्या अंतरावर एका मृत

माणसाची कवटी पडलेली होती. कवटीचा वरचा भाग खोलगट होता. ती कवटी उचलून मधुआ धावत धावत नदीवर गेला. कवटीत पाणी भरून आणलं आणि पुनीला पाजलं. पुनीनं अधाशासारखं गटगट करीत पाणी पिऊन टाकलं. थोड्या वेळानं ती उठून बसली. डोळ्यांनीच मधुआचे आभार मानले. तिला काही बोलायचं होतं. पण बोलू शकली नाही.

"तुझं घर कुठंय ?" मधुआनं विचारलं.

"विष्णुपूर" पुनीनं उत्तर दिलं.

"तुला महामारी झाली आहे. आता इथंच बैस. आपसूक विष्णुलोकाला पोचशील."

मधुआ जाऊ लागला. पुनीने उठायचा प्रयत्न केला. पण पुन्हा धपदिशी खाली बसली. म्हटलं, "रात्रभर कुठं डोकं टेकायला मिळालं असतं तर ?..."

"रात्रभर ?" मधुआ म्हणाला, "ज्याच्या घरी रात्र घालवशील सकाळी त्याला मुडदाच बाहेर काढावा लागेल. त्याच्या घरच्या एखादजणालादेखील जाताना बरोबर घेऊन जाशील. होय ना ?"

मधुआनं पुनीकडे जरा निरखून बघितलं. अरेच्या ! चांगली आहे की ! जगेल का ? तब्येत काही फार खालावलेली नाही. जितेई नायक जिवंत होते तेव्हा असंख्य रोग्यांना वाचवलं होतं. हीदेखील वाचेल कदाचित. जितेई नायकनी आपल्या आजीसाठी जे औषध दिलं होतं ते अजून घरात पडून असल्याचं त्याला आठवलं. घासलेटाच्या बाटलीत दारूदेखील होती. घरी नेऊन दोन घोट पाजले की बहुधा बरी होईल. जगली वाचली तर आपली वाट धरील. मेली तर मरू देत. उद्या सकाळी प्रेत ओढून नदीकाठी नेईन आणि देईन रेतीवर फेकून. तेवढीच गिधाडांना मेजवानी...

आणखीही आठवलं. 'आईरी गौड' (एका जातीचा गारुडी)चा चमत्कार. तो गारुडी हाडाचा एक तुकडा घेऊन एका काळ्या फुलाला नुसता स्पर्श करायचा. बघता बघता काळं फूल पांढऱ्या रंगाचं होऊन जायचं. त्याच हाडाच्या तालावर बाहुली नाचायची, दगड बोलायचा. माणूस अदृश्य होऊन जायचा. एका रुपयाचे टोपलीभर रुपये व्हायचे. हां हां म्हणता आंब्याच्या कोयीपासून आंब्याचा डेरेदार वृक्ष डोलू लागायचा. झाड आंब्यांनी लगडलेलं असायचं. हे सारे चमत्कार तो गारुडी कुमारीच्या हाडाच्या स्पर्शानं करून दाखवायचा.

त्यासाठी कुमारीचं हाड हवं होतं. ते शोधण्यात मधुआने कित्येक रात्री घालवल्या होत्या. त्याच्या मनात आलं, ही मुलगी कुमारी तर नाही ? असली तर एखादं हाडूक नक्कीच मिळेल. कुमारीचं हाड जवळ असलं की मग मधुआ सूर्यचंद्रालादेखील जुमानणार नाही. नुसत्या फुंकरीसरशी सर्वांना उडवून लावील.

मधुआनं आपल्या दणकट बाहूंनी पुनीला उचललं आणि घरी घेऊन आला.

पण पुनी मेली नाही. बरी झाली. कुमारीचं हाड मिळवायच्या मधुआच्या स्वप्नाचा चुराडा झाला. मधुआ रस्त्याच्या कडेला पडलेली एक पोरगी घेऊन आल्याचं एव्हाना सर्वांना समजलं होतं. हरी महांतीनं जेव्हा मधुआला बोलावून चौकशी केली तेव्हा मधुआनं सारं खरं सांगून टाकलं. हरी महांतीनं सल्ला दिला, " तिला म्हणावं, चालती हो इथून. " बाउरी वस्तीच्या लोकांनी तक्रार केलीय. तुला वाळीत टाकायची धमकी दिलीय."

त्याच रात्री मधुआनं पुनीला स्पष्ट शब्दांत सांगून टाकलं, " ए, माझ्या घरून बाहेर नीघ बघू. एकच तर खोली. तू कुठं राहणार आणि मी कुठं राहणार ? मेली असतीस तर एक मोठं काम झालं असतं. पण..."

पुनी टक लावून मधुआकडे बघत होती. ती उत्तरली, " हे बघ, मी खड्गायत जातीची आहे. अस्पृश्य बाउरीच्या घरात राहावं लागलं. आता कुठं जाणार ? तुझ्याच पायाशी पडून राहीन."

मधुआ भडकला. पुनीला ओढून त्यानं तिला एक चपराक लगावली. ओरडला, " बदमाश कुठली. कुणी सांगितलं होतं माझ्या घरात राहून खा म्हणून ? नीघ, आत्ताच्या आत्ता नीघ इथून."

पुनी थरथरत होती. ती मटकन् खाली बसली. तिचं डोकं गरगरू लागलं होतं.

घासलेटाची ' चिमणी ' मिणमिणत होती. चुलीत विस्तव होता. तो चमकत होता. पुनीनं स्वयपाक करून ठेवला होता. खायचं एका मातीच्या हंडीत झाकून ठेवलं होतं. हंडीजवळच पाण्याचं मडकं ठेवलेलं होतं. एक दोन पावलांवर अंथरूण घातलेलं होतं. त्यावर तिनं पांढरी चादर घातली होती. जुन्या कपड्यांपासून तयार केलेली एक उशी देखील ठेवली होती. पुनीनं बनवली होती ती.

मधुआच्या मनात आलं, या घरात हे असलं यापूर्वी कधीच घडलं नव्हतं. सारी खोली कचऱ्यानं भरलेली असायची. उंदीर, घुशी, बेडूक वगैरे धुमाकूळ घालायचे. मध्यरात्री जेव्हा तो घरी परत यायचा तेव्हा थोडा 'पखाल' भात (उकडलेल्या भातात पाणी घालून हे बनवतात) खाऊन कचऱ्यातच अंग टाकायचा. सकाळी उठल्यावर पुन्हा थोडासा ' पखाल ' खाऊन तो कामावर जायचा.

मधुआनं पाच सहा दिवस पुनीची सेवा केली होती. स्वतःच्या हातांनी त्यानं पुनीला आंघोळ घातली होती. औषध पाजलं होतं, जेवू घातलं होतं, पुनी बरी झाली. निकोप झाल्यावर ती मधुआची सेवा करू लागली. मधुआ खाऊन पिऊन झोपी जायचा. पुनी त्याचे पाय चेपायची. तो घोरू लागला की पुनी त्याच्या छातीवर लवंडायची. त्याच्या रुंद छातीवर डोकं ठेवून तीदेखील गाढ झोपी जायची. दाट रात्री मधुआनं कूस पालटली की चिलटांना मारल्यासारखं तो अगदी सहज पुनीला ढकलून द्यायचा. पुनी

घाबरून मधुआच्या पायाशी झोपायची.

सकाळीच मधुआ कामावर निघून जायचा.

पुनी जेव्हा थरथरत खाली बसली तेव्हा मधुआ बिचकला. त्याला वाटलं, आपली चपराक खाऊन तर गायीम्हशीदेखील कोसळतात, पुनी काय बाईच आहे. आपला हात किती दणकट आहे ते मधुआला चांगलं ठाऊक होतं. त्यानं पुनीला आपल्या हातांनी उठवलं. गोड गोड बोलला. त्यानं म्हटलं, " तू कुणी का असेनास, कुठल्या का जातीची असेनास पण अन्नछत्रात सगळ्यांबरोबर खाल्लं आहेस ना ? तू माझ्या घरी राहिलीस तर लोक मला वाळीत टाकतील. म्हणून तू माझं ऐक. येथून निघून जा. माझ्या मालकांनी मला हेच सांगितलं आहे."

पुनीच्या डोळ्यांना धार लागली. " मी खड्गायत जातीची मुलगी आहे. अजून माझं लग्न झालेलं नाही. मला कुणाचाच आधार नाही. गेले असते तर स्मशानातच पोचले असते. तू मला वाचवलंस. मला हाकलू नकोस. मी तुझ्या पाया पडते... "

पुनीनं मधुआचे पाय धरले.

मधुआ नाराज होऊन बाजूला सरकला. पुनीचे हात धरून त्यानं तिला उठवलं. ' चिमणी ' अजून मिणमिणत होती. पुनीच्या गोऱ्या गालांवर मधुआची पाची बोटं उमटली होती. तिच्या अर्धनग्न शरीरात तारुण्य सळसळत होतं.

फत्तरालाही पाझर फुटला. मधुआ विरघळला.

कापऱ्या आवाजात मधुआनं विचारलं, " काय जाणार नाहीस ? तो दिवस आठव. आणली तशीच सोडून येईन. नमकहराम, बेईमान ! "

मधुआनं पुनीचे दोन हात धरून हिसकाहिसकी केली. पुनीचं अर्धनग्न शरीर घट्ट धरून तो तिला बाहेर काढू बघत होता. पण तिच्या अर्धनग्न शरीराचा स्पर्श होताच मधुआचे पाय डळमळू लागले. त्याचा पाय ' चिमणी 'ला लागला आणि दिवा मालवला. मधुआचं दगडासारखं कठीण मनही पाघळलं. तो दाराबाहेर पडू शकला नाही. बाहेर घनदाट अंधकार होता.

पुनी मधुआच्या घरातून बाहेर पडली नाही.

त्यांचा आटोपशीर, लहानसा संसार सुरळीत चालू लागला. नायकाचा गुमास्ता हरी महांति याच्या आज्ञेप्रमाणे मधुआ काम करायचा. संध्याकाळी घरी परत यायचा, जे काही मिळालं असेल ते पुनीच्या हाती देऊन दमून गेल्यानं तो जमिनीवरच आंग टाकायचा. पुनी सारं नीट सांभाळून ठेवायची—आणि मधुआची सेवाचाकरी करायची. त्याला खाऊ पिऊ घालून निजवायची. उष्टं खरकटं काढायची. उरलं सुरलं खाऊन मधुआच्या पायांवर हात फिरवायची. दिवा मालवून मधुआच्या वक्षावरच आपलं मस्तक टेकवून तीपण झोपी जायची. दोन शरीरांच्या अपूर्व मीलनानं क्षणभर स्वर्ग-

सुखच त्या दरिद्री झोपडीत अवतरत असे.

आत्म्याला आत्म्याची ओळख पटली होती. प्रेम कशाला म्हणतात ते दोघांनाही माहीत नव्हतं. पण दोघांनाही जाणवलं होतं की एकमेकांखेरीज आपण जगूच शकणार नाही. एकाला सोडून दुसऱ्याला या जगात राहताच येणार नाही. एकजण दुसऱ्यावर निर्भर होता आणि या निर्भरतेत दोघांनाही अपार आनंद, अनंत सुख जाणवलं होतं. दोघांनी सुरंगी स्वप्नं बघितली होती—आपल्या घर-संसाराची, आपल्या प्रगत भविष्याची !

समाजानं मधुआवर डोळे वटारले होते. अडाणी मधुआनं रोखठोक उत्तर दिलं होतं, "हो, मी अन्नछत्रात जेवलो आहे. मला जातपात काही नाही."

बायकांनी पुनीला खिजवलं तेव्हा पुनीनं पण उत्तर देऊन टाकलं होतं, "मी अन्न-छत्रात खाल्लं आहे. मला कुठलीही जात नाही आणि नसली तरी बिघडलं कुठं ?"

आपल्या भूतकाळाविषयी पुनीनं कुणाजवळ अवाक्षर काढलं नव्हतं. घरचं कामकाज आटोपलं की ती आणखी काही काम करायची. नायक घराण्याच्या कचेरीचं सारवण करायची. गोठा स्वच्छ करायची. केर काढायची. जे काही तिला मिळे ते आणून ती मधुआच्या समोर ठेवायची. मधुआ टक लावून तिच्याकडे बघू लागला की ती खुदकन् हसायची. पुनीला मांडीवर घेऊन मधुआ तिला कुरवाळायचा. म्हणायचा, "बघ, तू चांगल्या घराण्यातली आहेस. मी असताना तू का म्हणून काम करतेस ?"

पुनी त्याच्या मांडीवर कलंडायची. म्हणायची, "मी असताना तू कसा कामावर जातोस ?"

"तर काय मी बेकार म्हणून घरी बसू ?"

"तर काय मी घरात बसून राहू ?"

दोघांनी ठरवलं की बरोबरच कामाला जायचं.

नव्या जगाच्या मायेत दोघे मुशाफर गुरफटले होते. काळ उलटत गेला. वेळ किती झपाझप चाललाय ते दोघांनाही उमजलंच नाही. दोघंही एकमेकांवरून जीव ओवाळून टाकायला तत्पर होते. दोघांचं जीवन सुंदर होतं. जीवनलहरींच्या आवेगांवर दोघे तरंगत होते. भूतकालाचा अंधकार नाहीसा झाला होता.

समोर होता उज्ज्वल भविष्याचा प्रकाश.

एके दिवशी—

दुर्गापूरच्या बाजारात पोहे विकायला म्हणून परियाची आई आली होती. अचानक तिची पुनीशी गाठ पडली. परियाच्या आईनं तिला ओळखलं होतं. पुनीदेखील स्वत:ला लपवू शकली नाही. आपल्या गतजीवनाची सर्व कर्मकथा तिने तिला सांगितली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. परियाच्या आईनंदेखील टिपं गाळली होती.

सनियाची करुणकथा पुनीनंही ऐकली. परियाच्या आईनं सारं काही सांगितलं होतं. परियाच्या आईबरोबर विष्णुपूरला जावं असं पुनीच्या मनात आलं. पण मग तिनं विचार केला की, सनिया जरी कंगाल झाला असला तरी निदान 'बाउरी' अस्पृश्य झालेला नाही. 'बाउरी'च्या हातचं अन्न त्यानं खाल्लेलं नाही, त्याचं शरीर अजून पवित्र आहे. देवाच्या मनात आलं तर सनिया पुन्हा मोठा होईल. आपल्या जातीत जाईल, घरसंसार उभारील.

पुनीनं एका 'बाउरी'च्या घरात आसरा घेतला आहे. आता कोणत्या तोंडानं विष्णु-पूरला जाणार ? परियाच्या आईनं धीर दिला. म्हणाली, "उगी बाळ, रडू नकोस. नशिबात असेल ते सर्व भोगावंच लागतं. आपल्या प्राणांसाठी, आपल्या पोटासाठी, माणसाला प्रसंगी अस्पृश्याचं घरही जवळ करावं लागतं. यात जगावेगळं थोडंच काही आहे ?"

परियाची आई निघून गेली. पुनी मधुआच्या घरासमोर उभी होती. वाटू लागलं की, चुकलंच आपलं. पोटाची खळगी भरण्यासाठी अस्पृश्याच्या घरात आश्रय घेतला. राहू देत मधुआचं घर तसंच. घर सोडून पळून जावं इथून—अगदी लांब, लांब, जिथं कुणीही आपल्याला ओळखणार नाही. आपलं कलंकित आयुष्य लपवून नव्यानं पुन्हा घरसंसार थाटता येईल. जिथे लोक आपल्याला 'बाउरी' अस्पृश्याची बायको म्हणणार नाहीत.

पुनीला खेद झाला. मधुआच्या घरात पुन्हा पाय टाकायला तिचं मन होईना. मग गतकाळच्या काही गोष्टी आठवल्या. मधुआनं तिच्यासाठी काय केलं नव्हतं ? आपला जीव धोक्यात घालून मधुआनं तिचा जीव वाचवला होता. खाणंपिणं, झोप, विश्रांती, सारं विसरून त्यानं पुनीची सेवा केली होती. जातिबहिष्कृत करायची धमकी त्याला मिळाली होती तरी त्यानं निडरपणे पुनीस जवळ केलं होतं.

पुनी मधुआला सोडून जाणार का ?

मधुआच्या विशाल वक्षावर डोकं ठेवून झोपण्यात जो आनंद आहे तो दुसरीकडे कुठे मिळणार ? आणि मधुआच्या बळकट बाहूंमध्ये विसावण्याचं समाधान तरी दुसरी-कडे कुठे लाभणार ? त्याच्या दोन्ही ओठांमध्ये एक विलक्षण आकर्षण होतं. ते पुनीला वेडावून टाकायचं. आवेगानं ती जेव्हा मधुआला मिठी घालायची तेव्हा अवघ्या जगाचा तिला विसर पडायचा. सारं काही विसरून पुनी जाणार होय ?

असंख्य लोक दुष्काळाच्या अक्राळविक्राळ दाढांखाली चिरडले गेले. कित्येक लोक रस्त्याच्या काठी पडल्या पडल्या मेले. पुनी आणि मधुआदेखील मेले असते. कुणी यांना जिवंत राखलं ? दोन जिवांना कुणी प्रेमरज्जूंनी बांधलं ?

त्या सर्वशक्तिमान. देवाला साष्टांग नमस्कार घालून पुनी पुन्हा मधुआच्या घरात परतली.

विष्णुपूरमध्ये सनियानं आपली जमीन साफसूफ केली. आंब्याचं आणि काही रानझाडांचं लाकूड घेऊन एक छोटीशी झोपडी बांधली. आता छप्पर कुठून आणायचं ? गावकऱ्यांपाशी छपरासाठी 'नडा' (डहाळचा) होत्या खऱ्या. पण त्यांच्यापाशी जाऊन काय उपयोग ? ते तर नकारच देणार.

नदीकाठी एक विशिष्ट प्रकारचं गवत (तंडी) उगवतं आणि ते छपरासाठी उपयोगी पडतं हे सनियाला ठाऊक होतं. पण ते गवत अजून पुरेसं वाढलं नव्हतं, बळकटही झालं नव्हतं. पण त्याच्या घरापाशी जी ताडाची झाडं होती त्यांच्या झावळ्या तयार होत्या. त्यांचंच छप्पर घालायचं त्यानं ठरवलं.

हातात कोयता घेऊन तो ताडाच्या झाडापाशी गेला. संध्याकाळची वेळ होती. सूर्यास्त झाला नव्हता. चहूकडे सौम्य प्रकाश होता. आज मकर संक्रान्त. आजपासून सूर्य उत्तरायणात प्रवेश करणार. पौषाच्या शुक्ल पक्षाची नवमी. आज नीळकंठेश्वर महादेवाचा मकर यात्रेचा उत्सव होता. एव्हापासूनच लोकांची जा ये सुरू झाली होती. आजूबाजूच्या गावची बरीच मंडळी इथे जमतात. मंदिराच्या प्रांगणात बांगड्यांची, मिठायांची बरीच दुकानं थाटली जातात. हळूहळू गर्दी वाढेल. महादेवाच्या पुजाऱ्यांची कमाईदेखील वाढेल.

वर्षभरात आजचा दिवस सर्वात लहान असतो. आजपासून दिवस मोठे होत जाणार. रात्री लहान होत जाणार. कडाक्याची थंडी कमी होऊ लागेल. सूर्य मावळण्यापूर्वीच थंडी वाजू लागते.

बनेई परिडाच्या शेताजवळील वाटेनं जे लोक महादेवाच्या मंदिराकडे जात होते ते 'ठक् ठक्' चा आवाज ऐकून जरा चमकत होते. नजरेनं शोध घेत होते. सनिया बेधडक ताडाच्या झावळ्या तोडत होता. ते बघून लोक आपापल्या वाटेनं पुढे चालू लागत होते.

पण धोबीनं मात्र इतरांसारखी आपली वाट धरली नाही. सनियाकडे टक लावून बघत राहिली. तो ताडाच्या झाडावर चढून बसला होता. छोटंसं वस्त्र नेसला होता. बाकी सारं अंग उघडच होतं. शर्ट नव्हता की चादर नव्हती. खालच्या मजबूत देठाच्या पानांवर तो कोयत्यानं घाव घालत होता. ठक् ठक् चा आवाज होत होता आणि पान खाली पडत होतं. मानवसमाजातही असंच होतं. माणूस ज्याच्या आधारे वर चढतो तो खालीच राहतो आणि माणूस सर्वात अगोदर त्याच्याचवर वार करतो. खालचा माणूस निमूटपणे हा अत्याचार सहन करतो. अजिबात तक्रार न करता तो खाली पडतो.

सनियानंदेखील हेच अनुभवलं होतं—चितेई सोईने रात्रंदिवस राबून, घाम गाळून धन कमावलं होतं, त्याच संपत्तीतून थोडीशी देऊन त्यानं बनेई परिडाची जमीन गिळं-

कृत केली होती. आता सनिया परतून आला होता. तोदेखील रक्त आटवून धनवानाच्या रक्तभांडारात आणखी भर घालायला हातभार लावत होता.

धोबीची नजर सनियावर खिळून राहिली होती. ताडाच्या पानावर कोयत्याचे घाव पडत होते—ठक् ठक्.

सनिया कशासाठी घर बांधणार आहे ? सुखात राहण्यासाठी ? आता तो कष्ट करील ? पुढे भांडवलदार होईल. मग खालच्या पानांवर घाव घालून दुसऱ्यांचं रक्त शोषण करील ? धनवान होईल ? घराण्याचा लौकिक वाढवील ? अखेर कशासाठी...? भयाण वादळवारा सुटला की तो खाली पडेल, जगाचं चक्र चालूच राहील.

धोबी थबकली. तिला पाऊल उचलेना. तिनं आजूबाजूला नजर टाकली. कुणीच नव्हतं. ती हळूहळू पुढे झाली आणि ताडाच्या झाडापाशी पोचली. थोडा वेळ थांबून तिनं हाक मारली, " सनिया दादा, खाली ये ना ! "

धोबीला खाली उभी पाहून सनिया आश्चर्यचकित झाला. खाली उतरून तो धोबी-समोर उभा राहिल।. त्याला धाप लागली होती. श्वासोच्छ्वास जोरजोरात चालला होता. श्वासाबरोबर छातीची हाडं वरखाली होत होती. नाकपुड्या फुगल्या होत्या. हजामत करून बरेच दिवस झाले होते वाटतं. त्याच्या देखण्या चेहऱ्यावर दाढीचं रान माजलं होतं. केस वाढले होते. तेलाचा हात न लागल्यानं त्यांच्या जटा झाल्या होत्या. अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. ताडाच्या पानांची धारदार पाती अंगाला जागोजाग चिरा देऊन गेली होती. त्यातून रक्त ठिबकत होतं. चिखल व मातीचे डागही अंगावर लागलेले होते.

धोबीनं विचारलं, " सनिया दादा ! आज मकर संक्रान्त आहे ना ? नीलकंठेश्वर महादेवाच्या देवळाशी जत्रा भरली आहे. तू नाही जाणार ? वर्षभर काम करायचंच असतं. आजचा दिवस सुट्टी नाही घेणार ?"

सनियानं बोटांनी कपाळावरचा घाम निपटत म्हटलं, " नाही धोबी, अस्पृश्यांसाठी देवळाची दारं बंद असतात. घर निम्मं तयार झालं आहे. ते पुरं करायला देव थोडीच येणार आहे ?"

धोबी म्हणाली, " देव कुठं काय करतो ? माणूस जे काही करतो तीच देवाची मर्जी असते. माणूस कधी चांगलं करतो, कधी वाईट. देवाची पण तीच इच्छा असते. जाऊ दे. मी एक विचारायला आले आहे. बघ, तुझं स्वतःचं धानदेखील आहे आणि ' नडा ' देखील आहे. मग तू इतका बेचैन का ? आपली तीन एकर जमीन विकायला बनेई परिडा ज्या दिवशी माझ्या बाबांकडे आले होते, बाबांनी ती विकत घ्यायला नकार दिला होता. निराश होऊन बनेई परिडांनी मुलाबाळांसह गाव सोडला होता. पण ती तीन एकर जमीन थोडीच नाहीशी झाली ? अजून पडलेली आहे. माझी ती जमीन कुठं

आहे म्हणून का नाही विचारीत तू ? अजून पडलेली असेल. तू स्पष्ट विचार—माझी जमीन कुठं आहे ? कुणी घेतली आहे ?"

सनिया धोबीकडे टक लावून बघत होता. चितेई सोई जुलमी असूनही त्याची मुलगी धोबी इतकी दयाळू कशी ? का ती सनियाविषयी इतकी सहानुभूती दाखवते ? दुसऱ्यांबद्दल इतकी माया ? देवीसारखी ती समोर उभी होती. गोऱ्या रंगाला लाल साडी खुलून दिसत होती. दोन्ही हातांत सोन्याच्या दोन बांगड्या फक्त होत्या. एका हातात होतं प्रसादाचं लहानसं भांडं. धोबी पुजारिणीसारखी वाटत होती—शांत, सुंदर, पवित्र.

गावच्या या इतक्या पाषाणहृदयी लोकांबरोबर राहणं कठीण होतं. तरीदेखील सनियानं गाव का नाही सोडला ? धोबीसाठीच त्याचा पाय अडखळला होता.

धोबी सनियाच्या समोर उभी होती.

तिच्या प्रश्नाचं उत्तर सनियाला देता येईना. तो नुसता टक लावून तिच्याकडे पाहत होता.

धोबीनं म्हटलं, " ए, अमा नुसता बघत काय बसला आहेस ? प्रहराजपाशी जाऊन आपलं धान मागून घे. त्यानं दिलं नाही तर बाबांपाशी जाऊन तक्रार कर. मग जे काही होईल ते बघता येईल."

धोबीनं सनियाला आपादमस्तक न्याहाळलं. विचारलं, " सनिया दादा, सध्या तू कुठं नि काय खातोस ?"

हसत हसत सनियानं म्हटलं, " दुष्काळाच्या नावडीतून सुटलेल्या माणसाला खाण्यापिण्याचा काय त्रास होणार ? बागबगिच्यात गवत, पाला-बिला नाही का ? रानावनात कंदमुळं नाहीत का ?"

" मी काही दिलं तर घेशील ? माझ्या फार मनात आहे."

" काय ?" चकित होऊन सनियानं विचारलं.

" तुला बालपणं आठवतं ? तू झाडावर चढून आम्हाला कैऱ्या, पेरू वगैरे तोडून द्यायचा ? कित्येकदा आम्हाला बोरं, करवंद देण्यासाठी तू स्वतःचा जीव धोक्यात घातला होता. आठवतं ? महादेव तलावात एकदा तू कमळं काढायला उतरला होतास ? तेव्हा तुझ्या पायाला एक जळू चिकटली होती. आठवतं ना ?"

" सारं आठवतं, धोबी."

धोबीचे डोळे भरून आले. म्हणाली, " बालपणचे ते मित्र कुठे गेले देव जाणे. उपाशी पोटी रस्त्याच्या कडेला नाही तर झाडाखाली मरून गेले असतील. तूच काय तो एकटा परत आला आहेस. पण तोही अस्पृश्य होऊन. मला खाण्यापिण्याची ददात नव्हती. पण मीदेखील परक्या घरी गेले होते. माझी पण जात गेली. मी पण अस्पृश्य झाले. माझ्यापाशी खूप मालमत्ता आहे असं सर्वजण म्हणतात. पण मला मात्र मी तुझ्याहूनही

अधिक गरीब आहे असं वाटतं. मला कुणाची मदत नाही. मी निराधार आहे, एकटी आहे."

सनिया थक्क झाला. काय म्हणतेय हे धोबी ? सनिया काही वेळ अवाक् होऊन नुसता बघत राहिला.

धोबी रडत होती.

थोड्या वेळानं धोबीनं अश्रू पुसले आणि म्हटलं, " मी तुझी ऋणी आहे, सनिया दादा ! आता कर्ज फेडायची वेळ आली आहे, तुला घ्यावंच लागेल."

प्रसादाचं भांडं धोबीनं खाली ठेवलं. कडोसरीला लावलेला एक छोटा बटवा तिनं काढला. सनियाच्या हातावर तो बटवा ठेवून आपल्या हातांनी तिनं त्याची मूठ बंद केली. मग आपल्या हातांनी त्याचा हात धरून धोबीनं म्हटलं, " सनिया दादा, माझ्या-पायीच तुझी ही दुर्दशा झाली, बाबांनी जर आपल्या लग्नाचं मनात घेतलं नसतं तर तुला थोडीच गाव सोडावा लागला असता ? तुझी जमीन मातीमोलानं विकत घेऊन माझ्या बाबांनी तुला कंगाल करून टाकलं. तुझ्या घराण्यातले सर्वजण गेले, तू एकटाच काय तो परतून आला आहेस. सनिया दादा, मी जे काही दिलं आहे, ते माझं आहे. बाबांचं नाही. माझे सासूसासरे, पती यांच्याकडून मला ते मिळालं होतं. तू प्रायश्चित्त घेऊन जातीत पुन्हा दाखल हो. घर संसार थाटून सुखात रहा. तुझ्या घराण्याची भर-भराट होवो हीच माझी इच्छा आहे."

धोबीनं सनियाचे हात सोडले. तिच्या गोऱ्या गालांवरून अश्रुधारा वाहत होत्या. थोडं थांबून ती पुन्हा म्हणाली, " बाबांच्या वक्र दृष्टीतून माधो राऊत आणि कईसुद्धा सुटले नाहीत. पोटासाठी तेपण आमच्या दारी आले होते. पण निराश होऊन परत गेले. त्यांनादेखील गाव सोडावा लागला. या सर्वांचा तळतळाट मलाच भोगावा लागला सनिया दादा ! पण काही का असेना. आज माझी हीच इच्छा आहे की सर्वांनी परत यावं आणि सुखात संसार करावा."

सनियानं काही उत्तर द्यायच्या आतच धोबी तिथून निघून गेली. प्रसादाचं भांडं तिथंच राहिलं.

धोबी झुडुपापलीकडे जाऊन लपली. पण सनिया आश्चर्यचकित होऊन तिच्याच दिशेनं बघत राहिला.

तारुण्यातली किती तरी स्वप्नं आठवत होती. मनाच्या आत खोलवर हजारो कल्पनांची कारंजी उडू लागली होती. किती गूढ आहे ही स्त्री ! तिचं हसणं, रडणं सारंच समजण्यापलीकडचं आहे.

सनिया आ वासून उभा राहिला. अजाण शिशूसारखं त्यानं अवतीभवती बघितलं. तो शोध घेत होता—अशरीर वाणीचा, जेणे या गूढ रहस्याचा अर्थ समजून घेता

येईल. ती वादळासारखी यायची, विजेसारखी हसायची. सनिया चमकला होता. मग बघून बघून दमला होता. पण धोबीच्या लावण्याच्या नुमत्या एक झलकीनं त्याच्या मनातला अंधार क्षणभर दूर झाला होता.

त्या रात्री, तो निराश्रित असता, धोबीनंच त्याला मृत्यूच्या दाढेतून ओढून काढलं होतं. धोबीमुळेच सनियाच्या मनात पुन्हा जगण्याची आकांक्षा निर्माण झाली होती. त्यानं गाव सोडायचं ठरवलं होतं तेव्हा धोबीच्या प्रतिमेनंच त्याच्यासमोर उभं राहून त्याला अडवलं होतं. तिच्या अंगप्रत्यंगातून जणू नवप्रभाताची प्रभा फाकत होती. तिच्या चेहऱ्यावर होता एक विलक्षण भोळा भाव आणि सौम्य चांदणं. सनियाला समजावण्यासाठी तिनं किती आटापिटा केला होता.

सनियानं बटवा उघडून पाहिलं. आत पाच रुपये आणि सोन्याच्या पंचवीस मोहोरा होत्या. धावत जाऊन ते सर्व परत देऊन यावं असं त्याला वाटू लागलं. चिंतेई सोईच्या कृत्याला धोबी जबाबदार नाही.

मग त्याच्या मनात विचार आला. आपल्या दुर्दैवाला चिंतेई सोई जबाबदार आहेत असं तरी कसं म्हणता येईल ? ज्या दिवशी पंडित प्रहराज विवाहाचा प्रस्ताव घेऊन आले होते, माझ्या बाबांनीच तर त्यांचा अपमान केला होता. त्यांना परिडा घराण्याच्या लौकिकाची घमेंड होती. चिंतेई सोईना संधी मिळाली तेव्हा त्यांनी आपल्या संपत्तीच्या बळावर त्याचा बदला घेतला. बनेई परिडांना आपल्या उच्च जातीचा फार गर्व होता. ते नेहमी दुसऱ्यांना आपल्यापेक्षा खालचे, तुच्छ समजत. चिंतेई सोईदेखील काही कमी नव्हते. आपल्या संपत्तीच्या बळाची त्यांना कल्पना होती. त्यांनी बनेई परिडाची मुळीच पर्वा केली नाही. परिणामी अहंकाराला अहंकार भिडला, संघर्षाची ठिणगी पडली. आणि तो संघर्ष चालूच राहिला. ज्याचे बळ जेव्हा वाढत असे तो तेव्हा जिंकत असे.

चिंतेई सोई किंवा धोबीचा यात काय अपराध ? अपराध असलाच तर तो आहे अहंकाराचा. कुणाला धनसंपत्तीचा अहंकार असतो तर कुणाला जात, धर्म, बुद्धी वा ज्ञानाचा. कुणी आपल्या बळाची घमेंड करतो तर कुणी आपल्या रूपाची. प्रत्येकाचं काही ना काही वैशिष्ट्य असतं. त्याखेरीज त्याला जगताच येणार नाही. जो जगाप्रती विरक्त झाला आहे, ज्याने संन्यास घेतला आहे त्याला गर्व, घमेंड वा अहंकार नसतो. हे त्याचे ' अवगुण ' नाहीत. पण हे ' नसणे ' हेच त्याचं वैशिष्ट्य असतं.

चिंतेई सोईना का म्हणून जबाबदार धरायचं ? जगात जर कुठलाच धर्म नसता, जात नसती, संपत्तीवर कुणाचा अधिकार नसता, प्रत्येकाचं वैशिष्ट्य सर्वांच्या कल्याणासाठीच उपयोगी पडलं असतं आणि ' आपलं ' म्हणायचा अधिकार कुणाला नसता तर कदाचित सुख व दुःख दोन्हीही जगातून कायमचे नाहीसे झाले असते. अस्पृश्य वा दरिद्री झाल्यानं सनियाला मान खाली घालावी लागली नसती. विधवा म्हणून धोबीला

अश्रू गाळावे लागले नसते. धनिकांच्या जुलमानं लोक मेले नसते.

मानवसमाज जर शांत, संथ जलसंचयासारखा स्थिर झाला तर सुखदु:खाचं उत्थान पतन नाहीसं होईल. जगण्याचा उत्साहदेखील मावळेल, सर्वजण सर्वांसाठी जगतील, कुणी एक दुसऱ्या कुणा एकासाठी फक्त जगणार नाही. सर्व वस्तू सर्वांसाठी असतील, कोणतीही वस्तू कुणा एकासाठी फक्त असणार नाही.

सनियाचं पाऊल उचलेना. स्वप्न दिसू लागलं, धोबीनं जे काही सांगितलं ते देववाणी-सारखं सतत कानापाशी घुमू लागलं. तो पुन्हा आपल्या जातीत दाखल होईल—घर संसार उभारील—परिडा घराण्याचा नावलौकिक पुन्हा वाढेल.

उज्ज्वल भविष्याची स्वप्नं सनियाच्या डोळ्यांत होती. सोनेरी आकांक्षांच्या रज्जूंनी तो बांधला गेला होता. जणू त्याचं मन ओरडत होतं—तो प्रायश्चित्त घेऊन जातीत सामील होणार, घर संसार थाटणार, परिडा घराण्याचा नावलौकिक वाढणार.

सनियानं प्रायश्चित्त घेतलं. तो पुन्हा जातीत आला. त्यानं जिथं झोपडी बांधली होती त्याच्यासमोरच एक गवती छप्पर घालण्यात आलं होतं. त्यादिवशी माघ महिन्याच्या शुक्लपक्षाची पंचमी होती. सरस्वतीपूजेचा सण.

ब्राह्मण, पुरोहित आले. पंडित प्रहराजनी सांगितल्याप्रमाणे प्रायश्चित्त करण्यात आलं. गावच्या प्रत्येक देवळात नैवेद्य लावला गेला. तऱ्हेतऱ्हेची वाद्यं वाजवण्यात आली. ब्राह्मणांना चांगलं चुंगलं खायला घातलं गेलं. चितेई सोईच्या आदेशानुसार निधी सोई सर्व कार्यक्रमावर देखरेख करीत होते.

गवती छपराखाली सर्व जातिबांधवांना जेवू घालण्यात आलं. निधी सोई पण त्यात होते. सर्वांच्या मनात एकच प्रश्न सारखा डोकं वर काढीत होता—' दरिद्री सनियाला इतके पैसे कुठून मिळाले ? जे काही कुणी सांगेल ते सारं तो बिनबोभाट करतोय. मुक्त हस्तानं खर्च चालवलाय. ब्राह्मणांना दक्षिणापण भरपूर दिली आहे. मामला काय आहे ?' काही जणांनी सरळ सनियालाच विचारलं. पण सनियाचं आपलं एकच उत्तर होतं, " मी माझेच पैसे खर्च केलेत. कुणाचे पैसे चोरले नाहीत."

काही लोकांनी म्हटलं, " सनिया आपलं शेत नांगरत असता अचानक त्याला गुप्त धन सापडलं. सात पिढ्यांपासून ती जमीन त्यांच्या घराण्यात होती ना. गुप्त धन सापडलं तर त्यात नवल ते काय ?"

निधी सोईनी सांगितलं की, " सनियाला फारसं काही सापडलं नाही. सोन्याच्या काही जुन्या मोहोरा फक्त मिळाल्या आहेत. मोहोरा त्यानं मला विकल्या आणि पैसे घेऊन गेला. मी एक दिवस विचारलं होतं, ' बाबा रे, कुठून आल्या या मोहोरा ?' तेव्हा त्यानं उत्तर दिलं होतं की, ' माझ्याच आहेत. मी कुणाकडं चोरी केली नाही."

सनिया पुन्हा जातीत, समाजात आला. आज तो आनंदात होता. आता त्याला

अस्पृश्य म्हणायची कुणाचीही छाती होणार नाही. कुणीही त्याचा तिरस्कार करणार नाही, आमच्या घरी येऊ नकोस म्हणून म्हणणार नाही.

भूक त्याला सहन झाली नव्हती म्हणून त्यानं वाटेल ते खाल्लं होतं. आणि आपली काया भ्रष्ट करून टाकली होती. पण आज 'पंचामृता 'चा अभिषेक त्याच्या शरीरावर झाला आणि त्याच्या शरीरावरचे अपवित्रपणाचे सर्व डाग धुऊन निघाले. आता त्याला देवळात जाता येईल. उच्च जातीच्या लोकांच्या ओसरीवर बसता येईल. त्याच्या हातचं खाण्यापिण्यात लोकांना गैर वाटणार नाही. अस्पृश्यांपासून तो आता निराळा राहील.

सनिया सर्वांच्या घरी गेला. जणू तो खूप दिवसांनंतर परदेशाहून परत आलेला शेजारी असावा. सर्वांनी त्यास योग्य तो मान दिला. सनिया अतिशय आनंदित होऊन घरी परतला.

आंब्याच्या व जंगली झाडांच्या लाकडापासून आणि गवतापासून बनविलेल्या घरातच सनिया राहणार काय ? घरात शिरलं की छप्पर डोक्याला लागत होतं. छप्पर तरी कसलं होतं ? ताडाच्या झावळ्यांनी बनविलेलं.

त्याला लाज वाटत होती. त्यानं बटवा उघडून पाहिलं. अजून काही शिल्लक आहे. या पैशांनी एक छानसं घर बांधता येईल. त्यानं विचार केला. अगोदर राहायची सोय करावी, एक चांगलंसं घर बांधावं. मग मजुरी करून पोट भरता येईल.

सनियानं एक चांगलं घर बांधलं. चारी बाजूला भिंत घातली. अंगणात विहीर खोदून घेतली. बागबगीच्यासाठी देखील दहा गुंठे जमिनीला कुंपण घातलं. परिडा घराण्याची झाडाझुडपांनी भरलेली जमीन आता माणसानं राहण्यास योग्य बनली. लोकांनी म्हटलं, " सनियाला गुप्त धन सापडलं आहे. पण अशी संपत्ती फार दिवस टिकून राहत नाही. कापरासारखी उडून जाईल."

सनियानं नव्या घराकडे नजर टाकली. समाधानाचा निःश्वास सोडला. धोबी जणू हसत हसत घराबाहेर पडून येत असल्याचा भास त्याला झाला. पण धोबी कुठे आहे ? मकर संक्रान्तीला तिची भेट झाली होती. त्यानंतर दिसलीच नव्हती. त्या भेटीनंतर त्याचं आयुष्य किती बदलून गेलं होतं. धोबीला भेटण्यासाठी त्याचं मन तळमळत होतं. पण धीर होत नव्हता. काही झालं तरी सनिया नुसता एक मजूर होता, दुसरं काय ? लक्षाधीश चितेई सोईची मुलगी व लक्षाधीश जितेई नायकची सून असलेल्या धोबीला तो कसा काय भेटणार ?

का म्हणून धोबीनं स्नेहरज्जूंनी बांधून टाकलं ? दरिद्री, कंगाल सनियाला का तिनं मृत्यूच्या पाशातून ओढून काढलं ? त्यानं तर गाव सोडायचा निर्णय घेऊन टाकला होता. पण मग त्याच प्राचीन समाजात त्यानं का मुक्काम ठोकला ?

हे घर कुणाचं ? जे नवजीवन घेऊन सनिया घरी परत आला ते जीवन कुणाचं ?

सनियाच्या मनातल्या सोनेरी कल्पनांना जबाबदार कोण ?

सारं काही धोबीचंच तर होतं आणि सनिया जणू धोबीच्या हातचं खेळणं होता.

धोबीनं त्याला जे काही दिलं होतं ते सारं संपलं होतं. आता पोट भरण्यासाठी त्याला मजुरी करावी लागणार.

सनियाच्या मनात आलं, "कशासाठी करायची मजुरी ? जगण्यासाठी की दुसऱ्यांची संपत्ती वाढवण्यासाठी ? जगायचं तरी कुणासाठी ?"

नुसती मजुरी करण्यासाठी का सनिया जिवंत राहील ? देवाच्या सृष्टीचा हाच का न्याय आहे ? काही अपराध नसताना देव एकाला मजूर बनवतो आणि अजिबात कष्ट न करणाऱ्याला त्याचा मालक करतो ?

माणसानं घडविलेल्या दगडी मूर्ती प्रत्येक देवळातून देव म्हणून बसल्या आहेत. माणसानंच देव निर्माण केला आहे. आपल्या स्वार्थासाठी त्यानं जे मंत्र तयार केले ते ऐकून ऐकून दगडाचे देव जणू बहिरे झाले आहेत. माणसामाणसांत भेदभाव असावेत असा प्रचार काही त्यांनी कधी केला नाही. पण देव निर्माण करणारा; वेद, पुराण व मंत्र रचणारा माणूस मात्र तसा प्रचार करतो.

दुसऱ्याकडे मजुरी करण्याखेरीज सनियाला गत्यंतरच नव्हतं. मजुरी करून पोट भरणार. मग त्रासून जाणार. या जगात जन्मल्यापासून तो जगाचा होता. पण जग त्याचं नव्हतं. हे जग त्यांचंच आहे ज्यांनी ते अगोदरच लुबाडून घेतलं आहे. ते एक दिवस जग सोडून जातील. मात्र ज्या लोकांना ते 'आपले' समजतात त्यांच्यासाठी सारं काही मागे ठेवून जातील. हे 'आपले' लोक मालक बनतील जणू आईच्या उदरातूनच ते सारी संपत्ती आपल्याबरोबर घेऊन येणार आहेत.

त्याच लोकांकडे सनिया मजुरी करणार. त्यांच्यासारखं किंबहुना त्यांच्याहून मोठं होण्याकरता तो कष्ट करणार. रात्रंदिवस राबणार. सनिया मजुरी करू लागला. भल्या पहाटे उठून तो घरचं कामकाज आवरायचा. सर्वांत अगोदर बागेत काम करायचा. कुदळीनं माती खणायचा, मग रोपांना पाणी घालायचा. सूर्य वर येऊ लागला की घराला कुलूप लावून तो मजुरीसाठी निघायचा. दुसऱ्यांकडे अंग मोडून कष्ट केल्यावर तो दुपारी घरी परत यायचा. रात्रीचे 'परवाल' (पाण्यात भिजवलेला भात) खाऊन जरा दम घ्यायचा. मग पुन्हा उठून कामावर जायचा. संध्याकाळी दिवेलागणीची वेळ झाल्यावर तीन आणे मजुरी घेऊन तो घरी परत यायचा. दुकानातून डाळ, तांदूळ, मीठ, तेल विकत आणायचा. घरी पोचताच दमल्यामुळे एक तास व्हरांड्यात नुसता बसून राहायचा.

चावडीवरून मृदंग आणि दुसरीकडून चिपळ्या वाजवण्याचा आवाज यायचा. सनिया स्वैंपाक करायचा. मग बागेत काम करायचा, वांगी आणि अळू त्यानं लावला

होता. वांग्याच्या रोपांना छोटी छोटी वांगी आली होती.

मध्यरात्रीच सनिया स्वतःच्या हातांनी शिजवलेला भात खायचा. थोडं खायचा. उरलेल्यात पाणी घालून ' परवाल ' करायचा, मग झोपी जायचा. भल्या पहाटेच तो पुन्हा जागा व्हायचा.

सनियाबरोबर आणखीही मजूर काम करायचे. सनियाला सापडलेलं गुप्त धन बहुतेक संपलेलं दिसतंय असं ते कधी कधी आपसात बोलायचे. पण सनियानं मात्र अजून ते संपलेलं नाही असंच सर्वांना सांगितलं होतं. एके दिवशी त्यानं स्पष्टच सांगून टाकलं, " जमिनीत अजूनही बरंच धन आहे. कधी ना कधी सापडेलच." लोक आ वासून बघत राहायचे.

सनियाला जी तीन आणे मजुरी मिळत होती, ती त्याचं पोट भरायलाही पुरेशी नव्हती. त्यातून एक आणा शिल्लक टाकून एखादं वासरू वा शेळी खरेदी करणं अशक्य-प्रायच होतं.

त्याच्या वडिलांनी तीन एकर जमीन मागे ठेवली होती. त्या जमिनीवर चितेई सोई शेती करीत होते. जमिनीतून आपल्या वाटयाचं जे धान मिळत होतं ते प्रहराजपाशी होतं. देवाच्या नावावर गावकऱ्यांचा त्या जमिनीवर ताबा होता. या लोकांना चितेई सोईचं पाठबळ होतं. आपल्याच जमिनीकडे फिरकायचं धैर्य काही सनियाला होत नव्हतं. उपाशी राहावं लागलं तरी त्यानं प्रहराजपुढे कधी हात पसरला नाही.

समजा सगळे गावकरी गोळा झाले तरी सनिया थोडाच त्यांना तोंड देऊ शकणार होता ? जमीनदारापाशी तक्रार करायची म्हटलं तर त्यासाठी अगोदर ' सलामी ' लागणार ती कुठून आणायची ? सरकारी कोर्टात जायलाही पैसा हवा. ज्याच्या घरात खाण्यापिण्यासाठी दोन भांडी नाहीत तो कोर्टकचेरीत जाण्यासाठी पैसे कुठून आणणार ?

त्याला धोबीचा उपदेश आठवायचा. धोबी एक स्त्री आहे. तिचं वयदेखील खूप लहान आहे. चांगल काय, वाईट काय याचा विचार करायची बुद्धी अजून तिला नाही. गावकऱ्यांविरुद्ध काही बोललं, केलं तर त्याचा परिणाम काय होईल याचा अंदाज अजून तिला नाही.

सनियाला चैन पडेना. स्वतःचा काही कामधंदा नसेल तर त्याला चारचौघात कशी काय ऊठबस करता येणार ? ज्या लोकांकडे मजुरी करून पोट भरील त्यांच्यासमोर त्याला नेहमी खाली मान घालूनच वावरावं लागणार. यापेक्षा गाव सोडून गेला असता तर अधिक चांगलं झालं असतं. इतके कष्ट सहन करायची काय जरूर आहे ? कशा-साठी तो या गावात पडून राहिलाय ?

धोबीची सेवा, सहानुभूती आणि तिच्या प्रोत्साहनाविषयी सनिया विचार करायचा. तिची आठवण होताच तो रोमांचित व्हायचा. त्यालाही वाटायचं की धोबीबरोबर... त्याच्या लहान तोंडी मोठा घास यायचा. तो जणू ओरडून सांगायचा की इतके दारिद्र्य, दु:ख, कष्ट, अपमान सहन करून मनातल्या खोल आशाआकांक्षांच्या चितेवर जगण्यात काय अर्थ आहे ? तसलं जीवन जगायची इच्छा नाही. जगायचं असेल तर माणसा-सारखंच जगेन. ओंडक्यासारखं वा दगडासारखं निष्प्राण जीवन जगणार नाही. स्वत: राबून दुसऱ्यांच्या संपत्तीत भर घालण्याचं साधनही बनणार नाही. त्यानं निश्चय केला की प्रहराजपाशी जायचं. आपला हक्क त्यांच्याकडून घ्यायचा.

सनियाचं म्हणणं पंडित प्रहराजनी मान्य केलं नाही. सनियाचं सारं बोलणं ऐकून घेतल्यावर त्यांनी तपकिरीची चिमूट ओढली. शेंडीत लावलेली फुलं जराशी हलविली आणि अगदी मवाळ सुरात म्हणाले, "हे बघ बाळ, जमिनीचा मालक जमीनदार आहे. मी नाही. जोवर शेतकरी सारा भरतो, जमीन त्याच्यापाशी राहते. शेतसारा वेळेवर पोचला नाही की जमीनदार न्यायालयात दावा करून जमीन परत घेतो. जमीनदारालादेखील सारा भरावा लागतो ना ! तो कुठून आणावा त्यानं ? तुझी तीन एकर जमीन लिलावात निघाली होती. कारण सारा भरला नव्हता. चिंतेई सोईंनी जमीन विकत घेतली."

थोडं थांबून पंडित प्रहराज पुढे म्हणाले, "चिंतेई सोई अतिशय उदार आहेत. त्यांनी गावकऱ्यांना बोलावलं आणि सांगितलं की, गावच्या देवाला देवस्थान नाही. देवाचे सण, उत्सव कसे साजरे करायचे ? त्यांनी मला बोलावलं आणि ही जबाबदारी माझ्यावर सोपवली. त्याचबरोबर ताकीद पण दिली की दुसऱ्या गावच्या देवांच्या तुलनेत आपला देव मागे पडता कामा नये. धन्य आहे सोईजीची ! देव त्यांची भरभराट करो. सनिया बेटा, त्या जमिनीवर आता तुझा काहीच हक्क नाही."

पंडित प्रहराजनी पुन्हा नाकात तपकीर कोंबली आणि म्हटलं, "माधो राऊत, गोकुलि पात्र, आणि गोबरी बस्तिआची जमीनदेखील सोईजीनी लिलावात घेतली होती. सर्व जमीन त्यांनी देवालाच अर्पण केली आहे. सनिया बाळ, तू का उगाच काळजी करतोस ? माणूस धनसंपत्ती कमावतो. त्यापुढचे मग सर्व देवाच्या हाती आहे. त्याच्या मर्जीखेरीज झाडाचं पान हलत नाही. देव आणि ब्राह्मणांवर श्रद्धा ठेव. देवाच्या मनात आलं तर 'अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशिल दो कराने,' अशी स्थिती होऊन जाईल."

ओसरीत बसल्या बसल्या पंडित प्रहराजनी पोथीची पानं उलटली. ओसरीखाली परी दलाई, बिनी कांडी आणि सेवा बेहेरा हात जोडून बसले होते. प्रहराजचं बोलणं ऐकून सर्वजण म्हणाले, "होय सनिया, देवावर विश्वास ठेव. तुझं दु:ख दूर होईल. चांगले

दिवस येतील, तुझी संपत्ती वाढतच जाईल."

बिनी कांडीनं म्हटलं, "अरे बेटा, तुझ्या पूर्वजांच्या पूर्वपुण्याईनंच तू त्या लोकापर्यंत जाऊन परत आलास. परिडा घराण्याचं नाव राहिलं. माधो राऊतकडचं कुणीच आलं नाही. गोकुलि पात्र, गोबरी बस्तिआ वगैरे पण गेले होते. पण कुणीही परत आलं नाही. ते सर्व पापी होते म्हणूनच त्यांचं तसं झालं."

बिनी कांडीच्या होला हो करीत पंडित प्रहराज म्हणाले, "बिनी खोटं नाही सांगत. मी माझ्या डोळ्यांनी पाहिलंय की माधो राऊत बैलांना किती निर्दयपणे मारायचा. एक दिवस त्यानं इतकं मारलं होतं की बैलाच्या अंगातून रक्त आलं होतं. गोमातेच्या शापामुळे तर स्वर्ग, पृथ्वी, पाताळ तिन्ही थरारून जातात."

परी दलाईनं म्हटलं, "प्रहराजजी, आपली गोष्ट का लपवताय ? त्या दिवशी गोकुलि पात्र कसा तुमच्या अंगावर धावून आला होता ? विसरलात का ? तुमचा शापदेखील त्याला भोवलाय."

हसत हसत प्रहराजनी म्हटलं, "छे, छे, असं बोलू नकोस परी ! जगाच्या कल्याणासाठी ब्राह्मणाचा जन्म असतो. आमच्या तोंडून थोडाच शाप निघणार ? त्याला त्याच्या कर्मांची फळं मिळाली. माझ्या शापाची नव्हे."

सेवा बेहेरा म्हणाला, "गोबरी बस्तिआचीदेखील देवाब्राह्मणांवर श्रद्धा नव्हती. परिणाम काय झाला ? त्याचा निर्वंश झाला. गावातल्या देवीच्या पिपळाच्या झाडाची एक फांदी त्यानं तोडली होती. काय घमेंड !"

सनियानं हात जोडून म्हटलं, "तर मग मी कशावर गुजराण करायची ? मजुरी मिळते ती पुरेशी नाही. शिवाय मजुरी तरी दररोज कुठं मिळते ? देवाच्या दानाच्या ढिगाऱ्यातून मला थोडंसं उधार द्या. देवाची थोडीशी जमीन मला शेती करायला द्या. मी माझा वाटा घेऊन दुसरा वाटा परत करीन."

हे ऐकून पंडित प्रहराज गंभीर झाले. म्हणाले, "चिंतेई सोईच्या परवानगीवाचून मला काही करणं शक्य नाही बाळ ! देवाची संपत्ती आहे—मी तो नुसता भारवाही."

सेवा बेहेरानं म्हटलं, "अरे, जमिनीतून सापडलेलं गुप्तधन संपलं वाटतं ? ती संपत्ती मिळवायला तू थोडीच घाम गाळला होता ? देवाच्या मनात आलं नि तुला गवसलं. सारं खलास करून टाकलं की काय ? देवाच्या चरणीही काही वाहायचं होतंस."

रागाने सनियाचे डोळे तांबारले. तो टक लावून सेवा बेहेराकडे पाहत होता.

बिनी कांडी म्हणाला, "बाळ, तू फार मोठी चूक केलीस. इतकं मोठं घर बांधायची काय जरूर होती ? किती पैसा वाया गेला त्यात. स्वतःसाठी एक खोली फक्त बांधून, पैसे वाचवून दोन एकर जमीन घ्यायची होतीस. किती चांगलं झालं असतं. नंतर मग हळूहळू आणखी जमीन खरेदी करायचीस."

प्रहराज पोथी बघत होते. काही बघून ते म्हणाले, " अरे परी, तू विचारीत होतास ना ते आता सापडलं. तुझ्या वहिनीच्या पायाच्या जखमेवर माशी बसली होती ना ? त्याला म्हणतात 'मक्षिकापातक दोष.' ठाऊक आहे, किती पापं केल्यावर माशी बसते ते ? या पोथीत सारं काही लिहिलेलं आहे. हं तर प्रायश्चित्तासाठी पंधरा एक रुपये खर्च येईल. जे काही जप, नेम वगैरे आहेत ते करावे लागतील. नाही तर पापनिरास कसा होणार ? थोडयाशा पैशात थातुरमातुर काही करून प्रायश्चित्त घेता येईल. लोकांच्या डोळयात धूळ टाकता येईल. पण तो देव सारं बघत असतो ना ! देवाच्या डोळयात धूळ टाकणं शक्य नाही. पाप कधी एकाच जन्मात नाहीसं होत नसतं, जन्मोजन्मी पाठपुरावा करीत राहतं. बघ की, आपण सर्व एकजात मानव आहोत. पण सर्वजण समान कुठेत ? कुणी सुंदर आहे तर कुणी कुरूप आहे, कुणी लहान आहे तर कुणी मोठा. हे सर्व कर्माचंच फळ बरं बाळ ! तेवढयाचसाठी मी सांगतोय की चार पैसे जास्त खर्च झाले तरी होऊ देत. पण पापाची कायमची हकालपट्टी करून आत्म्यास निर्मल करायलाच हवं."

परी दलाई असहायपणे त्या पोथीकडे बघत होता. काय ? पंधरा रुपये ? चिखलापाण्यात रात्रंदिवस खपून परी दलाई काही मासे पकडतो आणि तेच विकून पोट भरतो. दुसऱ्यांची थोडी जमीनही कसतो. धान कुटून त्याचे पोहे बनवतो. पण सारं काही करूनसुद्धा जे काही पैसे मिळतात त्यावर भागत नाही. आणि प्रहराज तर पंधरा रुपयांविषयी बोलताहेत. आता हे पंधरा रुपये आणायचे कुठून ? थोरल्या भावाचा रोजगार चांगला होता. तो देवीच्या साथीला बळी पडला. संसाराचं सारं ओझं त्याच्याच खांद्यावर येऊन पडलं. आता काय करावं ? त्याच्यासाठी पंधरा रुपये ही भली मोठी रकम होती. प्रायश्चित्त केलं नाही तर लोक खायला उठतील. जातभाईंनी त्याला अगोदरच दूर लोटलं होतं. त्याच्या घरच्या कुणाचा नुसता स्पर्श झाला तरी ते पाणी दुसरी मंडळी पीत नसत. पोहे करण्यासाठी त्याला धानही कुणी देत नव्हतं.

आता बिनी कांडीकडे मोहरा वळला. पंडित प्रहराजनी सांगितलं की, " खुंटयाला बांधली असताना जर गाय मेली तर फार मोठं पातक लागतं. गोहत्येपेक्षा महत्पातक अन्य नाही. दाती तृण धरून लोकांच्या दारी जावं लागेल. कुणाशी बोलणंचालणं नाही. याशिवाय आपल्या सामर्थ्यानुसार ब्राह्मणभोजन घालायला हवं. किती खर्च येईल ते आताच सांगणं कठीण आहे. मी सर्व मागचा पुढचा विचार करून एका कागदावर टिपून देईन. तू नंतर पाहा."

सेवा बेहेरानं म्हटलं, " पंडितजी माझं काय व्हायचं ते पण जरा सांगून टाका की."

प्रहराज म्हणाले, " आता तुला काय सांगू ? कसं समजावू ? आजारी असलं, मरतुकडं असलं तरी अखेर ते मांजर आहे ना ? तुझ्या बायकोने त्याला काठी फेकून

मारलं. त्या काठीच्या मारानं जर मांजर मेलं तर त्याचं पाप कुणाला ? काठीला का लागणार आहे ? नाही ना ? तुझ्या बायकोलाच लागेल ना ? तेव्हा आता असं कर. मांजराच्या भारंभार मीठ ब्राह्मणाला दान दे. तुझ्या ऐपतीप्रमाणे ब्राह्मणांना खाऊपिऊ घालून वर दक्षिणा दे. बस ! इतकं केलं तरी चालेल."

प्रहराज उठून उभे राहत म्हणाले, " चितेई सोईची मुलगी धोबी उद्या एकादशीचं व्रत करणार आहे. तिनं बोलावलं आहे. दर एकादशीला त्यांच्याकडे होमहवन असतं. पाच ब्राह्मणांना जेवू घालतात. भागवताचं पठण असतं. ' खड्गायत ' घरची ही मुलगी, लहानपणीच विधवा झाली. पण ज्या नेमधर्मानं ती वागते तसं दुसरीकडे क्वचितच पाहायला मिळेल. माझ्या तरी पाहण्यात दुसरं उदाहरण नाही. बरंय मंडळी. आता तुम्ही जायला हरकत नाही."

सर्वजण उभे राहिले.

आता सनियानं पुन्हा तोंड उघडलं. भीत भीत म्हटलं, " पंडितजी, आता थोडा माझाही उद्धार करा. मी काय खावं ? कसं जगावं ? दुसरं काही शक्य नसेल तर तुम्ही तुमच्याच जमिनीतली थोडीशी मला द्या. मी शेती करून तुमचा वाटा तुम्हाला देईन. सध्या तरी गुजराण करण्यासाठी मला थोडं धान द्या. पीक आल्यावर सव्याज त्याची फेड करीन."

प्रहराज चिडले होते. म्हणाले, " अरे, तुझ्या पोषणाची जबाबदारी माझ्यावर थोडीच आहे ? मी कोण हे लोढणं गळ्यात घेणारा ? या गावचे सर्वेसर्वा चितेई सोई आहेत. त्यांच्यापाशी जा. आपलं गाऱ्हाणं सांग त्यांना. त्यांच्याकडे कसली कमतरता ? धन मागितलंस तरी ते देतील नि जमीन मागितलीस तरी ते देतील. त्यांना प्रसन्न केलंस तर तुझ्या सर्व अडचणी दूर होतील. त्यांच्यासमोर आम्ही नुसते शेळ्यामेंढ्या आहोत. दुसरं काय ! आमच्याकडून काही होणार नाही, बाळ ! "

प्रहराज आत निघून गेले. पगी, बिनि आणि सेवा बेहेरादेखील निघून गेले. निराश होऊन सनिया प्रहराजच्या घरासमोरील नारळाच्या झाडाखाली जाऊन बसला. अतिशय थकून गेला होता तो.

पौषातल्या कृष्णपक्षाची दशमी होती. थंडी कमी झाली होती. तरीमुद्धा दुपारच्या उन्हाच्या वेळी वाऱ्याच्या झुळुकीनं शरीराला कुडकुडी भरत होती. सावलीत गारठा जाणवत होता. पण उन्हाची उष्णताही सहन होत नव्हती. नारळांच्या झाडाखाली बसून सनिया विचार करीत होता—आता काय करावं ?

कुणा मुलीच्या हसण्याच्या आवाजानं सनिया सावध झाला. चौकसपणे बघू लागला. कोण होती ती ? नारळाच्या झाडापासून थोडं दूर प्रहराजचे पिकांचे ढीग होते. त्या ढीगा पाठीमागे एक सुंदर मुलगी लपत होती. तिचा पदर धरून एक तरुण तिच्यामागे

धावत होता. दोघे हसत होते. पण अठरा वर्षांच्या त्या मुलाचं अजून सनियाकडे लक्ष गेलं नव्हतं.

कोण होती ती मुलगी ?

सनियानं नजर टाकली. प्रहराजची नात होती ती. बालपणीच विधवा झाली होती. तिचं नाव होतं पार्वती. लोक तिला लाडाने 'पारो' म्हणायचे. मुलगा होता शिव घोष. प्रहराजच्या शेतावर काम करायचा. तोदेखील खड्गायत कुळाचा एक अनाथ मुलगा होता.

सनियाला बघताच पारो लाजली. शिव घोषावर लटका रोष दाखवून म्हणू लागली, " सोड ना माझा पदर."

सनिया हळूहळू घराकडे परतला.

सनियाकडे जाऊन त्याचं नवं घर बघावं आणि त्याच्याशी थोडं बोलावं, गप्पा माराव्यात असं कधी कधी धोबीच्या मनात यायचं. पण तिला लाज वाटायची आणि भीतीदेखील वाटायची. महादेवाच्या देवळाला जाताना सनियाचं घर तिला दिसायचं. तिरप्या नजरेनं त्याच्या घराकडे बघत बघत ती परत यायची. सनियाच्या घरापाशी जरा थांबावंसं वाटायचं. पण ती झपझप निघून जायची. सनियाची गाठ पडावी असं मनातून वाटायचं. पण भीतीनं ती आजूबाजूला नजर टाकायची. जणू अवघ्या जगाचे डोळे तिच्यावरच खिळलेले असायचे.

जाता जाता सनियाचं घर मागे पडायचं. धोबी त्याच्या घराच्या छपराकडे अखेरचं बघून दीर्घ उसासा टाकायची.

धोबीला हेदेखील उमजत नव्हतं की सनिया जेव्हा गाव आणि गावकऱ्यांना सोडून जाऊ इच्छित होता तेव्हा धोबीचं म्हणणं ऐकून कशासाठी थांबला ? धोबीसाठी त्यानं आपला संकल्प का मोडला ? धोबीच्या आग्रहाखातर त्याने सोन्याच्या मोहोरा घेतल्या होत्या ? धोबीच्या प्रेरणेनं त्यानं घर बांधलं, प्रायश्चित्त घेऊन जातीत आला. आता मजुरी करून पोट भरतोय. का म्हणून तो इतके कष्ट उपसतोय ? परिडा घराण्याचं नाव राखण्यासाठी तो लग्नही करणार का ?

याच विचारानं धोबी अस्वस्थ व्हायची. आपले कैलासवासी पती व सासरे यांची चित्रं तिच्या डोळ्यांसमोर तरळून जायची. त्यांच्या प्रेमळपणाच्या गोष्टी आठवायच्या. अतिशय दु:ख व्हायचं. या सर्व विचारानं धोबीला स्वत:चाच राग यायचा. स्वत:चाच तिरस्कार वाटायचा. मनात यायचं, का म्हणून तिनं आपले पती व सासऱ्यांनी मिळवलेलं धन रस्त्यावरच्या भिकारी सनिया परिडाला देऊन टाकलं ?

आपल्या खोलीत धोबी अश्रूंनी उशी भिजवून टाकायची. तिच्या अंगाखांद्यावर धाकटी भावंडे हुंदडायची. तिची साडी ओढायची. पण धोबी निर्जीव ओंडक्यासारखी पडून राहायची. काकू कधी कधी येऊन बघायची. तिरकस बोलायची. मुलांना ओढून घेऊन जायची. पण धोबी तशीच स्तब्ध पडून राहायची.

अधूनमधून आजी यायची, मस्तकावर हात फिरवायची.

कधी कधी वडीलही हाक मारायचे, " धोबी, हरी महांति कागदपत्र घेऊन आलेत. मी सर्व नीट पाहिलेत. तू येऊन सही कर बघ."

धोबीला वाटायचं, जळले मेले ते कागद ! पण ती निमूटपणे उठायची. डोळे पुसून बाहेरच्या खोलीत जायची. महांति सांगतील तिथे सही करायची. महांतींना सारं समजत होतं. पण धोबीला काहीच समजत नसे. काम संपवून धोबी घरात निघून जायची.

आई म्हणायची, " धोबी थोडं खाऊन घे !"

धोबीचे डोळे भरलेले असायचे. म्हणायची, " आज तर चंद्रवार आहे. मला उपवास आहे." धोबी एकटी आपल्या खोलीत निघून जायची. श्रीमद्भागवत पुराण वाचायची. आजीजवळ बसून ऐकायची.

कधी चंद्रवार तर कधी एकादशी. कधी व्रत तर कधी एखादं पर्व. धोबीचा बराचसा वेळ या अशा उपवासांमध्येच जायचा. प्रहराज येऊन पुराण वाचायचे. एखादा चांगलासा दिवस बघून होमहवन करायचे. ब्राह्मणांना भोजन मिळायचे. लोक म्हणायचे, " धोबी धन्य आहे. या कोवळ्या वयात इतका नेमधर्म ?" लोक आणखीही बोलायचे की, " बाहेरून आल्यावर धोबी कपडे बदलते. अस्पृश्याची नुसती सावली जरी पडली तरी ती स्नान केल्यावाचून राहत नाही."

चिंतेई सोई खूष व्हायचे. त्यांची मुलगी समाजाचे नीतिनियम पाळून नेमधर्मानं राहत होती. लोक तिची प्रशंसा करीत होते—त्यांच्यासाठी किती अभिमानाची गोष्ट होती ही ! प्रहराज शास्त्रपुराणे वाचून दाखवीत. म्हणत, या एका धोबीच्या धर्माचरणानं व सदाचारानं सात पिढ्यांचा उद्धार नक्कीच होईल.

निधी सोई चकित होऊन धोबीकडे पाहायचे. धोबी मान खाली घालून बसायची. आई डोळ्यांतून अश्रू गाळायची. तपस्विनीसारख्या आपल्या मुलीला छातीशी कवटाळून रडायची आणि तिच्या बरोबर धोबीदेखील रडायची. आपल्या रक्तामांसानं जिनं तिला जन्म दिला होता, तिला आपल्या पोटच्या गोळ्याचं दुःख जाणवत असे, सहन होत नसे.

दुपारची वेळ. चिंतेई सोई बैठकीच्या खोलीत बसून हरी महांतीनं आणलेले कागदपत्र तपासून पाहत होते. निधी सोई सावकारीचे कागद पाहत होते. एकाएकी धोबी तिथं

आली. रडून रडून तिचे डोळे सुजले होते. पाठीवर केस मोकळे सोडलेले होते. डोळ्यांत हताश भाव होता. शून्यपणा होता. हरी महांती उठून उभे राहिले.

चिंतेई सोईंनी मुलीच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. मनातल्या मनात दचकले. विचारलं. "काय झालं बाळ ?"

निधी सोईदेखील कागदावरून नजर बाजूला करून धोबीकडे एकटक पाहत होते.

धोबीचे ओठ थरारले. काही बोलायचं होतं. अचानक स्तब्ध झाली. चिंतेई सोईंना जणू तिच्या मनातली गोष्ट कळली होती. म्हणाले, "बैस."

धोबी बसली. हरी महांतींनी थोडं दूर बसून आपल्या कार्यनिपुणतेचा पाढा वाचून दाखवला. त्यांनी सांगितलं, "मी नायकजींच्या संपत्तीची देखभाल करू लागल्यापासून 325 एकर जमीन लिलावात खरेदी केली. 1100 'भरण' धान कर्जाऊ दिले त्यापैकी 1028 'भरण' धान परत वसूल केलं. 900 'भरण' धान व्याजावर दिलं. 128 'भरण' धानाची विक्री झाली आहे आणि त्याचे पैसेपण जमा केले."

महान्तींनी जरा दम घेतला. मग धोबीकडे दृष्टिक्षेप टाकला. धोबी लक्षपूर्वक कागदपत्र पाहत होती. महान्तींनी आणखी खातेवह्या काढून हिशेब समजावून सांगायचा प्रयत्न केला. त्यांनी म्हटलं, "जी मंडळी गाव सोडून पळून गेली त्यांची 180 एकर जमीन खरेदी केली. जे लोक परतून आले त्यांना प्रायश्चित्त, शुद्धिकार्य वगैरेसाठी पैशांची गरज लागली. जमीन विकण्याखेरीज त्यांच्यापुढे दुसरा मार्ग नव्हता. म्हणून धान व काही रुपये घेऊन त्या लोकांकडून 219 एकर जमीन विकत घेतली. आता पूर्वी जे मालक होते त्यांना खंडानं ती जमीन दिली आहे."

चिंतेई सोईनी म्हटलं, "अशा लोकांकडून ती जमीन परत मिळवणं कठीण होईल."

"मुळीच नाही." महान्तींनी समजावून सांगितलं, "दरवर्षी खंडकरी बदलले जातात. नंतर त्यांना जमिनीवर काहीच हक्क सांगता येत नाही."

चिंतेई सोई खूष झाले. म्हणाले, "शाबास महान्तीजी ! किती दूरदर्शीपणानं तुम्ही काम करता. पण इतकं सारं समजावून सांगितलं तरी या निध्याच्या (निधी सोईच्या) डोक्यात काही शिरतच नाही. बैलासारखा हा राबतो, कागदपत्रपण नीट बघतो, तरी याला सावधगिरी कशी ती माहीतच नाही. यानं जर धोबीच्या मालमत्तेची देखरेख केली असती तर इथला सर्व कारभार मी साभाळला असता."

थोरल्या भावाचं रोखठोक बोलणं निधी सोई कधी मनावर घेत नसत. लहानपणापासूनच थोरल्या भावाच्या शिव्या खाऊन, तसंच त्याच्या मायेच्या वर्षावात न्हाऊन निधी सोई मोठे झाले होते. थोरल्या भावाच्या हुकुमाखेरीज दुसरं काही त्यांना ठाऊक नव्हतं.

पण आज निधी सोई धोबीचाच विचार करीत होते. धोबी अशी आज अचानक

कागदपत्र बघायला का आली होती ? दोन दिवसांपासून ती खिन्न होती. कुणाशी बोलत नव्हती. जिथं बसायची, तिथंच निमूटपणे बसून राहायची. खाण्यापिण्याचं नाव घेत नव्हती. डोळ्यांना संततधार लागली होती.

धोबीचे डोळे अजूनही अश्रूंनी डबडबलेले निधी सोईंना दिसले. ते शहारले. जणू त्यांच्या काळजावर कुणी घाव घालीत होते. पण थोरल्या भावासमोर धोबीला काही विचारणं त्यांना शक्य नव्हतं. तिला दिलासादेखील ते देऊ शकत नव्हते. धोबीच्या मनात काय आहे हे ओळखणं त्यांना कठीण होतं.

हरी महान्तींनी कागदपत्र गोळा करून पुन्हा म्हटलं, " त्या मधुआचं प्रकरण तुमच्या कानावर आलेलं दिसत नाही. बनेई परिडाची मुलगी पुनी हिला त्यानं घरात ठेवलं आहे. यावर बाउरी हरिजन वस्तीचे लोक खवळले आहेत. मधुआ जातभाईंना भोजन घालत नाही की पुनीला सोडत नाही. मी खूप समजावलं. धमकी देखील दिली पण तो ऐकेल तर ना ? काल त्याला बोलावलं होतं. पण त्याचा उद्धटपणा बघा. म्हणतो कसा, " हात आहेत तोवर भात नक्की मिळेल. धमकीनं घाबरून जायचं मला काय कारण ?"

चिंतेई सोई हसू लागले. म्हणाले, "ठीक आहे, राहू देत ती मुलगी त्या अस्पृश्याच्या घरी. लोकांनाही दिसेल की बनेई परिडाची मुलगी एका अस्पृश्याच्या, बाउरीच्या घरात राहतेय. त्या दिवशी बनेई परिडा काय म्हणाला होता ते आठवतंय ना ? तुम्ही पण बाउरी वस्तीच्या लोकांना समजावून टाका की मधुआ आणि पुनीला तिथंच राहू द्या. त्या दिवशी जे लोक हसले होते त्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडू दे. मग वाटल्यास त्यांनी हसावं."

चिंतेई सोई गप्प झाले. थोड्या वेळानं जरा हसून पुन्हा म्हणाले, " बनेई परिडाच्या मुलाचंपण बघा तरी. त्याला कुठलंसं गुप्तधन सापडलं. त्यानं प्रायश्चित घेतलं, घर बांधलं, दुसऱ्यांकडे मजुरी केली. पण इतका गर्विष्ठ आहे की अजूनपर्यंत माझ्यापाशी आला नाही. प्रहराजपाशी मात्र गेला जमिनीसाठी."

प्रहराजकडून ऐकलेली सारी गोष्ट चिंतेई सोईंनी सांगितली. हसत हसत म्हणाले, " तो गेला आहे जमीनदारापाशी तक्रार करायला पण जमीनदार काय करणार आहे ? सारं कसं कायद्याप्रमाणं झालं आहे. सनियाची जमीन लिलावात घेऊन ती मी देवाला वाहिली आहे. जमीनदाराला काय, नुसत्या शेतसाऱ्याशी कर्तव्य !"

धोबीचे ओठ थरारले. तिला जे सांगायचं होतं ते ती सांगू शकली नाही. तिचे डोळे जणू धगधगत होते. नाकपुड्या फुलल्या होत्या. बोलायचं धैर्य झालं नाही. वडिलांच्या व काकांच्या समोर बसून त्यांचे विचार ऐकायची तिची इच्छा नव्हती. कुणाला काही न सांगता ती उठून निघून गेली.

दुर्गापूरहून तीन कोसांवर निमपूर होतं. सनियानं खूप चकरा मारल्या. पण जमीनदार शिव छोटरायची गाठ काही पडली नाही. शिवराय क्षत्रिय जातीचे होते. सकाळी खूप उशिरा उठत. आंघोळ, नाश्ता वगैरे उरकेपर्यंत दुपार व्हायची. त्यानंतर सोंगट्यांचा खेळ सुरू व्हायचा. तो संध्याकाळीच संपायचा. रात्री भांग घोटली जायची. भांग पिऊन जमीनदार महाशय मौजमजा करायचे. मध्यरात्री जेवून झोपी जायचे.

आता या सर्व कार्यक्रमांतून प्रजेच्या तक्रारी ऐकायला त्यांच्यापाशी वेळ कुठं होता ? गोविंद प्रधान हा दुर्गापूरचा मामलतदार होता. सनियानं त्याच्याचपाशी आपलं निवेदन केलं.

गोविंद प्रधानानं सारं ऐकून घेतलं. मग म्हणाला, " हा सर्व नशिबाचा खेळ आहे बरं सनिया ! नशिबात असेल ते काही बदलता येत नाही. चितेई सोईनं जे काही केलं आहे ते सर्व कायद्याच्या चौकटीत बसवून केलंय. त्यांच्याविरुद्ध काही कारवाई करणं शक्य नाही."

मग गोविंद प्रधानानं उपदेश दिला की सनियानं जाऊन त्यांचेच पाय धरावे. त्यानं म्हटलं, " तू त्यांच्याचपाशी जा. त्यांना काय कमी आहे ? त्यांची कृपा झाली तर तू पुन्हा संपन्न होशील."

गोविंद प्रधान सनियाच्याच जातीचा होता. त्याच्यासाठी सनिया वांगी, केळी वगैरे ढीगभर सामान घेऊन गेला होता. गोविंद असा उपदेश करील असं सनियाला स्वप्नातही वाटलं नव्हतं. त्यानं विचार केला, जावं चितेई सोईंच्यापाशी आणि त्यांचे पाय धरून पाच एकर जमीन मागावी. त्यांच्या जमिनीवर शेती करून उपजीविका करणारे खूप लोक होते. चितेई सोईंनी दया दाखवली तर त्याला कसलाच त्रास उरणार नाही. घमेंड केल्यानं नुकसानच होतं, फायदा नाही. हरिश्चन्द्र राजानं नाही स्मशानात पहारेदारी केली होती ? आपल्यालाच कशाला हवा इतका तोरा ?

संध्याकाळी घरी परतल्यावर सनियानं मामलतदार गोविंद प्रधानाच्या सल्ल्यावर पुन्हा विचार केला. चितेई सोईंच्या घरी जावंसं वाटत होतं. पण पाय उचलत नव्हते. कशासाठी जायचं ? समजा थोडी जमीन मागून शेती केली तरी त्यानं काय होणार आहे ? शेतावरचा मजूर मजूरच राहील. मालक थोडाच होणार आहे ? अशा एका मजुराला चितेई सोई आपली लेक देतील होय ? एका सामान्य मजुराचा हात धरायला धोबी पण पुढे सरसावणार नाही.

तर मग ? कशासाठी त्यानं घर बांधलं ? का म्हणून तो जातीत आला ? कशाकरता तो शेती करणार ? रक्त आटवून संपत्ती मिळवायची ती तरी कशासाठी ?

धोबीनं त्याच्या हातात सोन्याच्या मोहोरा कोंबल्या त्या दिवसांपासून पुन्हा तिची गाठ पडलेली नाही. भेटायचा त्यानं खूप प्रयत्न केला होता. महादेवावर त्याची अजिबात भक्ती नव्हती. तरी तो पुन्हा पुन्हा महादेवाच्या दर्शनाला गेला होता. मनात ओझरती आशा होती. धोबी भेटेल कदाचित. बांधावरदेखील येरझाऱ्या घातल्या होत्या. पण त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले होते. धोबीची गोष्ट त्यानं दुसऱ्या कुणाला सांगितलीही नव्हती.

आहे तरी काय धोबीच्या मनात ? धोबीच्या मनातली गोष्ट समजणं सनियाला शक्य नव्हतं. त्याने विचार केला, " धोबीचं त्याच्यावर प्रेम होतं खरं. पण त्याचा काय उपयोग ? चिंतेई सोईच्या इच्छेविरुद्ध काही करणं तिला जमेल का ? अशक्यच आहे."

सनियाला कुठलाच निर्णय घेता आला नाही.

सायंकाळ झाली. आभाळात पश्चिम दिशेला श्रीपंचमीचा उज्ज्वल चंद्र प्रकाशत होता. त्याच्याचकडे पाहत सनिया स्तब्ध बसला होता. त्याच्या घरचं मागील दार उघडून कुणी आत येत होतं. सनिया उठून उभा राहिला. आंगतुकानं विचारलं, " सनिया आहे का ?"

सनियानं आवाज ओळखला. त्यानं नमस्कार केला. विचारलं, " कसं येणं झालं प्रहराजजी ?"

प्रहराजनी हात उचलून आशीर्वाद दिल्यासारखं करीत म्हटलं, " अरे सनिया, पुरोहित ब्राह्मण काय कधीही यजमानाच्या घरी दाखल होतो. यजमानाच्या कल्याणाचा विचार करणं हे पुरोहिताचं कर्तव्यच आहे."

नारळाच्या झावळ्यांनी बनविलेली एक चटई सनियानं जमिनीवर अंथरली. प्रहराज बसले. सनिया एका खांबापाशी उभा राहिला. प्रहराज का आले होते ते कोडं त्याला अजून उलगडत नव्हतं.

" अरे सनिया, तू चिंतेई सोईच्या घरी गेला नाहीस, पण मी मात्र तुझ्यातर्फे त्यांना विनंती केली आहे. सोईजी अतिशय दयाळू आहेत. तुझ्या मामल्यात त्यांनी खूप सहानुभूती दाखवली. म्हणाले, बनेई परिडाने मोठ्या सुखासमाधानानं संसार केला होता. त्यांचं नशीब वाईट होतं म्हणून त्यांच्या कुटुंबाची अशी वाताहत झाली. असो, सर्वांना याच गावात राहायचं आहे. सनियापाशी तर बैलसुद्धा नाहीत. बैल विकत घ्यायला पैसे पण नाहीत. एकटा जीव, जमीन त्याला मिळाली तरी तो शेती कशी करणार ? दुसरी गोष्ट म्हणजे, तो असा रोज रोज दुसऱ्यांकडे मजुरी करायला का जातोय ? माझ्या घरी जर त्यानं मजुरी केली तर त्याचे सर्व प्रश्न सहज सुटतील. जेवणखाण, कपडालत्ता तर मिळेलच शिवाय चार पैसेही मिळतील. त्या पैशांनी पुढे त्याला बैल विकत घेता येतील."

प्रहराजनी सारं सांगून टाकलं होतं. त्यानंतर ते गप्प होऊन बसून राहिले.

सनियाच्या मनात आलं, चिंतेई सोईंच्या घरी का म्हणून मजूर होऊन राहायचं ? दुसऱ्यांकडे मजुरी केल्यानं तो काही उपाशी राहणार नाही ? गरिबांच्या अगतिकपणाचा फायदा उचलून त्यांची बरीचशी जमीन चिंतेई सोईनं घशात घातली आहे. अशा माणसाचा मजूर म्हणून काम करायचं ? चिंतेई सोईचा मजूर म्हणून जगासमोर मिरवायचं ?

त्याच्या मनातली खळबळ जणू प्रहराजनी ओळखली. त्यांनी म्हटलं, " सनिया बाळ, संकटप्रसंगी नुसता विचार करण्यात इतका वेळ घालवायचा नसतो. माझं ऐक, सोईजींच्या घरी एकदा जा आणि तुला जे काही वाटतंय ते त्यांना सांगून टाक. एकदा समोरा-समोर बोलून झाल्यावर मग तुला जे काही वाटेल ते कर. बुडत्याला काडीचा आधार. तुझी स्थिती सध्या तशीच आहे बाळ ! ईश्वरेच्छा असली तर तुझं दुर्दैव संपेल."

प्रहराज निघून गेले. दार बंद करून सनिया आत आला. अजून तो विचार करीत होता. त्याच्याकडे येण्यामागे प्रहराजचा काय हेतू असावा ?

दुसऱ्या दिवशी दुपारी—

सनिया चिंतेई सोईंच्या कचेरीत दाखल झाला. सोईजी कागदपत्र पाहत होते. हरी महान्ति चष्मा घालून काही तरी समजावून सांगत होते. थोडं दूर बसून निधी सोईदेखील हिशेब करण्यात दंग होते.

चिंतेई सोईंनी मान वर करून सनियाकडे नजर टाकली. निधि सोईंनी देखील त्याच्याकडे दृष्टिक्षेप टाकला. चष्मा कपाळावर करून हरी महांतींनीदेखील तिरप्या नजरेनं त्याच्याकडे पाहिलं.

मनियानं नतमस्तक होऊन नमस्कार केला. चिंतेईंनी हसून विचारलं, " कसं काय सनिया ? आज इकडं कुणीकडं ? ठीक, ठीक, बस जरा."

चिंतेई सोई पुन्हा कागदपत्र बघू लागले. सनिया एका बाजूला बसला. सोईजी काही विचारतील अशी आशा त्याला वाटत होती. पण सोईंनी कागदांतून डोकंच वर केलं नाही. महान्ति जमाखर्च समजावून सांगत होते.

का आलास, कशासाठी आलास ? काही नाही.

एक तास उलटला.

कागदपत्र एका बाजूला सारून सोईंनी आपल्या धाकट्या भावाला म्हटलं, " निधि, धोबीला बोलावून आण, उत्पन्न व खर्चाचा तपशील समजावून सांगण्यासाठी महांति बरेच दिवसांपासून इथं थांबले आहेत. आता धोबीला सही करावी लागणार आहे. जा, लवकर बोलावून आण तिला."

निधि सोई आत निघून गेले.

सनिया दचकला. धोबी येत आहे. बऱ्याच दिवसांनी धोबी दृष्टीस पडणार आहे. पण धोबीसमोर चितेई सोईना आपल्या मनातली गोष्ट सांगता येईल का ? धोबी यायच्या आत बोलणं उरकून घ्यायला हवं.

सनिया चाचरत म्हणाला, " मी, मी आपल्यापाशी आलो होतो."

सोई म्हणाले, " हो, हो, सांग ना काय सांगायचंय ते. प्रहराजनी सारं काही सांगितलं आहे तसं म्हणा. त्यांच्यामार्फत मी तुला निरोप पाठवला होता. त्यांनी सर्व सांगितलं ना ?"

सनिया उत्तरला, " हो, सांगितलं. त्याच बाबतीत मला काही बोलायचं आहे."

चितेई म्हणाले, " ठीक आहे. मला एक मजूर हवाय. तू जर राहायला तयार असशील तर राहा थोडे दिवस. आणखी पाच माणसं आहेत. त्यात आणखी एकाची भर. काय फरक पडणार आहे. राहा. हातात चार पैसे जमले की मग बैल विकत घे. तेव्हा मग मी तुला दोन चार एकर जमीनही देईन. इतक्यातच बैल विकत घेणं तुला शक्य नाही. दुसऱ्याबरोबरच तू देखील मजुरी कर. मला सर्वजण समान आहेत. जो कष्ट करील त्याला खायला मिळेल. काय, पटतं ना ?"

सनियानं कदाचित ते मान्य केलं असतं. इतक्या लोकांनी सल्ला दिलाय. तेव्हा या बेताला मान डोलावली असती. पण त्याचवेळी धोबी हळू हळू तिथं आली. तिच्यामागे निधि सोई होते. धोबी !

हे काय झालं धोबीला ? आपल्या लाडक्या धोबीला बघायला सनिया किती तळमळत होता. पण तिला समोर बघून सनियाला अतिशय वाईट वाटलं. कोमेजलेल्या फुलासारखी धोबी सुकून गेली होती, अशक्त झाली होती. डोळे निस्तेज होते. केस विखुरले होते. सनियाचं मन आक्रंदन करू लागलं.

चितेई सोईपासून थोडं दूर बसून धोबीनं सनियाकडं फक्त एकदाच दृष्टिक्षेप टाकला. त्या नजरेत जणू युगायुगांची व्यथा साठली होती. सनियाची नजरही धोबीच्या नजरेला भिडली—क्षणभरच फक्त ! सनियानं नजर वळविली. धोबीदेखील खाली बघू लागली.

सनियाला निरोप देण्यापूर्वी चितेई सोईनी म्हटलं, " दोन वेळा जेवण आणि थोडा पगार यांच्या बदल्यात माझ्या घरी मजुरी करायची तयारी असेल तर उद्यापासून ये. आणि हे जर कबूल नसेल तर आपला दुसरा रस्ता धर. आमच्या घरात भात आहे तर राबणाऱ्या हातांचीही काही कमी नाही."

सनियाच्या धैर्याचा बांध फुटला. राग व तिरस्कारानं त्याच्या नाकपुड्या थरथरू लागल्या. त्याचे दोन्ही डोळे धगधगू लागले. त्यानं स्पष्ट उत्तर दिलं, " हात जर जवळ

असतील तर भातालाही काही कमी नाही. तुमच्यापाशी धनदौलत आहे हे खरं. पण मी काही तुमच्या दारी भीक भागायला आलेलो नाही."

चितेई खदखदून हसले. महान्तिदेखील हसत होते. निधि चकित होऊन सनियाकडे बघत होते. धोबी पण चमकली. तिनं मान वर करून सनियाच्या लालभडक नजरेकडे पाहिलं. खरंच सनिया भयंकर संतापला होता.

चितेई सोईंनी चेष्टेच्या स्वरात म्हटलं, " शाबास, परिडाच्या पोरा ! अरे, तुझ्या हातात इतकं बळ होतं तर तुझ्या बापानं पोराबाळांसह अन्नछत्रात अस्पृश्यांबरोबर अन्न का खाल्लं ? गाव सोडून पळून का गेला ? जे लोक पळून गेले त्या सर्वापाशी बळकट हातपाय होते. पण मूठभर तांदूळ त्यांना मिळाले नव्हते आणि स्मशानात कायमचं झोपी जावं लागलं होतं."

चितेईनी पुढे म्हटलं, " हातापायांची सारी ताकद घेऊन परिडा वंशाचे सर्वजण निघून गेले. पण कुणी परतलं काय ? एक तूच काय तो परत आला आहेस, तोसुद्धा अर्धमेला होऊन. तुलापण हातपाय होते. पण निधीनं मध्यरात्री चोरून माझाच भात खाऊ घातला म्हणून तू जगलास. माझ्याच भातावर त्यानं तुला जगवलं. मला सारं ठाऊक आहे. निधीनं भीतीमुळे माझ्यापासून ते लपवलं. पण कुणाच्या पोटात काय आहे ते सारं मला ठाऊक आहे. तो होता भाताचा चमत्कार, हाताचा नव्हे बरं ! भातापायी तर स्वर्गातले देव सुद्धा खाली उतरून येतात नि मुंग्यांसारखे भाताला चिकटतात. निधीने तुला खायला घातलं, वाचवलं. तुझ्या दुबळ्या हातापायांना बळ दिलं. हे ऐकून मला आनंद झाला होता. वाटलं होतं, चला, जे काही होतंय ते उत्तमच आहे. परिडा घराण्याचा निर्वंश होणार नाही. निदान एक तरी जिवंत राहील. पण आज माझ्यासमोर तू त्याच हातांची बढाई मारतो आहेस ? शाबास, परिडाच्या बच्च्या !"

निधी सोईना घाम फुटला. चितेई सोईकडे बघायची त्यांना छाती होईना. चितेईंना साऱ्या गोष्टीचा कसा काय पत्ता लागला ? धोबीदेखील अस्वस्थ झाली. बाबांना सारं काही ठाऊक आहे.

सनिया जणू क्रोधाग्नीनं पेटला होता. त्याला वाटत होतं, एक काठी उचलावी आणि चितेई सोईच्या डोक्यावर सणसणून हाणावी. हाताची ताकद चितेई सोईना दाखवून द्यावी. पण त्याचा परिणाम काय होईल ? पोलिस, खटला आणि तुरुंगवास—सारं काही 'भाता'च्या बळावर चालतं. सनियाच्या हातांची ताकद या विभागात एकदाच खळबळ माजवू शकते. पण त्यानंतर सारं स्तब्ध होऊन जाईल. सनिया समाजाच्या रसातळाला जाईल. चिखलात पाय रुततो तसाच.

सनियाची मान खाली झाली. डोळ्यातलं तेज लुप्त झालं. वाटलं, चितेईचं बोलणंच कदाचित खरं असेल. नाही तर लाखो लोकांचे हात मातीला कसे मिळाले ?

सनिया थोडा वेळ स्तब्ध राहिला. मग म्हणाला, "थोडंसं धान देऊन तुम्ही आमची दहा एकर जमीन घेतली. माझ्या वाडवडिलांनी घाम गाळून त्या दहा एकर जमिनीत सोनं पिकवलं होतं. जीव वाचवण्यासाठी माझ्या बाबांनी ती जमीन तुम्हाला देऊन टाकली. पण कुणाचा जीवही वाचला नाही. मीच काय तो एकटा परत आलोय. मला माझी जमीन परत द्या सोईजी."

चितेई सोई पुन्हा हसले, "अरे सनिया, परत देण्यासाठी थोडंच कुणी जमीन घेत असतं ? तुला दिसतेय ती सारी जमीन कष्टानंच तयार झाली आहे. सुरुवातीला ज्यांनी रान तोडून जमीन तयार केली होती, त्यांच्यापैकी कित्येकांचा वाघ, अस्वलादी जनावरांनी फन्ना उडविला होता. प्राणापलीकडे त्यांनी कष्ट केले होते. पण आज ते किंवा त्यांची मुलंबाळं, त्यांचे वंशज जमिनीचे मालक नाहीत. ते सर्व मेले. त्यांची मुलं, त्यांचे नातूदेखील भुकेनं मरण पावले. ज्यांनी रुपये पैसे देऊन जमीन खरेदी केली होती तेच लोक आज जमिनीचे मालक आहेत."

थोडं थांबून चितेई सोई पुन्हा म्हणाले, "अरे सनिया, तुला जर खरंच तुझी जमीन हवी असेल तर पैसे काढ. पैसे नसतील तर आपल्या वाडवडिलांसारखं अर्धपोटी राहून पैसे शिल्लक टाक, जमव. या जन्मात जरी नाही तरी कदाचित दुसऱ्या जन्मात जमीन घेऊ शकशील."

सनियानं म्हटलं, "तुम्ही काही पैसे देऊन जमीन घेतली नव्हती. तुम्ही जितकं धान दिलं होतं तितकंच धान आणि जोडीला त्याचं व्याज देऊन मी तुमचं ते परत करीन. तुमचा कर्जदार होऊन राहायची माझी इच्छा नाही. माझी जमीन तेवढी मला परत द्या."

सनियाचं हे बोलणं चितेई सोईना चेष्टेचं वाटलं. ते म्हणाले, "सनिया तू वेडा नाहीस पण मूर्ख आहे. अरे, धान मी उधार नव्हत दिलं. धान देऊनच मी जमीन खरेदी केली होती. तुझ्या बापानं त्यावर शिक्कामोर्तब केलं आहे. सध्या जमीनदाराला मी शेतसारा भरतोय. जमिनीवर माझा वहिवाटीचा हक्क झाला आहे. तुझा त्यावर मुतराम अधिकार नाही. जमिनीपाशी तुला फिरकतासुद्धा येणार नाही."

सनियाचे डोळे भरून आले—सात पिढ्यांचे अश्रू ! बेचैन होऊन दोन्ही हात कपाळाला लावीत तो म्हणाला, "हो, खरंय तुमचं म्हणणं—जमिनीचे मालक तुम्हीच आहात, मी नाही. पण जरा देवाचं नाव घेऊन विचार करा, जमिनीचा खरा मालक कोण आहे ? जाऊ दे. जमीन तुमचीच राहू दे. मला नुसती कसायला तरी द्या. मी तुमच्या हिश्श्याचं धान परत देईन."

सनियाच्या डोळ्यांतले अश्रू आणि त्याचे हात जोडलेले पाहून धोबीच्या काळजात कळ उठली. असंच धावत जावं आणि सनियाचे हात धरून त्याला दिलासा द्यावा अशी अनिवार ऊर्मी तिच्या मनात आली. पण त्यानंतर काय होणार ? त्यानंतर काय होणार

याचा विचारच तिला करवत नव्हता. तिला वाटलं, सनियाचं दारिद्र्य, त्याची विवशता हे सर्व आपल्या नजरेस आणून देण्यासाठीच वडिलांनी आपल्याला या ठिकाणी बोलावलं आहे. धोबीच्या डोळ्यांदेखत सनियाचा अपमान करण्याचीच वडिलांची इच्छा होती.

धोबीनं वडिलांच्या निर्दय चेहऱ्याकडे पाहिलं. त्यांच्या ओठांवर कुचेष्टेचं स्मित होतं. डोळ्यांत सूडाचा अंगार भडकलेला होता. त्या चेहऱ्यावर प्रेमळपणाची पुसटशी खूणदेखील नव्हती. धोबीचा स्वतःवरचा ताबा सुटला. कापऱ्या आवाजात ती म्हणाली, " बाबा, सनियादादा गरीब आहे. त्याला कुणाचा आधार नाही. जरा त्याचं ऐकून घ्या. त्याला या वेळी आपल्या सहानुभूतीची अतिशय गरज आहे. त्याची जमीन त्याला परत देऊन टाका. नाही तर त्याच्या जमिनीवर त्यालाच शेती करू देत, तो तर भिकारी झाला आहे बाबा ! "

एका दमात इतकं बोलून धोबी गप्प बसली. चिंतेई सोईंचे डोळे रागानं लाल झाले होते. ते धोबीकडे टक लावून पाहत होते.

धोबीनं मान खाली घातली.

चिंतेई सोईंनी म्हटलं, " हो, हो, सनिया गरीब आहे, निराश्रित आहे, हे सारं मला ठाऊक आहे, त्याचं दुःख बघून मलाही वाईट वाटतं पण आपली मालमत्ता गरिबांना वाटून आपण रस्त्यावरचे भिकारी होऊ शकत नाही. माझ्या नजरेला सर्व गरीब, सर्व दुःखी समान आहेत. माझ्या मनात इतरांविषयी जितकी अनुकंपा आहे, तितकीच सनियाविषयीदेखील आहे."

चिंतेई सोईंनी धोबीच्या मस्तकावर हात फिरवला. सनियाकडे दृष्टिक्षेप टाकून म्हटले, " या पोरीला तर कुणाचंच दुःख बघवत नाही. सनिया, तू आता घरी जा. उद्यापासून आमच्या घरी कामावर ये. हे घर काय तुझं नाही ? घरातली कामं घरची माणसं नाही का करीत ? घरात काम कर. खा, पी आणि आपल्या वाडवडिलांच्या जमिनीवर जाऊन धान, मूग वगैरे पिकव, मी थोडीच नाही म्हणणार आहे ? तुझी कसलीही गैरसोय होणार नाही. जो मजुरी घेतो त्यास मजूर किंवा नोकर म्हणतात. जो काहीच घेत नाही तो तर घरातला आपला माणूस असतो."

हरी महान्तीनी म्हटलं, " सोईजी म्हणताहेत ते खरं आहे सनिया ! "

सनिया हसला. आपली काठी घेऊन उठला. म्हणाला, " सोईजी दयाळू आहेत. ते बोलतील ते खोटं कसं असणार ? खरंच असणार. माझ्यासारखी ' घरची माणसं ' त्यांना खूप भेटतील. आणि त्यांच्यासारखे दयाळू वडीलदेखील मला या जगात खूप भेटतील."

सनियानं मागे वळून पाहिलं नाही. थेट बाहेर निघून गेला. सर्वजण अवाक् होऊन त्याच्याकडे बघत राहिले.

सूर्य मावळतीला आला होता. झाडांवर सौम्य सूर्यप्रकाश पसरला होता.

कुणाशी काही न बोलता धोबी घरात जायला निघाली होती. पण अचानक दाराच्या चौकटीवर तिचं डोकं आदळलं. बेशुद्ध होऊन ती खाली कोसळली. सर्वजण तिच्यापाशी धावले. गडबड गोंधळ ऐकून सनियादेखील परत आला.

धोबी बेशुद्ध पडली होती.

बऱ्याच वेळानं धोबी शुद्धीवर आली. पण ज्याला बघायला ती अधीर होती तो काही दिसला नाही. सनिया निघून गेला होता. धोबी एका पलंगावर पडली होती. तिच्या आजूबाजूला बसले होते तिचे आईवडील आणि काका.

कविराजदेखील आले होते. कविराजांनी म्हटलं, " काळजीचं काही विशेष कारण नाही. मन कमकुवत आहे म्हणून चक्कर आली. ही गोळी घ्या. आल्याचा रस आणि मधात घोटून पाजा म्हणजे होईल बरी."

धोबीनं कूस बदलली.

आठ दिवसांनंतर—

धोबीच्या कपाळाची खोक भरली होती. पण मनाची जखम अजून तशीच होती. तिच्या मनात जे दुःख होतं ते कुणालाच समजत नव्हतं. तिची आई रात्रभर तिच्या उशाशी बसून राहायची. हात लावताच ती दचकायची. भयंकर ताप ! आईच्या डोळ्यांतून टप्‌टप् अश्रू गळायचे. आईनं म्हटलं, " धोबी, तुझ्या मनात काय आहे मला सांग ना बाळ ! काय ही स्वतःची अवस्था करून घेतली आहेस ?"

धोबी तापात बरळायची. म्हणायची, " काही नाही आई ! त्या लोकीचं बोलावणं आलं आहे. माझे सासूसासरे माझी वाट पाहताहेत. त्यांचं माझ्यावर खूप प्रेम होतं आई !! माझ्या सासूबाई अतिशय प्रेमळ होत्या ना म्हणूनच देवानं त्यांना आपल्यापाशी बोलावून घेतलं वाटतं. त्यांची सेवा करायची संधी मला एकही दिवस मिळाली नाही. मी काही करायला गेले की त्या मला जवळ ओढून मांडीवर बसवीत."

धोबी रडू लागायची. ओक्साबोक्शी रडायची. अस्वस्थ होऊन आई तिच्या केसांवर हात फिरवून म्हणायची, " विसर बाळ ते आता. ती सारी स्वप्नं होती, खरं काही नव्हतं ते. तू माझी लाडकी बाळी !"

धोबी उठून बसायची. चहूकडे नजर फिरवून म्हणायची, " नाही ग आई, ती स्वप्नं नव्हती. खरं होतं ते ! सासूबाई मला मांडीवर बसवून माझं कोडकौतुक करायच्या. मी पाय चुरू लागले की सासूबाई माझे हात धरून म्हणायच्या, " तू आमच्या कुलाची लक्ष्मी आहेस. माझ्या पायांना नको हात लावूस. त्या मला छातीशी धरायच्या. त्यांच्या कुशीत शिरावंसं वाटतं आई ! त्या माझ्या पाठीवर हात फिरवू लागल्या की कशी ऊब

यायची."

धोबी पलंगावर निजून राहायची. आई तिचं डोकं दाबायची. नकळत धोबीचे डोळे मिटून तिला झोप लागायची. निधी सोई घरी आले की धोबीची देखरेख त्यांच्यावर सोपवून आई दुसऱ्या कामाला निघून जायची. निधी सोई धोबीच्या पलंगापाशी सारी रात्र बसून रहायचे.

धोबी झोपेत बडबड करायची, " तो गरीब आहे. त्याला कुणाचा आधार नाही. त्याला हाकलू नका."

धोबीच्या मनातली गोष्ट निधि सोईना समजत होती. तिचा तळहात आपल्या हातात घेऊन तो ते प्रेमानं कुरवाळायचे. धोबी डोळे उघडून पाहायची. तिच्या तोंडून शब्द बाहेर पडायचा—" काका ! "

निधि सोई गप्प राहायचे. धोबीचा तळहात कुरवाळायचे.

आठ दिवस उलटले—

धोबी बरी झाली. कविराजांच्या सल्ल्यानुसार ती आता थोडंफार खाऊ लागली होती. पण अशक्तपणा अजून गेला नव्हता. चितेई सोई ब्राह्मण पंडितांना बोलावून शुभ तिथी काढायला सांगत होते. निधि सोईच्या मुलाला, विदेईला, धोबीनं दत्तक घेण्यासाठी विष्णुपूर, दुर्गापूर आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीतील प्रतिष्ठित लोक या समारंभाला हजर राहणार होते. कारण तेच भावी काळातले साक्षीदार ठरणार होते.

चितेई सोईच्या मनाचा कुणाला थांगपत्ता लागत नव्हता. घरच्या अन्य लोकांशी सल्लामसलत केल्याखेरीज धोबीच्या दत्तक विधीसाठी ते इतकी घाई का करताहेत हेच लोकांना समजत नव्हतं. लोक आपसात कुजबुजत होते. पण या सर्व प्रकाराविरुद्ध कुणी अवाक्षर बोलणार नाही हेदेखील लोक ओळखून होते आणि खुद्द चितेई सोईला देखील ते ठाऊक होतं. तर मग ही घाई कशासाठी ?

एके दिवशी दुपारी धोबी आपली पेटी उघडून सामान नीट लावत होती. एकाएकी तिचा हात थरारला. घरच्या अंधारात ती बेचैन झाली. प्रेम करायचा अधिकार तिला उरला नव्हता. कारण ती विधवा होती. श्रीमंता घरची सून झाली होती. आणि श्रीमंताच्या घरात राहत होती. सनियाविषयी तिनं सहानुभूती दाखवली होती. पण त्याचबरोबर आपलं मन त्याच्यापाठी धावायला मुक्त सोडून दिलं होतं.

सनियाच्या मनात तिनं जी आशा प्रज्वलित केली होती त्याचा परिणाम काय होणार ? आपलं शरीर तिनं त्याच्यापासून लांब ठेवलं असलं तरी मन त्याच्यापासून दूर ठेवणं तिला जमलं नव्हतं. सनियानं घर बांधलं. तो जातीत आला. तो जमीनही

घेईल, घरसंसारदेखील करील आणि सुखात राहील. एवढ्यावरच धोबीनं समाधान मानायला हवं. तिच्या प्रेमामुळं सनिया सुखी व्हायला हवा.

धोबीचे नेत्र सजल झाले. जणू तिला एखादा दैवी संकेत मिळाला असावा. त्या अंधाऱ्या खोलीतच तिनं हात जोडून देवाला नमस्कार केला.

आपल्या पतीच्या घरून आणलेल्या सर्व पेटचा धोबीनं एका मागून एक धुंडाळल्या. पण ती जे शोधत होती ते काही तिला सापडलं नाही. विधवा झाल्यावर आपले सर्व दागिने उतरून तिनं या पेटचांमध्ये ठेवले होते. दागिने हरवतील, चोरीला जातील या सबबीवर चितेई सोईंनी एक दिवस या पेटचांच्या किल्ल्या तिच्याकडून मागून घेतल्या होत्या. पेटचांमधून त्यांनी काय काढलं, काय ठेवलं ते बघायची धोबीला कधी गरज वाटली नव्हती. काही दिवसांनी चितेई सोईंनी किल्ल्या परत दिल्या होत्या. आणि धोबीने त्या तशाच ठेवून दिल्या होत्या. आज इतक्या दिवसांनी पेटचा बघायची आठवण झाली. खूप शोधाशोध करूनही काही सापडलं नाही. सारे दागिने तिच्या वडिलांनी काढून घेतले होते.

धोबी निराश झाली. पेटी धरून क्षणभर निःस्तब्ध उभी राहिली. तिचे बाबा इतके कठोर कसे झाले ? धोबीवर त्यांनी विश्वास का ठेवला नाही ? तिच्या मनात शंका आली. धोबीनं सनियाला सोन्याच्या मोहोरा दिल्याचं त्यांना कळलं वाटतं. सनियाला मोहोरा दिल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांनी किल्ल्या मागून घेतल्या होत्या. पण या बाबतीत आजवर तिला कुणीच काही विचारलं नव्हतं.

धोबीच्या मनानं बंड केलं. जुन्या चालीरीती, प्रथापरंपरा, संस्कारांना पायदळी तुडवून पुढं निघून जावं असं तिला वाटू लागलं. पण हिंदू समाजाच्या बिकट नियमांच्या परिघात बंडाची आँग विझून जाईल. जुन्या बंधनांचाच विजय होईल.

धोबीचं बंडखोर मन सनियाच्या मागे धावत होतं. पण सामाजिक संस्कार त्या मनाला आवर घालत होते, मागे खेचत होते. तिच्या स्वप्निल भावना, रंगीबेरंगी कल्पना सनियाभोवती रुंजी घालत. पण तिच्यासाठी सर्वस्व ओवाळून टाकणारे सासूसासरे व पती यांची आठवण झाली की त्या सर्व भावनांवर विरजण पडे.

धोबीला खेद व्हायचा. पतीची आठवण होताच तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागायचे. व्रतवैकल्यं करून ती मनाचं मालिन्य धुऊन टाकायची. गीता, पुराणं वगैरे वाचून निर्बल मनास मजबूत करायचा प्रयत्न करायची.

पण ओढाळ मन ऐकेल तर ना ?

संस्कारांचं दावं तोडून तिचं मन, तिच्या भावना उधळून जायच्या. अगदी दूरवर जायच्या. मन नेहमी दोलायमान स्थितीत राहायचं. भलं काय नि बुरं काय याचा विचार करायची सारासार शक्ती तिच्यात राहत नसे.

सनियाचा सर्वनाश करून त्याला आपल्याच घरात मजूर म्हणून राबवायचा जो डाव चिंतेई सोईंनी आखला होता त्याला सनियानं सुरुंग लावला होता. चिंतेई सोईंची घमेंड मोडली होती. सनिया जाणूनबुजून कसला श्रीमंतांच्या तावडीत सापडतोय ?

सनियानं मोठाच निर्णय घेतला होता. धोबीला तो अतिशय आवडला होता. या निर्णयामुळं सनिया धोबीच्या आणखीनच जवळ आला होता. छे, छे, मी त्याला दुसऱ्याच्या घरी मजुरी करू देणार नाही. सनियाला स्वतःचा आत्मविश्वास वाटायला हवा. स्वतःच्या बाहुबळावर त्यानं जगायला हवं. वेळच आली तर मी माझ्याजवळचं सारं काही देऊन त्यास साहाय्य करीन—धोबीच्या मनात सतत हाच विचार चालू होता.

पण होतं काय धोबीपाशी ?

सोन्याचा हा हार ? तिचे सासरे तिला पहिल्यांदा बघायला आले तेव्हा हाच हार त्यांनी तिला दिला होता. सोन्याच्या चार बांगड्यादेखील होत्या. तिच्या सासूनं तिच्या हातात घातल्या होत्या. तिच्या वडिलांचा वा काकांचा यावर काही एक हक्क नव्हता. सारं तिचंच होतं—तिच्या सासूसासऱ्यांच्या मायेच्या खुणा !

शिवरात्रीचा उत्सव होता. नीलकंठेश्वराच्या देवळाशी जत्रा भरली होती.

धोबीला आज उपास होता. टिमीला बरोबर घेऊन ती देवाला आली होती. देवाला जाण्यासाठी तिनं आई, वडील, काका, काकू, कुणाचीच परवानगी घेतली नव्हती. टिमी बरोबर असल्याचं त्यांनाही ठाऊक होतं. देऊळदेखील गावातच होतं. जत्रेला येणारी लोकंदेखील गावातलीच होती. म्हणून आईवडील निश्चिंत होते.

सनियाच्या घरासमोरून धोबी चालली होती. मनात आलं, आत जाऊन त्याच्याशी दोन शब्द बोलावेत. त्याची चौकशी करावी. पण बरोबर टिमी होती. तिला काय वाटेल, म्हणून धोबीनं आपला बेत बदलला.

अंधार पडला होता. दूरच्या देवळातल्या लहान लहान दिव्यांचा प्रकाश लुकलुकत होता. जणू प्रकाशाचा लपंडाव चालला होता. लोक हातात दिवे घेऊन दूरदुरून येत होते. पण सनियाच्या घरात मात्र अंधार होता. घरात बहुतेक कुणी नसावं.

धोबी पुढे चालू लागली.

टिमीनंदेखील उपास केला होता. घर सोडून निघून गेलेला आपला पती परत येईल असं तिला वाटत होतं. तेवढ्याचसाठी ती देवाला आली होती.

थोडं चालल्यावर टिमी म्हणाली, "धोबी ! माझ्या मनाला शांतता नाही. मी नुसती तळमळतेय. माझ्या नवऱ्याला उपासमार सहन झाली नाही. घर सोडून कुठं गेला देवाला ठाऊक ! मी सध्या माहेरीच राहतेय. इतके लोक घरी परतून आले. पण तो आला नाही. कुठलाही नवा माणूस आला की माझे बाबा वेड्यासारखे त्याच्याविषयी

त्याला विचारतात, सर्वजण नकार देतात. म्हणतात—आम्हाला नाही ठाऊक !"

थोडं थांबून टिमीनं म्हटलं, " लग्नानंतर मी त्याच्या घरी थोडेच महिने राहिले होते. आता वाटतं, ते जणू एक स्वप्न होतं. एक दिवस कधी जिवाला चैन नव्हतं. दुसऱ्यांच्या घरी मोलमजुरी करून तो थोडेफार पैसे मिळवायचा. त्यापैकी निम्मे तो दारू व गांजात उडवायचा आणि उरलेले खर्चाला द्यायचा. त्यात पोट भरत नसे. त्याचा राग मग तो माझ्या पाठीवर काढायचा. किती सहन करायचं मी ? कुणाला सांगायचं ? कुणापाशी तक्रार केली तर तो उलट मलाच म्हणायचा, " अरे, बिशुनिया (बिशन) तर फार चांगला मुलगा आहे. तुझीच चूक असेल. लोकांना माझीच चूक वाटायची. मलाच लोकं नावं ठेवायची."

टिमी पुढं म्हणाली, " सहन करायलाही काही मर्यादा ? अखेर हाडामांसाचीच मी ! रडूनभेकून शेवटी आईवडिलांच्या दारी परत आले. तो वेड्यासारखा झाल्याचं नंतर कानावर आलं होतं. वाटलं, खरंच का तो मला शोधतोय ? जावं परत. बदलला असेल कदाचित. पण पुन्हा भीती वाटली. नको, नकोच ते, उगाच कशाला इतक्या शिव्या खायच्या, मार खायचा ? आई म्हणाली, ' जा परत सासरी.' बाबादेखील म्हणाले, ' आपल्या घरी परत जा.' मी स्पष्ट सांगून टाकलं की, मला परत पाठवलं तर जीव देईन. एक दिवस तो आमच्या घरी आला. आईपाशी खूप रडलाबिडला. खूप मनधरणी केली. पण मी लपून बसले. त्याच्यासमोर मुळी आलेच नाही. वाघासमोर जावं तसं मला वाटत होतं. आईनं त्याची समजूत घालून कसंबसं त्याला वाटेला लावलं. मग मला म्हणाली, 'बिशन किती चांगला मुलगा आहे. मित्रांबरोबर घेतो कधी तरी त्यात एवढा बाऊ करण्यासारखं काय आहे. पुरुष जात असं करायचीच. तुझ्या बाबांचंच बघ. . . ' होय धोबी, माझे बाबा पण कधी चोरूनमारून गांजा ओढतात."

टिमी मोठ्यांदा हसली. बोलता बोलता एव्हाना त्या दोघी महादेवाच्या देवळाशी येऊन ठेपल्या होत्या. तिथं गडबड गोंधळ चालू होता. बरेच लोक बत्त्या घेऊन मागून पुढून येत जात होते. टिमीनं धोबीचा अशक्त हात आपल्या हातात धरला. दोघी उंच बांधावरून चालल्या होत्या. बांध धोकादायक होता. शेतातली मातीदेखील उंचसखल, खाचखळग्यांची होती. पडलं तर हातपाय जखमी व्हायचीच भीती.

" हात सोड माझा "—धोबी म्हणाली.

" पडशील "— टिमी उत्तरली.

" नाही. मी नीट लक्ष ठेवून चालतेय. तू तुझी हकीकत सांग. इतके दिवस का लपवून ठेवलीस ? मी तुझी मैत्रीण ना ?" टिमी म्हणाली, " तुझ्यापासून काय लपवायचं ? सांगायला सवडच मिळाली नाही. हं तर, काय झालं—तो तर परत निघून गेला. मी सुटकेचा श्वास टाकला. त्यानं कितीदा निरोप पाठवला. मी गेलेच नाही. त्यानंतर या

प्रदेशात दुष्काळ पडला. त्यानं माझी साधी चौकशीसुद्धा केली नाही. त्याच्यापाशी दोन तीन एकर जमीन होती. त्यातली काही जमीन त्यानं तुझ्या सासऱ्यांनाच विकली. उरलेली दारूत उडवून टाकली. त्यानंतर त्यानं गाव सोडला. मला काही सांगितलं नाही की माझी विचारपूस केली नाही.

"कित्येक वर्षं निघून गेली. त्याची काहीच बातमी कळली नाही. माझे बाबा म्हणाले, 'टिमीचा दुसऱ्याशी पाट लावून देऊ.' आई म्हणाली, 'हे कसं शक्य आहे ? बिशननं अजून सोडचिठ्ठी कुठं दिलीय ? बारा वर्षं त्याची वाट बघायला हवी. मग तो आला नाही तर पळसाची पानं जाळून शुद्धी करावी लागेल. त्यानंतरच टिमीचं लग्न शक्य आहे.' माझी आई म्हणते, 'टिमी, उपासतापास, व्रतवैकल्यं करीत जा. बिशन परत येईल.' आईच्या भीतीनं मी उपास करते. पण तूच सांग धोबी, 'बारा वर्षं का कुणी उपासतापास करू शकतं ? आयुष्यात स्वस्थता, शांतताच उरलेली नाही."

देऊळ जवळ आलं. लोकांचा गोंगाट वाढतच गेला. बत्त्या अधिक उजळ दिसत होत्या. टिमीनं आपले डोळे टिपले. धोबी तिचं सांत्वन करू शकली नाही.

टिमीनं म्हटलं, "तो परत यावा म्हणून मी बारा वर्षं व्रतवैकल्यं करायला, देवाची प्रार्थना करायला तयार आहे. पण इतकं करून तो परत आला तरी काय होणार आहे ? तो भांग, गांजा, दारूच्या नशेत धुंद राहील आणि माझ्या पाठीवरच आपला राग काढील. ते सर्व मी कसं सहन करणार ? धोबी, खरंच सांगते. लोकांना काय वाटेल ते बडबडू देत. मला ते सर्व नको आहे. माझी एकच इच्छा आहे. अगदी माझ्या मनातलं तुला सांगते. कुणी जर येऊन मला सांगितलं की त्यानं बिशनचं प्रेत पाहिलंय तर मला समाधान वाटेल."

धोबी दचकली. टिमीचा हात धरून तिनं तिला आपल्यापाशी ओढत म्हटलं, "ए वेडे, असं का कधी कुणी मनात आणत असतं ?"

टिमी जरा चिडून म्हणाली, "का ? का येऊ नये माझ्या मनात तसं ? तूदेखील स्वतःचा जरा तरी विचार कर. तुझा नवरा मेला. तू खूप शोक केलास. मग रडं आवरलं. मनात आणलंस तर पुन्हा नवा घरसंसार थाटशील. तू तर तळमळणार नाहीस ना ?"

धोबीच्या अंगभर शहारा आला. तिच्या तोंडून शब्द फुटला नाही. आपल्या नवऱ्याच्या मृत्यूच्या वेळचं दृश्य तिच्या डोळ्यांसमोर उभं राहिलं. ती आकसली. का तिने उपास-तापास केले ? का म्हणून ती अशी रातची महादेवाला निघाली आहे ? सनियाच्या घरापाशी तिचे पाय का घुटमळले होते ?

मंदिराच्या अवतीभवती गर्दीला उधाण आलेलं होतं. धोबी आणि टिमीनं देवळाला प्रदक्षिणा घातली. मन ज्याला शोधत होतं तो काही कुठं दिसला नाही. आसपासच्या

कित्येक गावचे स्त्री-पुरुष जमले होते. मधून मधून 'हरिबोल' व 'हुलहुली' चा (स्त्रिया तोंडातल्या तोंडात जिभेने ध्वनी करतात तो) गजर चालला होता. झाडाखाली बायका आपापल्या मुलांच्या मस्तकावर दिवे लावत होत्या. जागोजागी लोक साष्टांग दंडवत घालीत होते आणि पुकारा करीत होते—" शंभो महादेवा, तुझाच आधार रे बाबा !"

देवाचं दर्शन घेऊन धोबी आणि टिमी देवळाजवळच्या एका झाडाखाली येऊन उभ्या राहिल्या. तिथं बऱ्याच बायका होत्या. फाल्गुन मास होता. रात्री थंडी होती. मध्यरात्री महाप्रदीप प्रज्वलित होईल. त्याचीच वाट पाहत सर्वजण ताटकळत उभे होते. महाप्रदीपाचं दर्शन घेतल्याखेरीज व्रत उपवासाचं फळ मिळणार नव्हतं.

धोबी आणि टिमी त्याच झाडाखाली जाऊन बसल्या. कुणाच्याही तोंडून शब्द उमटत नव्हता. सनियाची नक्कीच गाठ पडेल असं धोबीला वाटलं होतं. पण तो भेटला नाही. तिच्या मनात आलं की परत जाताना सनियाच्या घरी जावं. तो काय करतोय ते बघावं, पण तिला भीती वाटत होती. ती मनातल्या मनात तळमळत होती. पण सनियाच्या घरी जाऊ या असं टिमीला सांगायचं धैर्य काही तिला झालं नाही. तिनं ठरविलं की टिमीला गुंगारा देऊन हळूच सटकायचं आणि धावत सनियाच्या घरी जाऊन विचारायचं, "सनिया दादा, काय झालं ? तू भेटत का नाहीस ?"

टिमीदेखील संधी शोधत होती. देवळातून बाहेर पडली. तशी दिसलं की बिशि जेनाचा मुलगा चंदरा धर्मशाळेच्या एका कोपऱ्यात उभा राहून, तिच्याकडे बघून हसत होता. त्याने दोन तीनदा टिमीसमोरून चकरा मारल्या होत्या पण धोबी तिच्याबरोबर होती म्हणून त्याला काही बोलता येत नव्हतं. त्याला ऐकू जाईल अशा बेतानं टिमीनं म्हटलं, " ही आजकालची पोरं किती बदमाष असतात. कुणीसुद्धा त्यांच्या तावडीतून सुटत नाही. धोबी, बघ ग !"

धोबीनं चंदराकडं बघितलं. उगाचच रागावल्याचा आव आणला आणि टिमीचा हात धरून देवळाकडे जाऊ लागली. तिनं टिमीला म्हटलं, " टिमी, जा बाई, त्या चंदराला जरा धमकावून ये. म्हणावं, नीट वाग, नाही तर जोडे खावे लागतील. लोक काय म्हणतील. बघ, काका येताहेत. मी जाते. तू वाटल्यास नंतर ये."

टिमीच्या मनातलं गुपित धोबीनं ओळखलं होतं, तिला सोडून ती दुसरीकडे निघून गेली.

निधि मोईनी विचारलं, " कधी परतायचं घरी ? कुणी आहे का तुझ्याबरोबर ? की माझ्याबरोबर येणार आहेस ?"

धोबीनं उत्तर दिलं, " टिमी आहे माझ्याबरोबर. तसे लोकही खूप आहेत. तेव्हा भ्यायचं काही कारण नाही. महाप्रदीपाचं दर्शन घेऊनच आम्ही येऊ. तुम्ही व्हा पुढे

काका !"

रात्रीच्या गहन अंधारात धोबी सनियाच्या घरी निघाली एकटीच. पण शेतातल्या काट्याकुट्यांचं किंवा गवतात सरपटणाऱ्या सापांचं कशाचंही तिला भय वाटत नव्हतं. तिला भीती होती ती फक्त माणसांची. सापासारख्या दंश करणाऱ्या प्रथा निर्माण करणाऱ्या आणि अफवांचं विष पसरविणाऱ्या माणसांनाच ती घाबरत होती.

धोबी झपझप चालू लागली. मनात आलं, सनियादादानं जर तिची भेट स्वीकारली नाही तर ? तिच्या मनातली गोष्ट सनियानं ओळखली तर ? तर...तिला काहीच निर्णय घेता आला नाही.

सनियाच्या घरासमोर पोचून ती थबकली. कुणी येत तर नाही ? कुणी पाहिलं तर नाही ? ती बिचकली होती. शरीर थरथरत होतं. दाट अंधारात तिनं निरखून पाहिलं. कुणीसुद्धा नव्हतं.

प्रकाशाची एक क्षीण रेखा सनियाच्या घरातून दिसली. मंद दिवा जळत असावा बहुतेक. सनिया घरात आहे तर ? छाती धडधडत होती. पाय डळमळत होते. हळूहळू तिनं पाऊल उचललं. फाटक उघडून ती आत अंगणात आली. पण पुन्हा थबकली.

कुणी पाहत तर नाही ?

धोबीला वाटलं, आपल्या मनातलं कुणाला कळणार नाही. आपला सद्हेतू कुणाला उमजणार नाही. मात्र दिवस उजाडताच सर्वत्र अफवा पसरेल. धोबीच्या नावाला कलंक लागेल. धोबीचं मस्तक भणाणून गेलं. काय करावं याचा विचारच तिला करवत नव्हता. जाऊ नये ? परत जावं का ?

धोबीने वर आभाळाकडे नजर टाकली. आभाळात आज रोजच्यापेक्षा जास्त तारे लुकलुकताना दिसत होते. आपल्या भावना अन्य कुणाला समजो वा न समजो यांना तरी नक्कीच समजतील असं धोबीला वाटलं.

धोबी सनियाच्या घरात शिरली. एक दिवा लावून सनिया बसला होता. समोर होतं एक पांढरं मांजर, त्याच्याशीच तो खेळत होता. जणू ते मांजरच त्याचा जिवलग मित्र होतं.

धोबीकडे लक्ष जाताच सनिया थक्क झाला. क्षणभर त्याला काही समजेनाच. त्याच्या मनातल्या मधुर भावना जणू साकार झाल्या, मूर्त झाल्या. त्याला वाटलं, धोबी किती अशक्त झाली आहे. डोळे रडवेले दिसत होते. ओठ थरथरत होते. अंगात जणू रक्तच नसावं. शरीर थरथरत होतं.

धोबी !

" काय सनिया दादा ?"

" एकटीच आलीस ?"

" हो. एकटीच. महादेवाच्या दर्शनाला आले होते. म्हटलं तुलाही भेटून जावं."

सनिया अवाक होऊन पाहत होता.

" तब्येत कशी आहे, सनिया दादा ?"

" ताप येतोय."

" ताप ?"

" हो, मलेरिया झालाय. थांबून थांबून दर दोन दिवसांनी ताप येतो. पण ताप येतो केव्हा नि जातो केव्हा, मला काही पत्ताच नाही लागत. दुसऱ्याकडे मजुरी करता करता ताप चढतो, मग मी आपला पंचा पांघरून झाडाखाली नाही तर गोठ्यात निजतो. थोड्या वेळानं घाम येऊन ताप उतरतो. मग मी पुन्हा कामाला लागतो."

धोबी थक्क होऊन ऐकत होती.

" बस, धोबी."

धोबी सनियासमोर बसली. खूप बोलावंसं वाटत होतं. पण शब्द फुटत नव्हता. जणू सारे शब्द तिच्या ओठांतच अडखळले होते.

दोघे नि:शब्दपणे परस्परांकडे पाहत होते. दोघांचे डोळे भरून आले होते.

महादेवाच्या मंदिराकडचा गोंगाट वाढला होता. नदीकाठाकडून गार वारा आला. अचानक दोघांचे मौन भंग पावले. एकमेकांना बघून दोघेही पुन्हा एकदा दचकले. एकाच्या उपस्थितीनं जणू दुसऱ्याला भय वाटत होतं. दोघांनी डोळ्यांतले अश्रू पुसले.

" सनिया दादा !"

" नाही धोबी. आता आणखी नाही सहन होत. तू मला तुझं खेळणं समजली आहेस. तुझ्याच शब्दाखातर, तुझ्याच दानावर मी पुन्हा जातीत आलो, घर बांधलं, दुसऱ्याकडे मजुरी करून पोट भरलं. मग तुझ्याच सांगण्यावरून मी चिंतेई सोईच्या घरी गेलो आणि आपल्या वाडवडिलांचा सर्व स्वाभिमान विसरून त्यांच्या पायांशी नतमस्तक होऊन उभा राहिलो. पण इतकं करूनही चिंतेई सोईनी अपमान केला. मी सारं सहन करून, मूग गिळून, निमूटपणे परत आलो."

धोबीचे डोळे पुन्हा वाहू लागले होते.

सनियानं म्हटलं, " मी तुझ्या हातचं बाहुलं बनलोय धोबी ! तुझा खेळ होतोय पण माझा जीव जातोय. माझ्या बाबांनी तुझ्या वडिलांना एकच कटु गोष्ट सांगितली होती. त्यांचा अपमान करण्याचा हेतू त्यात नव्हता. तुझे वडील हारले होते. पण धोबी तू जिंकलंस. माझ्या आपत्तीचा फायदा घेऊन तू बदला घेतलास."

धोबीला आणखी ऐकवेना. ती म्हणाली, " पुरे, पुरे सनिया दादा. एक शब्द आणखी

बोलू नकोस."

"का नको ? हे घर तुझं आहे. या घरात जे काही आहे ते सर्व तुझं आहे. तुझ्या हातचं बाहुलं होऊन राहायची माझी तयारी नाही. अफाट जग माझ्यासमोर आहे. हजारो वृक्षांच्या सावलीत कुठंही मला आश्रय घेता येईल."

"सनिया दादा—" धोबीला काही सांगायचं होतं. पण सांगू शकली नाही. सनियानं पुढं म्हटलं, "मी माझ्या मनातलं तुला सांगतोय धोबी. मी जिवापाड कष्ट केलेत. दुसऱ्यांकडे रक्त आटवून मी मजुरी केली आहे आणि इथे एकटा पडलोय. या घरात राहिलं की मला गेल्या दिवसांची आठवण होते. आई, बाबा, बहीण, भाऊ सर्वांची आठवण मला छळते."

धोबीनं म्हटलं, "सनिया दादा, माणूस जेव्हा एकटा राहतो तेव्हा त्याला किती तरी त्रास सहन करावा लागतो. तो वेड्यासारखा बडबडत सुटतो. या घराला जर एखादी घरधनीण मिळाली तर तुझं सारं वेड संपेल."

धोबी हसली. तिनं सनियाचे हात धरले. तिची बोलण्याची ढब, तिचा तिरका कटाक्ष, तिचे हसरे, कापरे ओठ आणि गाल पाहून सनियाचं सारं शरीर पुलकित झालं. काही वेळ त्याच्या तोंडून अवाक्षर निघालं नाही.

धोबीनं पुन्हा म्हटलं, "सनिया दादा, या जगात सुखानंतर दुःख आणि दुःखानंतर सुख येत असतं. जगाचा हा नियमच आहे. तू धीर सोडू नकोस. तुझे आईवडील, बहीण, भाऊ, सारे पुन्हा तुझ्याच घरी जन्म घेतील. तुझ्याच मांडीवर याच घरात खेळतील, हे घर त्यांच्या गोड बोलांनी निनादून जाईल. मग ज्यांच्या आठवणीनं तू तळमळतो आहेस त्यांचीच सेवा करायची संधी तुला लाभेल. उगाच डोक्याला ताप करून घेऊ नकोस."

धोबीच्या हातांत असलेला सनियाचा हात थरारला. काय म्हणायचं आहे धोबीला ? हे घर पुन्हा हसू लागेल ? या घरात आनंदप्रवाह वाहू लागेल ? पण या घरची घरधनीण कोण होणार ?

धोबीच्या डोळ्यांवरून, तिच्या बोलण्याच्या शैलीवरून सनियाला जणू आपल्या सर्व प्रश्नांचं उत्तर सापडलं. सनियाच्या मनात आलं, आपल्या भावी पिढीच्या या जननीला मिठीत घ्यावं, तिच्या गालांचं चुंबन घेऊन तिला विचारावं, 'तो दिवस कधी उगवणार धोबी ? कधी माझं भाग्य फळाला येणार ?' पण धोबीच्या डोळ्यात 'नकार' होता. त्याचा अर्थ सनियानं ओळखला होता. आपल्या दोन्ही हातांनी धोबीचे नाजूक हात धरून त्यानं म्हटलं, 'पण धोबी मी गरीब आहे ग !"

"गरीब ?" धोबीनं म्हटलं, "तू का म्हणून गरीब राहणार ? देवानं तुला विद्या, बुद्धी दिली आहे. तुझ्या शरीरात बळ दिलंय. तुझी गरज काय आहे ते मला ठाऊक आहे. दुसऱ्याच्या मदतीखेरीज कुणाची प्रगती होत नसते. म्हणूनच मी तुला बाबांकडे

पाठवलं होतं. त्यांनी नकार दिला. तू परत निघून आलास. यात कसला अपमान ? ज्याला मोठं व्हायचं असतं, थोर व्हायचं असतं त्याला प्रसंगी स्वत:कडे कमीपणा घ्यावा लागतो. जो सहन करू शकतो तोच मोठा माणूस होऊ शकतो. तुला त्यांच्याकडे वारंवार खेटे घालावे लागतील. आणखी एकदा जा. आणि पैसे देऊन आपली जमीन परत माग."

" पैसे ?" सनिया आश्चर्यचकित झाला. त्यानं विचारलं, " पैसे कुठून मिळतील धोबी ? जितके रुपये उरले होते त्याने एक शेळी घेतली, एक वासरू पण विकत घेतलंय. माझ्यापाशी आणखी रुपये नाहीत."

" तुला जमिनीतून आणखी गुप्तधन सापडणार आहे, समजलं ?" धोबीनं आपल्या कडोसरीतून सोन्याची एक माळ काढली. चिमणीच्या प्रकाशात सोन्याचा हार लकाकला. सनिया दचकला.

धोबीनं म्हटलं, " हा हार चितेई सोईचा नाही. माझ्या सासऱ्यांनी हा मला दिला होता. हा हार माझा आहे. फक्त माझाच. आज मी तो तुला देत आहे. हा हार विकून तू आपली जमीन सोडवून घे. बाबांनी जर जमीन परत दिली नाही तर नवी जमीन विकत घे."

जरा थांबून धोबीनं पुढं म्हटलं, " सनिया दादा ! ही मी तुला भिक्षा देत नाहीये. हा हार तुझा आहे. माझ्यापाशी हा ठेवून काय उपयोग होणार आहे ? माझ्या पेटीत बराच पैसाअडका, दागदागिने होते. पण एक दिवस माझ्याकडून चावी घेऊन बाबांनी ते सारं काढून घेतलं. हा हार कपड्यांच्याखाली ठेवला होता. म्हणून यावर त्यांची नजर गेली नाही. त्यांना जर हा दिसला असता तर त्यांनी नक्कीच काढून घेतला असता. एकदा का हा हार त्यांच्यापाशी गेला असता तर मग मला पुन्हा कधीही मिळाला नसता. तू हा घे. पेटीत पडलेल्या धनाची काय किंमत ? पेटीतलं धन तर रस्त्यावरच्या खड्यांमारखं असतं."

" पण धोबी. . . "

" पण बिण काही नाही. मी तुझं अजिबात ऐकणार नाही."

सनियाच्या तोंडावर धोबीनं आपला हात ठेवला. म्हणाली, " मी तुला आणखी काही बोलू देणार नाही. सनिया दादा ! जो हार पेटीत नुसता पडून राहणार होता तो कुणाच्या तरी उपयोगी पडू देत. तू जमीन विकत घेऊन गावच्या इतर मंडळींच्या पंक्तीला येऊन बसावं इतकीच माझी इच्छा आहे. मला गरज लागेल तेव्हा मी हक्कानं तुझ्याकडून रुपये मागून घेईन. त्या वेळी तुला नकार देता यायचा नाही."

सनियानं म्हटलं " कशासाठी जमीन घ्यायची धोबी ? जगात माझं आहेच कोण ? कोण त्या जमिनीचा उपभोग घेणार आहे ? का तू माझ्या उन्मुक्त जीवनाला बांधू

पाहत आहेस ?"

सनियानं पुन्हा म्हटलं, "धोबी, एक विचारावंसं वाटतंय. तुझ्याच तोंडून त्या प्रश्नाचं उत्तर मिळेल अशी ग्वाही माझं मन मला देतंय. तेवढी एकच गोष्ट तुझ्या तोंडून ऐकली की माझं सर्व दु:ख नाहीसं होईल. मी फक्त तुझीच वाट पाहत राहीन धोबी."

सनियाच्या शब्दांत प्रेम होतं. त्याच्या डोळ्यांत जगण्याची उमेद होती. त्याच्या बोलण्यावरूनचा त्याचा उद्देश कळून येत होता.

सनिया काय विचारणार आहे ते धोबी समजली. सनियाच्या मनात असलेली निष्कलंक वासना धोबीला जाणवली. तिनं जर सनियाच्या प्रश्नाचं उत्तर आनंदानं दिलं तर त्यामुळे सनियाची जगण्याची उमेद वाढेल. त्याच्या या निर्जन झोपडीत भविष्यकालाची सोनेरी स्वप्नं साकार होतील. पण सनियाचा प्रश्न ऐकायची तिची तयारी नव्हती. त्याच्या प्रश्नाचं उत्तर द्यायचीही तिची तयारी नव्हती.

कंगाल सनिया कशासाठी जगतोय ? कशाकरता प्रायश्चित्त घेऊन जातीत आलाय, घर बांधलय ते सर्व धोबीला ठाऊक आहे. तो इतके कष्ट, इतके अपमान का झेलतोय हे पण तिला माहीत आहे, सनियाच्या प्रश्नाचं उत्तर ती नकारार्थी देणार ? आपल्या एकाच ' नाही ' शब्दानं त्याचा सर्वनाश ओढवेल, परिडा वंशाचा लोप होईल'याची जाणीव तिला होती. त्याला ' नाही ' म्हणून खुद्द धोबी तरी कुठे जगू शकणार होती ? पण मग काय ' हो ' म्हणायचं ? ' हो ' म्हणायचं धैर्य तिच्यात नव्हतं. कित्येक उत्तुंग भिंती दोघांमध्ये आडव्या उभ्या होत्या––सामाजिक संस्कार, वडिलांची इच्छा आणि आर्थिक विषमता.

धोबीचे डोळे आसवांनी डबडबले. म्हणाली, " सनियादादा ! तुझ्या पाया पडते. यावेळी मला काही विचारू नकोस. विचारायची वेळ अजून आलेली नाही. उत्तर द्यायचा धीरही मला नाही. तू माणूस हो. मोठा हो. मग तुला काही विचारावं लागणार नाही. आणि मलाही कसलं उत्तर द्यावं लागणार नाही."

धोबीनं सनियाच्या पायांवर डोकं ठेवलं. तिच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या उष्ण अश्रुधारा सनियाला सहन झाल्या नाहीत.

सनियानं धोबीला वर उठवलं. तिचे डोळे पुसले. तिच्या गालांवरील अश्रुधारा पुसल्या. त्या दिव्य मूर्तीच्या अशक्त शरीराला छातीशी कवटाळून, " धोबी तू माझी आहेस, फक्त माझीच आहेस" असं म्हणावंसं त्याला वाटलं.

धोबीला सारं उमजलं होतं.

महादेवाच्या देवळाकडून ' हरिबोल ' आणि ' हुलहुली ' चा आवाज येत होता. अचानक धोबी सावध झाली. महाप्रदीप मंदिराच्या शिखरापर्यंत उजळलेला होता. धोबीनं म्हटलं, " सनिया दादा, मी जाते."

ती मग आणखी थांबली नाही. तिची पावलं आपोआप घराबाहेर पडली होती. सनियापण तिच्या पाठोपाठ आला. सोन्याचा हार जमिनीवरच पडलेला होता.

होळी जवळ आली होती. गोपीनाथाच्या देवळाच्या आजूबाजूची जागा स्वच्छ करण्यात आली. एक मोठा बांबू रंगवून चबुतऱ्यापाशी रोवला गेला. मांडव घालायची व्यवस्था झाली. चतुर्दशीला विष्णुपुरात मोठी जत्रा भरत असे. आता फक्त सात दिवस उरले होते. अगोदरच तयारी केली नाही तर वेळेवर काहीच नीट व्हायचं नाही म्हणून मोठ्या घाईनं काम चाललं होतं.

साऱ्या कामावर प्रहराज जातीनं देखरेख करीत होते. देवळामागच्या आखाड्याची डागडुजी सुरू झाली होती. संध्याकाळी कीर्तन सुरू झालं होतं. पूर्वी ज्या लोकांनी मृदंग वाजवण्यात चागलं नैपुण्य दाखविलं होतं, आसपासच्या पंचक्रोशीत ज्यांच्या कलेला मान होता, ते आज हयात नव्हते. दुष्काळाच्या विक्राळ दाढांखाली चिरडले गेले होते. सध्या जे मृदंग वाजवीत ते बहुतेक नवशिके होते. त्यांचं वयदेखील लहान होतं. त्यांना अनुभव नव्हता, सराव नव्हता. पण त्यांच्याच कलेवर काम भागवायला हवं असं लोक म्हणत होते.

मृदंगवादकाना प्रहराज प्रोत्साहन देत होते. गावच्या पोरांकडून पालखी स्वच्छ करून घेत होते. पालखी बऱ्याच गावी जाईल, जत्रेला अमाप गर्दी लोटेल. जुन्या मांडवाच्याऐवजी या वर्षी नवा मांडव घातला जाणार आहे. धोबीच्या नावे पन्नास रुपये देऊन चितेई सोईनी मांडवासाठी एक नवे छत्र घेतले आहे. अवघा गाव धोबीची प्रशंसा करीत होता. लोक म्हणत होते, या इतक्या लहान वयातही धोबी पुढच्या जन्मासाठी पुण्य मिळवतेय.

देवाप्रीत्यर्थ चाललेले कामकाज पाहण्यासाठी चितेई सोई नियमितपणे यायचे. विष्णुपूर गावातली जी मुलं मलेरिया, महामारी, देवी आणि दुष्काळातून वाचली होती, आज त्यानी गावात ' लउडी ' खेळ सुरू केला होता. दुसऱ्या गावी पण जायला हवं. दुसऱ्या गावच्या संघाशी जर भांडण झालं तर बहुधा डोकी फुटतील—तो अनुपम सोहळा बघण्यासाठी गावची वडीलधारी वयस्क माणसे उत्सुक होती, अस्वस्थपणे वाट पाहत होती.

चितेई सोई देवळाजवळच्या चबुतऱ्याशी आले. बरोबर त्यांचे धाकटे भाऊ निधि सोईदेखील होते. त्यांना येताना बघून गावच्या तरुणांनी लाठीचा खेळ मोठ्या जोषात सुरू केला. आखाड्यातून मृदंगाचा मधुर स्वर ऐकू आला. प्रहराज देवळातून बाहेर आले आणि सोईनी नमस्कार करण्याच्या आतच त्यांनी त्यांना आशीर्वाद देऊन टाकला. प्रहराजनी म्हटलं, " या वर्षीची जत्रा मोठी थाटाची होणार. त्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न

चालू आहेत."

सोईजी हसले. म्हणाले, " तेच तर व्हायला हवं प्रहराजजी ! गावाची शान राहावी हीच तर आमची इच्छा आहे. गावचे सर्व तरुण आले ना ? सनिया कुठंय ?"

प्रहराजनी उत्तर दिलं, " गावच्या जत्रेला तो कधी कुठे येतो ? वर्गणीसाठी मुलं त्याच्याकडे गेली होती. त्याच्याकडून चार आणे वर्गणी घ्यायचं ठरलं होतं. पण त्यानं तर वर्गणीसाठी एक रुपया देऊन म्हटलं, " अरे चार आण्यात का कधी देवकार्य होत असतं ? हा घ्या एक रुपया."

मोईनी म्हटलं, " पोरात अक्कल आहे खरी पण जरा उद्धट आहे. वेळ आली म्हणजे होईल सारं ठीक. बरं, देवकार्य आटोपून तुम्ही जरा घरी या. होळीच्या दिवशीच दत्तकविधान करायचं धोबी म्हणतेय. कुणाकुणाला आमंत्रण धाडायचं ते सारं ठरलं आहे. हरी महांती पत्रं लिहितोय. तुम्ही येऊन सारं एकदा नजरेखालून घाला."

चिंतेई सोई आणि निधि सोई घरी परत निघाले. वाटेत निधि सोईनी विचारलं, " या प्रकरणी धोबीला नको का एकदा विचारायला ?"

चिंतेई सोई गंभीर झाले. या प्रश्नाचं उत्तर देणं त्यांना योग्य वाटलं नाही.

निधि सोईना दोन मुलं आणि एक मुलगी. मोठा मुलगा भगवान उर्फ मंगी आठ वर्षांचा होता. गावच्या शाळेत शिकत होता. खूप हुशार आणि सालस होता. विद्याधर उर्फ विदेई पाच वर्षांचा होता. चपळ आणि धीट. विलक्षण बुद्धिमान. एकपाठी. मुलगी रानी दोन वर्षांची होती. अतिशय खेळकर आणि हसरी.

लहानपणापासूनच मुलं थोरल्या आईच्या—काकूच्या—अंगाखांद्यावर वाढली होती. धाकटी आई, निधि सोईची बायको, नेहमी घरकामात गुतलेली असायची. मुलांना जन्म देऊन जणू ती निश्चित व्हायची. मुलांना धोबीच्या आईचाच लळा होता. आणि धोबीच्या आईलादेखील मुलांवाचून चैन नसे. मुलांच्या डोळ्यांत अश्रू आलेले तिला सहन होत नसे.

धोबी दत्तक घेणार असल्याचं धोबीच्या आईला समजलं तेव्हा तिच्या हृदयाला तीव्र वेदना झाल्या. नेहमी कडेवर असणाऱ्या विदेईला तिनं धम्मदिशी खाली जमिनीवर आदळलं. आज ' त्यांची ' चांगली कानउघाडणी करायची, मग काय होईल ते होवो असं तिनं ठरवलं.

चिंतेई सोई बैठकीच्या खोलीत बसले होते. थोडं दूर निधि सोईदेखील बसले होते. खोलीत हरी महांती आणि प्रहराजदेखील होते. धोबीच्या आईला बघताच सर्वजण बोलणं थांबवून तिच्याकडे बघू लागले. धोबीच्या आईच्या डोळ्यांतून आग वर्षत असल्याचं सर्वांना दिसलं.

बैठकीत पोचताच धोबीच्या आईनं आपल्या दिराला म्हटलं,, " हे काय चाललंय

निधि ? माझ्या कानावर आलंय ते सर्व खरं आहे का ? विदेईलाच धोबी दत्तक घेणार आहे ना ?"

निधि सोई खाली मान घालून बसले होते. वहिनीकडून त्यांनी अशा स्पष्ट शब्दांत कधी काही ऐकलं नव्हतं. चितेई सोईदेखील आपल्या बायकोचा हा निर्लज्जपणा पाहून चिडले. त्यांनी म्हटलं, " अग, ऐक तरी. धोबीच्या सासऱ्याची खूप मोठी मालमत्ता आहे. त्याची व्यवस्था कोण बघणार ? शिवाय नायक वंशाच्या पूर्वजांचं श्राद्ध कोण करील ? धोबीच्या मुलाचाच तो हक्क आहे. त्यालाच ते सर्व करता येईल. तू तर खूप पोथ्या पुराणं वाचली आहेस. तूच सांग..."

धोबीच्या आईनंदेखील मनातली मळमळ ओकून टाकली. तिनं स्पष्टपणे सांगून टाकलं की, " नायक वंशाचे पूर्वज नरकात जावोत नाही तर त्यांच्या मालमत्तेला आग लागो, माझं काय जातंय त्यात ? पैशाच्या लोभापायी तुम्ही माझ्या लाडक्या पोरीचं इतक्या लहान वयातच लग्न लावून टाकलंत. ज्याचा हात धरला त्याची पुरती ओळख होण्यापूर्वीच बापडीच कुंकू पुसलं गेलं. कसं सहन व्हायच हे ?"

बोलता बोलता धोबीच्या आईचे डोळे भरून आले. हुंदके देत देतच ती म्हणाली, " ज्यांचा सल्ला ऐकून तुम्ही आपल्या पोरीला अश्रू गाळायला लावताय त्यांना जाऊ देत नायक वंशाच्या पूर्वजांचं श्राद्ध करायला. धोबी का म्हणून कुणाला दत्तक घेईल ?"

चितेई सोईंनी म्हटलं, " तुला थोडी जरी लाजलज्जा असती तरी तू अशी बाहेर येऊन तणतणली नसतीस. जा, आत जा बघू."

धोबीची आई आणखी संतापली, ओरडून म्हणाली, " हो, हो, माहीत आहे लाज-लज्जा काय असते ते ! लोकलाजेपायी मी इतके दिवस काही बोलले नाही, गप्प राहिले. पण तुम्ही काय केलंत ? माझा सर्वनाशच केलात ना ? सांगून ठेवते, माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी धोबीला दत्तक घेऊ देणार नाही. कुणीही असो, मूर्ख असो, मजूर असो, त्याच्याशी मी धोबीचं लग्न लावून देईन. माझी ती एकुलती एक मुलगी आहे. संपत्तीचा अर्धा वाटा तिचाच आहे. तुम्ही आपल्या वाट्याची संपत्ती तिच्या नावे लिहून टाका. तिनं लग्न केल्यास तिला आपल्या सासरची, नायक घराण्याची संपत्ती मिळायची नाही हे खरं. न का मिळेना, चुलीत जावो ती मेली संपत्ती. त्या संपत्तीपायी माझ्या लेकीच्या जन्माचं वाटोळं नाही होऊ द्यायची मी. आपल्यापाशी आहे या संपत्ती-वरच माझी पोर सुखानं राहील."

चितेई सोई लालनिळे झाले. त्यांचा पारा इतका चढला की त्यांना हसू आलं. म्हणाले, " बरं, बरं. आता आत जा आधी. खूप झालं. झाला तेवढा उपदेश बस्स झाला."

धोबीची आई म्हणाली, " तुम्ही कधी कुणाचं काही ऐकत नाही. निधीनं तुम्हाला भुरळ घातलीय. त्याच्याच पोरांना सारी संपत्ती मिळणार. पण माझंही बोलणं नीट

कान उघडे ठेवून ऐकून घ्या. येत्या होळीपर्यंत मी धोबीचं लग्न लावून टाकीन. मजूर मिळाला तरी त्याच्या हाती तिचा हात देईन. तो काबाडकष्ट करीत असला म्हणून काय झालं ? आपलं पोट तर भरतो. बनेई परिडाचा मुलगा सनिया घरी परत आलाय. त्याच्याशी धोबीचं लग्न लावीन. हो..."

पण तिचं बोलणं पुरं व्हायच्या आत सनियाच तिथं दाखल झाला. दारापाशी उभा होता. धोबीच्या आईनं पतीला खिजवण्यासाठीच सनियाचं नाव घेतलं होतं. आता त्यालाच समोर बघताच ती लाजली आणि आत निघून गेली. सनियानं आत येऊन सर्वांना नमस्कार केला. धोबीच्या आईच्या तोंडून त्यानं नुसतं आपलं नाव ऐकलं होतं. ती आणखी काही बोलत होती. पण ते त्याच्या कानावर आलं नव्हतं. सर्वांचे गंभीर चेहरे बघून त्यानं कयास केला की आपल्याविषयीच काही बोलणं चाललं असावं.

एकाएकी चिंतेई सोईनी आपले मनोभाव पालटून म्हटलं, "ये, ये सनिया, बस. आज तुझ्याविषयीच बोलत होतो. गावच्या आखाड्यात सर्व मुलं दिसली. पण तू काही दिसला नव्हतास. अरे, नुसती वर्गणी देऊन का कधी काम होतं ? स्वतः येऊन त्यात भाग घ्यायला हवा. नाही तर देवाचं काम कसं पुरं होणार ? ये, बस."

सनिया आपली काठी खाली ठेवून बसला. म्हणाला, "मी देवाचं काम बघायला नव्हतो आलो. ते तुमचं तुम्हीच बघा. आम्ही गरीब आहोत, कमनशिबी आहोत. आमच्यावर काही देवाची कृपा नाही. आम्हाला पण देवाचं काम करायला वेळ नाही. तुमच्यापाशी माझं स्वतःचं काही काम होतं."

"काय काम होतं माझ्यापाशी ? " थट्टेच्या स्वरात चिंतेई सोईनी विचारलं.

"माझी जमीन मला परत देऊन टाका. तिची जी काय किंमत असेल ती मोजून घ्या."

सर्वजण थक्क होऊन सनियाकडे बघू लागले. प्रकरण काय आहे ? फार मोठी झेप घेतोय ! सनिया दुसऱ्यांकडे नोकरी करून पैसे मिळवतो. इतके पैसे कुठून जमवले ? दहा एकर जमिनीची किंमत काही थोडीथोडकी नाही. हा द्यायला तयार आहे म्हणजे काय ?

चिंतेई सोईनी आपली नजर खाली करून विचारलं, "जमिनीची किंमत तू देऊ शकशील ?"

"हो, बाजारात तिची जी काही किंमत असेल ती घ्या आणि माझी जमीन मला परत द्या. मी पैशांची व्यवस्था केली आहे."

"बाजारात याची काय किंमत आहे मला ठाऊक नाही. दहा एकर जमीन जर परत हवी असेल तर हजार रुपये दे आणि आपली जमीन परत घे."

"सध्या बाजारात जमिनीचा भाव दर एकरी पंचवीस रुपये आहे. त्या हिशेबानं मी

अडीचशे रुपयांची व्यवस्था करून आलोय."

"अस्सं ? " सोई हसले. तर मग तू बाजारातच जा आणि तिथूनच विकत घे. तुझ्या बापाकडून मी जमीन खरेदी केली होती ती परत विकण्यासाठी नव्हे. विकायची असेल तर मी माझ्या मर्जीनं विकीन. काय खरं ना महांतीजी ?"

हरी महांतीनी म्हटलं, "खरेदी विक्री ही आपल्या खुशीची गोष्ट आहे. कुणी कुणाला त्यासाठी भाग पाडू शकत नाही."

सनिया उठला. आपली काठी एका हातात घेतली. सर्वांना नमस्कार करून निघून गेला.

सनिया निघून गेल्यावर निधी सोईंनी हरी महांतीला म्हटलं, "वहिनींच्या इच्छेविरुद्ध काही बोलणं कठीण आहे. ती अजून रागावलेली आहे. कागदपत्रं बांधून ठेवून द्या. नंतर विचार करून काम करावं लागेल."

चिंतेई सोई म्हणाले, "अरे निधिआ ! आता काय घरच्या बायका बाजारात येऊन कामधंदा करतील ? घरची चूल कोण सांभाळणार मग ? तुझ्या वहिनीच्या मनासारखं काम केलंस तर घर मोडायला दोन दिवससुद्धा लागायचे नाहीत. समजलं ? मुलाला दत्तक घ्यायचं काम नाही थांबवता येणार. महांतीजी, तुम्ही पत्रं लिहा बघू."

निधी सोईनी आपल्या भावाविरुद्ध ब्र काढला नाही. तेवढं धैर्यच झालं नाही त्यांना. ते उठून जायला निघाले. पण चिंतेई सोई म्हणाले, "कुठं निघालास ? बस इथंच ! हरी बाबूना मदत कर. प्रह्लादजी ! चला, आपण देवळाचं काम बघून येऊ या."

सोईच्या घरात जो असमाधानाचा वणवा पेटला तो बघायला धोबीला वा बाहेरच्या लोकांना वेळ लागला नाही. काकू नेहमी वैतागलेली असायची. क्षुल्लक गोष्टींवरून भांडायची. आई नेहमी व्यथित राहायची. वडिलांची मनःस्थिती पार बिघडलेली होती. काका पण उदास राहायचे. घरात काहीतरी शिजतंय आणि पुढे मागे ते धोकादायक ठरण्याची शक्यता होती. पण विचारायची सोय नव्हती. अखेर प्रकरण जेव्हा गावभर झालं आणि गावच्या सर्वांना पत्ता लागला तेव्हा एके दिवशी टिमीनं येऊन सारं काही तिला सांगितलं.

त्या दिवशी टिमी म्हणाली, "धोबी, अग ठाऊक आहे का तुला, तुझे बाबा आणि काका वेगळे होणार आहेत. होळीच्या आत तुझं सनियाशी लग्न लावून द्यायचं तुझी आई म्हणतेय, तर तुझे बाबा म्हणताहेत की होळीच्या आत तुला दत्तक घ्यायला लावायचं. तुझी काकू, मुलाला दत्तक द्यायला तयार नाही पण काका म्हणताहेत द्यायचं. सनिया रुपये घेऊन आला होता. त्यानं आपली जमीन परत मागितली. पण तुझ्या

बाबांनी नकार दिला. तुझे काका मात्र त्याची जमीन त्याला द्यायला तयार होते. सनिया बिचारा निराश होऊन परत गेला.''

टिमीचं बोलणं ऐकून धोबीच्या मनाला क्लेश होत होते. टिमीचा प्रत्येक शब्द सुरीसारखा तिचं काळीज चरचरा कापत होता. पण ती निमूटपणे सारं काही ऐकत होती. आपण शब्द जरी बोललो तरी त्याच्या शंभर वावड्या उठायला वेळ लागणार नाही हे ती ओळखून होती. टिमीनं जे काही ऐकलं होतं ते सारं तिला स्पष्ट शब्दांत सांगून टाकलं होतं. त्यातलं खरं काय नि खोटं काय याची शहानिशा करून घ्यायचं धैर्य धोबीला नव्हतं. आपल्या खोलीत पडल्या पडल्या ती विचार करीत होती—' माझं कर्तव्य काय ?'

माझं जीवन सुखी करण्यासाठी सोई कुटुंब का धुळीस मिळवलं जात आहे असा प्रश्न प्रत्येकापाशी जाऊन विचारावंसं तिला वाटत होतं. पण कुणाला काही विचारायचं धाडस तिला होत नव्हतं. जोवर तिचं लग्न झालेलं नव्हतं, ती या घरची लेक होती, तोवर वेगळी गोष्ट होती. आता ती दुसऱ्या घरची सून होती. आता तिचा या घरावर काय हक्क होता ? आता तर आपल्याच घरात पाहुणं असल्यासारखं तिला वाटत होतं.

आपले पती व सासरच्या गोष्टी तिला नेहमी आठवायच्या, त्या गावची माती जणू तिला हाक मारीत होती. मोहमायेचे पाश तोडून जे निघून गेले होते त्यांचे आत्मे जणू तिला डिवचत होते, '' वेडे, तुला काय कमी आहे ? धनदौलत, घरदार, जमीनजुमला सारं, सारं काही...तू नायक घराण्याची सून आहेस. दुसऱ्यांच्या घरी जाऊन अश्रू गाळायची तुला काय गरज ? तुझे पती व सासरे जे कार्य अर्धवट टाकून गेलेत ते का नाही तू पुरं करीत ? नायक वंशाचा सर्वनाश झाला आहे. जे घराणं जीवित राखायला त्यांनी इतकी संपत्ती मिळवली होती, त्याचं काय होणार ?

धोबीनं जर कुणाला दत्तक घेतलं तर नायक वंशाचं रक्त त्याच्यात राहणार नाही, नुसतं नाव तेवढं राहील. पण नायक वंशाच्या रक्ताचा अखंड प्रवाह आदिकालापासून आजपर्यंत तसाच वाहत आहे का ? भूतकाळात कदाचित कित्येकदा हा प्रवाह मोडला असेल. फक्त नाव उरतं, बाकी काही नाही. नावात काय ठेवलंय ? पोकळपणा, नुसता पोकळपणा. का म्हणून आपण दत्तक घ्यायचा ? त्याऐवजी पती व सासऱ्यांचं अपूर्ण, राहिलेलं काम का नाही पुरं करावं ?

गेल्या वर्षीची गोष्ट आठवली. गेल्या वर्षी नेमक्या याच वेळी होळीची तयारी जोरात चालू होती. पण तिचे पती व सासरे होळी साजरी करायच्याऐवजी लोकांची सेवा करायच्या कार्यात गुतले होते. त्यांना होळीचा आनंद उपभोगता आला नव्हता. लोकांना अन्न वाटण्यात आणि मृतांची प्रेतं उचलण्यात ते गढून गेले होते.

धोबीचा थरकाप झाला.

तिच्या मनात आलं, का आपण वेळ दवडतोय ? कशाची वाट पहातोय ? पती व सासूसासऱ्यांच्या श्राद्धाची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. मोक्षासाठी त्यांचे आत्मे तिच्याचकडे आशाळभूतपणे पाहत असतील. एक मुलगा दत्तक घ्यायच्याऐवजी वाटे-वरल्या शेकडो मुलांची तिनं सेवा केली तर त्यांच्या आत्म्यांना नक्कीच जास्त समाधान लाभेल. आपली संपत्ती एकाला न देता सर्वांसाठी तिचा उपयोग व्हायला हवा. तिचे पती, सासूसासरे, शेकडो मुलांची हाक अधिक ऐकतील, एकाची नव्हे.

धोवी चमकली. खिडकीतून चंद्राचं शीतल चांदणं आत येत होतं. देवळातून कीर्तन-ध्वनी कानावर येत होता. पण तिच्या नजरेसमोर मात्र होता नवप्रकाश; कानांमध्ये नव्या हाकेचा आगळा आवाज घुमत होता. तिला जाणवलं, आपण स्वतंत्र आहोत, निश्चित आहोत. आता आपल्याला कुणीही अडवू शकत नाही. इतके दिवस आपल्या वडिलांच्या व काकांच्या घरात जणू तिचं शरीर कैद होतं. सर्वांच्या स्नेहरज्जूंनी जणू तिचा आत्मा जखडून टाकला होता.

धोबीला स्वातंत्र्य हवं होतं. प्रत्येक घराची दारं आपल्यासाठी खुली असावीत असं तिला वाटत होतं. आपल्या प्रेमरज्जूनं ती सर्वांना बांधू इच्छित होती. आईवडिलांचं घर तिची जन्मभूमी असली तरी ती तिची कर्मभूमी नव्हती. ती जाणार. आईवडील, काका इत्यादींच्या मायेच्या परिघाबाहेर असलेल्या आपल्या कर्मक्षेत्री ती नक्कीच जाणार !

धोबीनं बाहेर पाहिलं. घराच्या छपरावर रुपेरी चंद्र हसत होता. अवघ्या अंगणात जणू प्रकाशलहरी भरून राहिल्या होत्या. थंड वारा मन व शरीराला सुखवीत होता. स्वैंपाकघरातून भांड्यांचा झणकार ऐकू येत होता.

आई काही तरी बोलत होती बाहेर. घरात जो गोंधळ होता, आईच्या बोलण्यावरून त्याचा काही पत्ता लागणं शक्य आहे या विचारानं धोबी लक्षपूर्वक तिचं बोलणं ऐकू लागली. आई चंदराला सांगत होती—" जा, सनियाला बोलावून आण. मी त्याच्याशीच बोलणी करीन."

चंदरानं म्हटलं, " बरं, हा आत्ता बोलावून आणतो त्याला. इथंच घेऊन येऊ ?"

" निधी कुठं आहे ?"

" दोघे बाबू देवळाच्या चबुतऱ्यावर बसले आहेत. राम प्रहराज, हरी महांती आणि बाम ओझाशी बोलताहेत."

" काय बोलणं चाललंय ?"

" मी ऐकलं नाही. आपण बोलावल्याचा निरोप टिमीनं मला वाटेतच दिला. लगेच मी सरळ देवळाकडच्या रस्त्यानं इकडेच आलो."

" हो, हो, टिमीनं तुझ्याविषयीही काही सांगितलं होतं मला. शिवरात्रीच्या दिवशी

रात्री सनियाच धोबीला घरी सोडायला आला होता, ही गोष्ट तू टिमीला सांगितल्याचं ती म्हणत होती."

आणखीही काही गोष्टी धोबीनं ऐकल्या. मग आई म्हणाली, "चंदरा, तू एक काम कर. लगेच जा आणि सनियाला बोलावून आण. मी इथंच त्याची वाट बघत बसलेय."

धोबीचं अंग शहारलं. डोकं गरगरू लागलं. इथून कसा पळ काढावा तेच तिला समजेना. हळूहळू ती आपल्या खोलीत परतली आणि तिनं धाडदिशी पलंगावर अंग झोकून दिलं. जणू तिची शुद्ध हरपली. पण आजी त्याच खोलीत बराच वेळपासून माळ जपत बसल्याचं काही तिच्या लक्षात आलं नाही.

धोबीच्या मनात वादळ सुरू होतं, भयंकर वादळ ! दुःख, स्वाभिमान, संताप सारे जणू एकत्र मिळून तिच्या डोक्यावर घाव घालत होते. तिच्या मस्तकाचा चुराडा करीत होते. टिमीनं का म्हणून ही गोष्ट आईला सांगितली ? टिमीशी तिची दाट मैत्री होती, असं असताना टिमीनंच का तिची बदनामी केली ? हे सर्व विचार मनात येऊन धोबीला अतिशय वाईट वाटत होतं.

तिनं तरी काय केलं होतं, धोबीच्या मनात आलं. गरीब सनियाला मदत करण्यासाठी ती त्याच्या घरी गेली होती इतकंच शिवरात्रीच्या सर्व घटना तिला आठवल्या. अशा घटना घडल्या यावर तिचा विश्वासच बसत नव्हता. सनियाचा चेहरा तिच्या नजरेसमोर तरळून गेला. लाजेमुळे ती काही बोलू शकली नव्हती. सनियानं तिचे हात धरले होते. सनिया काय बोलला होता आणि धोबीनं काय उत्तर दिलं होतं हे आठवण्याच्या प्रयत्नात धोबीला चक्कर आल्यासारखं वाटू लागलं.

धोबीच्या मनात आलं, तिच्या हातून एक फार मोठी चूक झाली. उत्साहाच्या नादात ती सनियाला मदत करायला गेली आणि त्याच्या मनात तिनं सुखाची आशा पालवली. उज्ज्वल भविष्याचं चित्र तिनं त्याच्यासमोर रंगवलं. याच आशेनं सनिया वेडावून गेला. त्याच वेडाच्या भरात तो घाम गाळून खूप कष्ट करतो. त्याला किती दुःख व अपमान सहन करावा लागतो, तरी तो ते मनाला लावून घेत नाही. त्याला मोठं व्हायचं आहे. मोठं होण्याच्या या वेडानंच तो जिवापाड श्रम करतो.

धोबी का म्हणून सनियाला मदत करीत होती ? धोबीला ते ठाऊक होतं. मनाच्या क्षणिक आवेगापायी काही तिनं सनियाला मदत केली नव्हती, तिचं सनियावर प्रेम होतं. लहानपणापासूनच, ते दोघे जेव्हा एकत्र खेळायचे तेव्हापासूनच धोबीला सनिया आवडत होता. बालपणापासूनच तिचं सनियावर प्रेम होतं.

पण आता ? आता धोबी नायक घराण्याची विधवा सून आहे. सनियावर प्रेम

करायचा काय अधिकार आहे तिला ?

धोबीनं विचार केला, आता मनियाशी आपले सारे संबंध संपले पाहिजेत. सनियाच्या सर्व काळज्या आपल्या मनातून निघून गेल्या पाहिजेत—कायमच्या ! रस्त्याच्या कडेला शेकडो अनाथ लोक पडले होते. त्यांच्यापैकीच एक होता सनिया ! धोबीनं त्याला जीवदान दिलं होतं. आता सनिया जगातल्या लाखो गरीब लोकांपैकी एक आहे. धोबीनं सहानुभूतीनं त्यास साहाय्य केलं आहे. आता त्यानं स्वतःच आपला मार्ग शोधला पाहिजे. त्यानं वाटल्यास घरसंसार थाटावा. धोबीला त्याच्याशी काय कर्तव्य ?

धोबी बिछान्यावरून उठली. आजी काही तरी सांगत होती. पण धोबीनं तिकडे लक्ष दिलं नाही. सरळ बाहेर निघून गेली.

बाहेर आई उभी होती. समोर चंदरा उभा होता. जरा वरच्या आवाजात तो सांगत होता, " आई, तो सनिया काय घमेंडखोर आहे ! मी त्याला बोलावलं, आपला निरोप सांगितला. पण तो ऐकेल तर ना ? उलट चिडून म्हणाला, " चंदरा, जा, जाऊन सांग की मी चितेई सोईच्या घरी पाय टाकणार नाही. गरीब असलो म्हणून काय झालं. मी-देखील माणूस आहे. देवानं जिवंत ठेवलंच आहे तर राबल्यावर पोटभर खायलादेखील तोच देईल. आम्हाला काही सोईच्या घरून भीक नव्हती मिळाली. अन्नछत्रात आम्हाला खावं लागलं होतं. खूप लोक मेले. सोईच्या दारी मी दोनदा गेलो आणि माझ्या वाड-वडिलांची जमीन त्यांच्याकडून परत मागितली. पण त्यांनी साफ नकार दिला. का म्हणून आता मी त्यांच्या घरी जावं ?"

आईनं म्हटलं, " मी बोलावलंय म्हणून सांगितलं नाहीस तू...?"

" हो, सांगितलं. तो म्हणाला, चितेई मोईच्या पत्नीचा घरातच काय तो अधिकार आहे, घराबाहेर नाही. आजवर कधीही त्यांनी मला सहानुभूती दाखवली नाही. का म्हणून मी त्यांच्यापाशी जायचं ? जा, जाऊन सांग, मी गरीब आहे. पण कुणाला डरत नाही. फार काय महादेवालाही भीत नाही. मेलो तरी ताठ मानेनंच मरेन."

चंदराच्या तोंडून सनियाचं बोलणं ऐकून धोबी आनंदली. सनिया मोडेल पण वाकणार नाही याची खात्री होती तिला. प्रेमापायी तो वाटेल ते करायला तयार होईल. पण कुणी धाकधपटशा दाखवून त्याच्याकडून काही करून घेईल म्हणाल तर ते शक्य नाही, हे तिला पुरतं ठाऊक होतं. या साऱ्या गावात तो एकच तर माणूस आहे—सनिया ! बाकी जी मंडळी आहेत ती नुसती ढोरांसारखी !

" आई !" धोबीनं आईपाशी जाऊन हाक मारली.

" काय ग ?" आईनं मागे वळून पाहिलं.

" तुलाच शोधत होते. आई !"

" का ? काय झालं ?"

धोबीनं चंदराला म्हटलं, " चंदरा दादा ! जरा हरी महांती गुमास्त्यांना बोलावशील ? काही महत्त्वाचं काम आहे."

आता काय करावं ? चंदरा गोंधळला. पण धोबीच्या आईनंच हरी महांतीला बोलवायला सांगितलं.

चंदरा निघून गेला. धोबीची आई विचारात पडली. विचारलं, " हरी महांतीना कशाला बोलावलं आहेस तू ?"

धोबीनं उत्तर दिलं, उद्या सकाळी मी दुर्गापूरला जाईन. सासऱ्यांची पहिली पुण्यतिथी आहे. मी गेले नाही तर हे काम कोण करील ?"

धोबीच्या आईनं दीर्घ उसासा टाकला.

दुर्गापूरला न जाण्याचा सल्ला काका-काकू आणि घरातल्या सर्व लोकांनी दिला. पण धोबीनं कुणाचंच ऐकलं नाही. आपण दुर्गापूरला जाणार आणि पुण्यतिथीचे सर्व कार्य स्वतःच्या देखरेखीखाली करवून घेणार असल्याचा आपला निर्णय तिनं सर्वांना सांगून टाकला.

धोबीच्या मनात काय आहे ते कुणालाच समजू शकलं नाही. चिंतेई सोईना वाटलं की धोबीला तिच्या आईची फूस आहे आणि आईच्या सल्ल्यावरूनच ती दुर्गापूरला जायचा हट्ट धरून बसली आहे. दत्तक घेण्याच्या विधीसाठी जी व्यवस्था करण्यात येत आहे तिला खो घालण्यासाठीच ती असं करतेय. ज्या मुलीला आजवर वडील, काकांसमोर मान वर करून बोलायचं धाडस कधी झालं नव्हतं, ती आज इतकी धीट आणि हट्टी कशी झाली ? याच्या मागं नक्कीच तिच्या आईचा हात असला पाहिजे.

पण चिंतेई सोई धोरणी होते. वाहत्या पाण्याला बांध घालणं व्यर्थ होय हे ते ओळखून होते. ते पाणी वाहू देतात आणि त्याचा आपल्या कामासाठी उपयोग करून घ्यायचा प्रयत्न करतात. धोबीच्या हट्टामुळं अस्वस्थ झाल्याचं त्यांनी दिसू दिलं नाही. सुज्ञ विचार केला, जाऊ दे. धोबीला तिच्या मनासारखं करू दे. नाही तरी नायक घराण्यात आता तिच्याखेरीज दुसरं कोण आहे ?

सोईंनी म्हटलं, " धोबीला जाऊ देत. तिच्यासोबत तिची आई आणि काका यांनीही जावं. प्रहराजजी, तुम्ही पण जा. हरी महांती आहेतच. धोबीच्या मनाला क्लेश होऊ देऊ नका आणि काम संपल्याबरोबर परत या."

दुर्गापूरला पुण्यतिथी साजरी झाली. ब्राह्मण, गोरगरीब आणि इतर लोकांना भोजन मिळालं. अवघ्या गावात तीन दिवस धामधूम राहिली.

कार्य संपल्यावर सर्वजण विष्णुपूरला परत आले. पण धोबी आली नाही. काही

दिवसांनी चिंतेई सोई स्वत: दुर्गापूरला गेले. धोबीला खूप समजावलं. पण धोबीनं त्यांचं काहीएक ऐकलं नाही. आपण दुर्गापूरलाच आणखी काही दिवस राहून जमीन-जुमल्याची देखभाल करणार असा तिनं हट्टच धरला. निरुपायानं चिंतेई सोई परत आले. तरुण मुलीला दुर्गापूरमध्ये एकटं सोडणं धोबीच्या आईला प्रशस्त वाटलं नाही. ती पण दुर्गापूरलाच राहिली.

परतायच्या अगोदर चिंतेई सोईनी हरी महांतीला म्हटलं, " हे पाहा, धोबी अजून लहान आहे. तिचं बोलणं ऐकून घाईगर्दीत काही काम करू नका. मला निरोप पाठवा."

हरी महांतींना ते पटलं. चिंतेई सोई निश्चिंत मनानं परत आले.

मोईच्या घरून सनिया निराश होऊन परतला. त्यानं विचार केला की, जमीनदार शिव छोटेरायापाशी पुन्हा एकदा जावं आणि मामलेदार गोविंद प्रधानाच्या मदतीनं त्यांच्या कानांवर आपलं गाऱ्हाणं घालावं. विष्णुपूर गावी जमीनदाराच्या मालकीची बरीच जमीन होती. लोक त्या जमिनीवर शेतीवाडी करायचे. त्यालाही थोडीशी जमीन मिळाली तर काय बहार होईल ! दोन चार एकर मिळाली तरी त्याचं काम भागेल. महादेवाच्या देवळापाशी जो तलाव आहे, त्याच्यालगतच पाच दहा एकर ओस, पडीक जमीन आहे. जमल्यास यातली काही जमीन तो खंडानं घेईल. आपल्या वाडवडिलां-सारखाच तोदेखील मातीत राबेल.

आपल्या दोन शेळ्या देखरेखीसाठी धनगराच्या हाती सोपवून, घराला कुलूप ठोकून सनिया थेट निमपूरला निघाला. जमीनदार तेथे राहत होता. गोविंद प्रधानाच्या चरणी पाच रुपये ठेवून त्यानं त्यांना साष्टांग नमस्कार घातला. गोविंद प्रधानानं स्मित करून विचारलं, " काय बाळ, काय झालं ? सोईनी काय म्हटलं ?"

सनियानं सारं काही सांगितलं. निमपूरला आपण कशासाठी आलोय तेदेखील सांगितलं. मग पुन्हा एकदा प्रधानाच्या पायांना स्पर्श करून म्हणाला, " प्रधानजी, आता आपणच जर आधार दिला नाही तर मी गाव सोडून पळून जाईन. इथं राहून तरी काय उपयोग ? कशासाठी राहायचं ? मोलमजुरी करूनच जर पोट भरायचं आहे तर जगात इतरही खूप गावं आहेत की ! जमीनदार बाबूंची काही पडीक जमीन आहे. तिथं शेती करायची परवानगी जर मला मिळाली तर मी रिकाम्या हाती थोडाच आपल्या सेवेसी रुजू होईन ? जवळच एक तलावदेखील आहे. तो जळवा आणि सापांनी भरलेला आहे. आपली परवानगी असेल तर त्यातलं पाणी मी शेतीसाठी वापरीन. थोडीशी दया करा माझ्यावर, प्रधानजी !"

सनियाचं बोलणं प्रधानानं नीट कान देऊन ऐकलं. कागदपत्र काढून बघितले. मग

म्हटलं, " अरे सनिया, ती जमीन तर बारा एकर आहे आणि तलाव आहे, दीड एकराचा ! जमीनदार तुझं ऐकतील होय ?"

" ऐकतील की नाही ते तुम्हाला ठाऊक."

" सलामी काय देणार ?"

" आपण सांगाल ती. " जरा अडखळत सनियाने उत्तर दिलं.

प्रधानानं थोडा विचार केला. म्हणाला, " बारा एकर जमिनीचे बारा दुणी चोवीस रुपये. दीड एकर तलावासाठी पंधरा रुपये. कागदपत्रांचा खर्च, जमीनदाराच्या सहीचा खर्च इत्यादी सर्व धरून एकून साठ रुपये होतात. बस ! तेवढ्या रुपयांची व्यवस्था कर आणि करारपत्र घेऊन जा. याशिवाय पडीक जमिनीचा खंड दरएकरी एक रुपया."

सनियानं म्हटलं, " प्रधानजी आपण मला देवासारखे ! आपण जे सांगाल तेच करीन."

प्रधानानं म्हटलं, " ठीक आहे. आता तू घरी जा. पैसे घेऊन ये. मी जमीनदार बाबूंना फूस लावून सगळी बोलणी पक्की करून ठेवतो. एकदा का त्यांनी नकार दिला की मग त्यांच्या तोंडून होकार मिळवणं महाकठीण !"

" तर मग कधी येऊ ?"

" दोन दिवसांनी. घाई केल्यास कामाचा विचका व्हायची भीती आहे. चांगली संधी बघून तुझ्याविषयी बोलणं काढावं लागेल. समजलं ?"

सनियानं नमस्कार केला आणि तो घरी परत आला.

ते दोन दिवसदेखील सनियाला दोन युगांसारखे वाटले. घरात त्याचं मन रमत नव्हतं. महादेवाच्या देवळापाशी जो तलाव होता तिथं तो जायचा. खूप जुना तलाव होता. कुणी बांधला होता कुणास ठाऊक ! दुरुस्ती नसल्यानं आटला होता. तलावात पाणी फारच थोडं होतं. जमीनदारानं जर तलाव आपल्याला दिला तर गाळ उपसून काढायचं सनियानं ठरवलं.

तलावाजवळच उतारावर पडीक जमीन होती. तिथं काटेरी झाडी माजली होती. कोल्ह्यालांडग्यांची वस्ती त्यात होती. गावकरी मेलेली जनावरं तिथं टाकून द्यायचे. सनिया जिवापाड श्रम करून झाडी साफसूफ करील, रान तोडील, उतरणीवरची ती जमीन समतल करील, तलावातील पाणी खेचून शेत फुलवील. तो स्वत: शेतकऱ्याचा पोर आहे. त्याची हाक शेताच्या कानी नक्कीच जाईल. सनियानं का म्हणून निराश व्हावं ?

सनिया झाडीपाशी गेला. जमीन तपासली. चारी बाजूला नजर टाकली, उतरणी-वरच्या जमिनीपासून थोडं दूर खालच्या बाजूला चांगली सुपीक जमीनही होती. काही दिवसांपूर्वी ती जमीन कित्येकजणांच्या मालकीची होती. पण चितेई सोईंनी सर्व जमीन गिळंकृत केली. नांगर चालवून सोनं उगवणारे, त्या जमिनीचे खंडकरी कुठं निघून गेले ते देवाला ठाऊक ! जे लोक परतून आले ते सोईच्या शेतावरच मजुरी करीत होते. काही लोक शेती करीत होते पण त्यातला निम्मा वाटा सोईंना देत होते. सोई घर-बसल्या दुसऱ्यांच्या पिकानं आपलं कोठार भरत होते. दुसऱ्यांच्या संपत्तीनं स्वतः श्रीमंत होत होते. सनिया काही चितेई सोईचा गडी नाही. तो पीक आपल्या घरी घेऊन जाईल.

सनियानं जमीन नीट न्याहाळून पाहिली. जमीनदारानं जरासा जरी सहानुभूतीनं विचार केला तरी ही इतकी सर्व जमीन त्याच्या हाती येईल. तो शेतात नांगर चालवील, सोन्याचं पीक काढील, पैसे शिल्लक टाकील आणि त्या पैशांतून पुढे मग आणखी जमीन विकत घेईल. तोदेखील मोठा माणूस होईल. त्यानंतर धोबी त्याचीच होईल. तसं पाहिलं तर धोबीच्या पैशानंच तो जमीन खरेदी करणार आहे. पण निढळाचा घाम गाळून तो रात्रंदिवस कष्ट करील, शेतात सोनं पैदा करील.

दोन दिवसांनी—

सनिया रुपये घेऊन जमीनदारापाशी गेला. त्या दिवशी गोविंद प्रधानानं त्याच्या कामाकडे लक्ष दिलं नाही. संध्याकाळपर्यंत सनिया उपाशी बसून राहिला. संध्याकाळी प्रधान आला आणि म्हणाला, " बाळ, तुझं नशीबच वाईट आहे. तुझ्या वतीनं मी खूप सांगून पाहिलं. पण ते काही ऐकायलाच तयार नाहीत. म्हणतात, जमीन काही वाईट नाही. खरेदी करण्यासाठी लोक हल्ली येऊ लागले आहेत. तशीच पडून राहू देत. तिची किंमत आणखी वाढेल."

सनियावर जणू वज्रपातच झाला. त्याच्या स्वप्नांचा मनोरा पार कोसळला. धड-धडत्या हृदयानं विचारलं, " अहो, पण झालं काय ?"

" अरे असा घाबरू नकोस. जरा धीर धर. मला वाटतं, जमीनदाराला थोडे जास्त पैसे हवेत. दहा-पाच जास्त घेतले तर घेऊ देत. पण जमीन तर आपल्या हातात येईल. तुला काय वाटतं ?"

सनियानं मान डोलावली.

प्रधानानं पुन्हा म्हटलं, " बरं सनिया, शंभर रुपयांची व्यवस्था करता येईल का ?"

" मी तर बरोबरच घेऊन आलोय शंभर रुपये."

" वा ! फारच छान. मी जमीनदारबाबूंना पुन्हा समजावून बघतो. तू उद्या येऊन जमिनीचा पट्टा घेऊन जा. कळलं ?"

सनियानं शंभर रुपये प्रधानापुढे केले. पण मनातून तो अतिशय कष्टी झाला होता.

काय होणार आहे कुणास ठाऊक ? गोविंद प्रधान काय करणार आहेत ? उद्या खरंच पट्टा देतील की नाही ? सनियानं विश्वासानं शंभर रुपये प्रधानाच्या हवाली केले. आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा प्रधानापाशी गेला. पण प्रधान घरी नव्हता. शेतसारा वसूल करायला दुसऱ्या गावी गेला होता. सनिया परत आला. दिवसेंदिवस त्याची उत्कंठा वाढत गेली.

सनिया नेमानं प्रधानाच्या घरी जात होता. अखेर एक दिवस त्याची गाठ पडली. होळी जवळ आली होती. त्रयोदशी होती. जमीनदाराचं कार्यालय बंद होतं. इतर मंडळी रजेवर गेली होती. पण गोविंद प्रधान अत्यंत प्रामाणिक पडला ना ? तो जमीनदारापाशीच राहायचा.

सनियाला बघून प्रधानानं स्मित केलं. म्हणाला, " झालं रे तुझं काम सनिया ! आता आमच्या होळीचा खर्च देणार की नाही ?"

सनियानं सुटकेचा श्वास टाकला. म्हणाला, " प्रधानजी, सारं काही देईन हो ! आता काय मी आपली रयत आहे. आपल्या उपकारांचा डोंगर माझ्यावर आहे."

प्रधान मोठा खुषीत होता. कागदाचे तीन पट्टे त्यानं आतून आणून सनियाला दिले. म्हणाला, " धानाच्या दोन प्रकारच्या जमिनीसाठी दोन पट्टे, आणि तलावासाठी एक पट्टा—एकूण तीन पट्टे जमीनदारबाबूंनी दिले आहेत. पूर्वी जे लोक जमीन कसायचे ते जमीनदाराचा हिस्सा नीट देत नसत. तू मेहनत कर. जमीनदाराला खूष केलंस तर तूदेखील मोठा माणूस होशील. समजलास ?"

स्वर्गच गवसल्याचा आनंद सनियाला झाला. त्यानं कागदपत्र सांभाळून घेतले. प्रधानाला नमस्कार करून म्हटलं, " प्रधानजी, मी जन्मभर तुमचे उपकार विसरणार नाही."

प्रधानानं त्याच्या मस्तकावर हात ठेवून म्हटलं, " बरं, बरं. जा आता कामाला लाग."

जमीनदारबाबू सोंगट्या खेळत बसले असताना प्रधानानं अन्य कागदांबरोबरच हे तीन पट्टेदेखील त्यांच्याकडे पाठवून त्यावर त्यांच्या सह्या घेऊन ठेवल्या होत्या. सनियानं दिलेल्या रुपयांपैकी पैदेखील जमीनदाराला मिळाली नव्हती.

सनिया आनंदाने घरी परतला. जमीन उतरणीची असली म्हणून काय ? जमीन तर आहे ! सनियाने पाहिलं की आता तो जवळजवळ वीस एकर जमिनीचा मालक आहे. आता त्याला गावच्या इतर लोकांबरोबर बरोबरीच्या नात्याने ताठ मानेनं उभं राहता येईल. चिंतेई सोईना घाबरण्याचं आता काय कारण ?

सनियाला जमिनीची धुंदी चढली.

होळी आली आणि गेली. सनियाला पत्तासुद्धा लागला नाही. रात्रंदिवस त्याच्या मनात एकच विचार होता—नांगर चालवून जमीन सखल करायची, जास्तीत जास्त

धान जमवायचं. पैसा अडका जवळ बाळगणं कठीण आहे. पण या इतक्या विस्तृत जमिनीत एकट्यानं शेती करणं जमेल का त्याला ? जरूर पडली तर तो एक माणूस कामाला ठेवील.

सनियानं बैल विकत घेतले. धानाचा भुसा दुसऱ्या गावाहून घेऊन आला. शेतमजूर लावून आपलं काम सुरू केलं. आता कुठे गावकरी जागे झाले. " अरेच्या ! " लोक म्हणू लागले, " मामला काय आहे ? इतके पैसे सनियाला कुठून मिळाले ? महादेव-तलाव स्वच्छ करवून घेतोय, जमीनदाराची जमीन साफसूफ करून कुंपण घालतोय, आहे काय गडबड ?"

होळीनंतर सुमारे वीस दिवसांनी चंदरा भल्या पहाटे शेताकडे गेला होता. जमीन-दाराच्या ओस जमिनीत सनिया नांगर चालवताना त्याला दिसला. दोन मजूर माती वाहून नेत होते. पहाटेची वेळ असूनही सर्वांना घाम फुटला होता. चंदरानं विचारलं, " सनियादादा ! असा पहाटेच जमीनदाराची जमीन का खोदतो आहेस ?"

सनिया ताठ उभा राहिला. कपाळावरचा घाम निपटीत म्हणाला, " अरे बाबा, ही जमीन मी जमीनदाराकडून घेतली आहे. जमीन उतरणीची आहे ना ! हातभर खोदल्याखेरीज कामाची नाही. म्हणून खोदतोय झालं. यात वांगी लावीन. कळलं ?"

चंदरानं तलावाकडे नजर टाकली. वा ! किती स्वच्छ झाला आहे. तलावातला गाळ एकीकडे करण्यात आला होता. चंदरानं विचारलं, "हा तलावपण तू घेतला आहेस का ?"

माती खोदत खोदत सनियानं उत्तर दिलं, " होय दादा. जमीनदारबाबूंची मेहेरबानी आहे. मी विचार केला की तलावातला गाळ काढून वर टाकावा म्हणजे तलावाच्या बाजूला चांगली जमीन तयार होईल. मधला तलाव तेवढा मोकळा सोडीन. बाकी चारी बाजूला सपाट जमीन तयार होईल. गाळानं तयार झालेल्या या नव्या जमिनीत केळ्यांची बाग करीन. तुझ्या शेतातनं केळ्यांची काही रोपटी मिळतील ना ?"

चंदरानं म्हटलं, " अरे, आमच्या बागेतनं हवी तेवढी रोपं घेऊन जा. माझा बा तर केळ्यांची रोपं उपटून फेकतोय नुसता. तू फार छान केलंस सनियादादा ! या तलावाच्या जमिनीकडे अजून कुणाची नजर गेली नव्हती. नीट मेहनत केलीस तर या मातीतून सोनं मिळेल, सोनं !"

नायक घराण्याची सून धोबीची ख्याती नुसती दुर्गापूरलाच नव्हे तर आजूबाजूच्या पंचक्रोशीत पसरली होती. लोक स्तुतिसुमनांचा नुसता वर्षाव करीत होते. काही कुटाळ-खोर लोक तिला पूर्वी पांढऱ्या पायाची अवदसा म्हणायचे. ती घरात आली आणि घरचे सर्वजण मृत्युमुखी पडले असे म्हणून तिची निंदानालस्ती करायचे. पण आता मात्र ज्याच्या त्याच्या तोंडी तिची नुसती प्रशंसाच होती. आता लोक म्हणू लागले होते की धोबीच त्या घरची लक्ष्मी आहे. जगात कुणी अमर थोडीच आहे ? जो गोरगरिबांचं

दु:ख दूर करतो तो माणूस नाही, देव आहे. धोबी देवी आहे.

दुर्गापूरला आल्यावर धोबीनं आपल्या सासूसासऱ्यांचं व पतीचं श्राद्ध केलं. मग आपल्या मालमत्तेचे कागदपत्र पाहिले. सुरुवातीला हरी महांति मोठ्या उत्साहानं व आनंदानं कागदपत्र समजावून सांगायचे. पण त्यांचा हा आनंद फार दिवस टिकला नाही. त्यांना दिसून आलं की धोबी प्रत्येक कागद अतिशय काळजीपूर्वक तपासत आहे. तिला फसविणं शक्य नव्हतं. वय लहान असूनही तिची बुद्धी अतिशय तल्लख होती. जमीन व जमीनदारीविषयीचे सर्व कागदपत्र धोबीनं आपल्या ताब्यात घेतले. त्यामागचा तिचा हेतू काय होता, ते काही हरी महांतींना समजू शकले नाही. पण लवकरच वस्तुस्थिती त्यांच्यासमोर आली.

धोबीनं एक दिवस हरी महांतींना बोलावून म्हटलं, " काका ! गेल्या पाच वर्षांत ज्या ज्या लोकांना रुपये पैसे किंवा धान कर्जाऊ दिलंय त्यांची एक यादी तयार करून द्याल का ?"

हरी महांतींनी म्हटलं, " यादी तयार आहे. पण यादीनं काय होणार आहे बाळ ?"

" मला हवीय." धोबी म्हणाली.

हरी महांतीनी म्हटलं, " ठीक आहे. एकदोन दिवसांत नवी यादी तयार करून देतो."

हरी महांतीना कसलीशी शंका आली. चितेई सोईना निरोप पाठवावा असं त्यांना वाटू लागलं पण मग विचार केला, " त्यांना कशाला त्रास द्यायचा ? ही अठरा वर्षांची पोर तर आहे. काय करणार आहे ?"

यादी तयार झाली.

धोबीने पुन्हा एकदा हरी महांतींना बोलावून म्हटलं, " काका, या यादीत ज्यांची नावं आहेत ना त्या सर्वांना बोलावून घ्या. मला जरा त्या सर्वांशी बोलायचंय."

हैराण होऊन हरी महांतीनी म्हटलं, " ते सर्व थोडीच हयात आहेत ? दुष्काळात ते घरदार सोडून गेले. मेले असतील कुठे रस्त्याबिस्त्याच्या कडेला."

" पण काही जण तरी परतून आले असतीलच की ! ज्या घरातलं कुणी परत आलं असेल त्याला निरोप पाठवा. ज्या कुटुंबातलं कुणीही राहिलं नाही त्यांची एक वेगळी यादी तयार करा."

" पण कशासाठी हे सर्व, बाळ ?"

" हवंय मला."

धोबीच्या आवाजात कठोरपणा होता. दृढ निश्चय होता. हरी महांती घाबरले. खूप विचार करून त्यांनी पाच सहा जणांना निरोप धाडला.

एक दिवस धोबी बाहेरच्या बैठकीत येऊन बसली. याच बैठकीत बसून तिचे पती व

सासूसासरे वगैरे जमीनदारीचे व्यवहार पाहत असत. धोबीनं जोगिणीची वस्त्रे घातली होती. तिच्या मनात संकोच नव्हता की भय नव्हतं.

खूप लोक आले. धोबी त्यांच्याशी बोलली. त्यांच्या दुर्दैवाची विचारपूस केली. सर्वांनी हेच उत्तर दिले की दुष्काळामुळे निरुपायानं त्यांना घरादाराला, गावाला मुकावं लागलं होतं. भुकेची आग कुठवर सहन करणार ? जे घर सोडून गेले त्यांच्यापैकी बरेच लोक भुकेपायी मरण पावले होते. जे गावी परत आले होते, त्यांच्यापाशीही जगण्यासाठी काही साधन नव्हतं. हरी महांतीना आपापली जमीन विकून जे काही थोडेसे पैसे मिळाले होते त्यावर त्यांनी आपला जीव बचावला होता. आता ते दुसऱ्यांच्या घरी मजुरी करताहेत. स्वतःचं घरदार काही नाही. झाडाखाली झोपडी बांधून त्यात राहताहेत.

लोकांच्या या करुण कथा ऐकत असताना धोबीच्या नजरेसमोर सनियाचंच चित्र तरळून गेलं होतं. सनिया गरीब असला तरी या बाबतीत तो एकटा नाही. शेकडो लोक त्याच्यासारखेच आपापले प्राण बचावून परत आले आहेत. आपले पती, सासूसासरे यांना गमावून धोबीनं या सर्वांना प्राप्त केलं आहे. हे सर्व तिचे आत्मीयजन आहेत, नातलग आहेत. आपलं सारं सामर्थ्य एकवटून ती या लोकांच्या उपजीविकेचं साधन जुळवील. या लोकांपाशीही एके दिवशी सारं काही होतं. पण आज त्यांच्यापाशी काहीसुद्धा उरलेलं नाही. ते कफल्लक झाले आहेत. मानवसमाजात राहूनही आज त्यांना एकाकीपण जाणवत आहे. धोबी ही स्थिती फार काळ राहू देणार नाही. त्या लोकांच्या व्यथा दूर करायचा प्रयत्न ती करील.

धोबीचे डोळे भरून आले. आपल्या आईकडे तिनं बघितलं. म्हणाली, " आई बघ ग ! किती निराधार आहेत हे लोक ! देव यांच्यावर रागावला. कठोर झाला. पण आपण का जाणूनबुजून इतकं कठोर व्हायचं. आपणदेखील हाडामांसाची माणसंच आहोत. लाकूड वा दगड नाही. इतकी सर्व मालमत्ता घेऊन आपण काय करणार आहोत ? माझं हे टीचभर पोट. ते काय मला भरता येणार नाही ?"

धोबीची सूचना तिच्या आईला पटली. धोबीनं हरी महांतींना बोलावलं. म्हटलं, " जितक्या लोकांच्या जमिनी खरेदी केल्या आहेत त्या सर्व त्यांना परत द्या. कागदपत्रंपण देऊन टाका."

महांती स्तिमित झाले. काय चाललंय हे ? त्यांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. वाटलं, काही तरी करायलाच हवं. पण तक्रार तरी कुणापाशी करायची ? धोबी मालकीण होती. धोबीनं गावच्या ओझा, साहू, महापात्र, कांडी वगैरे सर्व लोकांना बोलावलं आणि कागदपत्रांवर आपली सही करून ते त्यांना परत दिले. म्हटलं, " आजपासून ही तुमची जमीन तुमच्या स्वतःच्या मालकीची झाली. शेतात राबा आणि

पोटभर खा. जरूर वाटली तर हरी महांतींच्याकडून आणखी धान घ्या. व्याजवीज काही द्यावं लागणार नाही. पीक काढल्यावर धान परत द्या म्हणजे झालं."

हरी महांती चकित होऊन बघत होते. सारं काही जमीनदोस्त होत असल्यासारखं त्यांना वाटत होतं. किती कष्टानं, चलाखीनं त्यांनी जमीन मिळवली होती. पण धोबी आज साऱ्याची धूळधाण उडवीत होती. पण ते तरी काय करणार त्याला ?

लोक साष्टांग नमस्कार घालीत होते. बोलत होते, " साक्षात देवीच अवतरली आहे. लक्ष्मी आई आली आहे. नाही तर गरिबांचं दुःख दुसऱ्या कुणाला समजणार आहे ?"

हां हां म्हणता चहूकडे बातमी पसरली की नायक घराण्याची सून सर्वांना त्यांच्या जमिनी परत देत आहे. ज्यांच्यापाशी अजिबात जमीन नाही त्या लोकांना पण जमीन देत आहे. निर्वाहासाठी थोडं धान पण देत आहे. खरंच, लोकांची परिस्थिती पाहून धोबी त्यांना जमीन, धान वगैरे देत होती. ज्या लोकांना जमिनी परत मिळाल्या ते अतिशय आनंदले. पण ज्या लोकांपाशी आपल्या जमिनी होत्या ते मात्र खवळले. धोबीची बदनामी करू लागले. धोबीला वेड लागलंय, घरची मालमत्ता फुंकून टाकायला उठलीय, वगैरे बोलू लागले.

सात दिवसांत सर्व जमीन ज्यांची त्यांना परत करण्यात आली. तरीदेखील धोबीच्या घरात माणसांची रीघ लागलेली होतीच. लोक नाना तऱ्हेच्या तक्रारी घेऊन येत होते. धोबी आपल्या मागण्या पुऱ्या करील अशी आशा त्यांना वाटत होती.

बातमी कळताच चितेई सोईदेखील आले. हरी महांतीकडून त्यांनी सारं ऐकून घेतलं. ते धोबीवर रागावले. पण धोबीनं त्यांना समजावलं, " बाबा, ज्यांची जमीन त्यांना परत दिली. आपलं काय गेलं त्यात ? माझ्या घरात तरी इतकं सर्व खाणारं कोण आहे ? माझ्या या टीचभर पोटासाठी इतकं सर्व घेऊन मला काय करायचंय ? ज्यांना त्यांना त्यांची जमीन मिळावी, त्यांनी सुखासमाधानात राहावं इतकंच मला वाटतं."

थोड्या दिवसांपूर्वीची तर घटना आहे. चितेई सोईंनी सनियाला त्याची जमीन परत दिली नव्हती. त्याला घरातून हाकलून दिलं होतं. त्याचा अपमान केला होता. धोबीची विनंती त्यांनी ऐकली नव्हती. चितेई सोईंना ते सर्व आठवलं. त्या दिवशी धोबीला धक्का बसला होता. धोबीनं त्याचंच उट्टं आज हे असं काढलं होतं.

चितेई सोई त्या दिवशी काही बोलले नाही. दुसऱ्या दिवशी त्यांनी आपल्या बायकोला बोलावून म्हटलं, " मालमत्तेचं इतकं नुकसान झालं त्याला जबाबदार कोण ? धोबी पोर आहे. तिला काय कळतं ? पण तू नको होतं का तिला समजावयाला ?"

धोबीच्या आईनं उत्तर दिलं, " पोर असली म्हणून काय झालं ? तिला खूप कळतं. चांगली हुशार आहे ती. इतकी धनसंपत्ती कुणासाठी ठेवायचीय ? कोण भोगणार आहे ? तुम्ही म्हणताय, ती दत्तक घेईल. पण दुसऱ्यांच्या मुलाचा काय भरवसा ? अजूनही माझं ऐका, एखादा चांगलासा मुलगा बघून तिचं लग्न लावून टाका."

" तिच्याही मनात आहे का ते ?"

" तिच्या मनात काय आहे, काय नाही, त्याच्याशी तुम्हाला काय करायचंय ? ती तुमच्या शब्दाबाहेर जात नाहीये, काही बोलत नाहीये. पण तिनं जर घर संसार थाटला नाही तर ही एवढी मालमत्ता कुणासाठी ठेवायचीय ? त्यापेक्षा गोरगरिबांना त्यांची जमीन परत मिळावी, त्यांनी सुखासमाधानात राहावं हेच अधिक इष्ट नाही का ?"

चितेई सोईंनी म्हटलं, " धोबीनं जर लग्न केलं तर या संपत्तीवर तिचा मुळीच हक्क राहणार नाही."

" तुम्हाला धोबीपेक्षा तिची संपत्ती प्रिय आहे. मला मात्र माझी लेक—धोबीच प्रिय आहे. तिनं सुखात नांदावं इतकीच माझी इच्छा आहे. एखाद्या अगदी सामान्य मजुरानं जरी तिचा हात धरला तरी तो तिला नांदवील. धनसंपत्ती असते तरी कशासाठी ? माणसाच्या सुखासाठीच ना ?"

चितेई सोईनी बोलणं वाढवलं नाही. त्याच दिवशी दुपारी हरी महांतीना बोलावून म्हटलं, "मेण्याची व्यवस्था करा. मायलेक दोघी उद्या सकाळी घरी परत जाणार आहेत."

रात्री—

चितेई सोईनी धोबीला बोलावलं. म्हटलं, " बाळ, आता फार दिवस इथं राहणं योग्य नव्हे. उद्या सकाळीच आपण निघू या."

धोबीनं उत्तर दिलं, " नाही बाबा. इथं आम्हाला कसलाही त्रास नाही. अजून बरीचशी कामं मला उरकायची आहेत. ती संपवल्याखेरीज मला इथून हलता येणार नाही."

" विष्णुपूरला राहिलीस तरी तुझी कामं काही अर्धवट राहायची नाहीत. हरी महांती सारं काही नीट सांभाळतील."

" पण मी काही जाणार नाही, बाबा."

" जाणार नाहीस ? अग पण तुझी आईदेखील जाणार आहे. तिकडे मुलांची आबाळ होतेय. तू एकटी इथं कशी राहशील ?"

" राहीन की. त्यात काय झालं ?"

" छे, छे, हे कसं शक्य आहे ? इथं खूप गैरसोयी आहेत."

" कसलीही गैरसोय नाही बाबा ! ही तर माझी कर्मभूमी आहे. बालपण तुमच्या मायेत आनंदानं गेलं. पण मोठी झाल्यावर याच घरात आले. याच घरात माझे सासू-

सासरे, पती आणि त्यांच्या सात पिढ्या नांदल्या होत्या. इथंच त्यांनी आयुष्यातील चढउतार, सुखदु:खं अनुभवली. इथंच दुसऱ्यांची सेवा करता करता माझे पती व सासरे या घरातून कायमचे निघून गेले. हे घर मला तीर्थक्षेत्रासारखं आहे. हे जगन्नाथाचं मंदिर आहे—मंदिर. याहून अधिक सुख मला दुसरीकडे कुठं मिळणार आहे ? ज्या जागी त्यांची जळून राख झाली, मीपण तिथंच राहीन. त्याच मातीत अखेरचा श्वास घेईन. त्यातच मला शांती मिळेल बाबा !''

धोबीचे डोळे भरून आले.

चिंतेई सोई थोडा वेळ गप्प राहिले. स्वत:च्याच मुलीच्या तोंडून हे असलं बोलणं ऐकून त्यांच्या हृदयात कालवाकालव झाली. त्यांना वाटलं, आपलं चुकलंच. आपली बायको सांगत होती तेच बरोबर होतं. धोबीचं लग्न झालं असतं तर तिच्या आयुष्यात असा भकासपणा आला नसता. पण मग मालमत्तेचं काय झालं असतं ? या कुटुंबातल्या एखाद्या मुलीनं किंवा लांबच्या एखाद्या वारसानं याचा कबजा घेतला असता. त्यातून सोई घराण्यातल्या मुलीनं वा विधवेनं पुनर्विवाह केला तर घराण्याची अब्रू काय राहणार आहे ? चिंतेई सोईंच्या मनात आलं, आपल्याला अगदी मेल्याहून मेल्यासारखं होईल. शरमेनं कुणाला तोंड दाखवायला जागा राहणार नाही. लोक तोंडावर काही बोलायचे नाहीत पण अपरोक्ष बोलल्याखेरीज, नावं ठेवल्याखेरीज राहतील होय ? काय तोंडाला येईल ते बोलत सुटतील. शिवाय धोबी थोर कुळातली मुलगी आहे—थोर कुळातली सून आहे. तिनं काय विधवा झाल्यावर दुसऱ्याच्या घरी जाऊन भाकऱ्या बडवायच्या होय ?

मनाच्या कमकुवतपणाला आवर घालत चिंतेई सोईनी म्हटलं, " तुझ्यापाशी संपत्ती भरपूर आहे. या संपत्तीवर कायम तुझा हक्क राहावा म्हणून तुला एक दत्तक घ्यावा लागेल. दत्तक घेतला नाही तर मेल्यावर पितरांना पाणी कोण देईल ?"

धोबीनं उसासा टाकला. किती कठोर होते तिचे बाबा ! तिनं वाद घातला नाही. धीरच झाला नाही. ती निमूटपणे उभी राहिली.

" का, गप्प का अशी ?"

चिंतेई सोई तिच्या उत्तराची वाट पाहत होते. परखडपणे चार गोष्टी त्यांना ऐकवाव्यात असं धोबीला वाटत होतं. म्हणे, नायक घराण्यातल्या पितरांना पाणी कोण देईल ? यांना का पितरांची इतकी काळजी वाटू लागलीय ? पितरांच्या पाण्याच्या बाबतीत यांना इतकी तळमळ वाटतेय. पण इतक्या गोरगरीब, दुर्दैवी लोकांची जमीन लुबाडून घेतली तेव्हा नाही काही वाटलं ? ते बिचारे लोक भुकेपायी गाव सोडून गेले, रस्त्याच्या कडेला पडल्या पडल्या मरून गेले. त्यांच्या कुटुंबात कुणीसुद्धा उरलं नाही. त्यांच्या पितरांना कोण पाणी देईल ?

थोड्या वेळानं धोबीनं म्हटलं, " इतकी काय घाई आहे ?"

" घाई करायलाच हवी बाळ ! परक्या पोराला माया लावणं इतकं काही सोपं नसतं. लहानपणापासूनच जवळ केला तर या घराण्याविषयी त्याला ओढ वाटू लागेल. माया वाटू लागेल. तुलादेखील त्याच्याविषयी जास्त माया वाटू लागेल. विदेई तुझा भाऊच आहे. दोघेही एकाच रक्ताचे आहात. दुसऱ्या कुणा बाहेरच्याला दत्तक घेतलं तर मायेची बंधनं व्हावी तशी दृढ व्हायची नाहीत. विदेईला जर तू दत्तक घेतलंस तर तुम्हा दोघांमध्ये अतूट बंधन निर्माण होईल बाळ !"

धोबी म्हणाली, " तुम्ही म्हणताय ते ठीक आहे. पण मला विचार करायला थोडी सवड द्या. पती, सासूसासरे गेल्यावर तुम्ही मला तुमच्या घरी घेऊन गेलात. त्यांच्यासाठी शोक करायलाही तुम्ही मला उसंत दिली नाही. त्यांची कामं अर्धवट राहिली आहेत. मला इथंच सोडून तुम्ही आईला घेऊन जा. ती जोवर माझ्यापाशी आहे तोवर मला दु:ख म्हणजे काय ते समजू शकणार नाही. बाबा, मला रडायला वेळच मिळत नाही. तुम्ही मला इथंच सोडून जा."

धोबीनं वडिलांच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला. तिच्या मस्तकावर हात ठेवून चिंतई सोई म्हणाले, " बाळ, इतकी का उद्विग्न होतेस ? सारं काही तुझ्या मनासारखं होईल. बरं ! मी तुझ्या आईला घेऊन जातो. तू राहा इथंच. पण नीट सांभाळून राहा. मालमत्ता उधळून टाकू नकोस. तिच्यावर नीट देखरेख ठेव. मालमत्ता जमवणं किती कठीण आहे ते तुला अजून ठाऊक नाही. जो मिळवतो त्यालाच ते ठाऊक असतं."

धोबीनं काहीच उत्तर दिलं नाही. तिला वाटलं, उपाशीतपाशी, तहानेल्या माणसाला जर खायलाप्यायला दिलं, ज्या लोकांच्या जमिनी हिसकावून घेतल्या आहेत त्या जर त्यांना परत दिल्या तर त्यामुळं मालमत्तेची नासाडी होत नसते. त्यानं जर कशाची नासाडी होत असेल तर तो म्हणजे माणसाचा गर्व, त्याचा रोष !

चिंतेई सोईनी म्हटलं, " तुला काय कमी आहे ? ज्याला जे द्यायचं होतं ते तू देऊन टाकलं आहेस. आता फार तर गोरगरीब, कंगाल, भिकाऱ्यांसाठी देवळात काहीतरी सोय करून टाक. रोज जो कुणी उपाशीतपाशी येईल त्याला देवळात खायलाप्यायला मिळेल अशी व्यवस्था करता येईल. तेवढं केलं म्हणजे झालं. बाकी जी धनसंपत्ती तुझ्यापाशी आहे त्याची नीट देखरेख ठेव."

काही वेळानं चिंतेई सोई पुन्हा म्हणाले, " धोबी, तू अजून लहान आहेस. अजून तुला माणसाची पारख नाही. माणूस दिसतो तितका सरळ नसतो. ज्याचं करावं भलं तो म्हणतो माझंच खरं अशी त्याची वृत्ती असते. कितीही उपकार केले तरी पाठीमागून वार करायला तो मागेपुढे पाहत नाही. आज तू ज्यांच्या जमिनी परत दिल्या आहेस तेच पुढे तुला नावं ठेवायला कमी करायचे नाहीत. तू जे काही केलंस ते शहाणपणाचं काम नव्हतं. तो एक शुद्ध वेडेपणा होता. तुझ्या या चांगल्या कृत्यासाठी लोक तुलाच

मूर्ख म्हणतील."

चिंतेई सोईचं बोलणं ऐकूनही धोबी गप्पच राहिली. आपण केलं तेच योग्य असल्याची तिची खात्री होती. त्यासाठी कुणी प्रशंसा करावी वा टीका करावी याची अपेक्षाही तिला नव्हती. नाही तरी तिला कोण नावं ठेवणार आहे ? चांगलं वा वाईट कृत्य करण्याची शक्ती माणसाच्या हाती नाही. ते तर देवाच्या हाती आहे. त्याची मर्जी असेल त्याप्रमाणे भलं किंवा बुरं होतं. तोच ते करू शकतो. माणूस काय करणार ? देवाचीच इच्छा पुरी होणार, दुसऱ्या कुणाची नाही, माणसानं देवावर भरवसा ठेवून लोकांची सेवा करीत राहावं. मानवाची सेवा हीच देवाची सेवा आहे. जो माणूस मानवाची सेवा करीत नाही तोच खरा नास्तिक आहे. त्यालाच देवाचा शाप भोगावा लागतो.

धोबी गप्प राहिली. थोड्या वेळानं चिंतेई सोई म्हणाले, " ठीक आहे. तुझा हट्टच आहे तर राहा तू इथं काही दिवस. मी तुझ्या आईला घेऊन जातो. हरी महांती इथं राहतील. ते चांगले अनुभवी वृद्ध गृहस्थ आहेत. आमचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यांना विचारल्याखेरीज तू काही करू नकोस. त्यांच्या सल्ल्यानंच वागत जा. विदेईला तुझ्यापाशी सोडून जावंसं मला वाटतं. तुझ्यापाशी त्याला बरं वाटतं. तुझा खूप लळा आहे त्याला. तुलादेखील त्याची छान सोबत राहील."

धोबीनं संमतीही दर्शविली नाही की नकारही दिला नाही.

अखेर चिंतेई सोईंनी आपल्या मनासारखंच केलं. पाच वर्षांच्या विदेईला धोबीपाशी सोडून ते निघून गेले.

पाच वर्षांचा पोर विदेई धोबीपाशी राहू लागला तेव्हा अगोदर काही धोबीला आनंद झाला नाही. आपण त्याला दत्तक घ्यावं म्हणून हा सर्व डाव आहे असं तिला वाटे. सुरुवाती सुरुवातीला तर तिला त्याचा रागच यायचा. पण या साऱ्या कारस्थानाची विदेईला थोडीच कल्पना होती ? तो एक निष्पाप पोर होता. त्याचा नाजूक चेहरा, हसरे डोळे, खटयाळपणा बघून मग मात्र धोबीचं मन विरघळू लागलं. आपलं चुकत असल्याचं तिला जाणवू लागलं. या निष्पाप मुलावर जळफळण्यात काय अर्थ ? त्यात त्याची काय चूक ? कितीही झालं तरी तो तिचा भाऊ आहे, तिचं व त्याचं रक्त एकच आहे. किती मुक्त आनंदानं खेळत असतो. हात जरा पुढे करताच पटकन् हसत धावत येतो आणि मांडीवर लोळण घेतो.

धोबी टक लावून विदेईकडे पाहायची. तिच्या नाजूक लाल ओठांवर स्मितरेखा तरळून जायची. ' आपा ' म्हणून विदेई जेव्हा तिच्या अवतीभवती बागडायचा तेव्हा धोबीला अस्मान ठेंगणं व्हायचं. विदेईला कडेवर उचलून ती त्याला उराशी घट्ट कवटाळून

धरायची. त्याचे मुके घ्यायची. त्याला खांद्यावर बसवून आनंदानं घरभर नाचायची. आणि त्याचबरोबर डोळ्यांतून अश्रूही गाळायची.

धोबीच्या एकाकीपणाचा एकमात्र आधार होता विदेई. तोच धोबीचा एकुलता मित्र होता. घर नोकराचाकरांनी भरलेलं असलं तरी विदेईची देखभाल, त्याची सारी कामं मात्र धोबी स्वतःच करायची. त्याला आपल्या हातांनी भरवायची, मांडीवर निजवायची, दिवसभर त्याला वेगवेगळे. तऱ्हेतऱ्हेचे कपडे घालून त्याचं रूप डोळ्यात साठवायची. मग त्याला उराशी धरून अतीव समाधानानं डोळे मिटून घ्यायची. बघता बघता ती स्वतःला विसरून जायची. हृदयात आत कुठं तरी खोलवर जाणवायची, आई व्हायची अतृप्त इच्छा ! तिची ही इच्छा विदेईला उराशी धरल्यानं क्षणभर तृप्त व्हायची.

हो, क्षणभरच फक्त !

पण मग ती पुन्हा दचकायची. तिचा ऊर धपापू लागायचा. जणू तिच्या आतून मातृत्वभावना आकांत करायची की निर्मिती करणं हाच तिचा हक्क आहे, सृजन हीच तिची नैसर्गिक इच्छा आहे.

विदेईला ती कडेवरून खाली ठेवायची. दूर करायची. त्याच्या खट्याळ नजरेला नजर भिडवून थोडा वेळ नुसती टक लावून बघत राहायची. मनात एक अज्ञात हुरहूर, शंका वाटू लागायची. लगेच ती देवघरात निघून जायची. दार लावून राधाकृष्णाच्या पायांवर डोकं ठेवून अश्रू ढाळायची.

धोबीला आपल्या पतीची आठवण व्हायची. त्यांच्या सान्निध्यात लज्जा, संकोच वगैरे सारं काही विसरून तिला स्वर्गसुखाचा आनंद व्हायचा. आई व्हायची नैसर्गिक अभिलाषा तिच्या मनात जागृत झाली होती. पण ते देवाघरी निघून गेले. आता तर त्यांच्या मृत्यूचं दुःखही कमी झालं होतं. आता तिला जाणवत होतं ते हेच की आपली आई व्हायची अभिलाषा अतृप्त राहिली आहे. हेच तिच्या मनीचं शल्य होतं. तेच तिला सारखं खुपत होतं. व्यथेमुळे ती तळमळायची आणि देवापुढं जाऊन अश्रूंना वाट करून द्यायची.

अंतर्मनात खोल धोबीला आठवायची—सनियाची गोष्ट ! गतकाळातले किती तरी प्रसंग डोळ्यांसमोर यायचे. शिवरात्रीच्या दिवशी त्या निर्जन खोलीत सनियानं तिला स्पर्श केला होता. त्या स्पर्शानं धोबीच्या हृदयाचा थरकाप झाला होता.

मनातल्या मनात धोबीला आपली चूक समजत होती. आणि त्यामुळंच तिला लाज वाटत होती. आपण सनियाच्या आशाआकांक्षा चाळवल्या, त्याच्यापुढं सोनेरी विश्व साकार केलं. त्या आशा या जन्मी पुऱ्या होणं अशक्य असल्याचं तिला ठाऊक होतं. त्याचाच खेद तिला व्हायचा. का केलं तिनं हे असं ? मनात हा विचार येताच ती अस्वस्थ व्हायची. अस्वस्थ झाल्यावर तिला फार वेळ खोलीत बसवत नसे. खोलीबाहेर

पडून ती हरी महांतींना बोलवायची.

"तलाव खोदायचं काम कुठवर आलं ?" धोबी हरी महांतींना विचारायची.

उत्तर द्यायच्या अगोदर हरी महांती तिच्या चेहऱ्याकडे दृष्टिक्षेप करीत. हिच्या मनात कसली शंका आहे याचा अदमास घेऊ पाहत पण काही अंदाज लागत नसे. म्हणत,

"काम चालू आहे."

"मजुरांच्या खाण्यापिण्याची नीट सोय केली आहे ना ?"

"होय बाळ. देवळात नवीन अन्नछत्र घातलंय. साऱ्या मजुरांना तिथंच जेवणखाण मिळतं. कुठलीही गैरसोय कुणाला होत नाही."

"मी स्वत: बघणार आहे."

धोबी आता घरचं कामकाज संपवून बाहेरची कामंपण बघू लागली. लोक काय बोलतील, काय अफवा पसरतील याकडे तिनं अजिबात लक्ष दिलं नाही. सकाळीच आपलं काम आवरून ती विदेईची देखभाल करायची. मग विदेईला गड्याहाती सोपवून ती घराबाहेर पडायची. घरोघरी जाऊन लोकांची विचारपूस करायची, गावात कुणी आजारी होतं तर कुणी भुकेलं. कित्येकांच्या घराच्या छपरांची अजून दुरुस्ती झालेली नव्हती. वास्तविक ती दरवर्षी व्हायला हवी होती. कुणाच्या हाती पैसे नसल्यानं त्यांच्या मुलींची लग्नं खोळंबली होती. धोबी सर्वांची विचारपूस करायची. याखेरीज तळ्यातला गाळ स्वच्छ करवणं, विहिरींची दुरुस्ती करवणं, गावातल्या चिखलभरल्या रस्त्यांची दुरुस्ती करवणं अशासारखी नानाप्रकारची कामं धोबीलाच करवून घ्यावी लागत.

अल्पावधीत धोबीनं गावच्या सर्वांना आपलंसं करून टाकलं. गावातले सर्व लोक तिला आपल्याच कुटुंबातले वाटत. कुणाचंही दु:ख तिला सहन होत नसे. गावकऱ्यांनाही धोबीबद्दल आपुलकी वाटू लागली. धोबीची प्रत्येक गोष्ट सर्वजण मान्य करू लागले. इतक्या लहान वयात इतकी बुद्धिमत्ता तिच्यात कुठून आली याचंच सर्वांना आश्चर्य वाटे.

धोबी निष्ठापूर्वक जीवन व्यतीत करीत होती. गोब्राह्मणांप्रती आदर, देवांविषयी भक्ती, जाति-धर्मानुसार सर्वांशी योग्य ती वर्तणूक या सर्व गोष्टींना ती आपले कर्तव्य समजायची. तिला वाटे, समाजात उच्चनीच, श्रीमंत, गरीब हा भेद राहायलाच हवा. नाही तर सनातन हिंदू धर्माचं वैशिष्ट्य ते काय राहील ? सर्व लोक समान झाले, सर्वजण सुखात राहू लागले तर लोक शास्त्रातला कर्मफलसिद्धान्त मानायचे नाहीत. आणि तो जर मानला नाही तर पाप-पुण्य, धर्म-अधर्म हा भेददेखील राहणार नाही. तसं झाल्यास समाज रसातळास जाईल. त्याचं अस्तित्वच संपुष्टात येईल.

धोबी पुराण वाचायची. उपाध्यायांकडून शास्त्रोपदेश ऐकायची. एखाद्या विधवेनं जसं नेमधर्मानं राहायला हवं तशीच राहायची. उदार मनानं, मुक्त हस्तानं सर्वांना मदत

करायची. सर्वांना आपलं समजायची.

चहूकडे धोबीची ख्याती पसरली होती. लोक म्हणू लागले, " धन्य आहे धोबी ! " पण हरी महांती मात्र या सर्व गोष्टीमुळे मनातून नाराज होते. अस्वस्थ होते. घरचे पैसे उगाच खर्च होताहेत, वाया जाताहेत, दौलतीला गळती लागली आहे असं त्यांना वाटत होतं. त्यांच्या दृष्टीनं धोबी अजून लहान पोर होती. पोरवय असल्यानं तिला सर्व गोष्टीचं आकलन होत नाही असं त्यांचं मत होतं. तरी पण धोबीला समजावण्याचं धैर्य काही त्यांच्यात नव्हतं. त्यांना ठाऊक होतं की जास्त काही समजावयाला गेलं तर धोबीला दु:ख होतं. ती रडू लागते आणि त्या समजावणीचा विपरीत परिणाम होऊन ती आणखीनच जोरात धनसंपत्ती उधळू लागते, तिचं मनोधैर्य वाढतं. धोबीला तर कधी कधी वाटे की सर्व गरीब मजुरांना बोलावून फुकटात त्यांना जमीन वाटून टाकावी. या सर्व गोष्टी पत्रातून चिंतेई सोईना कळविणंही त्यांना जमत नव्हतं, नाही तरी सोईजी काय करणार ? फार फार तर अकांड तांडव करतील नि स्वत:लाच चार शिव्या घालून गप्प राहतील. आजकालची पोरं मनात येईल तेच करतात, तसंच वागतात, कुणाचं ऐकतात थोडंच ?

हा सर्व विचार करून हरी महांती स्वस्थ बसले. त्यांनी कुणाला काही सांगितलं नाही.

एके दिवशी परियाची आई गावात आली. पुनीनं तिला बोलावून आपल्या भावाची, सनियाची चौकशी केली. परियाच्या आईकडून पुनीला माहिती मिळाली की सनियानं प्रायश्चित्त घेतलं असून तो पुन्हा जातीत दाखल झाला आहे. त्यानं घर बांधलंय, महादेवाच्या देवळापासची जमीनदाराची जमीन घेऊन तो शेती करतोय. त्याच्या घरी मजूर राबताहेत वगैरे वगैरे. तिचा सनियादादा आता सुखात आहे. सख्खी बहीण पुनी या गावात राहातेय पण तो कधी तिची विचारपूस करायला आला नाही.

परियाची आई निघून गेली. ती आपल्या सनियादादाविषयी आणि स्वत:विषयी विचार करू लागली. तिचा भाऊ हेतुपुरस्सरच तिला विसरला होता. खालच्या जातीत शिरणं आणि मरणं या दोन्ही गोष्टी समानच होत्या.

सनियाच्या लेखी पुनी मेली होती. सनिया चुकूनसुद्धा पुनीचं नाव घेत नसे. तिच्या बाबतीत कधी विचारसुद्धा करीत नसे. तर मग पुनीनं तरी का सनियाचा विचार करावा ? त्याला नुसतं ओझरतं का होईना बघण्यासाठी तळमळावं ? विष्णुपूरला जावंसं पुनीला फार फार वाटत होतं. आपल्या मनातलं तिनं मधुआपाशी बोलूनही दाखवलं होतं. मधुआनं तिला मज्जाव केला नव्हता. पण तिचंच पाऊल उचललं नव्हतं.

तिला मनातून भीती वाटत होती की, सनिया जर नीट बोललावागला नाही, विचार-पूस केली नाही तर काय करायचं ? गावचे लोकही कदाचित चौकशी करायचे, खोचून बोलायचे, " पुनी, तू अस्पृश्य बाउरीच्या घरी राहिलीस ? त्यापेक्षा जीव का नाही दिलास ? काय करावं ? कुणाला कसं तोंड दाखवावं ?

लोकांच्या निंदेपासून, उपहासापासून बचावण्यासाठी खरंच आत्महत्या करावी असंही कित्येकदा तिच्या मनात आलं. पण हा विचार मनात येताच तिचं हृदय धडधडू लागा-यचं. भीतीनं सर्वांगाला कंप सुटायचा. मधुआचा गोड चेहरा, त्याचं दणकट शरीर तिच्या नजरेसमोर तरळून जायचं.

मधुआला एकटं टाकून मरणं कसं शक्य आहे तिला ?

आणि आता तर मरणं शक्यही नव्हतं तिला. मधुआचा आत्मा तिच्या उदरात होता. आई व्हायची अभिलाषा तिच्या मनात फुलली होती. मधुआलादेखील हे ठाऊक होतं. आतुर होऊन तो पुनीकडे बघायचा. तिच्या नजरेला नजर भिडवायचा. लाजून पुनी मान खाली घालायची. मधुआ उत्सुक होऊन किती तरी प्रश्न विचारायचा. अगदी अडाण्यासारखा ! पुनी नुसती हसायची. काहीसुद्धा उत्तर नाही द्यायची.

हसत हसत पुनी मधुआच्या समोरून पळून जायची. मधुआ तिचा पाठलाग करायचा. पुनीचा पदर धरायचा. पुनी आत खोलीत शिरायची. खरंच, पुनी किती सुंदर दिसायची. हे सौंदर्य त्यानं अन्यत्र कधी पाहिलं नव्हतं. मधुआ वेळीअवेळी पुनीला पकडायचा आणि आपल्यापाशी ओढायचा.

मरायचा विचार पुनीने सोडून दिला होता.

धोबी दुर्गापूरला आली त्या दिवसापासून पुनीनं नायकांच्या घराकडे जायचं सोडून दिलं होतं. तिला अतिशय लाज वाटे. गावकऱ्यांच्या तोंडून तिने धोबीची प्रशंसा ऐकली होती. ती ऐकून तिचा जळफळाट झाला होता. चिंतेई सोईची मुलगी, तिची बालमैत्रीण धोबी आज लाखांची मालकीण आहे आणि ती...?

मधुआदेखील मालकिणीची प्रशंसा करायचा. पुनी सारं काही ऐकायची पण गप्प राहायची.

एके दिवशी मधुआनं धोबीला साष्टांग दंडवत घालून तिच्यापाशी दोन एकर जमीन मागितली होती. धोबीनं नकार दिला नव्हता. मधुआला जमीन मिळाली होती. शेती-साठी दोन बैलदेखील मिळाले होते. मधुआचं सुदैव बघून धोबीच्या घरचे दुसरे नोकर-चाकर स्तिमित झाले होते. म्हणाले होते, मधुआवर मालकिणीची खास मेहेरबानी आहे. मर्जी आहे, विश्वास आहे.

खरं होतं ते ! धोबीला मधुआ आवडायचा. त्याच्यावर विश्वास होता तिचा. ती म्हणायची, " मधुआ अस्पृश्य बाउरी जातीचा असला तरी त्याचं मन दृढ आहे. खंबीर

आहे. त्यात उमेद आहे. दया, धर्म नि प्रेम आहे. वाटेवर पडलेल्या एका मुलीला त्यानं आसरा दिला आहे. समाजाविरुद्ध वागून एका भिकारिणीला त्यानं जवळ केलं आहे. कुणाच्या उपहासाची पर्वा केली नाही की कुणाच्या धमकीला घाबरला नाही.

गरज लागली की धोबी मधुआला बोलवायची. म्हणायची, " अरे मधुआ, धर्मशाळेचं काम अर्धवटच राहणार की काय ? आणखी माणसं कामाला हवीत. कच्च्या विटा पडल्या आहेत. भट्टीत घातल्या नाहीत तर साऱ्या वाया जातील."

" आपण काळजी करू नका आईसाहेब ! मी सारं काही नीट करतो." मधुआ उत्तर द्यायचा.

मधुआच्या तोंडून ' आईसाहेब ' ऐकून धोबी दचकायची. मधुआ पुनीचा पती आहे. त्याचं बळकट शरीर—दणकट बाहू बघून धोबी क्षणभर मंत्रमुग्ध झाल्यासारखी होऊन जायची. नजर चुकवून मग ती इतर गोष्टी बोलायची.

मधुआ अतिशय कष्टाळू होता. ऊन असो, पाऊस असो—तो आपला कामात दंग असायचा. धोबीला हे ठाऊक होतं आणि त्यामुळेच ती त्याच्यावर खूषही असायची. विटांची भट्टी लावून झाली होती. धर्मशाळेवर छत घालून झालं होतं. धोबी नजर टाकायची तिथं तिला मधुआ काम करताना दिसायचा. त्याला आळस कसा तो माहीतच नव्हता. इतर मजुरांसारखा तो गप्पा मारण्यात उगाच वेळ वाया घालवत नसे. अगदी घामाघूम होईपर्यंत काम करायचा.

धोबीनं त्याला असाच घामाघूम झालेला पाहिलं. तो बिचारा अगदी दमून गेला असेल असं वाटून तिनं त्याला जवळ बोलावलं, " मधू, जरा इकडे ये बघू."

धोबी पुढे चालली होती आणि मधुआ तिच्या मागोमाग चालला होता. विदेई धोबीचा हात धरून धावत होता. धोबीनं मागं वळून पाहिलं आणि म्हटलं, " अरे मधू, सकाळपासून तू काही खाल्लेलं नाहीस." कपाळावरचा घाम पुसत मधुआनं म्हटलं, " सकाळी मी ' मांडिया ' (एक प्रकारचे विशिष्ट धान्य) ची भाकरी खाल्ली होती. काल रात्रीच ती करून ठेवली होती."

" बरं तर हे चार ' काकरे ' (तांदूळ, गूळ, तूप आणि नारळापासून बनवलेले मिष्टान्न) घे आणि खा." धोबीनं काकरे दिले.

धोबीच्या 'चार'चा अर्थ असतो निदान दहा बारा ! मधुआनं सर्व 'काकरे' धोतरात बांधून घेतले. पण तोंडात टाकायच्या अगोदर त्याला पुनीची आठवण झाली. मनात आलं, किती चवदार असतील हे काकरे ! पुनीला दिल्याखेरीज कसे खायचे ? पुनी घरी वाट पाहत असेल. मी जेवल्याखेरीज ती कधीही काही खात नाही. यावरून कितीदा तरी भांडण झालंय. पण वारंवार सांगूनही ती काही खात नाही आणि वाट पाहत राहते. " अरे मधू ! खा की. काकरे धोतरात का बांधून घेतलेस ?" धोबीनं

विचारलं. मधुआनं काही उत्तर दिलं नाही. लाजून मान खाली घातली फक्त !

" अरे खा की ! घरी न्यायचे आहेत ? अरे, आमच्या घरी आणखी नाहीत की काय ? तू हे खा. आणखीही देईन."

मधुआ खालच्या आवाजात म्हणाला, "आईसाहेब, अजून माझी आंघोळ झालेली नाही."

मधुआच्या मनातली गोष्ट धोबीला ठाऊक होती. मनात आलं, मधुआ खरंच सुखी आहे. तिनं मधुआला पुन्हा विचारलं, " अरे मधू, पुनी का नाही येत आमच्या घरी ? ती तर माझी बालमैत्रीण आहे. तिला एकदा घेऊन ये आमच्याकडे."

समाजाच्या कठोर नीतिनियमांची धोबीला भीती वाटायची म्हणूनच पुनीची अधिक चौकशी करायला ती धजत नसे. " मधू, किती गरीब आहेस रे तू. तुझ्यापाशी धड कपडे-सुद्धा नाहीत. एका फाटक्या धोतराशिवाय तुझ्या अंगावर दुसरा कपडा नाही." "खरंच मी अतिशय गरीब आहे आईसाहेब ! आपल्या घरून जी काही मजुरी मिळते त्यात धड पोट भरत नाही तर कपडा कुठून आणणार मी ?"

" बरं थांब जरा."

धोबी आतून एक धोतर आणि एक लुगडं घेऊन आली. म्हणाली, " घे, तुझ्यासाठी हे जुनं धोतर आणि हे जुनं लुगडं तुझ्या बायकोला दे. समजलं ?"

मधुआ उपकाराच्या ओझ्याखाली दबून गेला. इतका आनंदित झाला की त्यानं धोबीच्या पायांना हात लावीत म्हटलं, " आपण गरिबांची माय आहात आईसाहेब."

आणखी काही ऐकायची धोबीची इच्छा नव्हती. तिचे डोळे भरून आले. ती आत निघून गेली.

पण तिच्या या अशा वागण्यानं बाकीच्या नोकराचाकरांना मत्सर वाटायचा. ते काही जुने कपडे नव्हते. जुने म्हणून दिलेले ते कपडे अगदी नवे होते. अस्पृश्य बाउरी जातीच्या मधुआवर धोबीचा इतका जीव का ? लोकांना आश्चर्य वाटायचं. तऱ्हेतऱ्हेच्या अफवा पसरायच्या. लोकांना संशय वाटायचा. का म्हणून धोबी मधुआवर इतकी माया करते ? मधुआ एक तगडा जवान आहे म्हणूनच ना ?

मधुआ धावत घरी आला. पुनी त्याचीच वाट पाहत असल्याचं त्याला दिसलं.

मधुआला पाहून पुनी स्मित करायची. पण तिला मनापासून आनंद होत नसे. तिला ठाऊक होतं की धोबीनं त्याला जमीन दिली आहे, धान दिलं आहे, आणखीही कित्येक प्रकारे मदत केली आहे. तिच्या कुटुंबाचं दुःख निवारण करायचा प्रयत्न केला आहे. पण पुनीला त्याचा फारसा आनंद होत नसे. मधुआच्या तोंडून ती नेहमी धोबीची प्रशंसा ऐकायची. धोबीच्या मनात मधुआविषयी स्नेह असल्याचंही तिला ठाऊक होतं पण ही काय आनंदाची गोष्ट आहे ? पुनीला वाटायचं, मधुआला घेऊन दूर, अगदी दूर, जिथं

धोबीची सावलीसुद्धा पडणार नाही अशा जागी निघून जावं.

धोबीला या गावात येऊन खूप दिवस झाले होते. घरोघरी जाऊन तिनं लोकांच्या मुखदु:खाची विचारपूस केली होती. एके दिवशी ती बाउरी वस्तीतही आली होती. पण धोबीला बघताच पुनी घरात जाऊन लपली होती. घरची दारं तिनं लावून घेतली होती. लोकांनी सांगितलंही होतं—" हे मधुआचं घर." पण धोबीनं त्या घराकडे नुसतं पाहिलंही नव्हतं. ती पुढं चालू लागली होती.

दारातल्या भोकातून पुनीनं सारं पाहिलं होतं आणि अश्रू गाळले होते.

धोबीला काय पुनीविषयी काही माहीत नव्हतं ? होतं की ! सारं माहीत होतं. पण लोक नावं ठेवतील या भीतीनं म्हणा किंवा तिरस्कारानं म्हणा पण पुनीला भेटावंसं तिला वाटत नव्हतं आणि पुनी कशी जाणार धोबीला भेटायला ? आणि का म्हणून जाणार ? समजा गेली तरी तिला ओसरीखाली उभं राहून बोलावं लागेल. धोबीला 'आईसाहेब' म्हणून संबोधावं लागेल. हे सर्व करणं पुनीला कसं शक्य आहे ?

याच कारणामुळे मधुआनं हजारदा सांगितलं तरी पुनी धोबीच्या घरी गेली नव्हती. काही तरी निमित्त सांगून घरीच राहिली होती.

एके दिवशी मधुआनं तिची नानातऱ्हेनं समजूत घालून सांगितलं होतं, " पुनी, ते काही असो तू आईसाहेबांच्या घरी थोडा वेळ का होईना जायलाच हवं. आईसाहेबांना भेटून लगेच परत ये. त्या तर साक्षात लक्ष्मी आई आहेत."

पुनीच्या उरात जणू काय कुणी सुरा खुपसला. काही दिवसांमागची गोष्ट तिला आठवली. चिंतेई सोई खालच्या जातीचे होते. म्हणूनच पुनीच्या वडिलांनी आपल्या मुलाशी धोबीची सोयरीक करायला नकार दिला होता. धोबी नीच तर आहे. असं वाटतंय जणू कालचाच तर तो प्रसंग आहे.

त्याच धोबीसमोर पुनी एखाद्या मोलकरणीसारखी उभी राहणार ?

पुनीनं मधुआला काहीच उत्तर दिलं नाही. तिच्या मनात आलं, जगात कुणाचाही मोठेपणा कायम थोडीच टिकला आहे ? वेळ आली की जग बदलतं. पुनी ज्याच्या आसऱ्यावर जगत आहे त्या मधुआनं धोबीच्या पायांना हात लावून तिला नमस्कार केला होता. आता ती बनेई परिडाची मुलगी, सनियाची बहीण म्हणून जगत नाही आहे. ती आहे फक्त पुनी—रस्त्याकाठी मरू लागलेली. अस्पृश्य बाऊरी मधुआ तिला रस्त्यावरून उचलून आपल्या घरी घेऊन आला होता. त्या पुनीला आता कसला आला आहे मान ?

" हो !" पुनीनं ठरविलं, धोबीला भेटायला जायचं

ते ऐकून मधुआ आनंदला.

तीन वर्षांनंतर—

ही वेळ--वर्ष, महिना, दिवस, क्षण... केव्हा सुरू झाली होती आणि कधी संपणार आहे... देवाला ठाऊक !

खरंच काळाला आदी नसतो की अंत नसतो. मानवाची कल्पनादेखील तशीच असते —अनंत. या अनंत कल्पनेत किती तरी जण धुळीच्या कणांसारखे उडत असतात आणि कल्पनेच्या विस्तारात नाहीसे होऊन जातात. महाकालाच्या व्यापकतेत मानव संस्कृतीचा इतिहास हा जणू दोन दिवसांच्या गोष्टीसारखा असतो. या हिशेबानं पाहिल्यास तीन वर्षं म्हणजे काहीच नाहीत.

पण सनियासाठी ही तीन वर्षं काही कमी नव्हती. वर्षाचा प्रत्येक दिवस त्याला राबावं लागलं होतं. उन्हातान्हात, पावसापाण्यात शेतावर जावं लागलं होतं. कामापुढं त्यानं रात्र पाहिली नव्हती की दिवस ! रात्ररात्र जागून आंग मोडून कष्ट केले होते. गावात होळी, दसरा, रामनवमी, शिवरात्र वगैरे सारे सण मोठ्या धामधुमीत साजरे झाले होते. पण सनियानं वर्गणी फक्त दिली होती. बस्स ! लोकांच्या त्या आनंदोत्सवात भाग नव्हता घेतला. त्याचा सगळा वेळ फक्त शेतात राबण्यात आणि बैलांना खाऊपिऊ घालण्यात गेला होता.

सनियानं पंधरा वर्षांच्या एका अनाथ मुसलमान मुलाला आपल्या घरात थारा दिला होता. त्याचं नाव होतं रहीम. पटकीच्या साथीला बरेच लोक बळी पडले होते. रहीमच्या घरचंपण कुणी राहिलं नव्हतं. काठीच्या आधारे इकडे तिकडे जाऊन तो भीक मागायचा. त्याच्या दुबळ्या शरीराला सनियानंच नवजीवन दिलं होतं. आता रहीमच सनियाचा सर्वात विश्वासू, इमानदार चाकर झाला होता. रहीमच सनियाचा आधार व मित्र होता. विशु सामलदेखील सनियाचा शेतमजूर होता. दरवर्षी तो भत्ता घ्यायचा आणि अगदी प्रामाणिकपणे काम करायचा.

रहीम आणि विशूबरोबर सनियानं तीन वर्षं शेतात काम केलं होतं. याच लोकांच्या मदतीनं सनियानं महादेवाच्या देवळापासची जमीन साफसूफ केली होती, तयार केली होती. आता त्या जमिनीवर बाग आहे. बागेत केळी नेहमी तयार असायची. याखेरीज वांगी, बटाटे इत्यादी तऱ्हेतऱ्हेच्या भाज्यादेखील होत्या. भुईमूग आणि तंबाखूदेखील त्या जमिनीत पिकत होता. खालच्या बाजूच्या जमिनीत तो धानाचं पीक घेत होता. त्याच्या जमिनीत उत्तम प्रतीच्या धानाचं पीक यायचं. सनियाची जमीन, त्याची बाग बघून लोक थक्क व्हायचे. म्हणायचे, " सनिया मातीतून सोनं उगवतो." आता सनियापाशी दहाच्या जागी वीस एकर जमीन झाली होती.

पण इतका जमीनजुमला मिळवूनही सनियाच्या मनाला सुख नव्हतं. त्याला सारखं वाटे, करायचंय काय ही दौलत घेऊन ? जिच्यासाठी त्यानं हे सारं मिळवलं होतं ती कुठंय ? दुर्गापूरहून येणाऱ्या बऱ्याच लोकांच्या तोंडून सनियानं धोबीची प्रशंसा ऐकली होती. धोबीनं देऊळ बांधलं होतं, गोरगरीब, अनाथ लोकांसाठी आश्रम स्थापन केला होता. भुकेल्याला अन्न दिलं होतं आणि निराधाराला राहण्यासाठी जागा दिली होती. जे दुष्काळपीडित लोक परत येत होते त्यांना ती मदत करीत होती, अस्पृश्यांनाही मानानं वागवीत होती.

दुर्गापुरात बरेच दुष्काळग्रस्त लोक येऊन राहिले होते. या लोकांमध्ये जातीपातीचा भेदभाव राहिला नव्हता. ब्राह्मण, क्षत्रिय व हरिजन—सर्व एकाच जातीचे मानव बनले होते. लोक जरी त्यांच्याकडे हेटाळणीच्या दृष्टीनं बघत असले तरी धोबीला मात्र त्यांच्याविषयी अपार सहानुभूती वाटायची.

धोबी या लोकांना योग्य तो मान द्यायची. तरी त्यांच्यापासून दूर राहायची. तिच्या मते या लोकांचे देह अपवित्र झाले होते. ते हिंदू अवश्य होते पण अस्पृश्य झाले होते. धोबी स्वतः उच्च जातीच्या हिंदू घराची लेक होती. हिंदू घराचीच ती विधवा सून होती. विधवेनं जसं नेमधर्मानं राहायला हवं तसंच ती राहत होती.

हे सर्व ऐकून सनियाला खूप आनंद होत असे. एकदा जाऊन धोबीला भेटून यावं असं त्याला कधी कधी वाटे, पण तेवढा धीर मात्र होत नसे. लोक काय म्हणतील ? खुद्द चिंतेई सोईदेखील धोबीकडे संशयाच्या दृष्टीने पाहत असत. धोबीनं विदेईला दत्तक घेतलंय असंच ते जगासमोर सांगत; पण धोबी तर मनमानेल तसा पैसा खर्च करीत होती. धोबीचा हा वेडेपणा त्यांनी कुठवर सहन करायचा ?

धोबीला विष्णुपूरला परत आणायचा चिंतेई सोईनी अटोकाट प्रयत्न केल्याचं सनियाला ठाऊक होतं. आपल्या आईच्या उत्तरक्रियेच्या वेळी तिला आणण्यासाठी त्यांनी मेणा पाठवला होता पण धोबी आली नव्हती. तिनं कसल्याशा आजाराचं निमित्त पुढं केलं होतं. धोबी स्वतः जरी विष्णुपूरला आली नसली तरी क्रियेचा सर्व खर्च तिनंच केला होता. तिचे गुमास्ते हरी महांतींनीच सर्व जबाबदारी घेतली होती.

धोबीचं न येणं हे जणू जळवेच्या तोंडी मीठ पडण्यासारखं होतं. जळवेसारखं चिंतेई सोई तळमळत होते. पण त्यांना काही बोलता येत नव्हतं. बोलणार तरी काय ? एके दिवशी विदेईला आपल्याबरोबर घेऊन आले. धोबीनं प्रतिकार केला नाही. पण काही दिवसांनी चिंतेई सोईंनी विदेईला पुन्हा दुर्गापूरला पाठवून दिलं.

पितापुत्रीमध्ये बेबनाव झाल्याचं सनियाला ठाऊक होतं. दोघांचं आपसात पटत नव्हतं. चिंतेई सोईंना वाटायचं की धोबीला कसंही करून विष्णुपूरला आणता आलं तर सर्व संपत्ती आपल्या हाती येईल. त्यासाठी त्यांचे सतत प्रयत्न चालू होते. त्यांना

ठाऊक होतं की त्यांचं त्या दिवशीचं सनियाशी वागणं धोबीला अजिबात आवडलं नव्हतं. तिला ते फार लागलं होतं. म्हणून त्याच दिवसापासून तिनं बंड पुकारलं होतं. प्रहराजकडून सनियाला हे कळलं होतं.

याचा पुरावादेखील सनियाला मिळाला होता. वर्षापूर्वी एके दिवशी चिंतेई सोई सनियाच्या घरी आले होते. त्या दिवशी त्यांनी सनियाची खूप प्रशंसा केली होती. म्हटलं होतं, " अरे सनिया, तुझ्यापाशी आता बैल आहेत, नोकरचाकरदेखील आहेत. तुझ्या वडिलांनी जी जमीन मला विकून टाकली होती ती तू पुन्हा खंडानं घेऊन टाक."

सनियानं काही उत्तर दिलं नव्हतं. मनात आलं होतं, " सध्या जी जमीन माझ्यापाशी आहे, जिची नांगरट मी स्वतःच्या हातांनी केली आहे तीच कसायला, तिच्यात पीक घ्यायला माझ्यापाशी वेळ नाही; तर आणखी जमीन घेऊन मी काय करू ? पण हो, ती जमीन माझ्या पूर्वजांची आहे. विकणार असाल तर पैशांची व्यवस्था करून ती खरेदी करीन." आपल्या मनातली ही गोष्ट सनियानं चिंतेई सोईना सांगितलीही होती.

पण चिंतेई सोईंनी काही उत्तर दिलं नव्हतं.

आणखीही एका दिवशीची गोष्ट आहे. महादेवाच्या देवळाच्या अंगणात सनियाला पाहून प्रहराजसमोरच चिंतेई सोईंनी म्हटलं होतं, " अरे सनि, जरा स्वतःच्या वयाकडे तर बघ. वय वाढत चाललंय. आता लग्नबिग्न उरकून घे. सुदैवानं आता तुझं नशीब फळाला आलंय. आता कसली काळजी आलीय ? काय प्रहराजजी, मी म्हणतोय ते ठीक आहे ना ?"

सनियाच्या कल्याणाची इतकी तळमळ चिंतेई सोईना का लागली होती ? सनियाविषयी ते इतकी सहानुभूती का दाखवीत होते ? धोबीचं सनियावर प्रेम असल्याचं त्यांना ठाऊक होतं. सनियादेखील मनातलं कुणाला बोलून दाखवत नसला तरी त्याचंही धोबीवरच प्रेम होतं. या बाबतीत धोबीची आई चिंतेई सोईपाशी कितीदा तरी बोलली होती. पण चिंतेई सोईंनी तिच्या बोलण्याकडे लक्षच दिलं नव्हतं. मात्र त्यांचं अंतर्मन सदैव संशयग्रस्त असे. सनियाविषयी ते नेहमी चौकशी करीत असत. लोकांना विचारीत, " सनिया दुर्गापूरला जातो का ? दुर्गापूरहून कुणी कधी सनियाच्या घरी येतो का ?" चिंतेई सोईंनी ज्या लोकांना हे विचारलं होतं, त्यांनी दुसऱ्या लोकांना सांगून टाकलं होतं. गोष्ट षट्कर्णी झाली होती. सनियाच्यापण कानावर आली होती. तो सारं काही ऐकायचा.

सारं ऐकूनही सनिया गप्प राहायचा. दुर्गापूरला जाऊन धोबीला बघून यायचं खूप दिवसांपासून त्याच्या मनात होतं. पण मनातली ही अभिलाषा मनातच दडपून गेली होती. त्याला ठाऊक होतं की आपण जर दुर्गापूरला गेलो तर ते लपून राहणार नाही. अफवा पसरतील, लोक नावं ठेवतील. धोबी एक विधवा आहे. लोक तिच्याकडे कुचेष्टेनं

बघू लागतील. धोबीनं सनियाची घरधनीण व्हावं हे चिंतेई सोईंना कधी सहन होणार नाही. आपल्या वडिलांच्या इच्छेविरुद्ध वागून, दुर्गापूरची सर्व जमीन हातची घालवून धोबी काय सनियाशी लग्न लावील ? अशक्य !

शिवरात्रीचा प्रसंग सनियाला आठवला ! त्याच्या अंगावर रोमांच फुलला. डोळ्यां-समोर स्वप्ननगरीचं एक सुंदर चित्र तरळून गेलं. त्या दिवशी धोबी जणू त्या चित्रात सामील झाली होती. त्यानं तिला म्हटलंही होतं की हे घर तुझंच आहे. सनिया पण धोबीचा आहे आणि धोबी सनियाची आहे. लोक म्हणतात, लग्नाचं वय उलटून चाललंय. जाऊ देत. वेळ वा जागेच्या अंतरानं धोबी आणि सनियाच्या मनात काही अंतर निर्माण होणार नाही. ते दोघे एक आहेत आणि नेहमी एकच राहतील. त्यासाठी सनिया कष्ट करील, वाटही पाहील.

पण किती दिवस ? दुसऱ्याच क्षणी सनियाचं मन दडपून जायचं. मन दमून भागून गेलं होतं. दिवसेंदिवस शरीर शिथिल पडत असल्याचं जाणवू लागलं होतं. कशातच मन रमत नसे. खूप वाट पाहून झाली होती. आता आणखी वाट पाहणं शक्य नव्हतं. त्याच्या मनाला कुणाची तरी सोबत हवी होती.

त्यानं शेतांकडे नजर टाकली. दूर पाऊलवाटेवरून कित्येक बायका येताना दिसल्या. त्याचं मन बेचैन झालं. या घोळक्यात ती तर नाही ? टक लावून तो त्यांच्याकडे बघत राहिला. आंब्याच्या बागेकडून कसलासा गोड ध्वनी आला, बायकांचा आवाज. कुणी हसत होतं. सनियानं कान लावून ऐकायचा प्रयत्न केला.

सनिया तरुण होता. जगातली प्रत्येक मुलगी आपल्याला खेचतेय असं त्याला वाटायचं. छे, आता फार दम धरवणार नाही. त्याला सोबत हवीय. त्याला धोबी हवीय. तिच्या-साठी त्यानं घर बांधलं होतं, कष्ट केले होते, आणि आता जगतोय तेदेखील तिच्या-साठीच !

त्या दिवशी रामनवमी होती.

तुतारी वाजवून कुणी तरी जाहीर केलं होतं की आजच रामनवमीचं नाटक आणि रामलीला होणार आहे. प्रहराज 'विशी रामायण' वाचतील आणि लोक मुखवटे घालून नाचतील. परी दलाईचे दोघे मुलगे—चंवरा आणि भंवरा—राम आणि लक्ष्मणाची भूमिका करतील. बिनी कांडीचा मुलगा मंगलिया सीता होईल. निशी जेना रावण आणि माधव राउत बिभीषण होतील. गावकऱ्यांनी सनियाला हनुमान व्हायची विनंती केली होती. खुद्द चिंतेई सोईंनी निरोप पाठवला होता. पण सनियानं नकार दिला होता.

त्यानं वर्गणी देऊन टाकली होती. पण झोपेचं खोबरं करून गावच्या पाच लोकांसमोर रात्रभर नाचणं त्याला पसंत नव्हतं. सनियाने नकार दिला तेव्हा गावकरी खूप रागावले होते. चिंतेई सोईंनी त्यांना समजावलं होतं, " जरा सबूर करा. सनियाला स्वत: येऊन गावकऱ्यांच्या पाया पडावं लागेल अशी वेळही कधी येईलच की ! "

या गोष्टीचा पत्ता सनियाला लागला होता. गावकऱ्यांशी वैर करणं चांगलं नाही असं त्याच्या मनात आलं. लोक रागावले तर त्याला गावात राहणं कसं शक्य होईल ? त्यानं मनातल्या मनात ठरवून टाकलं की संध्याकाळी देवळात जाऊन मुखवटा लावून नाचायचं.

दुपार उलटल्यावर रहीम आला. सनियानं त्याला जवळ बोलावून म्हटलं, " ए, ऐकत का नाहीस ? इतक्या उन्हात घामाघूम होऊन माती खणायची काय जरूर ? ताप आला म्हणजे तुला तर त्रास होईलच पण आम्हालादेखील उगाच त्रास होईल."

रहीम मान खाली घालून उभा होता. सनियाखेरीज दुसरं कोण होतं रहीमला ? सनियाच रहीमचा मायबाप होता. रहीमची तब्येत बिघडली तर सनियाच त्याच्या उशापायथ्याशी बसून त्याला औषधपाणी द्यायचा–एखाद दिवशी रहीम जर कामावर जाऊ शकला नाही तर त्याच्याऐवजी सनिया स्वत:च पावसात भिजत जाऊन काम करून यायचा.

सनियानं म्हटलं, " बरं, जा तू आता. हातपाय धुऊन ये. मी तोवर तुझ्यासाठी 'परवाल' (पाण्यात भिजवलेले तांदूळ) वाढतो. रात्री स्वैपाक करायला नको. रात्री जरा हुशारीनं राहा. गाय, बैल, शेळ्या आणि घराकडे नजर ठेव. आज रामनवमी आहे. मी नाचायला जाईन. गावकऱ्यांनी निरोप पाठवला होता. गेलो नाही तर ते रागावतील."

रहीमने कपाळावरचा घाम पुसला. म्हणाला, " विशी काका बाजारातून आल्यावर काय जेवणार आहेत ? त्यांच्यासाठी थोडा भात राहू देत."

सनियाने घरच्या किल्ल्या रहीमला देत म्हटलं, " या त्यांना दे."

सनिया आपल्या हातांनी स्वैपाक करायचा. रहीम आल्यापासून त्याची दगदग जरा कमी झाली होती. पाण्याच्या माठाला किंवा पाण्याला रहीम हात लावत नसे. पण बाहेरची बरीचशी कामं मात्र तो उरकायचा. रहीम मुसलमान होता. पण अगदी सख्खा भाऊ असल्यासारखा तो घरात वावरायचा. सनियाची एका मुसलमान मुलावरची माया पाहून लोकांच्या मनात तऱ्हेतऱ्हेचे संशय निर्माण व्हायचे. पण सनियाची निष्ठा पाहून त्यांना काही बोलायचं धैर्य होत नसे.

सनिया निष्ठावान होता. नीतिनियमांनुसार वागणारा होता. रहीम त्याच्यापासून जरा दूर राहायचा. त्याला वाटायचं, सर्वांचे धर्म समान आहेत. ज्याला जे योग्य वाटतं,

मनाला पटतं, ते त्यानं करावं, सुखी राहावं. लोकांनी परस्परांविषयी सहनशीलतेची भावना दाखवायला हवी, ती सर्वांनी शिकायला हवी. एकाच घरातील लोकांनी जर परस्परांचा विचार केला नाही तर घरसंसार कसा सुरळीतपणे चालणार ? आणि जसं घर तसंच जग !

विष्णुपूरची रामनवमी पंचक्रोशीत विख्यात होती. प्रहराज चांगलं गायचे. मृदंग वाजवणारेदेखील कुशल होते. नाचणारी मंडळीही त्या कलेत वाकबगार होती. विष्णुपूरची रामनवमी बघून त्या इलाख्यातले सर्वजण मुग्ध होऊन जायचे. खुद्द चितेई सोईदेखील सढळ हातानं खर्च करायचे. नवनवीन पोशाख घालून आणि मुखवटे धारण करून नाचणारी मंडळी बाहेर पडली की बघणारे बघतच राहायचे. रावणाचा मंच तर खूपच उंच असायचा.

सायंकाळ होण्यापूर्वीच दुर्गापूरचे स्त्री-पुरुष घराबाहेर पडत. दोन प्रहर रात्र उलटल्यावर रामलीला सुरू व्हायची आणि झुजुमुंजू व्हायच्या सुमारास संपायची. पहाटे लोक आपापल्या घरी परत येत.

सनिया दररोज संध्याकाळी रामलीलेत भाग घ्यायचा. हनुमानाचा मुखवटा घालून तो नाचायचा. नाचता नाचता तो झाडाच्या फांद्या तोडू लागला की लोकांना खूप गंमत वाटायची. स्वत: चितेई सोईदेखील सनियाची प्रशंसा करायचे. सनियाखेरीज रामलीला रंगत नाही असं लोक बोलायचे. ते ऐकून सनियालादेखील आनंद व्हायचा. त्याला वाटायचं, आपणही या असंख्य गावकऱ्यांपैकीच एक आहोत. क्षणभर तो आपल्या व्यथा वेदना विसरायचा. पण घरी परतल्यावर मात्र त्याला एक प्रकारची विलक्षण हुरहूर, एकाकीपण ग्रासून टाकीत असे. आपण कुठल्याशा रानात, अज्ञातवासात असल्यासारखं त्याला वाटायचं.

तसं वाटू लागलं की त्याचे डोळे भरून यायचे. छातीत पोकळी निर्माण झाल्यासारखं जाणवायचं. जणू त्याचं अवघं आयुष्य नीरस, निरर्थक झालं असावं. तो इतके जिवापाड कष्ट करीत होता, पण कुणासाठी ? कुणासाठी त्यानं घर बांधलं होतं ? हा जमीनजुमला, घरदार कुणाला मिळणार होतं ?

सनियानं ठरवलं, जायचं, जाऊन पुन्हा एकदा धोबीला विचारायचं. तिला स्पष्ट सांगून टाकायचं, की रक्त ओकून त्यानं जी जमीन मिळवली आहे ती सर्व धोबीसाठी आहे. हो, तो जाणार. नक्कीच जाणार. पण मन जरी असा निश्चय करीत असलं तरी पुन्हा विचार यायचा की लोक काय म्हणतील ? त्याचे पाय उचलत नसत.

त्याला विमनस्क पाहून रहीम विचारायचा, "सनियादादा, काय झालं ? कसलं दु:ख आहे तुम्हाला ?"

सनिया नुसता उदासपणे हसायचा. उत्तर द्यायचा नाही.

एकदा रहीमनं म्हटलं, "सनियादादा, तुम्ही लग्न का नाही करीत ? बघा ना, कामाचा व्याप किती वाढलाय—वहिनी आली म्हणजे ती घरचं काम सांभाळील. स्वैपाक करील, ही किल्लीदेखील नीट सांभाळून ठेवील. मला किल्ली सांभाळता येत नाही. हरवली तर...?"

सूर्य वर चढत होता.

सनिया रहीमच्या सुंदर चेहऱ्याकडे पाहत होता. मनात आलं, गावचे लोक बोलताहेत ते खरंच आहे. हा कालचा पोर रहीम, हादेखील तेच सांगतोय, माझ्याविषयी सर्वांना हेच वाटतं का ?

सनियानं हसत म्हटलं, "तुला इथं खाण्यापिण्याचा कसला त्रास तर नाही ना ? बरं, तुझ्यासाठी आम्ही एक छोटीशी नवरी शोधून काढतो. तू अगोदर लग्न करून घे. काय चालेल ना ?"

रहीम लाजला. म्हणाला, "मी माझ्याविषयी थोडंच सांगत होतो ? मी तर तुमच्या लग्नाविषयी बोलत होतो. आणखी किती दिवस ही दगदग करणार ? स्वतःच्याच हातांनी शिजवून खाणार ? सांगा ना ?"

सनियानं म्हटलं, "ठीक आहे. आपण खंडायत जातीच्या एका पोऱ्याला स्वैपाकासाठी ठेवून घेऊ."

रहीम गप्प राहिला.

परी दलेईची हाक येत होती, "सनिया, घरी आहेस का ?"

सनिया घराबाहेर आला. विचारलं, "काय आहे परी काका ?"

"प्रहराजनी निरोप पाठवलाय की आज रामलीला लवकर सुरू होणार आहे. 'लक्ष्मण मूर्च्छा' हा विषय आहे. आज जोवर लक्ष्मण जिवंत होत नाही तोवर रामलीला संपणार नाही. म्हणून तू कपडे वगैरे घालून अगोदरच तयार राहायला हवंय. आजची खाण्यापिण्याची सोय चिंतेई सोईंनी केली आहे. रामलीला चालू असताना लोकांना खातापिताही येईल. मध्यरात्री खाण्यापिण्याचा कार्यक्रम सुरू होईल."

थोडं थांबून परी दलेईनं पुढं म्हटलं, "मांडवात निधी सोईं बसले आहेत. तुला बोलावलंय. गावकरी आपापल्या ऐपतीप्रमाणं या कार्यक्रमासाठी वर्गणी देणार आहेत."

परी दलेईचं बोलणं पुरं व्हायच्या आत तुतारी वाजली. गावकऱ्यांना बोलावलंय, सर्वांनी देवळात यावं, आज सभा होईल याची ती खूण होती.

सनिया परी दलेईबरोबर निघाला.

देवळाजवळ मांडवात प्रहराज, चिंतेई सोईं, निधी सोईं आणि अन्य गावकरी मंडळी

बसली होती. सनिया गावकऱ्यांपाशी बसला. तीन वर्षांपूर्वी लोकांनी त्याला अस्पृश्य म्हणून ज्या जागी बसवलं होतं व त्याची अवहेलना केली होती नेमक्या त्याच जागी सनिया बसला.

प्रहराज एक कागद घेऊन बसले होते. कुणी किती वर्गणी द्यायची ते सर्व टिपून ठेवलं जात असे. चिंतेई सोईनी दोन रुपये द्यायचे. प्रहराजनी एक रुपया द्यायचा. बाकीच्या कुणी काय द्यायचं ते अजून ठरलं नव्हतं. वाद चालू होता. आपले दारिद्र्य, असहाय्यता लक्षात घेऊन वर्गणी आठ आण्यावरून चार आण्यावर आणावी अशी विनंती लोक करीत होते.

निधी सोईनी सनियाला म्हटलं, " पंगतीसाठी तू एक रुपया वर्गणी द्यावीस अशी सर्वांची इच्छा आहे. एकाच दिवसाचा तर प्रश्न आहे. तुझं काय मत आहे. चालेल ना ?"

निधी सोई मोठ्या आनंदात होते. सनियाने त्यांना म्हटलं, " निधी काका, मी काही बोलू ? आज लक्ष्मण–मूर्च्छेचा विषय आहे ना ? पण त्याच वेळी जर खाणंपिणं सुरू झालं तर लोकांची गैरसोय नाही का होणार ? खाणंपिणं दोन चार दिवसानंतर केलं तर बरं राहील. नाही तर लक्ष्मण–मूर्छेचा खेळ आज बंद ठेवा. दोन्ही कार्यक्रम एकाच वेळी ठेवणं ठीक नाही राहणार."

चिंतेई सोईनी म्हटलं, " सनियाचं सांगणं खरं आहे. पण जेवणासाठी दुसऱ्या गावच्या लोकांना आमंत्रण गेलं आहे. म्हणून जेवणाचा कार्यक्रम काही रद्द करता यायचा नाही. त्याऐवजी आज नाटक बंद ठेवा. नंतर एखादा चांगलासा दिवस पाहून पुन्हा सुरू करता येईल."

प्रहराजनी म्हटलं, " काल रात्री तुतारी फुंकून जाहीर केलं होतं की आज लक्ष्मण–मूर्च्छेचा खेळ होणार आहे. दूरदूरहून बायाबापड्या येतील. त्या सर्व निराश होऊन जातील. म्हणून आज जेवणाचा बेत रद्द व्हायला हवा."

निधी सोईनी म्हटलं, " दुर्गापूरहून बरेच लोक येताहेत असं ऐकलंय. धोबीदेखील येतेय. तीपण परत जाणार काय ?"

सनिया चमकला. चिंतेई सोईदेखील चपापले. विचारलं, " काय परत जाणार ?" निधींनी म्हटलं, " मला तरी मधु भोईनं हीच बातमी दिली होती. तुम्ही घरात होता. तुम्हाला सांगायचं राहूनच गेलं. पण वहिनीला सांगितलं होतं. धोबी रामलीला पाहायला इकडेच येणार आहे. थोडा वेळ घरीसुद्धा येऊन जाणार आहे. मग दुर्गापूरला परत जाईल."

चिंतेई सोई गंभीर झाले. सनिया उत्कंठित झाला.

उदी साहूनं म्हटलं, " तर जेवणावळ आणि रामलीला दोन्ही होऊन जाऊ देत. कुणी किती वर्गणी द्यायची ते प्रहराजजी सांगतील. नुसता विचार करण्यात असा वेळ

घालवला तर संध्याकाळ होऊन जाईल."

सनियानं म्हटलं, " वर्गणी गोळा करायची असेल तर आत्तापासूनच सुरुवात करा. संध्याकाळी पंगती उठायला लागतील. थोड्या वेळानं रामलीलादेखील सुरू होईल."

बागी कांडी म्हणाला, " अरे बाबा, वर्गणी गोळा करता करता दुपार उलटेल. संध्याकाळ व्हायच्या आत जेवणावळ कशी उरकणार ?"

सनिया उठून उभा राहिला. हात जोडून गावकऱ्यांना म्हणाला, " वर्गणीची काळजी आता तुम्ही सोडा. ते मी माझ्यावर घेतो. देवाचिये दारी गावजेवण होणार. गावकरी जेवणार. मी गरीब असलो म्हणून काय झालं ? एवढी जबाबदारीही मला घेता येणार नाही का ? बाकीचे सर्वजण कुटुंबवत्सल आहेत. त्यांना बायकापोरं आहेत. त्यांची जबाबदारीही जास्त आहे. मी सडा आहे. माझ्यावर कसली आलीय जबाबदारी ? गावकऱ्यांची परवानगी असेल तर जेवणावळीचा जो काही खर्च होईल तो द्यायला मी तयार आहे. निधीकाकांनी त्याची व्यवस्था करावी. मी जे घर बांधलं आहे ते त्यांचंच आहे, माझं नाही. सामानसुमान जे काही हवं असेल ते माणसं धाडून माझ्या घरून मागवून घ्यावं."

सर्वजण आश्चर्यचकित झाले. थोडा वेळ कुणाच्याही तोंडून शब्दच उमटला नाही. जणू सनियाच्या बोलण्यावर त्यांचा विश्वासच बसत नव्हता. चिंतेई सोईंदेखील अवाक झाले. त्यांना वाटलं, सनिया सूडच घेतोय. तो जणू हात जोडून उभा नसून चिंतेईच्या मुस्काटात लगावतोय. जणू चिंतेईचा सर्व अभिमान, दबदबा त्यानं पायदळी तुडवला असावा. बनेई परिडानं ज्या दिवशी सनियाशी धोबीचं लग्न लावायला नकार दिला होता त्या दिवशीदेखील ते आजच्या इतके अपमानित झाले नव्हते.

चिंतेई सोई लक्षाधीश होते. एका टोकाला उभं राहिलं तर दुसरं टोक दिसू नये इतकी विस्तृत जमीन त्यांच्यापाशी होती. त्यांचं बरंचसं धान तर शेतात नाही तर खळ्यातच वाया जात होतं आणि त्याचा त्यांना स्वत:लादेखील पत्ता लागत नसे. विष्णुपूर गावचे कर्तुमकर्तुम तेच होते. पण दुष्काळातून वाचलेल्या एका कंगालासमोर आज त्यांची मान खाली झाली होती. जणू कुणीतरी त्यांच्या मनात ओरडून सांगत होतं, " अरे मूर्खा, बघ तरी, किती थोर आहे तो ! ज्याचं हृदय विशाल आहे तो मग दरिद्री, कमनशिबी वा असाहाय्य का असेना."

गावकऱ्यांनी ' हरिबोल 'चा गजर सुरू केला होता. तुतारीदेखील फुंकली होती. सर्वांनीच सनियाची प्रशंसा केली. जणू सनियाच्या प्रशंसेनं गावचं वातावरणच थरारून गेलं, भारून गेलं. निधींनी सनियाचा हात धरून म्हटलं, " गावकऱ्यांना तुझं म्हणणं मान्य आहे. आता तू पुढच्या व्यवस्थेला लाग."

" ती तुम्हीच करायला हवी." सनियानं म्हटलं.

" अरे व्यवस्थेचं काय एवढं मोठंसं ? होईल ती." प्रहराजनी म्हटलं, " परीला म्हणावं, तुझं मोठं जाळं घेऊन ये. बघू या तरी सनियानं त्याच्या नव्या तलावात किती मासे पाळले आहेत."

लोकांनी पुन्हा एकदा ' हरिबोल 'चा गजर केला.

जखमी वाघासारखे चितेई सोई गरजले, " देवा देवा, इतका आरडाओरडा का लावलाय ? अरे परी, जा जाळं घेऊन ये. मीदेखील तुझ्याबरोबर येणार आहे."

त्यांच्या ओठांवर जहरी स्मिताची एक बारीकशी रेषा होती...

धोबी आली. बरोबर विदेईलापण घेऊन आली.

रामनवमीचा उत्सव मोठ्या धामधुमीत साजरा झाला. लक्ष्मण–मूर्च्छेचं नाटकदेखील छान रंगलं. जेवणावळीचा खर्च सनियानंच दिला. गावच्या आबालवृद्ध सर्वांनीच मिटक्या मारीत पोट भरून खाल्लं आणि मग मोठ्या उत्साहानं रामलीला बघितली.

लक्ष्मण-मूर्छेचं नाटक चालू असताना लोक उत्कंठेनं प्रत्येक गोष्ट नीट लक्षपूर्वक ऐकत होते. लक्ष्मण बेशुद्ध होताच कित्येकांच्या डोळ्यांना धारा लागल्या. कित्येक बायका तर अगदी हमसून हमसून रडू लागल्या. नंतर जेव्हा हनुमानानं गंधमादन पर्वतावरून औषधी वनस्पती आणून दिली आणि लक्ष्मण शुद्धीवर आला तेव्हा लोकांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यांना आनंदाचं भरतं आलं आणि त्यांनी पुन्हा पुन्हा 'हरिबोल'चा गजर केला.

चौथऱ्यावर बसून धोबी नाटक पाहत होती. पाहत असताना कितीदा तरी तिनंही डोळे टिपले. धोबीला पत्ताच नव्हता की आपण येणार असल्याची बातमी ऐकून सनियाला किती आनंद झाला होता. जेवणाचा सारा खर्च त्यानंच दिला होता. धोबीच्या उपस्थितीमुळं सनियाच्या मनात नवा जोम संचारला होता. हनुमानाचा मुखवटा चढवून, मोठ्या उत्साहानं उड्या मारून त्यानं अभिनय केला.

रामलीला संपल्यावर, आई व काकूच्या अत्याग्रहामुळं धोबी घरी आली होती. सनियानंदेखील हनुमानाचा मुखवटा काढून टाकला होता आणि जड अंतःकरणाने आपल्या घरी निघून गेला होता. घरच्या ओसरीवर बसून रहीम त्याची वाट पाहत होता.

दोन दिवसांनी धोबी दुर्गापूरला परत निघून गेली. विष्णुपूरला असताना ती एकेकदा सर्वांच्या घरी गेली होती, पण सनियाच्या घरी मात्र नव्हती गेली. सनिया व्याकुळ होऊन तिची वाट पाहत होता. पण ती आली नाही. तेव्हा मात्र त्याच्या काळजावरच घाव बसला होता. जणू त्याचं चैतन्य त्याच्या शरीरातून बाहेर पडून धोबीच्या पाठो-

पाठ धावत गेलं असावं. सारं जग त्याला निर्जन वाटू लागलं होतं. त्याचा सर्व आनंद, उत्साह नाहीसा झाला होता. कोणत्याही कामात त्याला गोडी वाटेनाशी झाली होती.

त्याच्या औदासीन्याचं कारण रहीमला समजू शकलं नाही. त्यानं विचारलं, " सनिया दादा ! तुमची तब्येत बरी नाही का ?"

सनिया हसला. म्हणाला, " अरे वेड्या ! तुला नाही ते कळायचं..."

रहीम टक लावून त्याच्याकडे पाहत होता. जणू तो काही तरी विचारीत होता...

सावित्री अमावस्या होती.

पुनीनं उपास केला होता. बायका मोठ्या निष्ठेनं हे व्रत पाळायच्या. पुनीला हे ठाऊक होतं. आपल्या मधुआसाठी तिनं अतिशय श्रद्धा व भक्तिपूर्वक व्रत केलं होतं. मधुआनं तिला आधार दिला होता. नवजीवन दिलं होतं. तिच्या मांडीवर तीन वर्षांचं एक बाळही दिलं होतं. ती ज्या ज्या वेळी बाळाकडे नीट लक्षपूर्वक पाहायची त्या त्या वेळी तिला आपल्या वडिलांची आठवण व्हायची. बाळाचा चेहरा तिचे वडील बनेई परिडा यांच्यासारखा होता. बाळाचं नाव तिनं बनेईच ठेवलं होतं. जणू तिच्या वडिलांनीच तिच्या बाळाच्या रूपात पुन्हा जन्म घेतला होता.

सायंकाळ झाली. आभाळ मेघांनी गच्च भरून आलं. सोसाट्याचा वारा सुटला. मधुआ अजून कामावरून घरी परतला नव्हता. तसं पाहिलं तर रोजच उशीर व्हायचा. पण पुनीला कधी भीती वाटत नसे कारण धोबीची मधुआवर माया असल्याचं तिला ठाऊक होतं. धोबी कधीही त्याला अति कष्टाचं काम देत नसे. पण आज का कुणास ठाऊक ती अतिशय आतुरतेने मधुआची वाट पाहात होती. मानवी मनच मोठं विचित्र आहे. मन चिंती ते वैरी न चिंती. ज्याच्यावर सर्वात जास्त प्रेम असतं त्याच्याचविषयी नाही नाही त्या अमंगल कल्पना मनात डोकावून जातात.

पणती पेटवून बाळाला कडेवर घेऊन पुनी मधुआची वाट पाहत होती. धाडदिशी दार ढकलून कुणी तरी आत शिरलं. अरे हा तर मधुआ आहे ! पुनी आनंदली. मधुआ-पण खुशीत होता. पुनीसमोर एक नवीन लुगडे ठेवीत तो म्हणाला, " बघ, आई-साहेबांनी तुझ्यासाठी पाठवलं आहे. आज कुठलंसं व्रत असल्याचं सांगत होत्या. तुझी फार आठवण करीत होत्या. तू गेली का नाहीस ?"

पुनी दररोज जायची. धोबीशी गप्पा मारून परत यायची. पण धोबीनं तिला कधी काही दिलं नव्हतं. तिला काही द्यावंसं वाटलं की ती ते मधुआच्या हाती धाडून द्यायची. घरात आणखी मोलकरणीही होत्या. त्यांच्यापासून लपवून धोबी पुनीसाठी वस्तू पाठवायची. तरीपण ते लपून राहत नसे. कोणत्या ना कोणत्या मार्गानं गावच्या

बायकांच्या कानांवर जायचंच. पुनीने जर एखादा नवा दागिना घातला तर बायका लगेच चौकशी करायच्या, " काय ग कुणी दिलं हे ?"

कित्येक बायकांना तर पुनीचा मत्सरच वाटायचा. त्या मुक्ताफळं उधळायच्या— दारी दोन बैल बांधायची काय मधुआची ऐपत आहे होय ? त्याला काय नवं घर बांधता येणं शक्य आहे ? रस्त्यावरून उचलून आणलेल्या पुनीसाठी नवं लुगडं खरेदी करणं तरी काय त्याच्या आवाक्यात आहे ? हे सर्व आज होतंय ते कुणामुळं ? या मधुआमुळं ? त्याला ना कुणी नात्याचं ना गोत्याचं ! खरं कारण दुसरंच आहे...

काही बायका शब्दानं शब्द वाढवण्यात वस्ताद असतात. त्यांपैकी काहीजणी पुनीची बाजू घेऊन तिला म्हणायच्या, " पुनी, तू का नाही सांगून टाकत की तूदेखील मिळवतेस. सांगून टाक बघू की मधुआ काही माझा एकटीचा नाही. दुसरे जणही आहेत...कुणी काय दिलं ते मी थोडीच लक्षात ठेवलंय ? सांगून टाक ना...

पण या बायकांपैकी काही जणी पुनीला चांगलं ओळखत होत्या. त्या म्हणायच्या, " पुनी, दुष्काळाच्या कचाट्यातून सुटून आली असली तरी मोकळ्या मनाची आहे. तिच्या मनात कसलंही कपट नाही. या सर्व वस्तू मधुआनंच तिला दिल्या आहेत. मधुआ या सर्व वस्तू कुठून आणून देतो ते पुनीलाही ठाऊक आहे. पण मूर्ख आहे ना ! साधं इतकंही विचारायचं धाडस नाही की या सर्व वस्तू तुम्ही कुठून आणता ? का म्हणून ती तुम्हाला इतकं सामान देते ?"

हे सर्व ऐकून पुनी दचकायची.

बायका आणखीही बोलायच्या, " आईसाहेबांच्या घरी किती तरी नोकरचाकर आहेत. पण मधु भाईवर त्यांची जास्त माया आहे. बाकीचे लोक कामकाज आटोपून संध्याकाळीच घरी परततात. पण मधुआ मात्र मध्यरात्री येतो. खरं ना पुनी ?"

पुनी वाघासारखी गरजायची, " तो कधी घरी येतो, कधी नाही त्याच्याशी तुम्हाला काय करायचंय ? तुम्हाला वाटल्यास तुम्ही पण कमवा. तुम्हाला थोडीच कुणी मनाई केली आहे की तुमचा कुणी हात धरला आहे ? इतका मत्सर वाटत असेल तर तुम्हीदेखील करा मधुआवर प्रेम. कुणी अडवलंय तुम्हाला ?"

संतापल्यानं पुनीच्या तोंडून यापेक्षा अधिक काही शब्दच बाहेर पडत नसत. तिची पाठ वळताच बायका हेटाळणी करीत—" मरत पडली होती रस्त्याच्या काठी. आता थाट बघा. दलाल आहे दलाल..."

त्या आणखीही काही बाही बडबडायच्या. पण पुनी ते सर्व ऐकायला तिथं थांबतच नसे. घरी येऊन मुलाला मांडीवर घेऊन विचार करायची. मधुआविषयी, धोबीविषयी, स्वत:विषयी विचार करीत बसायची. पण विचार संपता संपत नसत. मार्गही काही सुचत नसे. तिच्या मनात यायचं, " सर्वजण कामावरून संध्याकाळी घरी परत येतात,

मधुआ मात्र येतो मध्यरात्री. का हे असं ? का ?" डोळे भरून यायचे. अश्रुधारा वाहू लागायच्या. सतत याच गोष्टीची टोचणी मनाला लागून रहायची.

मध्यरात्री मधुआ परत घरी आला की पुनी टक लावून त्याच्याकडे बघायची. किती कंटाळला होता तो. पुनीचा थरकाप व्हायचा. तिला काही बोलवत नसे. अडखळत ती विचारायची, " इतका उशीर का झाला ?"

आजही तिनं मधुआला तोच प्रश्न विचारला. मधुआनं उत्तर दिलं, " आईसाहेबांपाशी होतो. मजुरांचा पगार चुकता करीत होतो. ते काम संपलं तेव्हा आईसाहेब म्हणाल्या, " अरे मधू, आज विदेईचा वाढदिवस आहे थांब जरा, थोडं खाऊन जा." तिथेच बसल्या बसल्या डोळ्याला डोळा लागला. त्यांनी तुझ्यासाठी पण खायचं पाठवलं आहे. हे घे."

मधुआने आपल्या मळक्या पंचाची गाठ सोडून खायचे पदार्थ पुनीसमोर धरले. पुनीने बघितलं, आठ काकरे (तांदळाचे पीठ, गूळ, नारळ व तूप यांनी बनवलेला गोड पदार्थ) आहेत.

तो ' काकरा ' तोंडात घालू नयेसं पुनीला वाटलं. फार काय घरातसुद्धा ठेवायला नको असं तिला वाटलं. हजारो प्रश्न मनात येत होते. पण काही बोलायची छाती नव्हती. मधुआला राग आला तर ? म्हणून मग तिने ते ' काकरे ' बांधून ठेवून दिले. झोप येत नव्हती. अंथरुणावर पडल्या पडल्या ती विचार करीत राहिली. पण दमलेला मधुआ मात्र पटकन झोपी गेला. चक्क घोरू लागला. पुनी मधुआच्या चेहऱ्याकडे पाहत राहिली. गेले काही दिवसांपासून ती अशीच त्याच्याकडे नुसती बघत रहायची. उलगडा मात्र कशाचाच होत नसे.

रात्र बरीच उलटली होती. पुनीनं दिवा मालवला. मधुआच्या विशाल वक्षावर मस्तक टेकवून तीही झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी—सायंकाळच्या सुमारास...

धोबीने विचारलं, " पुनी, हा काय अवतार केला आहेस ? अतिशय उदास दिसते आहेस. काय झालं ? मधुआ काही बोलला का ? थांब येऊच दे आज त्याला. चांगली खरडपट्टी काढते..."

पुनी हसली. धोबीच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर खरंच ती सारं काही विसरली होती. बायकांनी तिला खूप छळलं होतं. धिक्कार शिव्या घातल्या होत्या. त्या साऱ्यांचा तिला विसर पडला. धोबीच्या पवित्र निष्कलंक चेहऱ्यानं तिच्या मनातले सारे मालिन्य धुऊन टाकले. धोबीच्या गोड बोलण्यानं ती आनंदून गेली. मनात आलं, " किती चांगली आणि

दयाळू आहे धोबी ! तिचा संशय घ्यायचा. छी, छी ! तिचं तर चरणोदक घ्यायला हवं."

पुनी म्हणाली, "धोबीताई ! दुष्काळात इतके लोक मेले—बेपत्ता झाले, पण माझ्याच नशिबी अवहेलना, अपमान सहन करीत जगणं आलं. का हे असं ? माझा दादा सुखात आहे, पण एक दिवस कधी साधी चौकशी करायला येत नाही. मी तरी माझं हे काळं तोंड घेऊन कशी जाऊ त्याच्यासमोर ?"

गंभीरपणे धोबीनं तिची सारी व्यथा ऐकून घेतली. असंख्य भावतरंग मनात उचंबळले. हृदयात बारीकशी कळ उठली. म्हणाली, "असं का तू नेहमी बोलतेस पुनी ? मधुआ बाउरी जातीचा असला तरी रूपगुणात त्याचा हात धरणारं दुसरं कोण आहे ? देव तुम्हा दोघांना सुखी करो."

धोबीच्या तोंडून हे असले शब्द ऐकून पुनीला नेहमी आनंद व्हायचा. गर्व वाटायचा. पण का कुणास ठाऊक. मधुआच्या तोंडून धोबीची प्रशंसा ऐकली की तिला कसंसंच व्हायचं. तिचं मन अस्वस्थ व्हायचं.

त्या दिवशी सावित्री अमावस्या होती. मधुआ बऱ्याच उशिरा घरी आला.

मधुआची चाहूल लागून पुनीनं म्हटलं, "लवकर येईन म्हणून सांगितलं होतं ना तुम्ही ? मग आला नाहीत ? मी घरचं सारं काम आवरलं. बैल बांधले, त्यांना पाणी दिलं. खरंच, तुमच्या घरची कामं किती वाढली आहेत ! कुठवर करणार मी ?"

पुनीचे डोळे डबडबले.

मधुआ चकित होऊन तिच्या तोंडाकडे बघत राहिला. पुनी काम करू शकत नाही—हे पहिल्यांदाच तो पुनीच्या तोंडून ऐकत होता. त्यानं विचारलं, "खरं ? तर तूच सांग बघू—काय करायला हवं ?"

"मी सांगेन ते कराल ?"

"हो, हो, नक्कीच. तू सांग तरी."

"तुमचं स्वतःचंच काम आता इतकं वाढलंय की ते एकजणाला करता येणं शक्य नाही. तुम्ही का म्हणून दुसऱ्यांची ताबेदारी करता ? सोडून द्या ही नोकरी !"

इतकं बोलून पुनीनं मान खाली घातली. मनातून तिला एक प्रकारची भीती वाटत होती. वाटत होतं, आपल्याच मूर्खपणामुळं आपण आपल्या मनातलं विष ओकून टाकलंय आणि तेच विष पिऊन आता तळमळतेय. मधुआकडे बघायचा धीर तिला होत नव्हता. कोपऱ्यात पडलेली एक साडी उचलून ती भिंतीकडे वळली.

पुनीच्या बोलण्यातला अर्थच मधुआला समजला नाही. त्यानं बाहेरच्या अंधाराकडे नजर टाकली. जणू पुनीच्या प्रश्नाचं उत्तर शोधीत असावा.

गार वारा वाहत होता. थोड्याच वेळात पाऊस सुरू झाला.

पावसाचे थेंब पडत होते.

धोबीच्या आईच्या डोळ्यांना आसवांची संततधार लागली होती. आपल्या दुबळ्या हातांनी तिनं अश्रू पुसले. वाटलं, पाषाणहृदयी पतीचं मन कशानं बदलता येईल ? त्यासाठी काय करायला हवं ? सनियावर इतकं रागावणं बरं का आहे ? त्याच्या वडिलानं बनेई परिडानं अपमान केला असला तरी त्यासाठी सनियाला जबाबदार धरण चुकीचं नाही का ? बनेई परिडा मेला, त्याच्याबरोबर चिंतेई सोईंचा रागदेखील मेला पाहिजे. तो तसाच मनात ठेवून वैर धरण्यात काय अर्थ आहे ?

खरंच, चिंतेई सोई अतिशय स्वाभिमानी होते. एखादी गोष्ट मनानं घेतली की त्यासाठी हटून बसतील. कितीही समजावलं तरी ते मान्य करणार नाहीत.

धोबीची आई विचार करीत होती, "आज सावित्री अमावस्या. सर्व सवाष्णींनी आज उपास केला आहे. आपापल्या पतीच्या सुखसमृद्धी, दीर्घायूसाठी त्या देवापाशी प्रार्थना करतील. सती सावित्रीसारखा आजचा दिवस घालवतील." स्वत: धोबीच्या आईनंदेखील तेच केलं होतं. आपल्या कठोर पतीच्या सुखासाठी तिनं प्रार्थना केली होती. पण तिच्या मुलीची, धोबीची, काय अवस्था होती ? बालपणीच तिचं नशीब फुटलं. आणि आता ती टिपं गाळीत आयुष्याचे उर्वरित दिवस घालवत होती.

मुलीच्या मनातलं गुपित आईला ठाऊक होतं. धोबीचं लहानपणापासूनच सनियावर प्रेम होतं. विधवा होऊन माहेरी आल्यावरही ती सनियावरच प्रेम करीत होती. ही गोष्ट आईपासून लपून राहिलेली नव्हती. धोबीचं सनियावर किती प्रेम आहे ते निधीच्या तोंडूनही तिनं ऐकलं होतं. टिमीनंदेखील बरंच काही सांगितलं होतं. तिने स्वत:देखील धोबीला विचारलं होतं. पण धोबीनं काही उत्तर दिलं नव्हतं. नुसती मान खाली घालून, गप्प उभी राहिली होती. अजूनही धोबीचं सनियावर गाढ प्रेम होतं. या प्रेमानंच तिला सनियापासून दूर ठेवलं होतं. आणि याच कारणास्तव ती आईवडिलांच्या घरी येऊ इच्छित नव्हती.

धोबीच्या आईनं पतीला व दिराला सारं काही समजावून सांगितलं. दिराच्या हातात काही नव्हतं. चिंतेई सोईंनीच जर मनावर घेतलं तर कदाचित काम होईल.

धोबीच्या आईनं पदरानं डोळे टिपले. चिंतेई आणि निधींना ती म्हणाली, "आज मला तुम्हा दोघांच्या तोंडून अखेरचं उत्तर हवंय. धोबीसाठी सनियाच अनुरूप आहे. दोघांचं लग्न लावून टाका. त्यांना आणखी सतावू नका. जरा तरी विचार करा. का म्हणून धोबी सासरची मालमत्ता अशी उधळून टाकतेय ? बाम ओझाची मुलगी टिमीच्या बाबतीत ऐकलंय ना ? त्या चंदराबरोबर ती पळून गेली ना ? त्यासाठी

बाम ओझा आणि बिशी जेनाला तुम्हीच जबाबदार धरलं ना ? तुम्हीच तर सांगितलं होतं की यात चूक टिमीची नसून बाम ओझाची आहे, आठवतं ना ?"

धोबीची आई बऱ्याच गोष्टींचं स्मरण चिंतेई सोईंना करून देत होती. ती पुढं म्हणाली, " वयात आलेली मुलगी आणि तूप समान असल्याचं तुम्हीच नव्हतं का म्हटलं ? 'जावयाचा काही पत्ता लागत नव्हता तर पळसाची पानं जाळून पोरीला दुसरीकडे उजवायला काय हरकत होती ? का नाही तसं केलं ?' तुमचेच होते ना ते शब्द ?"

आपल्या चुकीसाठी बाम ओझानं प्रायश्चित्त घेतलं. देवांना दंडदेखील दिला. चंदराचे वडील बिशी जेनानं आपली चूक कबूल केली होती. पण त्यानं प्रायश्चित्त नव्हतं घेतलं. या सर्व बातम्या धोबीच्या आईच्या कानावर आल्या होत्या. त्याच दिवसापासून ती धोबीविषयी सतत विचार करू लागली होती.

बायकोचं बोलणं ऐकून चिंतेई सोई भडकले. मोठमोठ्यानं आरडाओरडा करीत गरजू लागले, " कुणाशी धोबीची तुलना चालली आहे ? बाम ओझाची मुलगी टिमी आणि माझी धोबी या काय बरोबरीच्या आहेत ? सासरच्या मालमत्तेची नासधूस चालवलीय म्हणून मी माझ्या विधवा पोरीचं लग्न लावून कुळाला बट्टा लावायचा होय ?"

चिंतेई आणखीही म्हणाले, " सनियानं प्रायश्चित्त घेतलंय, तो जातीत आला आहे, ते सर्व ठीक आहे. पण तेवढ्यानं त्याची सारी कृत्यं धुऊन थोडीच निघाली आहेत ? अन्नछत्रात मांडीला मांडी लावून तो जेवला आहे, हा कलंक कधी तरी पुसला जाणार आहे का ? सध्यादेखील एका पठाण मुलाला त्यानं आपल्या घरात ठेवलंय आणि त्याच्या हातचा स्वैपाक तो खातो. ही सारी कामं तो लपूनछपून करतोय. पण कधी ना कधी पकडला जाईलच की नाही ? अशा माणसाच्या हाती मी धोबीला द्यायचं होय ? हे काम जर मी केलं तर रस्त्यावरून मान वर करून चालायची सोय राहणार नाही. समजलीस ?"

निधीनंही आता तोंड उघडलं, " दादा, तुम्हाला जर सनिया पसंत नसेल तर धोबी-साठी आपण दुसरं स्थळ शोधू. तुमची परवानगी असेल तर मी दुसरा वर शोधतो."

भेदक नजरेनं निधीकडे पाहून चिंतेई सोईं म्हणाले, " अरे वा ! माझी अब्रू धुळीला मिळवायचा कटच करताय की दोघं मिळून तुम्ही. दोघं नीट कान उघडून ऐका. धोबी मजेत आहे. विदेईला तिनं दत्तक घेतलंय. माझं ऐकत नाही, मालमत्ता उधळतेय. पण मी त्याला कधी आडकाठी घेतली नाही. कितीही झालं तरी अखेर विदेई माझा मुलगा आहे. माझ्या संपत्तीवरदेखील त्याचा हक्क आहे. धोबीची मालमत्ता खलास झाली तरी माझ्या संपत्तीवर तो सुखानं जगेल. आपण त्या वेळी या जगात नसू. मग धोबीला

विदेईच्याच आश्रयाखाली जगावं लागेल. लिहून ठेवा वाटल्यास माझे हे शब्द !"

धोबीची आई भयंकर संतापलेली होती. तिनंही तसंच ओरडून उत्तर दिलं, " काय म्हणालात ? विदेईचा हक्क आहे ? तर मग तुम्हीदेखील लक्षात ठेवा की इथल्या संपत्तीत अर्धा वाटा धोबीचा आहे आणि माझ्या जिवात जीव असेतो मी विदेईला..."

चिंतेईनी बायकोचं बोलणं पुरं होऊ दिलं नाही. मध्येच म्हणाले, " हो, हो बघच तू. तुझ्याच डोळांदेखत मी विदेईला तिच्या मांडीवर दत्तक देईन. काय करशील तू ? बघून घेईन मी. धोबीचं लग्न होऊन ती परक्या घरी गेली त्याच दिवसापासून सोई घराण्याच्या संपत्तीवरचा तिचा हक्क गेला."

धोबीची आई कडाडली, " मी हे मुळीच होऊ देणार नाही."

चिंतेई सोई हसत म्हणाले, " तुझा काय पाड लागलाय ? मालमत्ता माझी आहे. माझ्या कामात मोडता घालायची छाती आहे तुझी ? माझी सर्व संपत्ती मी विदेईच्या नावे करून टाकीन."

असाहाय्यपणे धोबीच्या आईनं अश्रू पुसले. म्हणाली, " मालमत्ता तुमची आहे खरं. तुम्ही ती एखाद्या भंग्याला दिली तरी मी शब्दानं विचारणार नाही. पण मी धोबीला जन्म दिलाय. तिची आई आहे मी. मी तिला मात्र सनियाच्याच हाती सोपवून जाईन. तुम्ही तुमचा मानपान, गौरव, घमेंड सारं काही उराशी कवटाळून बसा. पण सनिया मूर्ख, अडाणी, मजूर, कसाही असला तरी त्याच्याशीच मी धोबीचं लग्न लावीन. हे जोवर मी करीत नाही तोवर या घरातल्या पाण्याचा थेंब घेणार नाही."

चिंतेई सोईंनी थट्टेच्या स्वरात म्हटलं, " पुरे पुरे ! खूप झालं ! इतकी मोठी भीष्म-प्रतिज्ञा करू नकोस." मग जरा थंडपणे विचारलं, " तुझी मर्जी तरी काय आहे ? धोबीचा हात कंगालाच्या हाती देऊन मी सोई घराण्याला कालिमा लावावा असं का तुला वाटतं ? असा वेडेपणा करू नकोस आणि बघ, फार वेडेपणा करायला लागलीस ना तर एका फुंकरीसरशी सनियाला या गावातून उडवून लावीन. समजलीस ?"

थोडा वेळ थांबून चिंतेई सोईंनी पुन्हा म्हटलं, " धोबीची आई, आणखीही ऐकून, समजून घे. मोठ्या कष्टानं सनियानं घर बांधलंय. थोडीफार जमीनही मिळवून तो कसाबसा आपलं पोट भरतोय. जाणूनबुजून त्याचं नुकसान करू नकोस. तुला फारच वाटत असेल तर व्रतवैकल्यं, उपासतापास कर. फार तर निधीपाशी जाऊन मनातली मळमळ बाहेर काढून टाक. काय वाटेल ते बडबड. पण घरची बाब जर घराबाहेर गेली आणि त्यावरून लोक माझी टर उडवू लागले तर मात्र याद राख. ज्यांचं भलं करायला निघाली आहेस त्यांचंच नुकसान होईल."

इतका दम देऊन रागारागानं चिंतेई सोई घराबाहेर निघून गेले. बाहेर होता दाट अंधार. आभाळात वीज कडाडली. मेघगर्जनेनं सायंकाळच्या शांत वातावरणाला

तडा गेला.

त्या दिवशीदेखील साऱ्या जगात अंधार भरून राहिला होता. ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसानं जणू अवघं जग थरथरत होतं. सती सावित्रीच्या मांडीवर होतं तिच्या पतीचं, सत्यवानाचं शव. सत्यवानाच्या आत्म्याला एका सतीच्या मांडीवरून घेऊन जाणं यमराजाला जमलं नव्हतं. त्यानं तो आत्मा परत देऊन टाकला होता.

त्या दिवशीदेखील दाट अंधकारानं साऱ्या जगाला कवटाळून धरलं होतं. थांबून थांबून विजा लकाकत होत्या आणि पावसाची संततधार चालू होती.

राधामाधवाच्या मूर्तीसमोर धोबीनं मस्तक टेकलं. डोळ्यातून अश्रू गाळले. देवाच्या चरणी प्रार्थना केली, " देवा, स्त्रीला इतकं असाहाय्य का रे केलंस ? काय चूक आहे माझी ? का मला इतकं दुःख सहन करावं लागतंय ? हे सगळे भोग भोगावे लागताहेत?"

पण त्या सावित्री अमावस्येच्या रात्री धोबीचा सत्यवान कोण बरं होता ? सनिया की नितेई नायक ? सनियावर तिचं मनापासून प्रेम होतं. तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना धोबीनं त्यालाच आपलं मन दिलं होतं. सनियाच्या सुखानं ती आनंदित व्हायची आणि त्याला दुःख झालं की तीदेखील अश्रू गाळायची. नितेई नायकबरोबर मात्र तिनं हे असं कधीच केलं नव्हतं. समाज व जातीच्या नियमांचं पालन करून तिनं नितेईशी लग्न केलं त्याच दिवसापासून तिचं मन बंडखोर झालं होतं. तरीसुद्धा ती नितेईच्या घरी आली होती आणि याच घरात तिनं आपलं सर्वस्व नितेईला अर्पण केलं होतं.

आता तिचा सत्यवान कोण होता ? सनिया परिडा की नितेई नायक ?

आपलं सर्वस्व गमावून सनिया कंगाल झाला होता. तरी पण आपल्या प्रिय गावाचा त्याला विसर पडला नव्हता. गावच्या मातीतच माती होऊन जाण्यासाठी तो परत आला होता. त्याच्या तोंडी धोबीनं घास दिला, त्याला पाणी पाजलं आणि मृत्यूच्या दाढेतून ओढून काढलं. त्याला वाचवलं. माणसासारखं जगात जगायची प्रेरणा त्याला धोबीनंच दिली. पण नितेई नायकची गोष्टच वेगळी होती. पत्नीला खुश करण्यासाठी त्यानं दुष्काळात सापडलेल्या भुकेकंगालांची सेवा केली होती आणि तेच काम करताना हसत हसत तो देवाघरी गेला होता.

मोठं काय ? तन की मन ? धोबीला या प्रश्नाचं उत्तर ठाऊक नव्हतं, तरीदेखील एखाद्या सुवासिनीप्रमाणं तिनं सावित्री अमावस्यचं व्रत केलं होतं. दिवसभर उपास केला होता. हे सर्व बघून घरातल्या मोलकरणींनी आपसांत नेत्रपल्लवी केली होती,

उपहासानं हसल्या होत्या. काहींनी म्हटलं होतं, "मोठी माणसं—मोठ्या गोष्टी."

धोबी देवाच्या पायांशी पडली होती. राधामाधवाच्या मूर्तीसमोर असलेल्या तुपाच्या दिव्याची ज्योत वाऱ्यानं थरथरत होती. जणू धोबीचं हृदयच थरथरत होतं. जमिनीवर पडल्या पडल्या ती पितळी मूर्तीकडे पाहत होती. तिनं देवाची प्रार्थना केली, "देवा, मला क्षमा करशील की नाही ठाऊक नाही ? पण शिवरात्रीच्या दिवशी सनियाच्या पायांना स्पर्श करून जे काही बोलले होते ते काही तुझ्यापासून लपून राहिलेलं नाही. माझ्या मनीच्या भावना तुला ठाऊकच आहेत देवा."

तिनं हात जोडले, डोळे मिटले. जणू सनियाच समोर उभा असावा. आणि अतिशय व्याकुळ होऊन सांगत असावा, " वाट पाहतोय तुझी, धोबी ? येशील ना ?" धोबी जणू उत्तरादाखल म्हणत असावी, " तुझ्या चरणांवर मस्तक ठेवूनच तुझ्या प्रश्नांचं उत्तर देईन, सनिया."

धोबी दचकली. छे, छे, अशक्य आहे हे ! अरे देवा ! हे काय तू माझ्या मनात आणतो आहेस ?

धोबीच्या साऱ्या शरीराचा थरकाप होत होता. तिनं पुन्हा डोकं टेकून देवाला नमस्कार केला. प्रार्थना केली, " मला मानसिक बळ दे, प्रभू !"

एका मोलकरणीनं दार ढकलून हाक मारली, " आईसाहेब !"

धोबी उठून बसली. डोळ्यातून अश्रू वाहत होते. ते न पुसताच तिनं विचारलं, " काय ग ? विदेई उठला का ?"

" नाही तो झोपलाय. बल्ली मोलकरीण बसली आहे त्याच्यापाशी. आपल्या गावचं कुणी आलंय. पावसात भिजून गेला आहे बिचारा ! बाहेर उभा आहे. आपल्याला भेटायचं म्हणतोय."

धोबी उठून उभी राहिली. डोळे पुसले. म्हटलं, " बाबांनी पाठवलं असेल." " नाही आईसाहेब ! तो आपला नावानं उल्लेख करतोय. गडीमाणूस असता तर आपलं नाव थोडीच उच्चारलं असतं त्यानं ? दुसराच कुणीतरी असावा."

" दुसरा कुणी ? धोबी दचकली. सनियादादा तर नाही ? सनियादादाखेरीज दुसरं कुणीही तिच्या बाबतीत एकेरी संबोधन वापरीत नाही. सावित्री अमावस्येच्या गहिऱ्या अंधाऱ्या रात्री, पावसात भिजत तो का आला आहे ?

धोबी धावत बाहेर आली. मोलकरणीला दिवा आणायला सांगितलं. बघितलं, ओसरीखाली कुणी उभं आहे. आपोआप तोंडून प्रश्न उमटला, " कोण ?"

सनियाला उत्तर द्यावं लागलं नाही. मोलकरीण दिवा घेऊन आली होती. प्रकाशात धोबीला दिसलं, सनिया उभा होता. पार भिजला होता. कपाळावरून पाण्याच्या धारा वाहत होत्या. कपडे चिखलानं माखले होते.

सनियाच्या भरल्या चेहऱ्याकडे धोबी पुन्हा पुन्हा पाहत होती. क्षणभर तिच्या मनात अनेक चित्रे तरळून गेली. कित्येक गोष्टी आठवल्या. पण तो सर्व विचार करायची ही वेळ नव्हती. दिवा घेऊन उभ्या असलेल्या मोलकरणीला काय वाटेल ?

एकेक शब्द सावकाश उच्चारीत धोबीनं म्हटलं, "अरे सनियादादा ! असा अनोळखी माणसासारखा ओसरीच्या खाली का उभा आहेस ? हे काय तुझं घर नाही ? ये ना आत."

सनिया धोबीच्या पाठोपाठ आत आला. मंत्रमुग्ध झाल्यासारखा तो हळूहळू चालत होता. आपसात बोलण्यासाठी दोघे व्याकुळ झाले होते. पण कुणाच्याही तोंडून शब्द फुटत नव्हता.

मध्यरात्र...चहूकडे एक प्रकारची विलक्षण निःस्तब्धता. पाऊस थांबला होता. पण आभाळ अजून मेघाच्छादित होतं. सनियाची झोप पार उडाली होती. धोबीच्या अगत्यानं त्याला सर्व गोष्टीचा विसर पडला होता. त्या तशा मध्यरात्रीदेखील धोबीनं त्याला जेवू घातलं होतं. अश्रूभरल्या डोळयांनी ती त्याच्याकडे एकटक पाहत होती. पुन्हा पुन्हा आग्रह करीत होती, "आणखी काही घे ना. तू तर काहीसुद्धा खाल्लं नाहीस." आपण एखाद्या मायापुरीत आल्यासारखं सनियाला वाटत होतं.

धोबीचं खरंच का त्याच्यावर प्रेम आहे ? सनियाच्या मनात हाच विचार वारंवार डोकावत होता. सनिया आज जिवंत आहे तो कुणासाठी ? धोबीनंच त्याला जीवदान दिलं होतं. मालमत्ता दिली होती. आणि...आणि आपल्या हृदयातलं खरं प्रेम दिलं होतं. धोबीविना या सर्वांना अर्थ नव्हता. धोबी नसेल तर हे सर्व असून काय उपयोग ? काय करायचं त्याचं ? जातीपातीच्या भेदभावावर त्याचा विश्वास नव्हता. भयंकर दुष्काळानंच त्याला शिकवलं होतं की धर्म व जातीच्या नावाखाली जे भेदभाव आहेत ते सर्व व्यर्थ आहेत. जात व धर्म एकच माया आहे. ती लोकांना स्वार्थी व्हायला शिकवते. हे सर्व ठाऊक असूनही त्यानं स्वतःला जातीच्या दोरखंडांनी जखडू दिलं होतं. हनुमानाचा मुखवटा चढवून त्यानं बराच धांगडधिंगा घातला होता. माणसाच्या हातांनी घडवलेल्या देवळातील मूर्तीवर त्याचा अजिबात विश्वास नव्हता. तरीदेखील देवळातील 'जत्रा' लोकनाटचासाठी त्यानं वर्गणी दिली होती. सर्वांबरोबरच त्यानंदेखील देवाच्या मूर्तीसमोर डोकं टेकलं होतं.

हा सर्व खोटेपणा कशासाठी चालू होता ? याचं उत्तर सनियाला सापडत नव्हतं. मनात आलं, आता आपण काय करायला हवं ? आणखी किती दिवस वाट पाहायला हवी ? एकलेपणा त्याला असह्य होऊ लागला होता. पण आता नायक घराण्याची सून असलेली धोबी इतकी धनदौलत, नोकरचाकर, ऐषाराम सोडून त्याच्या भिकारडचा झोपडीत येईल ? काय सांगून तिला आपल्या झोपडीत यायचं आमंत्रण द्यायचं ? आहे

काय आपल्यापाशी ? आपल्या मनातलं तिला कोण सांगणार ? कसं सांगणार ?

सनियाला झोप येत नव्हती. घरात अंधार होता. बाहेरच्या ओसरीवर कंदील मिण-मिणत होता. त्याचा अंधुक प्रकाश पसरलेला होता. अवघं जग जणू निद्रादेवीच्या कुशीत विसावलं होतं. एकच माणूस फक्त जागा होता. तो म्हणजे सनिया !

पाऊस, वादळवाऱ्याला तोंड देत या घनदाट अंधाऱ्या रात्री तो कशासाठी दुर्गापूरला आला होता ? का म्हणून इथं राहिला होता ? त्यानं काय करायला हवं ? हजारो प्रश्न त्याला भंडावून सोडत होते. आशा व निराशेच्या ओढाताणीत तो तळमळत होता.

सनिया उठून बसला.

नेमक्या त्याच वेळी, दुसऱ्या खोलीत धोबी आसवांनी उशी भिजवत होती. धोबी-देखील उठून बसली. घरात दिवा जळत होता. जवळच विदेई गाढ झोपला होता. पलंगाशेजारीच खाली जमिनीवर मोलकरीण बेशुद्ध पडल्यासारखी गाढ झोपली होती. मोठ्यांदा घोरत होती.

धोबीने विचार केला, आता स्वत:चीच फसवणूक करण्यात अर्थ नाही. का म्हणून आणखी तळमळायचं ? लोक नावं ठेवतील, बडबडतील, पण त्याची कशासाठी पर्वा करायची ? लोक बोलले तर बोलू देत. आपण का म्हणून भ्यायचं ? दिवस उजाडताच सनियाला सारं काही सांगून टाकायचं तिनं ठरवलं.

पण नुसतं बसून धोबीला चैन पडेना. खोलीला एकही खिडकी नव्हती. घासलेटाच्या दिव्याचा धूर खोलीत भरला होता. विलक्षण वास येत होता. धोबीचा जीव जणू गुद-मरू लागला.

धोबीने दार उघडलं. अंगणापलीकडे कुणीतरी कंदिलाची वात मोठी करीत होतं.

सनिया ! धोबीनं नीट निरखून पाहिलं. होय सनियाच तो ! त्यालापण झोप येत नव्हती. तोसुद्धा धोबीसारखाच तळमळत होता.

धोबीनं आपल्या पतीच्या मांडीवर डोकं ठेवून याच घरात काही दिवस घालवले होते. किती अल्पकाळ होता तो. बघता बघता सारं संपून गेलं. गावच्या लोकांची सेवा करता करता याच खोलीत तिच्या पतीनं प्राण सोडले. आणि आज...? त्याच खोलीत —आजच्या सावित्री अमावस्येच्या रात्री त्यांचा आत्मा परत आलेला नाही. आज जो आला आहे, तो आहे सनिया !

धोबी स्वत:ला आवरू शकली नाही. आवेगात ती सनियापाशी गेली. सनियानं वर पाहिलं—धोबी !

धोबीनं ओसरीवर येऊन विचारलं, " झोप येत नाही का ?" सनिया आत गेला. पलंगावर बसून म्हणाला, नाही धोबी. आज खूप उकडतंय."

धोबी पण आत गेली पण पलंगावर बसली नाही. भिंतीपाशी उभी राहिली. थोडा

वेळ कुणाच्याच तोंडून शब्द फुटला नाही. आपापल्या मनातली गोष्ट दोघांनाही नीट ठाऊक होती. पण त्याला शब्दरूप मात्र देता येत नव्हतं. बोलणं सुचत नव्हतं. दोघांनी खाली माना घातल्या होत्या. धोबीच्या मनातल्या भावना जणू अश्रू होऊन ओघळत होत्या. एखादी गोष्ट आठवत होती. पण ती तोंडावाटे बाहेर पडत नव्हती. मनातली गोष्ट मनातच राहत होती.

आणि सनिया ? तो तर खाली नजर करून मूर्तिवत उभा होता. एक प्रकारची विलक्षण नि:स्तब्धता होती. त्याच्या श्वासोच्छ्वासाचा आवाज काय तो ऐकू येत होता.

थोडा वेळ तसाच गेला. मान वर करून सनियानं धोबीकडे पाहिलं. धोबीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. सनियानं प्रेमार्द्र स्वरात विचारलं, " रडतेस का धोबी ?"

धरण फुटल्यावर पुराचं पाणी जसं वेगानं वाहू लागतं तसंच सनियाच्या या एकाच वाक्यानं धोबीच्या डोळ्यांतील अश्रू अनावर होऊन वाहू लागले. तिच्या धैर्याचा बांध फुटला. हुंदके देत ती म्हणाली, " सनियादादा ! मी फार मोठा अपराध केलाय. मला क्षमा कर. माझ्या आयुष्यात कोणतं सुख राहिलं आहे ? मी एक विधवा आहे. समाज, धर्म, जातीच्या बंधनांनी मला जखडून टाकलं आहे. या बंधनांच्या चौकटीत मी तडफडत असते. पण मला ही बंधनं कधी तरी तोडता येतील का ? मी यात ही अशीच तडफडत राहणार बहुतेक. कुणीच मला त्यांतून काढू शकणार नाही."

तळहातांत तोंड लपवून धोबी ओक्साबोक्सी रडत होती. सनियानं म्हटलं, " रडू नकोस धोबी ! तुझ्या तोंडून हे उत्तर ऐकायच्या तयारीनंच मी आज इथं आलो होतो. तुझं हे उत्तर ऐकून मी निश्चितपणे परत जाईन. आजपासून मी मुक्त झालो, धोबी. हनुमानाचा मुखवटा चढवून नाचायची गरज आता मला उरली नाही."

धोबीच्या डोळ्यांना संततधार लागली होती. पण थोडा वेळ रडं आवरून ती सनियाच्या तोंडाकडे बघू लागली. सनिया जणू स्मित करीत होता. सनिया का हसतोय ते धोबीला उमजेना. सनियानं म्हटलं, " तूच मला हनुमानाचा मुखवटा चढवून नाचवलं होतंस. घरदार, जमीनजुमला तूच दिला होतास. काही दिवस मी हनुमान होऊन उड्या मारल्या, नाचलोही. प्रत्येकजण असंच करीत असतो. सर्वांचा काही ना काही हेतू त्यामागं असतो,... कुठला तरी स्वार्थ असतो. पण माझा स्वार्थ काही वेगळाच होता. तुझ्या आसवांनीच तो मला मिळाला आहे. माझी स्वप्नं साकार झाली आहेत. आता त्या बनावटी दुनियेतून मला बाहेर पडता येईल. जिथं मी वेड्यासारख्या जगत होतो. माझा वेडेपणा संपला धोबी. आता मी आहे स्वतंत्र हनुमान !"

बोलणं संपवून सनिया खाली पाहू लागला. विचार आला, आता इथं एक मिनिटही आणखी थांबणं योग्य होणार नाही. दिवस उजाडताच लोकांना समजेल की एक

अनोळखी माणूस धोबीच्या घरी आला होता. रात्रभर तिच्या घरी राहिला होता. धोबीच्या निर्मल निष्कलंक चारित्र्याला बट्टा लागेल. लोक निंदा करू लागतील. त्यापेक्षा या क्षणी हे घर सोडून जाणंच उत्तम !

धोबीनं म्हटलं, " सनियादादा, माझी एकच विनंती आहे..."

मान वर करून सनिया धोबीकडे बघू लागला.

" तू लग्न कर, सनियादादा !"

ते ऐकून सनिया हसला. म्हणाला, " तीन वर्षांपूर्वी शिवरात्रीला काय घडलं होतं आठवतंय ?"

पुन्हा तेच ! शिवरात्रीच्या त्या दुर्बल क्षणाची कहाणी ! खूप पश्चात्ताप करूनही धोबीच्या मनाला शांतता लाभत नव्हती. ती आपल्या मनाला बळकट करू इच्छित होती पण दुसऱ्याच क्षणी ती दुबळी होत होती. जणू आत हृदयाच्या गाभ्यातून कुणी तरी तिला बजावत होतं—सनियाच्या बळकट बाहूंमध्ये त्याच्या विशाल वक्षावर डोकं टेकून गाढ झोपी जा धोबी ! जग काय म्हणेल ? म्हणू दे. जगाला मत्सर वाटत असेल तर वाटू दे. जगाशी काय करायचंय ? का म्हणून सनियाला छळायचं आणि स्वतःही असं दग्ध होत राहायचं ?"

धोबीच्या नसानसांतून जणू अग्नी पेटला होता. उत्तेजनेची परिसीमा तिनं गाठली होती. वेड तर नाही लागणार तिला ?

सनियाच्या डोळ्यांकडे ती टक लावून पाहत होती. सनिया काही बोलेल याचीच वाट पाहत होती.

सनिया उभा राहिला. म्हणाला, " त्याची काळजी करू नकोस धोबी ! जे काम होत नाही, जे काही जमत नाही, ते सर्व माणूस मग सहन करतो, स्वीकार करतो. तुझ्या मनाला व्यथित करण्यासाठी, किंवा तुझ्या मनाची शांतता नष्ट करण्यासाठी मी इथं आलो नव्हतो. तुझा निश्चय कायम राहो. मी त्यात मोडता घालणार नाही. त्याच्या आड येणार नाही."

थोडं थांबून सनिया म्हणाला, " आता जायची परवानगी दे धोबी ! इथं तुझ्या घरात तुझ्यापाशी फार वेळ थांबलो तर आपल्या दोघांनाही त्रासच होईल. दोघांचंही दुःख आणखी वाढेलच. आपल्या दोघांच्याही निश्चयाला बाध येईल. तेव्हा मी शक्य तितक्या लवकर इथून निघून जावं हेच उत्तम !"

सनियाचं बोलणं धोबीला सहन झालं नाही. ती पुन्हा रडू लागली. वाटलं त्याला सांगावं की, सनिया तू जाऊ नकोस. तू माझ्या इतक्या जवळ आला आहेस की आता तुला सोडायची माझी तयारी नाही. पण ती काही बोलू शकली नाही. एखाद्या लहान मुलीसारखी रडू लागली.

धोबीच्या मनातली वेदना सनियाला समजली होती. ज्या उत्तरासाठी तो दुर्गापूरला आला होता, ते त्याला मिळालं होतं. त्याच्या मनात विचार आला, धोबी त्याचीच आहे आणि सदैव त्याचीच राहील. सनियाच्या शब्दाखातर धोबी हरतऱ्हेचं दुःख, अपमान सारं काही सहन करील. पण त्यानं तरी धोबीला का म्हणून दुःखात लोटावं, तिला त्रास होईल असं कृत्य करावं. मनाच्या क्षणिक आवेगात धोबी त्याचा हात धरून पळून येईलही कदाचित ! पण मग जग तिच्याकडे एक कलंकिनी म्हणून बघेल. त्यानं जाणून-बुजून असं का म्हणून करावं ?

धोबीनं अजूनही त्याचा हात धरून ठेवला होता. त्यानं हळूच आपला हात सोडवून घेतला आणि प्रेमानं तिला म्हणाला, " धोबी, माझं बोलणं तुला समजलं असेलच. मी काही रागानं वा अभिमानानं पाठ वळवून जात नाहीय. तुझ्या मनाचा दृढपणा, तुझ्या अटळ निश्चयाचं महत्त्व मला समजतंय. तुझा आदर्श तोच माझाही आदर्श. तोच आदर्श समोर ठेवून मी परत जातोय."

तेवढ्यात बल्ली मोलकरणीनं येऊन सांगितलं की विदेई जागा झाला आहे. बस्‌ ! हीच संधी सनियासाठी योग्य होती ! तो गुपचूप बाहेर निघून गेला. धोबी दगडी मूर्तीसारखी स्तब्ध उभी राहिली.

घनघोर अंधकार. पुढे जावं तरी कसं ? त्या दाट अंधारातही सनियाच्या डोळ्यांसमोर धोबीचे आसवांनी डबडबले डोळे, तिचे थरारणारे ओठ, तिची दगडासारखी निश्चल झालेली मूर्ती—सारं उभं राहत होतं. जणू त्याच्यासमोर उभी राहून धोबी त्याला विनवत होती, " जाऊ नकोस सनिया, जाऊ नकोस." सनिया क्षणभर थबकला. त्याच्याही डोळ्यांतून अश्रू ओघळले. त्यानं मनाला खूप समजावलं पण हट्टी मन काही ऐकायलाच तयार नव्हतं.

जगाची माया ती हीच ! मायेची बंधनं किती खोल असतात ते सनियाला जाणवलं. या बंधनांचा दोर माणसाला हळूहळू त्याच्या नकळत आवळत जातो आणि माणसाला ते समजतसुद्धा नाही. पण पुढे जेव्हा समजतं तेव्हा बंधनं दृढ झालेली असतात आणि प्रयत्न करूनही माणसाला त्यांतून सुटता येत नाही.

एकाच झटक्यात सनिया बराच लांबवर निघून गेला. गावच्या सीमेशी पोचला. हळूहळू अंधार विरळ होत चालला असल्याचं आणि दूरचं क्षितिज उजळू लागल्याचं त्याला दिसलं.

उषःकाल ! आता अंधारी रात्र संपेल. पण सनिया कुठं जाणार आहे ? धोबीनं दिलेल्या पैशांतून त्यानं जिथं घर बांधलं आहे तिथंच तो जाणार का ? तिथं जाऊन

नांगरट करणार ? माती खणणार ? रक्त आटवून शेती करणार ?

क्षणभर तो एका झाडाखाली उभा राहिला.

पण हे सर्व त्यानं का म्हणून करावं ? पुन्हा दुष्काळ पडला तर लाखो लोक मरतील. धनवानांची मजा आहे. ते पुन्हा लोकांची पिळवणूक करतील. पै पैसा गोळा करतील. आपली तुंबडी भरतील. लाखो सांगाडयांमध्ये सनियाचा सांगाडाही पडून राहील. अखेरीस हेच सर्व होणार आहे ना ? त्यासाठीच जिवापाड राबायचं ?

अखेरीस हेच जर होणार असेल तर सनियानं कशासाठी पैसा मिळवायचा ? त्याचा उपयोग तरी काय ? कशासाठी घरी परत जायचं ?

काय करावं ? सनियाला काही सुचत नव्हतं. या अफाट विश्वात आपण एकटे असल्याचं त्याला जाणवलं. माणसासमोर जेव्हा कुठलंही ध्येय राहत नाही, जगण्यासाठी कसलीही प्रेरणा राहत नाही त्या वेळी त्याला फार निराधार झाल्यासारखं वाटू लागतं. कुठल्या तरी ध्येयासाठी सतत धावण्याची माणसाची इच्छा असते. त्यासाठी तो अपार कष्टही हसत सहन करतो.

पण सनियासमोर कुठलंच लक्ष्य नव्हतं. त्याची मनीषा पूर्ण झाली नव्हती. धर्म, काल्पनिक ईश्वर, पूर्वजन्म वा हा जन्म, माणसाचा मोक्ष वा निर्वाण यांपैकी कुठल्याच गोष्टीवर त्याचा विश्वास नव्हता. घरदार, जमीनजुमला यांच्याविषयी त्याला तिटकारा वाटू लागला होता, विरक्ती निर्माण झाली होती. मालमत्तेनं काय होणार आहे ? कोण त्याच्या धनसंपत्तीचा उत्तराधिकारी होणार आहे ? तो काय पुन्हा घरसंसार थाटणार आहे ? पुन्हा समाजाचा मुखवटा चढवून नाचणार आहे ? छे, अशक्य !

पहाट झाली होती. पूर्वेकडं फटफटलं होतं. दिशा उजळू लागल्या होत्या. सनियाच्या मनातला अंधारही हळूहळू नाहीसा होऊ लागला होता. जणू त्याच्या अंतर्मनातून कुणी तरी सांगत होतं, " सनिया ! तुझ्यासमोर तर एक महान ध्येय आहे. मूठभर तांदूळ न मिळाल्यानं रस्त्याकाठी बेवारशी कुत्र्याप्रमाणे जे प्राणाला मुकतात तेच तर आहेत तुझे आपले स्वजन ! तेच तुझे बंधुबांधव आहेत सनिया ! अगदी सख्खे भाऊ ! त्यांना उचलून आपल्या बळकट बाहूंचा आधार देणं हेच तुझं कर्तव्य आहे."

सनियाचं मन आवेशानं भरून गेलं. वाटलं, " धोबीनं आपली मालमत्ता गरिबांना वाटून टाकली. लोक तिची खूप प्रशंसा करतात. म्हणतात, तिने पुण्य मिळवलं आणि दुसऱ्या जन्मासाठीही त्याचा संचय करून ठेवला. जगातील सर्वजण जर सुखात राहिले, कुणाला कुणाच्या मदतीची गरज लागली नाही तर पुण्य कमावण्याची इच्छाही राहणार नाही. आपला निर्वंश व्हायचं भयदेखील लोकांना उरणार नाही."

धोबीनं पुण्य प्राप्त केलं आहे...

चूक आहे हे ! एवढं बरीक खरं की तिनं नक्कीच एक नवा समाज घडवला. पण

स्वत: मात्र त्यापासून विलग राहिली. तिनं ज्या लोकांना मदत केली त्यांनी पुन्हा पैसा कमावला. पैसा जमवला. ते पण पैशांच्या चक्रातच गुरफटले. ते धनवान होणार आहेत. आपल्या बायकापोरांना सुखी करणार आहेत, कायमचे !

ही अशी चूक का म्हणून वारंवार होत राहते ?

ज्या लोकांनी भावी पिढीसाठी धनसंचय केला त्यांचीच मुलंबाळं आज उपाशी पोटी रस्त्यावर मरताहेत. दैवावर विश्वास ठेवणारे लोक म्हणतात की हे सर्व पूर्वजन्मीच्या कर्मांचं फळ आहे. खरंही असेल कदाचित. पण धनसंचय करण्याची इच्छा माणसाला का होते ? भीतीमुळे ? कुळाचा नाश व्हायच्या धास्तीमुळे ?

निर्धन, दुर्दैवी, निराधार किंवा आजारी माणसाला बघून माणूस घाबरतो. त्याची वा त्याच्या वंशजांचीही हीच तर दशा होणार नाही ना ! या नुसत्या कल्पनेनंच त्याच्या जिवाचा थरकाप होतो. याच भयामुळं तो संपत्ती गोळा करतो. जमवून ठेवतो. सर्वांना दोन वेळा पोटभर जेवण आणि अंग झाकायला पुरेसा कपडा मिळाला तर लोक धनसंचय कशासाठी करतील ? धनसंचयाची इच्छाच उरणार नाही. भावी पिढीच्या सुखाची भावनाच मनात येणार नाही.

सूर्य वर चढत होता. सनिया हळूहळू पुढे जात होता. धोबीपासून तो बराच दूर निघून आला होता. ज्या पुनीला त्यानं मृत्यूच्या गर्तेत ढकललं होतं, आज तिलाच जवळ करावं, मधु भोईला छातीशी धरावं असं त्याला वाटू लागलं. पुन्हा एकदा सनियाची जात जाईल. तो अस्पृश्य होईल. पुन्हा एकदा तो कंगालासारखा समाजापासून दूर फेकला जाईल. पुन्हा लोक त्याचा तिरस्कार करू लागतील. करू देत. आता तो आपला मुखवटा फेकून देईल. हनुमानाचा पोशाख टाकून देईल. पण तो खराखुरा मानव होईल !

सनिया चालू लागला—पुनीच्या घराच्या दिशेने.

मधुआ खूपच लवकर उठला होता. सनिया त्याच्या घरी पोचला तेव्हा तो घरी नव्हता. कामावर निघून गेला होता. मधुआचं बाळ अजून झोपलं होतं. गोठ्यातून शेण काढून गोठा स्वच्छ करून पुनी बाहेर येत होती. बाहेर येताच समोर दिसला सनिया ! दादा ? तिचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. स्वप्न तर नाही ना हे ?

सनिया आणखी जवळ आला. आपल्या लाडक्या बहिणीला, पुनीला, नीट निरखून बघितलं. तीच ती. तिलाच त्यानं मांडीवर खेळवलं होतं. पुनी जरा मोठी झाली होती. पण तशीच सुंदर होती आणि तिच्यात काहीच बदल जाणवत नव्हता. तेच डोळे, तेच नाक, तेच ओठ, तेच गहिरे डोळे—सारं काही तसंच.

मग बदललं होतं तरी काय ?

तिची जात बदलली होती. कंगाल झाल्यावर पुनी आपल्या जातीत पुन्हा आली नव्हती. ती मधु भोईची बायको झाली होती. तरीदेखील पुनी, तीच पुनी होती. इतके दिवस सनियाने तिला का जवळ केलं नाही ?

त्यानं प्रेमळ स्वरात हाक मारली, ' पुनी—'

सनियाला कदाचित आणखी काही बोलायचं असेल. पण त्याचा गळा दाटून आला. तोंडातून शब्दच फुटेना. डोळे भरून आले.

भावाची प्रेमळ हाक ऐकताच पुनीही देहभान विसरली. असंख्य भावना मनात उचंबळल्या. उन्मळलेल्या वृक्षासारखी ती भावाच्या पायांवर कोसळली. हमसून हमसून रडू लागली.

सनियानं दोन्ही हातांनी तिला उचललं.

पण पुनीचं रडं थांबेना. सनियाच्या छातीवर डोकं ठेवून ती रडत होती. घरच्या सर्वांची आठवण उफाळून आली. बाबा, आई, धाकटी बहीण कुकी आणि दुष्काळानं निव्वळ सांगाडा झालेला धाकटा भाऊ. दुष्काळाचं भयंकर दृश्य तिच्या डोळ्यांसमोर पुन्हा साकार झालं. कुठं गेले सर्वजण ? आता कुठं आहेत ? पुनी ओक्साबोक्शी रडत होती.

सनिया तिच्या पाठीवरून हात फिरवीत होता. त्याचेही डोळे भरून आले होते. त्यानं समजावलं, " उगी पुनी, उगी. मी उगाच एका असत्याच्या पाठी धावत होतो. माझ्या आशा आकांक्षा फोल होत्या. मानवता पायदळी तुडवून मी सावलीचा पिच्छा करीत होतो. आता माझा भ्रमनिरास झाला आहे पुनी."

सनियाच्या छातीवरून मान वर करून पुनी त्याच्या अश्रुभरल्या डोळ्यांकडे टक लावून बघत होती.

" मधुआ कुठं आहे ?" सनियानं विचारलं. पुनीनं काहीच उत्तर दिलं नाही.

" एक छोनंसं बाळ पण आहे ना तुला ? कुठंय तो ?"

पुनीने उत्तर द्यायच्या आतच आतून बनाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. एका फाटक्या तुटक्या चटईवर, अतिशय मळक्या गोधडीवर बना झोपला होता. बना भोई बनेई परिडाच्या रक्ताच्या अंश—फाटक्या गोधडीवर हातपाय झटकीत रडत होता. बनेई परिडाचं एक जिवंत प्रतीक तोच तर होता ! आपले वडील बनेई परिडाच पुन्हा बाळाच्या रूपानं स्वर्गातून परत आले असल्याचा भास सनियाला झाला. बनेई परिडा त्याचे वडील होते—पण त्याचे पूर्वज—त्यांच्या काळी परिडा वा सोईमध्ये कसलंही अंतर नव्हतं. सर्व मानव समान होते, एकाच जातीचे होते—एकाच धर्माची लेकरं होती.

सनियानं बनाला उचलून कडेवर घेतलं. तरी बना गप्प होईना. सनियानं त्याला

पुनीच्या हवाली केलं.

सनिया पुनीच्या घरात आला होता. पुनीला वाटलं, आता बहुतेक लोक त्याला पुन्हा वाळीत टाकणार. जातीबाहेर करणार. समाजातून हाकलून देणार. त्याला सर्वांपासून वेगळं राहावं लागेल. लोक नानाप्रकारचे आरोप त्याच्यावर करतील. आता काय करावं ? पुनी विलक्षण घाबरली होती.

पण सनियानं तिच्या मनातलं ओळखलं. त्यानं हसत म्हटलं, " रागावलीस माझ्यावर ? लहानपणीदेखील तू अशीच रागवायची. पण मिनीटभरदेखील तुझा राग टिकत नसे."

पुनी बाळाला मांडीवर घेऊन जरा दूर सरकून बसली. तिचे ओठ थरथरत होते. कशीबशी म्हणाली, " दादा..."

पुढचे शब्द गळ्यातच अडखळले. सनिया तिचा सख्खा थोरला भाऊ होता—देवासारखा. आता त्याला कसं सांगायचं की दादा, तू निघून जा इथून. आता मी तुझी कुणीच नाही. तुझी बहीण असलेली पुनी कधीच मेली आहे...

पुनीचा चेहरा काळवंडल्याचं सनियाला दिसलं. जणू अनेक दुःखद भावना तिच्या चेहऱ्यावर झाकाळल्या होत्या. सनियानं प्रेमानं विचारलं, " पुनी तुझा ताठा कधीच कमी होणार नाही का ग ? लहानपणची गोष्ट आठवते ? तू कितीदा तरी चुका केल्यास पण मी ते कधीच मनात ठेवलं नाही. कधीच तुझ्यावर रागावलो नाही. आठवतं ना ?"

थोडं थांबून सनियानं पुन्हा म्हटलं, " बरं सांग बघू, मी कितीदा तुझा कान पिरगाळला होता ? कितीदा तुला मारलं होतं ? मग कितीदा तुला कडेवर उचलून घेतलं होतं ? प्रेमानं खेळवलं होतं ? आठवतं ?"

पुनीचा ऊर भरून आला. वाटलं, या क्षणी हृदय विदीर्ण होईल. का म्हणून सनिया गतकाळाची आठवण करून देतोय ? काय उत्तर द्यायचं त्याला ?

सनियानं पुन्हा म्हटलं, " मी तुझ्याहून मोठा आहे म्हणून काय झालं ? थोरल्या भावाकडूनही कधी चूक होते. माझ्या हातून फार मोठा अपराध घडला. पण जात, धर्म वा मालमत्तेचं आमिष मला तुझ्यापासून दूर ठेवू शकलं नाही. आपल्या दोघांच्यामध्ये जी भिंत होती ती होती मोहाची भिंत—अज्ञानाची भिंत. ती आता कोसळली आहे पुनी. मी परतून पुन्हा तुझ्यापाशी आलो आहे. आता ऊठ बघू. अशी बसून काय राहिली आहेस ? तुझा सख्खा भाऊ तुझ्या घरी आला आहे. हास बघू आता. ही काय रडायची वेळ आहे होय ? ऊठ..."

पुनी विस्मित होऊन—व्यथित होऊन भावाकडे बघत होती. सनियानं पुढं म्हटलं, " ऐक, तुझ्या दादाच्या घशाला कोरड पडलीय. जा, वाडग्यात थोडे ' परवाल '

(पाण्यात भिजवलेले तांदूळ) घेऊन ये. तुझ्या हातून ' परवाल ' खाल्ल्यावरच माझ्या जिवाला चैन पडेल."

" हे काय करतोस दादा ?" पुनीनं म्हटलं, " मी आता अस्पृश्य आहे. तू आठवणीनं मला भेटायला आलास, माझ्या बाळाला कडेवर घेतलंस—तेवढंच खूप झालं माझ्यासाठी. आभाळातला चंद्र जरी माझ्या हाती आला असता तरी मला इतका आनंद झाला नसता. आज माझ्या आनंदाला सीमा नाही. गेल्या जन्मी मी नक्कीच पाप केलं असेल. म्हणून मला अस्पृश्य व्हावं लागलं. दुष्काळात इतकी माणसं मेली पण मी कपाळकरंटी मात्र जिवंत राहिले. मला काही मरण आलं नाही. स्मशानात असाहाय्य होऊन पडले होते. पण अस्पृश्य बाऊरी मधु भोई मला कोल्ह्याकुत्र्यांच्या तावडीतून सोडवून घरी घेऊन आला. त्याच्याबरोबर जाण्याखेरीज मला गत्यंतरच नव्हतं. माझा जीव बचावला. तेव्हापासून मी त्याच्याच घरी राहतेय. भरीला हे पाप माझ्या पोटी जन्माला आलंय. आता तूच सांग मी काय करू ? या नरकात सारखी तळमळत असते. पण तुझ्याकडे कशी येऊ ? तुला तोंड दाखवायला जागाच नाही मला. म्हणून मी इतके दिवस तुला भेटायला आले नाही."

पुनीनं डोळे पुसले. मग म्हणाली, " कितीदा तरी आत्महत्या करायचा विचार मनात आला. पण करता आली नाही. मला मृत्यूच्या दाढेतून ओढून काढणाऱ्या, माझ्यासाठी इतके कष्ट झेलणाऱ्या, माझ्या कुशीत बाळ देणाऱ्याच्या तोंडाकडे पाहिलं की मरायचा माझा सारा आवेश थंड होऊन जायचा."

चकित होऊन सनिया पुनीच्या तोंडाकडे पाहत होता. म्हणाला, " तू नीट ओळखलं नाहीस पुनी. ज्यानं तुला जीवदान दिलं, तुझ्यावर प्रेम केलं तो तुझा पती आहे, परमेश्वर आहे. किती पवित्र आहे तुझं बाळ ! माणसाचं मूल नेहमीच पवित्र असतं. तो काही कलंक किंवा पाप नव्हे. त्यात लाजिरवाणी गोष्ट कुठलीच नाही. तुझा संसार खरंच दृष्ट लागण्यासारखा आहे."

पुनी अस्वस्थ झाली होती. म्हणाली, " या वाटेनं खूप रहदारी चालू असते. माणसांची वर्दळ असते. लोक जाता येता बघत असतात. तू इथून निघून जा सनिया दादा. लोकांनी तुला इथं पाहिलं तर तुलादेखील अस्पृश्य ठरवून टाकतील."

" लोकांना मी भीत नाही."

" छे, छे, असं करू नकोस दादा. परिडा घराण्याचं नाव धुळीला थोडीच मिळवायचं आहे ? बनेई परिडाचा निर्वंश का करायचा आहे ? तू जर अस्पृश्य झालास तर आपल्या सात पिढ्यांच्या पूर्वजांना पाणी कोण देईल ? घरात दिवा कोण लावील ? तुझ्या पाया पडते दादा. तू जा इथून. घरसंसार मांड, घराण्याचं नाव उज्ज्वल कर. तुला सुखासमाधानात पाहिलं की या नरकातही माझ्या मनाला शांती लाभेल."

सनियाला वाटलं, " किती मूर्ख आहे पुनी. समाजाच्या अत्याचारांमुळे ती स्वतःला अस्पृश्य समजतेय. एका मुलाला जन्म दिला आहे. देवबाळासारखं किती पवित्र आहे ते मूल. तरी ती मात्र स्वतःला पापी समजतेय. मुलाला पापाचं फळ समजतेय. पण तिच्याशी वाद घालून तरी काय उपयोग ? स्वर्ग आणि नरक एवढंच जिला ठाऊक आहे, जिच्या मानगुटीवर देवाधर्माचं भूत बसलेलं आहे तिला सत्याचा प्रकाश दाखविणं व्यर्थ आहे. त्या प्रकाशानं तिचे डोळे दिपून जातील. फायदा काहीच होणार नाही."

सनिया मग आणखी काही बोलला नाही. उठून उभा राहिला.

पुनीदेखील उठून उभी राहिली. मुलाला कडेवर घेऊन जरा बाजूला सरकली.

सनिया निघाला. पुनीच्या घरातून बाहेर पडला. एकदाही त्यानं तोंड वळवून मागे पाहिलं नाही.

सूर्य वर आला होता. गावातल्या रस्त्यावर लोकांची जा ये सुरू झाली होती. सनियाच्या मनाला एकच गोष्ट सारखी टोचत होती. त्याच्या सख्ख्या बहिणीनं, पुनीनंही, त्याला टाकलं.

मुलाला कडेवर घेऊन पुनी उभी राहिली. तिला भास झाला, परिडा घराण्याच्या पवित्र रक्ताची किती तरी लहान लहान बाळं सनियाच्या पाठोपाठ धावताहेत.

पुनीनं दीर्घ उसासा सोडला. मनात असंख्य कल्पना फुलल्या. भास झाला, परिडा वंशाचा वंशवृक्ष बहरला आहे. इतका की त्यावर नजर ठरत नाही आहे.

धोबीसाठी काय बरं करावं ? धोबीची आई याचाच विचार करीत होती. रात्रभर ती रडत होती. सकाळीदेखील अंथरुणातून बाहेर पडली नव्हती.

उन्हं वर आली. गडीमाणसांनी सकाळचं साफसफाईचं काम आटोपलं. पण धोबीच्या आईनं तोंडदेखील धुतलं नाही. निधीची बायको चोरपावलांनी आत आली. थोरल्या जावेचे पाय चेपीत म्हणाली, "उठा आता. इतकं काय मनाला लावून घेताय ? भाऊजीं-वर रागावून तुम्ही आपल्याच जिवाचा संताप करून घेताय. तेदेखील रागारागानं आज सकाळीच दुर्गापूरला निघून गेलेत.

" सकाळी मेणा बाहेर ठेवलेला दिसला. भोईदेखील उभे होते. काय आहे म्हणून मी चौकशी केली तेव्हा कळलं की ते दुर्गापूरला जाणार आहेत. आता ते गेलेसुद्धा ! "

मनातल्या मनात धोबीची आई कसलासा विचार करू लागली. धाकटीनं पुन्हा म्हटलं, " उठा ना जाऊबाई. कालपासून तुम्ही अन्नाला स्पर्श केलेला नाही. माझी शपथ आहे तुम्हाला. उठा आता..."

देवाला दूषण देत धोबीच्या आईनं म्हटलं, " देव तरी कसा डोळे मिटून बसला

आहे. जीवदेखील घेत नाही. आता काय ठेवलंय नशिबात..." मग जरा थांबून विचारलं " निधि कुठं आहेत ?"

" बाहेर आहेत."

" बोलाव बघू त्यांना."

धाकटी निघून गेली. पलंगावर बसल्याबसल्या धोबीची आई विचार करू लागली, असं सकाळीच दुर्गापूरला कशासाठी बरं गेले असतील ?"

थोड्याच वेळात निधी आले. त्यांनादेखील धोबीच्या आईनं तोच प्रश्न अगोदर विचारला.

" दादांनी तर मला काहीच सांगितलं नाही, वहिनी !" निधींनी उत्तर दिलं. धोबीची आई चिडली. ओरडून म्हणाली, " काहीच सांगितलं नाही ? माझ्यापासून लपवताय ? या सान्याच्या मुळाशी तुम्हीच आहात, समजलं ? तुम्ही जर त्यांच्या बोलण्याला होकार दिला नसता, अडून राहिला असता तर माझ्या धोबीचं लग्न नसतं का झालं ?"

निधि काही बोलले नाहीत. त्यांनी विचार केला, दादा आणि वहिनी दोघंही आदरणीय आहेत. त्यांच्यासमोर काही बोलणं योग्य नव्हे. पण त्यांच्या या मौनामुळं त्यांची बायको मात्र रागावली. ती तिथून निघून गेली. धोबीच्या आईनं पुन्हा विचारलं, " आता का दातखीळ बसली ? बोलत का नाही ?" निधींनी उत्तर दिलं, " खरंच, दादांनी मला काहीसुद्धा सांगितलेलं नाही. सकाळीच उठून ते निघून गेले. त्यांची गाठच पडली नाही."

" हो, हो, ते का गेलेत ते मला ठाऊक आहे. आता ते विदेईला दत्तक घेण्यासाठी धोबीला भाग पाडतील. तुम्हाला हे सर्व मान्य आहे ना ?"

निधींनी किंचित स्मित करून म्हटलं, " त्याची काळजी नको वहिनी, माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी हे होऊ देणार नाही."

" खरं ?"

" हो खरंच, वहिनी. मी हे होऊ देणार नाही. दादा रागावले तर मी माझ्या मुलाबाळांना घेऊन कुठंतरी निघून जाईन. ही सर्व मालमत्ता दादानं कमावली आहे. माझा त्यात काहीच वाटा नाही. ज्या घरात असमाधानाचा अग्नी सतत धुमसत असतो तिथंच ठाण मांडून मी तुम्हा सर्वांच्या मनाला आणखी वेदना होऊ देणार नाही. दादा रागावले तर रागावू दे. मला त्यांची धनदौलत मुळीच नको. मोलमजुरी करून जे काही मिळेल त्यावर मी माझ्या मुलाबाळांचं पोट भरीन."

निधीचं बोलणं ऐकून धोबीची आई आणखी चिडली. तिच्या डोळ्यांतून जणू स्फुल्लिंग बाहेर पडू लागले. वहिनीचं हे रौद्र रूप निधींनी कधीच पाहिले नव्हते. ते अतिशय घाबरले.

धोबीची आई किंचाळली, " गप्प बसा निधीभाऊजी. मुलं काय तुमची आहेत ?

तुम्ही त्यांचं पालनपोषण करून त्यांना वाढवलंय ? त्यांना कधी कडेवर घेतलं होतं का तुम्ही ? धाकटीनं त्यांना जन्म दिला खरा. पण कुणाच्या मांडीवर ही पोरं मोठी झाली ? कुणाचं दूध प्यायली आहेत ?"

संतापानं धोबीची आई थरथरत होती. पण ज्या डोळ्यांतून ठिणग्या बाहेर पडत होत्या तिथून आता अश्रुधारा वाहू लागल्या.

वहिनीचं बोलणं निधीच्या मनाला लागलं. खेद आणि भय यांनी ते बेचैन झाले. वहिनीच्या मनावर घाव झाल्याचं त्यांनी ओळखलं. वहिनीकडे त्यांनी नेहमी आई म्हणूनच पाहिलं होतं. वहिनी कधीही त्यांना अशी टाकून बोलली नव्हती. ती घरची लक्ष्मी होती. तिच्याच प्रेमळ छत्राखाली घरातील सर्व मुलं वाढली होती. आज का म्हणून त्यांनी वहिनीच्या मनाला जखम केली ? हे विचार मनात येऊन निधीना वाईट वाटलं.

धोबीच्या आईनं पुन्हा म्हटलं, " भावाशी भांडून किंवा त्यांच्या लाल डोळ्यांच्या भीतीनं तुम्हाला घर सोडून जायचं असेल तर जा. ज्याला स्वतःचं बळ माहीत नाही तो डोकं आपटून जीव देतो. पण माझ्या मुलांचं नाव नका घेऊ. जायचं असेल तर जा एकटे. मुलांना घेऊन जायची भाषा काढली तर सांगून ठेवते या घराला आग लावून टाकीन. लक्षात ठेवा."

आरडून ओरडून धोबीची आई गप्प झाली.

निधीनी हात जोडून म्हटलं, " वहिनी, मी मुलांचं नाव नाही घेणार. पण दादा किती हेकट आहेत ते तुला ठाऊक आहे. त्यांचं ऐकलं नाही तर ते हट्ट धरून बसतात. कितीही केलं, हातपाय जोडले तरी जाम ऐकत नाहीत. विदेईला दत्तक घेण्याच्या कामात मी जरूर अडथळा आणीन. सहजासहजी तसं करू देणार नाही. पण दादांनी जर ऐकलं नाही तर मी काय करणार ? घर सोडून जाण्याखेरीज दुसरा उपायच माझ्यासमोर राहणार नाही. म्हणूनच मी घर सोडून जायचं ठरवलंय."

धोबीची आई पुन्हा किंचाळली, " कुठं जाणार ते मलाही ऐकू देत बघू जरा. चार परक्या माणसांनी मला खांद्यावरून स्मशानात पोचवावं हेच तुमच्या मनात आहे ना ? मी काय तुमच्यासाठी काहीच केलेलं नाही ? मी पुन्हा सांगून ठेवते. हे कालत्रयी शक्य नाही. माझं प्रेत खांद्यावरून स्मशानात पोचवा मग काय वाटेल ते करा."

जरा थांबून धोबीची आई पुन्हा म्हणाली, " ठीक आहे. आजपासून मी धोबीचं नाव ओठावर येऊ देणार नाही. मी तिला जन्म दिला असला तरी तुम्हीच तिला वाढवली आहे. ती विधवा झाली त्याच दिवसापासून माझ्या दृष्टीनं मेली. हो, मेली—मेली आहे..."

वहिनीची ही मानसिक व्यथा निधींना सहन झाली नाही. घरातल्या सर्व मुलाबाळांत धोबी सर्वात मोठी होती. पण धोबीच त्यांची सर्वात जास्त लाडकी होती. धोबीच्या

पाठीवर आणखी तीन मुलं या घरात आली होती. पण त्यांच्याशी जणू निधीची ओळखच झाली नव्हती. खरं तर दादाच्या प्रत्येक गोष्टीला अशी मान तुकवणं, अन्यायाविरुद्ध ब्रदेखील न काढणं काही योग्य नव्हे. काही ना काही करायलाच हवं. धोबीचं सनियाशी लग्न लावून द्यायला हवं. त्यासाठी मग दादाशी भांडावं लागलं तरी बेहत्तर...

निधी व्यथित झाले. वहिनीच्या पायांवर डोकं ठेवून म्हणाले, " वहिनी, धोबीची तू मुळीच काळजी करू नकोस. दादाची हुकूमशाही मी काही नेहमी चालू देणार नाही. मी तुझ्या पायांची शपथ घेऊन सांगतो की धोबीचं लग्न होणार आणि सनियाशीच होणार."

भिंतीआडून विदेईची आई बघत होती. निधींचं बोलणं ऐकताच नाराज होऊन ती स्वयंपाकघरात निघून गेली.

काय घडतंय याकडे धोबीच्या आईनं मान वर करून पाहिलंसुद्धा नाही.

हां हां म्हणता पाच दिवस निघून गेले. सनिया कुठं गेला ? रहीम विचारात पडला होता. काहीसुद्धा न सांगता पाच दिवसांपासून सनिया बेपत्ता आहे. बिशी सामल मजुराला तो सनियाविषयी सारखा विचारीत होता. पण बिशी तरी काय सांगणार ? त्याला स्वतःला तरी कुठं काय ठाऊक होतं ? रहीमनं इतरांनाही विचारलं. पण सर्वांचं आपलं एकच उत्तर, " आम्हाला नाही ठाऊक !"

रहीम कामात कधी कसूर करीत नसे. मन लावून सारं काम करायचा. बिशीबरोबर भाज्यांच्या वाफ्यांत काम करायचा. गायीम्हशी, शेळ्यांची देखरेख करायचा. घरावर लक्ष ठेवायचा आणि बाहेरच थोडासा भात शिजवून खायचा. रात्री नारळाच्या झावळ्यांपासून बनविलेल्या चटईवर झोपायचा. पहाट होताच पुन्हा त्याचं काम सुरू व्हायचं.

निधी सोईनी निरोपावर निरोप धाडले होते. स्वतः येऊन पाहून गेले होते. पण सनियाचा पत्ता नव्हता. राम प्रहराजदेखील एक दोनदा आले होते. 'रज' (ओडिसातला एक लोकप्रिय सण) जवळ येत असल्याचं आणि 'रज'च्या अगोदर दोन तीन रात्री रामलीला व्हायला हवी असल्याचं प्रहराजनी सांगितलं होतं.

जमीनदाराचा गुमास्ता गोविंद प्रधान यानं सनियाला निरोप धाडला होता की तळ्यातून काही मासे पकडून पाठव. मासे पकडायला जाळं घेऊन काही लोक आलेही होते. पण रहीमनं त्यांना मासे पकडू दिलं नाही. कारण सनियानं त्याला काहीच सांगितलेलं नव्हतं आणि सनियाच्या परवानगीशिवाय कसं कुणाला मासे धरू द्यायचं ?

गावात भटकणारी एक वेडीदेखील सनियाच्या घरी आली होती. ती सांगत होती, "सनिया माझा नवरा आहे, मी त्याची नवरी. इथंच राहणार मी. हेच माझं घर." पण

गावची पोरं तिच्या पाठी लागली होती. त्यांनी तिला भंडावून सोडलं होतं.

रहीमनं तिला खाऊ घातलं होतं. पण पोरं मात्र टाळ्या वाजवीत तिच्या मागं धावत होती. तिला वेडावत होती, " कई वेडी, कई वेडी—"

गेला कुठं सनिया ? रहीमला काहीच उमजत नव्हतं.

धोबी तळमळत होती—मनाच्या व शरीराच्या पीडेनं ! ज्या खोलीत एके दिवशी हरी महांतीनं प्रेताचा अंगठा साध्या कागदावर उठवला होता, त्याच जागी धोबी झोपली होती. चितेई सोई जवळ बसले होते. थोड्या अंतरावर दिवा तेवत होता.

चितेई सोई गंभीरपणे बसले होते. मनात असंख्य विचारांचा धुमाकूळ माजला होता. आपण आयुष्यात जी कामं केली त्यांपैकी कोणती योग्य होती आणि कोणती अयोग्य याचाच ते सारखा विचार करीत होते.

त्यांची एकुलती एक मुलगी धोबी आज वेदनांमुळे अंथरुणावर पडली होती. कालच ती जन्माला आल्यासारखं वाटतं होतं. पण तिच्या सुखाचा त्यांनी कधीच विचार केला नव्हता. ते नेहमी रुपये, पैसे, धनदौलत यांतच अडकून राहिले. नायक घराण्याची संपदा सोई घराण्याच्या संपदेत मिसळून टाकण्यासाठी त्यांनी किती प्रयास केले. पण सारे व्यर्थ ! बायकोशी भांडून ते गुपचूप दुर्गापूरला आले होते. विदेईला दत्तक घेण्यासाठी धोबीला भाग पाडायचा त्यांचा बेत होता. तिनं बऱ्याच मालमत्तेची विल्हेवाट लावली होती. आताच जर काही केलं नाही तर उरलेल्या मालमत्तेचीदेखील वाताहत होईल अशी काळजी त्यांना वाटत होती.

दुर्गापूरला पोचताच हरी महांतीनं सारं काही त्यांच्या कानावर घातलं. मोलकरणींना बोलावूनही चितेई सोईंनी चौकशी केली. सनिया काल रात्री आला होता आणि पहाटे-पूर्वीच निघून गेला होता. चिखलानं माखलेले त्याचे कपडे अजून ओसरीखाली पडले होते. क्षुल्लक गोष्ट होती. पण बोलण्याच्या पद्धतीवरून राईचा पहाड होणं सहज शक्य होतं. जरा भुवई उंचावून बोललं की त्यातून कितीतरी अर्थ काढता येणार होते. बोलण्याच्या पद्धतीवरूनच 'हो'चं 'नाही' आणि 'नाही'च 'हो' करणं शक्य होतं—पौर्णिमेला अमावस्येत आणि अमावस्येला पौर्णिमेत बदलता येणार होतं.

अंधार ? हो, सोईंच्या मनात अंधार दाटला होता—त्यांनी सारं काही ऐकलं होतं. मनात इतका राग होता की त्याच्या धारेनं मुंडकं धडावेगळं व्हावं. वाटलं, याचसाठी धोबी इतके दिवस त्यांच्यापासून दूर राहत होती. सनिया रोज येतो का इथं ? लोकांना तो एक दिवस दिसला. पण यापूर्वी कदाचित तो वारंवार आला असेल. सनिया दुष्काळाच्या तावडीतून सुटून आला होता. कसाबसा तो बचावला. जिवंत राहिला,

जातीत आला, घर बांधलं, मालमत्ता मिळवली पण् इतकी धनदौलत कुठून आली ?

धोबीनं काही दिलं का ?

चितेई सोईच्या मनात पुन्हा पुन्हा एकच प्रश्न घर करीत होता. धोबीनं सनियाला पैसे दिले का ? किती लाजिरवाणी गोष्ट आहे. त्यांच्या एकुलत्या एका मुलीनंच त्यांच्यावर मान खाली घालायचा प्रसंग आणावा ना ? मनात आणलं तर फुंकरीसरशी सनिया व त्याचा जमीनजुमला उडवून टाकता येईल. पण हा कलंक कसा पुसणार ? आता काय करावं ?

बल्ली मोलकरणीनं येऊन सांगितलं, " आईसाहेब अजून देवघरात पडल्या आहेत. मधून मधून मुलीसारखं रडताहेत. इतका वेळ झाला अजून दार उघडून बाहेर आलेल्या नाहीत."

चितेई सोईंनी विचार केला, अशा परिस्थितीत धीर सोडता कामा नये. घाईगर्दीत काही काम केल्यास त्याचा परिणाम घातक होईल. लोकांनाही मिटक्या मारीत चघळायला एक विषय सापडेल. धोबीला आता एक मिनिटही इथं ठेवून उपयोगाचं नाही.

त्यांनी म्हटलं, " तुझ्या बाई देवघरातून बाहेर आल्या म्हणजे त्यांना म्हणावं की त्यांची आई आजारी आहे आणि मी त्यांना न्यायला आलोय."

चितेई सोई देवळात उतरले होते. एकेक क्षण त्यांना युगासारखा वाटत होता. विदेई-देखील एकदोनदा येऊन परत गेला होता. मोठ्या काकांना तो अतिशय घाबरायचा. म्हणून त्यांच्यापाशी फारसा येत नसे. चितेई सोईनीदेखील त्याला बोलावलं नव्हतं.

दुपार. बाईंना खूप ताप आल्याची बातमी बल्ली मोलकरणीनं दिली. आंग इतकं तापलं होतं की धान ठेवल्यास त्याच्या लाह्या व्हाव्यात. डोळे उघडवत नव्हते.

चितेई सोईंना वाटलं की धोबीची विष्णुपूरला जायची इच्छा नाही. म्हणून तापाचं निमित्त केलं आहे. खरं खोटं काय ते स्वतःच जाऊन पाहायला हवं. ते बघायला आले.

अरेच्या ! खरंच ताप आहे की ! त्यांनी हाक मारली, " धोबी."

धोबीनं डोळे उघडून पाहिलं. ती अतिशय बेचैन होती. पलंगावरच उठून बसली. चितेई सोईकडे तिनं पाहिलं. मग वडिलांचा हात धरून ओक्साबोक्शी रडू लागली. पहिला भर ओसरल्यावर म्हणाली, " बाबा, काय झालं आईला ? मी जाईन, नक्कीच जाईन."

चितेई सोईंना विचार पडला की आता काय बोलावं ? थोडं थांबत थांबत म्हणाले, " घाबरायचं काही कारण नाही धोबी. थोडंसं काही झालं होतं. पण होईल लवकरच बरी. तुला तर खूप ताप चढलाय. तुला कसं जाता येईल ? ताप कमी होऊ दे. मग जाऊ

उद्या नाही तर परवा."

धोबी गप्प राहिली.

ताप उतरला नाही. अंथरुणात धोबी तळमळायची. आपल्या रागाचा, अहंकाराचा चिंतेई सोईना विसर पडला. धोबीच्याच शुश्रूषेत ते दंग झाले. तीन दिवसांनी धोबीच्या अंगावर सूज दिसू लागली. अंगभर देवी निघाल्या. खूप त्रास होत होता. धोबी अंथरुणाला खिळली होती. हे बघून चितेई सोईचं मन विरघळलं.

आजूबाजूच्या गावांतून देवीची साथ आली होती. दुर्गापूरमध्येही देवीनं दोन तीन माणसं दगावली होती. हे सर्व पाहून चितेई सोई हताश झाले होते. असंख्य विचार त्यांच्या मनात येत होते. ते विचार करीत होते, " धोबी जर गेली तर नायक घराण्याची सारी संपत्ती हातातून जाईल आणि संपत्ती राहिली तरी त्याचा काय फायदा ? जिच्यासाठी त्यांना संपत्ती ठेवायची आहे ती तर या जगात नसणार."

हा विचार मनात येताच चिंतेई सोई दचकले. नायक घराण्याच्या संपत्तीचा उपभोग कोण घेणार ? त्या उपभोगासाठी कुणी जिवंत तर राहायला हवं ना ? माणसाला जगण्यासाठी काय हवं असतं ? अन्न आणि वस्त्र, बस्स ! या वस्तू जवळ असल्यावर मग अन्य मालमत्ता असो वा नसो—त्यानं काय फरक पडणार आहे ? लोक कशासाठी मालमत्ता कमावतात ? कमावण्याचं काम त्यामुळं तडीस जातं एवढंच ! सोई आता म्हातारे झाले होते. धोबी जर गेली तर मालमत्ता मिळवण्याचा काय व कोणता हेतू पूर्ण होणार आहे ?

चिंतेई सोई विचार करीत होते. अशा तऱ्हेचे किती तरी विचार त्यांच्या मनात आले आणि ते दचकले. हो, मालमत्ता जर राहिली तर निधीचा मुलगा विदेई सुखात राहील. पण त्यानं काय होणार आहे ? विदेई त्यांचा पोटचा मुलगा नव्हता. निधी त्यांचा सख्खा भाऊ नव्हता.

रक्त इतकं काही दाट असत नाही. दिवसेंदिवस ते पातळ होत चाललं आहे. भावी काळात कित्येक अन्य लोकांच्या रक्ताची चिंतेई सोईच्या वंशजांच्या रक्तात भेसळ होणार काय ? कित्यक पिढ्यांनंतर चिंतेई सोईच्या वंशजांना आणखीही बरेचसे लोक म्हणतील हे आमचे वंशज आहेत—हीच तर जगरहाटी आहे.

धर्म, वर्ण, जात इत्यादींचा अर्थ काय ? हजार वर्षांनंतरचा माणूस आपली कशी काय ओळख करून देणार ? तो कदाचित स्वतःला ओळखणारच नाही. त्याची त्यालाच बहुधा खरी ओळख नसणार. त्या वेळी कदाचित तो हेच सांगेल की, " मी आहे मानवाचा पुत्र. सर्वजण माझे पिता आहेत, सर्वजण माझे पुत्र आहेत. मी आहे मानव-मानव ! हे छोटसं जग हेच माझं घर आहे. या घरात जे काही आहे ते सर्व माझं आहे—म्हणजेच मानवाच्या पुत्राचं आहे. माझ्याप्रमाणेच पित्यांचं व पुत्रांचं आहे. सर्व-

जण ही संपत्ती वापरतील. सर्वांना जगायचा हक्क आहे."

चितेई सोईना वाटलं, चुकलंच आपलं. नायक घराण्याच्या संपत्तीची हाव सोडून आणि परिडा घराण्याविषयीचा द्वेषभाव सोडून आपण जर सनियाशी धोबीचं लग्न लावून दिलं असतं तर छान झालं असतं. आज घरात जे क्षुब्ध वातावरण आहे ते तरी निदान राहिलं नसतं.

धोबीनं कूस पालटली. आंग दुखत असल्यानं व ताप चढल्यानं तिची नुसती तडफड व्हायची. ती कण्हली. आवाजामुळं चितेई सोईंची विचारधारा मोडली. दचकून ते ताठ बसले. अतिशय प्रेमळ स्वरात म्हणाले, " धोबी बाळ, फार त्रास होतोय का ?"

" ऊं ऊं ऊं—" धोबीच्या तोंडून शब्द फुटला नाही.

" काय बाळ ?"

कूस पालटून धोबी पुन्हा झोपली. तिनं काहीच उत्तर दिलं नाही.

चितेई सोईं टक लावून धोबीकडं बघू लागले. अजूनपर्यंत निधीला काहीच कळलं नव्हतं. निरोप मिळताच धोबीची आई धावत येईल. चितेई सोईना वाटलं, " अशा वेळी धोबीची आई इथं असायला हवी. नाही तर मुलीची शुश्रूषा कोण करणार ?"

चितेई सोईनी दुसऱ्या दिवशी विष्णुपूरला पत्र पाठवलं. धोबीच्या आईला बरोबर घेऊन निधी दुर्गापूरला पोचले. चितेई सोईच्या मर्जीनुसार विदेई विष्णुपूरला गेला. चितेई सोईनी म्हटलं की, " ज्या घरात कुणाला देवी आलेल्या असतील त्या घरात विदेईसारख्या लहान मुलानं राहणं योग्य नव्हे." चितेई सोईनी निधीलादेखील विष्णु-पूरला परत जायला सांगितलं. पण निधीनी त्यांचं बोलणं ऐकलं नाही आणि दुर्गापूरलाच राहायचा निश्चय केला.

सायंकाळ झाली होती. पाच दिवस इकडे तिकडे भटकून सनिया घरी परतला होता. तो एक नवीन आदर्श मनाशी घेऊन आला होता. रहीम फाटकाशी उभा राहून वेड्या कईचा विचार करीत होता. रोज ती घरात यायची आणि तिचं आपलं एकच पालुपद असायचं, " हे माझं घर आहे. सनिया माझा नवरा आहे." रहीमनं तिला खूप समजावलं होतं. पण तिला काही समजेल तर ना ? रहीम खाऊपिऊ घालून तिची बोळवण करायचा.

सनियादादा ! सनियाला दुरून बघताच रहीम विचलित झाला. धावत पळत तो सनियापाशी गेला. सनियाच्या ओठांवर जणू पंचमीच्या चंद्राचं स्मित विलसत होतं. त्याच्या अंगातून नवीन संकल्प, नवे आदर्श सळसळत होते.

रहीमचे डोळे आसवांनी डबडबले होते. पण त्याकडे सनियाचं लक्ष गेलं नाही.

व्याकूळ होऊन रहीमनं विचारलं, "कुठं गेला होता सनियादादा ?"

रहीम नमस्कार करायला विसरला होता. सनियादादाचा हात धरून त्याला मिठी मारावी असं त्याला खूप वाटलं. पण पिढ्यान् पिढ्यांचे संस्कार आड आले.

रहीम विधर्मी आहे—मुसलमान आहे. याच देशात त्याचा जन्म झाला होता. पण त्याचे बंधुबांधव, नातलग पश्चिमेकडच्या कुठल्याशा वाळवंटाच्या दिशेला पाहत होते—जणू तिथूनच ते आले होते. या देशात जन्माला येऊनही ते जणू या देशाचे पाहुणे होते. सनियाचे जातभाई रहीमला दूर का ठेवत होते ? तोदेखील भारतमातेचाच पुत्र होता.

माणूस आपला धर्म बदलू शकतो, पण रक्त नाही बदलू शकत. धर्माबरोबर रक्त बदलत नसत—आपले आईवडील वा पूर्वज बदलत नसतात. माणूस आपलं खाद्य बदलून पशू होत नसतो—तो माणूसच राहतो. एकाच आईच्या पोटची लेकरं धर्म बदलल्यानं काही एकमेकाचे शत्रू होत नसतात.

रहीमला कुणी अस्पृश्य केलं ? सनियानं ! रहीम स्वत:ला लहान समजायचा—आपल्याला परदेशी मानायचा. एकाच घरात राहूनदेखील तो स्वत:ला सनियाहून वेगळा समजायचा. का ?

"इतके दिवस कुठं होता, सनियादादा ?"

सनियानं रहीमचे हात धरून म्हटलं, "मी वाट चुकलो होतो रहीम. आता मला मार्ग सापडला आहे. चल, घरी चल."

दोघे घरी परतले.

त्याच दिवशी, रात्री—

एकाच ताटात भात वाढला होता. रहीम अगोदर या गोष्टीला कबूल होईना. म्हणाला, "नको, सनियादादा ! तुमची जात जाईल. तुमचा धर्म भ्रष्ट होईल. लोक तुमचा तिरस्कार करतील. वेड का लागलंय तुम्हाला ?"

सनियानं उत्तर दिलं, "खरंच मला वेड लागलं होतं रहीम. पण आता मी ताळ्यावर आलोय. या घरात—या छपराखाली जो कुणी येईल तो हेच अन्न खाईल—आणि याच ताटात खाईल, समजलं ?"

सनियानं पुन्हा म्हटलं, "सर्वांना कष्ट करावे लागतील. सर्वजण घाम गाळून कष्ट करतील आणि पृथ्वीमातेच्या कुशीतून आपलं अन्न मिळवतील. जे काही मिळेल ते सर्वजण वाटून खातील. कुणी कुणाच्या धर्मावर, कुणाच्या आचरणावर आक्षेप घेणार नाही. सगळे एकमेकांवर प्रेम करतील, एकमेकांचा आदर करतील. लोक ज्यांना लाथा घालून हाकलून देतील ते सर्व इथं येतील. इथं त्यांना आधार मिळेल. रहीम, याच झोपडीत आपण मानवाचा नवा समाज उभारू या."

रहीम आ वासून सनियाकडे बघत होता. त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

सनियानं विचारलं, " असा बघत काय राहिलास ? ये, बैस इथं."

यंत्रवत रहीम पुढं आला. सनियाच्या समोर बसला. ताटात भात वाढलेला होता. रहीमच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. हातात भाताचा घास घेऊन सनियानंच स्वतःच्या हातांनी तो रहीमला भरवला. रहीमच्या अंगात जणू नवचैतन्याचा संचार झाला. त्याचे डोळे आपोआप मिटले गेले. सनियानं पुन्हा म्हटलं, " रहीम, माझा धाकटा भाऊ रहीम ! खा, अरे पोटभर खा. तुला जेवू घातल्यानं माझं पोटही भरेल."

रहीमनं म्हटलं, " पण मलाही तुझ्या तोंडात घास द्यावासा वाटतंय. तुला खाऊ घातल्याशिवाय माझंही पोट भरणार नाही."

रहीमनंदेखील सनियाला घास भरवला.

'रज' पर्व होता. (हा 'रज' उत्सव ओडिसात आषाढाच्या प्रतिप्रदेपासून तीन दिवस साजरा करतात.)

ठाकुरद्वारच्या समोर चबुतऱ्यापाशी गावच्या युवकांचा हुतुतूचा खेळ चालला होता. दुपारची वेळ होती. आभाळ भरून आलं होतं. गावकरी मोठ्या उत्साहानं सण साजरा करीत होते. आनंदीआनंद होता. राम प्रहराज चबुतऱ्यावर बसून काही लोकांबरोबर सोंगट्या खेळत होते. या खेळात भाग घ्यायला चिंतेई सोई नव्हते. ते असते तर खेळाला आणखी रंग चढला असता. खाण्यापिण्याचा कार्यक्रमही अगोदर ठरला होता.

पण चिंतेई सोई नसल्यानं तो आयत्या वेळी रद्द करण्यात आला होता.

वेडी कई कुठूनशी येऊन चबुतऱ्यापाशी पोचली.

याच गावची मुलगी आहे ती. माधो राऊत तिचे वडील होते. याच ठाकुरद्वारसमोर हसत खेळत ती मोठी झाली होती. दुष्काळाच्या फेऱ्यात पोटाची आग विझवायला तीदेखील एक दिवस आपला गाव सोडून आपल्या वडिलांबरोबर निघून गेली होती. पण तिच्या वडिलांनी रस्त्याकाठीच राम म्हटला. कई एकटी राहिली.

गतकाळच्या गोष्टी कईला आता नीटशा आठवत नाहीत. पोटासाठी ती अनेक ठिकाणी भीक मागत हिंडली होती. मग एके दिवशी ती गरोदर राहिली होती. कई आई झाली होती. आपला आणि पोराचा जीव वाचवण्यासाठी तिनं पुन्हा भीक मागायला सुरुवात केली होती. पोराला कडेवर घेऊन ती भीक मागायची. तिला कुठंच आसरा मिळाला नव्हता. कुणीही तिला जरासुद्धा सहानुभूती दाखवली नव्हती. शिव्यांखेरीज लोकांकडून तिला काहीही मिळालं नव्हतं. पण या सर्व गतकाळच्या गोष्टी होत्या. त्या आठवून काय फायदा ? तिनं निमूटपणे सारं सहन केलं होतं. आता कुणी तिला घालून पाडून बोललं तरी ती चुपचाप सारं सहन करते.

एके दिवशी कईचा लाडका एकुलता बाळदेखील देवाघरी निघून गेला. मुलाला

मांडीवर घेऊन ती ओक्साबोक्शी रडली होती. स्मशानात त्याला मूठमाती देऊन ती तिथून पळाली होती-—आणि त्याच दिवसापासून वेडी झाली होती. तिचं क्रंदन थांबलं होतं, अश्रू आटले होते आणि तिनं हसायला सुरुवात केली होती. हसता हसता तिची पुरेवाट व्हायची आणि ती मानवजातीला शाप द्यायची—" ऐक रे मानवा ! तूदेखील मरशील. तूदेखील रडून रडून मरशील."

कई हसायची. मुलाची आठवण झाली की रडायची. समोर कुणी भेटलं तर आपली करुण कथा त्याला ऐकवायची. सर्वांना तिनं आपली दु:खद कथा सांगितली होती. पण आजवर कुणी साधा नि:श्वासदेखील टाकला नव्हता. सर्वांनी तिच्याविषयी तिरस्कारच व्यक्त केला होता. आपल्या वडिलांचं घर ज्या जागी होतं त्या जागी बसून कई खूप रडली होती आणि मग खळाळून हसली होती. बनेई परिडाच्या जमिनीवर जे घर उभं होतं ते जुन्या घराहूनही मोठं होतं आणि तिच्या वडिलांची जमीन ? ती अजून ओस पडली होती. दुष्काळाच्या विक्राळ दाढेतून कई वाचली असली तरी कल्पनेच्या परिघातून अजून तिची सुटका झाली नव्हती. दिवस उलटले होते आणि भूतकाळात आपल्या काय अपेक्षा होत्या, काय स्वप्नं होती तेदेखील ती विसरली होती. आता तिला वाटायचं, ती सनियाची बायको आहे. सनियाच तिचा पती आहे आणि सनियाचं घरच तिचं घर आहे.

पण सनियाच्या घरी राहायचा हक्क तिला नव्हता. घरात दुसराच कुणी माणूस होता. तो तिला खायला देऊन घालवून द्यायचा. पण परत आल्यावर कई ओरडून सांगायची, " सनियाच माझा नवरा आहे आणि मी त्याची बायको."

कईला वेड लागलं होतं. गावकऱ्यांना हे ठाऊक होतं. त्यांनी तिला खूप प्रश्न विचारले होते. कईनं एकच उत्तर दिलं होतं—" सनिया तिचा नवरा आहे. पण त्यानं तिला टाकून दिलं. भुकेमुळं तिचं मूल मेलं.

सनियानं ही गोष्ट कुणालाच सांगितली नव्हती.

कित्येकांना कई वेडी वाटायची, तिचं बोलणं खोटं वाटायचं. पण काही लोक मात्र बोलायचे, करून करून भागली नि देवपूजेला लागली. आगच नसती तर धूर कुठून निघाला असता ? कुठे तरी नक्कीच पाणी मुरतंय. कईच्या बोलण्यामागे काही तरी रहस्य असलंच पाहिजे.

राम प्रहराज कईच्या वडिलांसारखे होते. सोंगट्या खेळता खेळता अचानक त्यांनी दुसरीकडे बघितलं तर तिकडून कई येत होती. प्रहराजनी मुद्दामच खवचटपणे म्हटलं, " अरेच्या कई आली आहे. कई सांग बघू, तुझा नवरा कोण आहे ? तुझ्या मुलाचा बाप कोण आहे ?"

हुतूतू खेळणाऱ्या तरुणांचंही कईकडे लक्ष गेलं होतं. ते सर्वजण तिच्याकडे बघून

हसले होते. पण कईला कशाशी काही कर्तव्य नव्हतं. तिचं आपलं तेच पालुपद चालू होतं—" सनिया माझा नवरा आहे... सनियानं मला टाकलं आहे... "

ऊदी साहू चेष्टेनं म्हणाला, " कई, तुझा सनिया परत आला आहे. जात का नाहीस तू त्याच्या घरी ?"

कईची वटवट थांबली. तिनं चारी बाजूला पाहिलं. खरंच का सनिया परत आला आहे ? कुठं आहे सनिया ?

तिच्या मनातली गोष्ट जणू ऊदी साहूनं ओळखली. त्यानं म्हटलं, " इकडं कुठं शोधतेय त्याला ? तो तर त्याच्या घरी आहे. जा, जा, त्याच्या घरी जा... "

बडबडत कई सनियाच्या घराकडे निघाली. जाता जाता पुन्हा एकवार ओरडून म्हणाली, " हो, हो, सनियाच माझा नवरा आहे—आणि मी त्याची बायको."

कई निघून गेली. मुलं पुन्हा हुतूतू खेळू लागली प्रहराज पुन्हा सोंगट्या खेळण्यात रंगले. सारा गाव जणू खेळात गुंतला. आज ' रज ' पर्व होता.

सनिया पुन्हा आपल्या कामात दंग झाला. रहीम त्याचा साथी होता—त्याचा उजवा हात. दोन मित्रांसारखे सल्लामसलत करून दोघे काम करायचे. नांगर चालवता चालवता सनिया दमला की गवत कापायचं काम थांबवून रहीम त्याच्यापाशी यायचा. " राहू दे सनियादादा ! आता तू जरा आराम कर. मी नांगर चालवतो."

पण सनिया रहीमचं ऐकत नसे. तो पुन्हा नांगर चालवू लागायचा. म्हणायचा, "ही एवढी नांगरट मी करतो. नंतर पुढची तू कर."

संध्याकाळी दोघं घरी परत यायचे. बैल बांधून ओसरीवरच बसायचे. गार वाऱ्यानं घाम सुकायचा. दमल्यामुळे दोघेही थोडा वेळ स्तब्ध बसायचे. एके दिवशी संध्याकाळी, दोघंही ओसरीवर विश्रांती घेत असता सनियानं म्हटलं, " रहीम, इतरांसारखंच आपणही रस्त्याकाठी मेलो असतो की रे. पण आपण मेलो नाही. जिवंत राहिलो. किती आश्चर्य आहे नाही ?"

रहीम उतरला, " आपण जणू मेलोच होतो."

सनिया म्हणाला, " हो, आपण मेलो होतो. आपणही स्मशानात प्रेताबरोबर पडलो होतो. माणसांच्या हाडांचा ढीग होता तिथं. कुणी हिंदू नव्हतं की मुसलमान नव्हतं—सारी हाडं माणसांची होती—एकाच मानवजातीची होती. धर्म, जात वगैरे घेऊन जगणाऱ्यांनी मूठभर भीक काही दिली नव्हती. आपण पुन्हा परतून त्यांच्याचपाशी आलो आहोत. आपलं कर्तव्य काय आहे ठाऊक आहे ?"

" काय ?" रहीमनं विचारलं.

सनियानं उत्तर दिलं, " ज्याला जात व धर्म सोडायला भाग पाडण्यात आलं आहे, ज्याला मानवाच्या लेकरासारखं जगायची इच्छा आहे, त्याला या घरात स्थान देणं हे आपलं कर्तव्य आहे. तो घाम गाळून कष्ट करील आणि त्याला त्याच्या कष्टाचं फळ मिळेल. या घरात धर्माचा वा जातीचा भेदभाव राहणार नाही. हे घर असेल मानव-जातीचं—मेहनतीचं, कष्टाचं ! आपल्या मनाच्या समाधानासाठी जे लोक देवांच्या पायाशी बसतात त्यांना बसू देत तिथं. आपलं काही त्यांच्याशी वैर नाही. इथं जे लोक राहतील ते मात्र आपल्या कुवतीप्रमाणं काम करतील आणि जे काही मिळेल ते आपसांत वाटून खातील."

रहीमनं म्हटलं, " ही तर फारच उत्तम गोष्ट आहे, आपल्या दारी जो कुणी अनाथ, निराधार येईल आपण त्याची सेवाचाकरी करू."

सनिया म्हणाला, " हो, तेच आपलं कर्तव्य, आपला संकल्प !"

सनियाच्या घरी राहायला कुणीसुद्धा तयार झालं नाही. ज्या घरात मुसलमान मुलगा स्वैपाक करतो, हरिजन जातीचा बिशी पाणी भरतो आणि प्रधान वंशाचा सनिया जिथं भात वाढतो, तिथं कोण राहणार ? रस्त्यावरचा भिकारीदेखील तिथं राहायला तयार होणार नाही.

भरतिया चांभार जातीचा होता. काबाडकष्ट करून तो आपलं व आपल्या कुटुंबाचं पोट भरायचा. एके दिवशी मालकाच्या नारळीच्या झाडावर चढून तो नारळ तोडत होता. अचानक पाय घसरला आणि तो खाली पडला. पण पडता पडता शेजारच्या एका घराच्या छपराला अडकला. जीव वाचला. पण सहा महिने अंथरुणावर पडून राहावं लागलं. उठला तेव्हा कंबरडं मोडलं होतं. सरळ उभं राहता येत नव्हतं. बाहूंमध्ये बळ राहिलं नव्हतं. घरात खायला काही नव्हतं आणि भुकेपायी म्हातारी आई मरण पावली होती. त्याची बायको बेंगुलीच त्याला पोसत होती. पण ती तरी किती दिवस पोसणार ? चांगली तरणीताठी होती. गेली एक दिवस दुसऱ्या कुणाशी लग्न लावून. बिचारा भरतिया. एकटा उरला. करणार तरी काय ?

भरतिया आपल्या मालकाच्या घरी जायचा. कधी कधी त्याला तिकडे दोन घास खायला मिळायचे. पण हळूहळू मालकीणबाई रागावू लागल्या. मालकानं त्याला नारळ तोडायला सांगितलं होतं. झाडावरून खाली पडायला थोडंच सांगितलं होतं ? आता त्याच्यानं काम होत नाही. अंगात तेवढं बळ नाही. ही काय मालकाची चूक झाली ? लटलटत्या पायांनी भरतिया रस्त्यावर आला. भीक मागत गावोगावी हिंडू लागला आणि असाच भीक मागत मागत एक दिवस तो विष्णुपूरला आला.

रहीमनं त्याला घरी बोलावलं. सनियाला सारं काही सांगितलं आणि म्हणाला, " सनियादादा, भरतिया झाडाखाली बसून राहील. एखादं जनावर पिकात शिरू लागलं तर हाका देऊन त्याला हाकलून देईल. आपण कामावर गेलो की तो घरची राखण करील."

सनियानं म्हटलं, " ठीक आहे. राहू दे त्याला इथं. आजपासून हादेखील आपला एक भाऊ. गरजेच्या वेळी निदान जवळ तरी राहील, काही बोलेल चालेल, हेच तर आपल्याला हवंय."

भरतियाला सनियाच्या घरी आसरा मिळाला. केळीच्या पानावर तिघंजण एकत्र जेवायचे—एक होता उच्च जातीचा हिंदू, दुसरा मुसलमान आणि तिसरा हरिजन !

भरतियानं पाहिलं की सनियाच्या घरात जातीचा भेदभाव नाही. त्याला वाटलं, पूर्वजन्मीच्या पापामुळंच आपली ही अवस्था झाली आहे, तेव्हा मुद्दाम जाणूनबुजून आणखी पाप कशाला करायचं ? छे, छे, या घरात राहायला नको. इथं जात, धर्म काही नाही. यापेक्षा रस्त्याच्याकडेला मरणं अधिक चांगलं.

सनियानं भरतियाला खूप समजावलं. म्हणाला, " भरतदादा ! जगात फक्त एक जात आहे—मानव जात. एकच धर्म आहे—मानव धर्म. नीट समजून घे. उगाच डोक्यात राख घालू नकोस."

बरंच समजावल्यावर भरतिया कबूल झाला.

भरतियाप्रमाणंच आणखी एक माणूस सनियाच्या घरी आला. तो होता—काशी बेज नाई. त्यानं आपल्या मालकाची खूप सेवाचाकरी केली होती. मालकाला देवी आल्या होत्या तेव्हा काशी सतत त्यांच्या उशापायथ्याशी बसून होता. मालक बरे झाले. पण काशी आजारी पडला. त्याला देवी निघाल्या. ऐन तारुण्यात त्याचे डोळे गेले. आता भीक मागण्याखेरीज दुसरा उपाय त्याच्यासमोर उरला नव्हता. पण सुदैवानं आता त्याला भीक मागावी लागत नव्हती. तोदेखील सनियाच्या कुटुंबातलाच एक झाला होता.

काही दिवसांनी आला म्हातारा जॉन. दुष्काळात जॉनच्या कुटुंबातील सर्वजण मरण पावले होते. साठ वर्षांच्या म्हाताऱ्या जॉननं आता कुणाच्या तोंडाकडे पाहावं ? काय करावं ? त्याला सनियाच्या घरात आश्रय मिळाला.

अखेरीस आली वेडी कई ! ती हसली, रडली, गोंगाट केला आणि देव जाणे काय काय बडबडली. एक मात्र खरं. ती सारखी सांगत होती, " सनिया, तूच माझा नवरा आहेस, नि मी तुझी नवरी."

सनियानं सारं काही ऐकलं. सहानुभूतीनं त्याचं मन भरून आलं. वाटलं, जर काळ बदलला नसता तर कईला सून म्हणून बनेई परिडांनी आपल्या घरी आणली असती. कई या घरची गृहिणी झाली असती. तसं जर झालं असतं तर कईला का म्हणून

भटकावं लागलं असतं ? का म्हणून दुसऱ्यांबरोबर राहावं लागलं असतं ? का म्हणून तिचा मुलगा जाऊन तिला वेड लागलं असतं ?

सनियानं म्हटलं, " कई, हे तुझंच घर आहे. तू इथंच राहा. हे जॉनकाका तुझे सासरे आहेत. काशी बेज, भरत मामल ही दोन तुझी मुलं आहेत. रहीम तुझा धाकटा भाऊ आहे आणि मी ? मी तर तुझा नवरा आहेच.

कई, तू इथंच राहा. कायमची. हे चारी बाजूला जे काही दिसतंय ते सर्व तुझंच आहे. आम्ही जे काही मिळवू ते सर्व तुला आणून देऊ. तूच आम्हा सर्वांना खायला घाल. घालशील ना ?"

कई टक लावून सर्वांना बघत होती. सनियाकडं पाहत तिनं विचारलं, " कोण आहेत हे सर्वजण ? माझे बनेई काका कुठेत ? माझी काकू कुठेय ? सनिया, कुनी आणि पुनी सर्वजण कुठे आहेत ?

सनियाचे डोळे भरून आले. कईला बघून त्याला वाटलं जणू आपल्या घरची सर्व मंडळी परतून आली आहेत. गेल्या दिवसांतील कित्येक चित्रं त्याच्या नजरेसमोर तरळून गेली. सनियाच्या बाबांनी एके दिवशी कईच्या मस्तकावर हात फिरवून म्हटलं होतं, " रडू नकोस कई. सनियाची आईच तुझीही आई आहे..."

त्या घटनेनंतरच सारी उलथापालथ झाली होती.

आता कई वेडी म्हणून समोर उभी होती. समाजाच्या नजरेतून ढळली होती. आता ती होती अस्पृश्य—पतिता ! प्रायश्चित्त घेऊनही जातीत येणं तिला आता शक्य नव्हतं. ब्राह्मणांना व भाऊबंदांना सहस्रभोजन घालूनही तिचा उद्धार होऊ शकणार नव्हता. ती आता धर्म, जात—सर्व काही सोडून रस्त्यावरच भटकत फिरणार, वेडी होणार, भीक मागणार आणि एखाद्या झाडाखालीच निजणार. त्यानंतर ?

त्यानंतर अचानक एखाद्या रोगाला बळी पडेल आणि अकालीच मरण पावेल. मेल्यावरही तिच्या प्रेताला लोक स्पर्शसुद्धा करणार नाहीत. कोल्हेकुत्रे तिच्या प्रेतावर ताव मारतील. अस्पृश्य आहे ना !

सनियासमोर कई उभी होती. केस विखुरलेले. डोळे भकास, शून्यवत. गालफडे बसलेली. मळक्या कपड्यानं वक्षाची हाडं आणि काटकुळे हात झाकले जात नव्हते. जगातल्या लाखो लोकांपैकीच कई एक होती.

जगातल्या सर्व मुलांप्रमाणंच कईचा जन्म झाला होता. पण आज ती सर्वांसारखी नाही आहे. ती आता रस्त्याकाठी रोगानं तडफडत मरणार. घर सोडाच पण गोठ्या-तही राहायला जागा मिळणार नाही. घरात उंदीर, मांजरे जितके धान्य फस्त करतात त्याचा दशांश भागदेखील तिला मिळणार नाही. तिला पशूपेक्षाही घृणित समजले जाईल. पतिता म्हणून लोक तिच्याकडे बोट दाखवतील.

सनियाला रडू कोसळलं. भरल्या डोळ्यांनी तो कईकडेच पाहत होता. म्हणाला, " कई, आमच्या घरातलं आणखी कुणी जिवंत राहिलं नाही. तुझ्या बाबांप्रमाणं, मुला-प्रमाणे तेदेखील मेले. पण तू धीर सोडू नकोस. या जगात बहीण, भाऊ, मित्रांना काय तोटा आहे ? बघ...हे आहेत माझे जॉन काका ! काशी, भरत आणि रहीम माझे सख्खे भाऊ आहेत. हे सर्वजण आपले वडील, भाऊ आणि पुत्र आहेत. कई, हे तुझंच घर आहे. तू या सर्वांची सेवा कर आणि सुखासमाधानानं राहा.

कईला हे बोलणं समजलं. गतकाळातील किती तरी घटना तिला आठवल्या. तिच्या डोळ्यांसमोर साकार झाल्या. क्षणभर तिचं वेड गेलं. पण तरी आ वासून उभी राहिली. काय बोलावं अन् काय बोलू नये ? तिच्या डोळ्यांना संततधार लागली होती.

थोडा वेळ सर्वजण स्तब्ध राहिले. कईनंच बोलायला सुरुवात केली, " सनियादादा, तर मग आपण जगायचं कशासाठी ?" सनिया उत्तरला, " माणूस जगण्यासाठीच जगतो. आपणदेखील असेच जगू या. आपल्याला जगायचंय कई. अरे रहीम, हिला आत घेऊन जा. ही तुझी थोरली बहीण आहे."

रहीमनं कईचा हात धरला. म्हणाला, " चल कई ताई ! हे तुझंच घर आहे. हा घे किल्ल्यांचा जुडगा. तूच ठेव आता. जॉन काकाच्या सल्ल्यानं हा वापरत जा."

जॉननं म्हटलं, " ये कई मा ! हे तर देवाचं घर आहे. आम्ही सर्व तुझीच लेकरं आहोत. तूच आमच्या तोंडी घास देऊन आमचे प्राण वाचवू शकतेस."

वेडया कईनं सर्वांच्या तोंडाकडे नजर टाकली. कुणाकुणाकडे ती नजर खिळवून बघत होती. तिला मोठं आश्चर्य वाटत होतं. ती ज्या ज्या ठिकाणी गेली होती, लोकांनी तिला झिडकारलं होतं, तिला शिव्या दिल्या होत्या. कुणीही तिचं बोलणं सहानुभूतीनं ऐकून घेतलं नव्हतं. पण इथं ? इथली गोष्टच वेगळी होती. लोक तिचा आदर करीत होते. घरात मानानं राहायला बोलावत होते. कई थक्क झाली. रहीमचा हात धरून ती सनियाच्या घरात गेली.

आणखीही कित्येक अनाथ आले होते. सनियानं त्यांना खूप समजावलं. पण त्यांनी ऐकलं नाही. सनियाच्या घरात राहिल्यानं देह विटाळणार नाही का ? ज्या घरात जात नाही, धर्म नाही त्या घरात कसं राहायचं ?

सर्वांना आशा होती की कधी ना कधी आपलाही भाग्योदय होईल. दिवस पालटतील. आज भीक मागावी लागत असली तरी उद्या पुन्हा सुखशांतीनं राहता येईल. जातीत सामील होता येईल. समाजात मान मिळेल. त्यांच्या वाडवडिलांनी जसा सुखासमाधानानं घर संसार केला होता तसाच आपल्यालाही करता येईल. त्यांना जरी फार पैसा मिळवता

आला नाही तरी त्यांच्या मुलाबाळांना नक्कीच मिळवता येईल, आणि ते श्रीमंत होतील. ते जमीनजुमला खरेदी करतील, जमीनदार होतील, मोठमोठाले वाडे बांधतील. त्यांना नावलौकिक मिळेल आणि त्यांच्या पूर्वजांचे आत्मे स्वर्गात संतुष्ट होतील.

असे लोक सनियाच्या घरात कसे राहतील ? का म्हणून मेहनत करतील ? भीक मागून त्यांनी जे काही मिळवलं होतं त्यावर त्यांचा पूर्ण हक्क होता. हे पैसे माझे आहेत, मला वाटेल तसे मी ते खर्च करीन असं ते बोलू शकत होते. या एका ' माझे ' शब्दात त्यांना विलक्षण आनंद वाटत होता. हा आनंद सोडून एका सामुदायिक संपत्तीचा स्वीकार करणं त्यांना कसं शक्य होतं ? कसं त्यांना बोलता येणार की हे जग आमचं आहे, सारं आकाश आमचं आहे.

सर्वजण परत गेले. सनिया त्यांचाच विचार करीत होता—कोण मूर्ख आहे ? कोण बरोबर बोलतोय आणि कोण चुकीचं बोलतोय...?

वडिलांच्या व काकांच्या शुश्रूषेनं धोबी बरी झाली. स्वर्गातून परत आल्यासारखं तिला वाटलं. धोबीची आईदेखील मुलीच्या शुश्रूषेसाठी आली होती. पण तिलाच देवी निघाल्या. तिच्या अंगावर देवीचे फोड उठले. डोळ्यांतही देवी निघाल्या. डोळे गेले. तिला अतिशय त्रास होत होता. सारं आंग भयंकर दुखत होतं. रात्रभर तिची तडफड चालली होती. तोंडून मात्र एकच हाक फुटत होती—' धोबी.'

धोबीला वाटत होतं, का म्हणून देवानं आपल्याला वाचवलं. त्यापेक्षा मेले असते तर सुटले असते. सासरी कुणीही नव्हतं. आता जर आई देवाघरी गेली तर कुणाच्या कुशीत तोंड लपवायचं ? कोण तिला समजून घेईल ? तिच्या जखमेवर हळुवार फुंकर घालील ? बाबांनी आपला एकच धोशा लावला आहे की, इकडे का आलीस ? काय उपयोग इथं राहून ? त्यापेक्षा विष्णुपूरला परत चल. जे काही व्हायचं असेल तिथं होऊ दे. चांगलंच होईल ते.

बायकोचं कण्हणं ऐकून चिंतेई सोईदेखील बेचैन व्हायचे. लग्न झाल्यापासून त्यांनी कधी बायकोकडे प्रेमानं डोळाभरून पाहिलंसुद्धा नव्हतं. कधी कोणत्याही कामात तिचा सल्ला घेतला नव्हता. धोबीच्या आईनंही कधी कशाबद्दल शब्दानं तक्रार केली नव्हती. घर-संसाराची संपूर्ण जबाबदारी तिच्यावर होती आणि ती आनंदानं निमूटपणे पार पाडीत होती. जन्मात तिनं फक्त एकदाच गळ घातली होती की धोबीचं सनियाशी लग्न लावून टाका. बस्स् ! पण चिंतेई सोईंनी तिची विनंती ऐकली नव्हती. आता आजारानं तळ-मळत असताना धोबीची आई दिराला आठवण करून देत होती, " निधी, तू सांगितलं होतंस ना की धोबीचं सनियाशीच लग्न लावून देईन म्हणून ! "

ती आता चिंतेई सोईना कसलीच विनंती करीत नव्हती. आपल्या कठोर व घमेंड-खोर नवऱ्याला ती पुरती ओळखून होती. तिच्या या भावनेचा चिंतेई सोईवरदेखील चांगलाच परिणाम घडत होता. तेदेखील आपल्या बायकोला ओळखून होते. त्यांनी म्हटलं, "तू कसलीही काळजी करू नकोस. आराम कर. देवाची मर्जी असली तर लगेच बरी होशील. मग तुझ्या मनासारखं तू धोबीचं सनियाशी लग्न लावून दे. कुणीही तुला अडवणार नाही."

हे ऐकून निधीदेखील खूश झाले. त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. त्यांनी म्हटलं, " वहिनी, तू मुळीच काळजी करू नकोस. सनियाशीच धोबीचं लग्न होईल. तू अगोदर बरी हो."

पण धोबीच्या आईची तब्येत दिवसेंदिवस खालावतच गेली. देवीचे फोड फुगले होते. एके दिवशी तिची शुद्ध हरपली. देवस्नानाच्या पौर्णिमेच्या दिवशी सकाळी तिनं जगाचा निरोप घेतला. पती, दीर आणि मुलीच्या सान्निध्यातच तिनं अखेरचा श्वास टाकला.

लोक म्हणाले, "धोबीची आई भाग्याची. खूप पुण्य मिळवलं होतं म्हणून इतक्या पवित्र दिवशी देवाघरी गेली."

निमपुरचे जमीनदार सोंगट्या खेळत होते. गुमास्ता गोविंद प्रधान त्याच वेळी वस्ता घेऊन तिथं पोचले. त्या सनिया पोराला चार शब्द सांगून त्याची कानउघाडणी करायला हवी असं त्यांना वाटत होतं.

तीन वर्षांपूर्वी सनियानं जमीन घेतली होती. त्याच दिवसापासून तो जणू अदृश्य झाला होता. प्रधानांनी वर्षातून दोनदा शेतसारा वसूल केला होता पण त्याची पावती काही दिली नव्हती. शेतसारा वसूल करायचा पण त्याची पावती मात्र कधी द्यायची नाही या गोष्टी प्रधानांच्या अंगवळणी पडल्या होत्या. परिणामी, जमीनदाराच्या खात्यात प्रजेकडून शेतसारा येणं नेहमी बाकी असे. शेतसाऱ्याची रकम वाढली की मग ती वसूल करायला जमिनीचा लिलाव करण्यात येई. अशा तऱ्हेनं कित्येक भोळ्या-भाबड्या शेतकऱ्यांच्या जमिनी प्रधानांनी घशात घातल्या होत्या. कित्येक विधवांवर जमिनी गेल्यानं भीक मागायची पाळी आली होती. प्रधानांची मालमत्ता फुगत चालली होती. इतकं असूनही जमीनदार छोटेराय साहेबांचा प्रधानावर पूर्ण विश्वास होता.

प्रधानांसमोर सनियाचा काय पाड ? तो किती क्षुद्र ! जमीनदाराच्या वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशी बरेच लोक त्यांच्या घरी भोजनाला जमायचे. खाण्याचं सर्व सामान कुळांकडूनच यायचं. प्रधानांनी दोन माणसं सनियाकडे धाडली होती, मासे आणायला. पण झालं काय ? प्रधानांच्या माणसांना सनियाच्या गड्यानं घालवून दिलं होतं. त्यांचा

अपमानही केला होता. जमीनदार बाबूंनी पाठवलेल्या पत्राकडे सनियानं ढुंकूनही पाहिलं नव्हतं. हे सर्व प्रधानांना सहन होत नव्हतं.

प्रधानांच्या मनात आलं, "दोन दिवसांपूर्वीच तर हा सनिया अन्नछत्रात बसून अस्पृश्यांबरोबर फुकटचं अन्न खात होता. किती मिनतवारीनं त्यानं जमीन मिळवली. त्यासाठी किती हातापाया पडला आणि आता त्याची ही मिजास ? माणसं त्याच्याकडे गेली तेव्हा तो घरी नव्हता हे खरं. पण परत आल्यावर तरी त्याला कळलं असेलच ना ? जमीनदारांपाशी येऊन माफी मागायला काय झालं होतं ?"

प्रधानांनी सारं काही जमीनदार बाबूंना समजावून सांगितलं. ते रागावले. त्यांनी हुकूम सोडला की प्रजा जर आडदांड असेल तर तिची खोडकी मोडा, तिला वठणीवर आणा. पण कुठल्याही प्रकारे तिला प्रोत्साहन देऊ नका. नाही तर दुसरी कुळंदेखील जमीनदार बाबूचा दबदबा मानणार नाहीत.

प्रधानांना काय हेच हवं होतं. खेरीज, सनिया सध्या जे काही करतोय त्यामुळे तर त्याच्याविषयी अजिबात सहानुभूती वाटता कामा नये. त्यानं जात, धर्म सारं काही सोडलंय. वरून म्हणतोय की अवघं जग त्याचंच आहे. हा शुद्ध वेडेपणा नाहीतर काय ? पण तो एक वेडा असला तरी जगभरचे लोक थोडीच वेडे आहेत ? असो. प्रधानानं विचार केला की सनियाविषयी इतका विचार करणं व्यर्थ आहे. त्याला चांगली अद्दल घडेल याची त्यांना खात्री होती. सनियाला मुळापासून उखडून काढायचा त्यांचा व्रत होता आणि म्हणूनच सर्व कागदपत्र घेऊन ते जमीनदारापाशी रुजू झाले होते.

जमीनदारांचा सोंगट्यांचा खेळ संपला. सूर्य अस्ताला निघाला होता. प्रधान उभे होते. जमीनदारांनी बसायला सांगितलं तरी ते उभेच होते. चाकर होते ना ते ! मालकासमोर कसं बसायचं ?

खेळात जमीनदारांची सरशी झाली होती. म्हणून स्वारी आनंदात होती. त्यांनी प्रधानाकडे पाहून विचारलं, "हं, काय आहे ?"

प्रधानानी कागद खाली ठेवून सांगितलं, "तीन वर्षांचा शेतसारा यायचा आहे हुजूर."

"खटला भरा."

"होय. त्यासाठी मला जाजपुरला (जिथे सबडिव्हिजनची कचेरी आहे) जावं लागेल."

"का ? कोर्टाच्या कारकुनाला नाही का करता येणार ?"

"नाही. एकतर्फी डिग्रीची व्यवस्था करावी लागेल."

"काय करायचं ते करा. हट्टी प्रजेला वळणावर आणा. त्यांना बेबंद होऊ देऊ नका."

"जी हुजूर."

जमीनदारबाबू उठून आत निघून गेले. काही कागदांवर त्यांच्या सहीची जरूर होती.

पण ते काम झालं नाही. प्रधान पुन्हा कागदपत्र घेऊन निघून गेले.

प्रहराजच्या घरापाशी जी खालची जमीन होती, त्यात शिवा घोष माती खणत होता. वांग्याची रोपं लावायची होती. सगळी रोपं लावून झाली पाहिजेत नाही तर मालकीण जेवू घालणार नाही. काम करता करता तो दमून गेला होता. तीन वर्षं तो सतत काम करतोय. पण अजून त्याला मजुरी काही कधी मिळाली नव्हती. त्याला अगोदर जे काही मिळालं होतं ते त्यानं मालकिणीच्या हातावर ठेवलं होतं. प्रहराजनी घर बांधून द्यायची लालूच त्याला दिली होती. शिवा एक अनाथ पोर होता. मालकिणीनं त्याच्यावर दया केली होती. अरेरे ! बिचारा अनाथ आहे ! ! तुझ्यासाठी एक घर बांधून देऊ हो ! ! !

पण कधी ? प्रहराजनी त्याला घर बांधून दिलं नव्हतं की त्याचे पैसे त्याला परत दिले नव्हते. म्हणून त्याला प्रहराजचं घर सोडून जाताही येत नव्हतं. प्रहराजच्या घरी पडून राहायचीही त्याची इच्छा नव्हती. द्विधा मन:स्थितीत तो सापडला होता.

तर मग शिवा घोष इतके दिवस प्रहराजकडे राहिला तरी कशाला ? प्रहराजची एक नात होती. ती बालपणीच विधवा झाली होती. तिचं नाव होतं पार्वती. खरं म्हणजे पार्वतीनंच शिवाला तिथं बांधून ठेवलं होतं.

पार्वतीनं मागून येऊन त्याला हाक मारली, " शिवा, ए शिवा " ! शिवा दचकला. पार्वती आणखी जवळ आली. त्याचे कान धरून त्याला लटके ओढीत म्हणाली, " चल, आई बोलावतेय तुला."

पार्वतीच्या हातून कान सोडवत शिवा दूर सरकला. त्यानं कुदळीनं थोडी माती खणली आणि म्हटलं, " तू जा, मी रोपं लावून येतो."

पारोनं आपले मोकळे केस गमतीनं हलवून म्हटलं, " अरे, तू तर अगदीच अडाणी आहेस अडाणी, आई नव्हती काही बोलवत. मीच बोलावतेय. चल, चल..."

शिवा आता उठून उभा राहिला. हसून म्हणाला, " अस्सं होय ? बरं तू हो पुढे. हा मी आलोच."

पार्वती आपले केस हलवत निघून गेली. शिवा घोष तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत राहिला.

प्रहराजनी गावच्या वडीलधाऱ्या मंडळींना आपल्या घरी बोलावलं होतं. ही सभा देवळासमोर भरणार होती. पण ज्यांच्या उपस्थितीत सभेचं कार्य व्यवस्थितपणे होऊ शकणार होतं ते चिंतेई सोईं आज येऊ शकत नव्हते. आज ते विपत्तीत आहेत. पण गावचे लोक कसे आपला धर्म, आपला समाज सोडणार ? सनिया पोरानं जो काही गोंधळ माजवला होता त्याचा काही प्रतिकार तर करायलाच हवा ना ?

प्रहराजनी तपकिरीची चिमूट नाकात कोंबत म्हटलं, " सनियानं जात सोडली, धर्म टाकला आणि पतित कईला घरात घेतलं. अशी माणसं जर आता विष्णुपूर गावात उजळ माथ्यानं वावरू लागली तर आपण काय करायचं ?"

परी दलाईनं म्हटलं, " काही ऐकलंय का प्रहराजजी ? ती वेडी कई आता दारो-दारी भटकत नसते. ती तर चांगली साडी नेसून घरात राहते. सनियाच्या घरच्या साऱ्या किल्ल्या आता तिच्यापाशीच आहेत. तीच स्वैपाक करते आणि अस्पृश्य हरिजन, मुसलमान, ख्रिश्चन सर्वजण एकत्र बसून जेवतात."

सेवानं विचारलं, " सर्वजण एकाच पानात जेवतात की काय ?"

परीनं उत्तर दिलं, " छे, छे, पानं सर्वजण वेगवेगळी घेऊन बसतात. पण कईच सर्वांना एकाच वेळी वाढते."

बिनी कांडीनं म्हटलं, " प्रहराजजी ! आता कसली जातबीत राहिली आहे ? गावात खूप लोक राहतात. ज्याला जे काम आवडतं ते तो करतो. गावकऱ्यांना त्याच्याशी काय कर्तव्य ? दुष्काळात माश्याचिलटांसारखे लोक मेले. तेदेखील आपलेच भाऊबंद होते. आपण त्यांना वाचवू शकलो नाही. जे काही कसेबसे वाचले ते आता इथंच तर राह-णार. नाही तर जाणार कुठं ?"

सेवा बेहेरानंदेखील बिनी कांडीचीच री ओढली. सेवानं म्हटलं, " गावी परत आल्या-वरदेखील जातीत सामील न झालेले किती तरी लोक आहेत. ते आपापली घरं बांधून गावात राहताहेतच की ! मग सनियाचाच तेवढा काय कसूर ? त्यानंही घर बांधलं."

" तेच तर मी पण सांगतोय." बिनी कांडीनं पुन्हा म्हटलं, गावकऱ्यांनी नीट समजून घ्यायला हवं. तुम्ही वाटल्यास सनियाच्या घरी जाऊ नका. पण त्याला उगाच त्रास देण्यात काय अर्थ आहे ? त्यानं कसला अपराध थोडीच केलाय ?"

प्रहराजनी आणखी थोडी तपकीर नाकात ओढली आणि म्हटलं, " अरे हे सेवा बेहेरा, बिनी कांडी काय बोलताहेत ? यांचं डोकं ताळ्यावर आहे ना ?"

प्रहराजना वाटलं, पवित्र पावन हिंदू धर्म रसातळाला जाऊ द्यायचा का ? दुष्काळ पडला होता, जणू प्रलयकालच आला होता, ते खरं. पण आता काय चाललंय ? लोकांनी जाणूनबुजून ही चूक करायची ?

प्रहराज दलाईच्या चेहऱ्याकडं टक लावून पाहत होते. दलाईनंदेखील म्हटलं, " प्रहराजजी ! सेवा बेहेरा जे काही बोलला ते खरं आहे. सनियानं चांगलं केलं की वाईट, त्याचे परिणाम त्यालाच भोगावे लागतील. जसं करील तसं भरील. आपल्याला काय करायचंय त्याच्याशी ? देव सारं बघतो. तो जर चुकीच्या मार्गानं जात असेल तर देव त्याला नक्कीच शिक्षा करील आणि तेच तो जर सन्मार्गानं चालला असेल तर त्याचं इनाम त्याला मिळेल. आपण काय करणार ?"

ऊदी साहू मिशांवर ताव देत बसले होते. म्हणाले, " सनिया गावकऱ्यांपासून दूर वेगळा राहतोय. तो कुणाच्या घरी जात नाही की कुणाशी बोलत नाही. कालच तो मला भेटला होता. मी विचारलं, " कसं काय सनिया ?" त्यावर तो म्हणाला, ' ठीक चाललंय काका.' त्याच्याबरोबर म्हातारा जॉनदेखील होता. मी म्हटलं, ' अरे वेड्या, तू तर प्रायश्चित्त घेतलं होतंस, जातीत आला होतास, घर बांधलं होतं. आता तर मजेत तुला घरसंसार थाटता आला असता. हे सर्व काय चालवलं आहे ? आता पुन्हा जातीतून बहिष्कृत झाला...' माझ्या बोलण्याच्या उत्तरादाखल सनिया म्हणाला, ' काका, जातीतून गेलो असलो तरी जगातून थोडाच गेलोय मी ? या जगाचा निरोप घ्यायच्या अगोदर दहा पाच जणांना वाचवावं म्हणतोय, ती माणुसकी आहे. ज्या पाच जणांना मी आधार दिला आहे त्यांना जर मी आधार दिला नसता तर त्यांची काय अवस्था झाली असती ? कधी विचार केलाय याचा ?' "

प्रहराजनी म्हटलं, " गरिबांना आधार देणं चांगली गोष्ट आहे. ती माणुसकी आहे. पण आपल्या जातीत, धर्मात राहून हे काम करता येणार नव्हतं का ? तुम्ही त्याला विचारलं का नाही ?"

ऊदी साहूनं म्हटलं, " विचारलं होतं प्रहराजजी ! पण तो म्हणाला की त्याचा जातीवर, धर्मावर विश्वासच नाही मुळी. त्यानंतर आणखी वाद घालणं मला योग्य वाटलं नाही. त्याचा जर देवधर्मावर, जातीपातीवर विश्वास नसेल तर नसेना का. देवच सर्वांचा पाठीराखा आहे."

प्रहराजनी म्हटलं, " ऐका हो सर्वजण. सनिया म्हणतो की त्याचा जातीवर, धर्मावर विश्वास नाही. प्रत्येकजण असं बोलू लागला तर हिंदुधर्म अस्तित्वात तरी राहील काय ? अशा माणसाला गावातून हाकलून दिलं पाहिजे."

सेवा बेहेरा म्हणाला, " प्रहराजजी, तुमचं बोलणं पटत नाही. अहो, सध्या ब्रिटीश सरकारचं राज्य आहे. कोण कुणाला हाकलू शकतो ? या राज्यात तर वाघ आणि शेळी एकाच घाटावर पाणी पिताहेत. प्रत्येकजण आरामात जगू शकतो. नाही तर प्रत्येक गावात मुसलमान, ख्रिश्चन यांची लोकसंख्या कशी वाढली असती ? ती पण आपलीच माणसं आहेत. ती काही दुसऱ्या देशातून आलेली नाहीत. पठाण वस्तीत तर अजून गायी कापल्या जातात. पाण (हरिजन) वस्तीत जाऊन बघाल तर दिसेल की लोक अजून मेलेल्या गायीचं मांस खातात. का ? त्यांना का नाही हाकलून देत ? सनियाला हाकलून द्यायचं आहे. कारण तो दुबळा आहे म्हणूनच ना ? हे काय योग्य आहे ? त्या दुसऱ्या लोकांपाशी तुम्ही गेला तर ते तुम्हालाच उलट चार गोष्टी सुनावतील हेच ना ?"

प्रहराज अस्वस्थ होते. म्हणाले, " माझं बोलणं तुम्हाला नीट समजलं नाही. पठाण

वा ख्रिस्ती–दोघांचा त्यांचा एक धर्म आहे. आपापला धर्म प्रत्येकालाच मोठा वाटतो. सनियाचा धर्म कोणता ? त्यानंही कुठल्या तरी धर्मात जावं. आम्ही काही बोलणार नाही. सर्वांबरोबर राहायलाच हवं. याच पाउलवाटेवरून किती तरी निधर्मी लोक चालतात. पण म्हणून काय आपण या पाउलवाटेची माती उकरून फेकून देतो ? विधर्मी नदीवरही जातो. म्हणून काय आपण नदीचं पाणी सोडून देतो ? माझ्या बोलण्याचं तात्पर्य हे की सनियाचा आता कुठलाच धर्म नाही. दोन्ही घरच्या पाहुण्यासारखा आहे तो, धड इथला नाही की तिथला नाही."

दलाईनं म्हटलं, " पण त्या दिवशी तुम्हीच तर सांगितलं होतं की सर्वांत अगोदर फक्त चार जाती होत्या. त्यातूनच पुढे चार हजार जाती झाल्या. कसं काय झालं हे ? हळूहळू ते होत गेलं ना ? समजा सनियानं एक नवी जात निर्माण केली. काही वर्षांनी एका कुटुंबाचं एका जातीत परिवर्तन होईल. होऊ देत..."

सेवा बेहेरा म्हणाला, " खरंय् तुझं बोलणं. सर्वजण एकाच जातीचे झाले तर जगरहाटी कशी चालणार ? लग्नकार्य कशी होणार ?"

प्रहराज वैतागले होते. म्हणाले, " सर्व गावकऱ्यांची डोकी तर नाही फिरलीत ? मी काय बोलतोय ते नीट ऐका आणि त्यावर विचार करा. नुसती वायफळ बडबड करण्यात काय अर्थ ? सनिया काही का करेना. आम्हाला काय करायचंय त्याच्याशी ? तो जर रानात राहिला असता तर आपलं त्याच्याकडे लक्षसुद्धा गेलं नसतं. पण तो आपल्या गावात आपल्या शेजारी राहतोय. आपल्या डोळ्यांदेखत तो दुराचरण करतोय, ते कसं आपण सहन करायचं ? शास्त्रपुराणांना काय आग लावून टाकायची ? देव तरी याला क्षमा करील का ? चिंतेई सोई आज गावात नाहीत. त्यांच्या गैरहजेरीचा फायदा तुम्ही घेताय. ते असते तर असं बोलायला सुचलं असतं का तुम्हाला ?"

चिंतेई सोईचं नाव ऐकताच सर्वजण गप्प झाले.

प्रहराज पुढे बोलू लागले, " शूद्रकानं अन्याय केला तेव्हा रामानं त्याचा प्राण घेतला, हे तर तुम्ही पुराणांत ऐकलं असेलच. हा सनिया कोण मोठा लागून गेलाय ? या सनियाला तुम्हाला मुठीत ठेवता येत नाही ? गावात सगळ्यांच्या नाकावर टिच्चून तो चांभार, पठाण, ख्रिश्चन, वगैरे खालच्या जातीच्या लोकांबरोबर राहणार, कईसारख्या पतितेला घरात ठेवणार आणि हे सर्व तुम्ही उघड्या डोळ्यांनी निमूटपणे पाहणार ? आपल्या पोरीबाळींबरोबर अब्रूनं या गावात तुम्हाला राहायचं नाहीये वाटतं ? सनिया जे काही करतोय ते तुमची मुलंही बघताहेतच. आता तुमची पोरंही काही एक ऐकणार नाहीत. काय समजलात ? बोलत का नाही बिशी जेना ? तुझ्या मुलाची, चंदराची, काही बातमी कळली ? बाम ओझाच्या मुलीचं टिमीचं काय झालं ? ती अजून बेपत्ता आहे ना ?"

बिशी जेनानं म्हटलं, " होय, प्रहराजजी. माझ्या मुलानं चूक केली म्हणून मी प्रायश्चित्तही घेतलं होतं. पण तो होता माझा तरणाताठा पोरगा. तो परत आला असता तर मला किती आनंद झाला असता. त्याच्या आईच्या डोळ्यातील अश्रूंना खळ नाही. खरंच चंदरा परत आला नाही तर त्याची आई काही जिवंत राहणार नाही."

बाम ओझानं म्हटलं, " चंदरा काय मुलगा आहे. एक ना एक दिवस येईल परत. पण टिमी तर मुलगी आहे. मी काय करू आता ? तिची वास्तपुस्त करणं, फार काय तिचं तोंड बघणंही पाप आहे. किती लाजिरवाणी गोष्ट आहे."

बिशी जेना म्हणाला, " लाज कसली ? तू थोडीच काही गुन्हा केला आहेस ? तुला का म्हणून लाज वाटायला हवी ? ज्यानं चूक केली आहे त्यालाच शिक्षा होईल, तुला नाही."

प्रहराजनी म्हटलं, " सनियाला शिक्षा व्हायलाच हवी. नाही तर मवाल्यांचं फावेल. त्यांना मोकळं रान मिळेल. तुम्ही सर्वांनी या गोष्टीचा विचार करायला हवा. तोवर चितेई सोईंदेखील दुर्गापूरहून परत येतील. मग काय तो निर्णय होईल. काय ?"

गावकऱ्यांनी मान डोलावली. चितेई सोईं परत येईपर्यंत सर्वांनी वाट पाहायची. प्रहराजनी म्हटलं, " पण तोवर खूप उशीर होईल. माझं तर म्हणणं आहे की ते परत येईपर्यंत सनियाला जातीबाहेर ठेवावं."

चितेई सोईंनी ठरवलं होतं की धोबीला विष्णुपूरला घेऊन जायचं आणि आपल्या बायकोचं पितृकर्मदेखील विष्णुपूरलाच करायचं. पण दुर्गापुरातच सारं काही करायचा हट्ट धोबीनं धरला. निधीनीदेखील ते मान्य केलं. सारं क्रियाकर्म दुर्गापूरलाच करण्यात आलं.

हरी महांती, राम प्रहराज, निधी सोई इत्यादींच्या सल्ल्यानुसार सोईं परिवाराचे सर्वजण विष्णुपूरला आले. क्रियेसाठी बऱ्याच लोकांना बोलावलं होतं. जमीनदार छोटेराय आणि त्यांचे गुमास्ते गोविंद प्रधान यांनादेखील आमंत्रण होतं. सनियालादेखील आमंत्रण पाठविण्यासाठी चितेई सोईंनी सांगितलं होतं. हरी महांती पत्र लिहू लागले तेव्हा प्रहराज चकित झाले. त्यांनी म्हटलं होतं, " अरे हे काय करताय तुम्ही ?"

धोबीनंदेखील हे ऐकलं, ती मान खाली घालून बसली होती.

निधींनी विचारलं, " सनियाला बोलावण्यास तुमची काय हरकत आहे प्रहराजजी ?"

सनियाविषयी सारं काही सांगायची संधीच प्रहराजना हवी होती. तपकीर ओढून ते म्हणाले, " सनिया ? तो काय माणूस आहे ? पार बाटलेला..."

प्रहराजनी सारं सांगून टाकलं. म्हणाले, " समाजात राहून समाजाशी वैर करणं कुणा-

लाही शक्य नाही. सनिया बदफैली करतोय. आपण मूग गिळून गप्प बसलो तर समाज भंग पावेल. सनियाला सामाजिक शिक्षा व्हायलाच हवी. त्याला जर शिक्षा मिळाली नाही तर तुम्हीच विचार करा गावच्या अन्य तरुणतरुणींवर त्याचा काय परिणाम होईल ? पिढचान् पिढ्या आपल्यात चालत आलेला धर्म, संस्कृती काय सनिया पायदळी तुडवणार ? तो आपल्या प्राचीन मानमर्यादा तुडवीत आहे आणि आपण अजाण बालकां-सारखे नुसते बघत बसलोय. हे काय योग्य आहे ? सनियाला शिक्षा व्हायलाच हवी. यातच आपलं व देशाचं कल्याण आहे."

चितेई सोई गप्प होते. बहुधा कसला तरी विचार करीत असावेत. मरण्यापूर्वी धोबीच्या आईनं जे काही सांगितलं होतं ते त्यांना आठवत होतं. सनियावर तिचं पोटच्या पोरासारखं प्रेम होतं. सनियाशीच आपल्या मुलीचं लग्न लावायचं तिच्या फार मनात होतं. पण सनिया बदलला होता. त्यानं प्रायश्चित्त केलं होतं, जातीत आला होता मग माशी कुठे शिंकली ? चितेईला काहींच उमजत नव्हतं.

निधीदेखील हाच विचार करीत होते. पण धोबीच्या मनात दुसरंच काही होतं. तिला वाटत होतं, की हे जे काही चाललंय त्याला सर्वस्वी तीच जबाबदार आहे. सनियाला धोबीचाच बदला घ्यायचा आहे. तो स्वतः सारं काही सहन करील. म्हणूनच त्यानं पतिता कईला आपल्या घरात जागा दिली आहे. घरचा सारा कारभार तिच्या हाती सोपवला आहे.

सर्व ऐकून धोबी संतापली. तिच्या मनातच जणू आग भडकली. विस्फारित डोळ्यांनी ती प्रहराजकडे बघत राहिली.

चितेई सोईनी दीर्घ निश्वास टाकला. म्हणाले, " प्रहराजजी, सनियाचा पोरकटपणा अजून गेला नाही. अजून त्याचं मन अस्थिर आहे. त्याच्यावर कुणाचा अंकुश नाही. म्हणून मनाला येईल तसं तो वागतो. त्यासाठी बेचैन व्हायची काय जरूर ? त्याला पण बोलवावं. त्याला इथं येऊ देत. माझ्या तोंडून चार समजुतीच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे येईल ताळ्यावर. होईल त्याचा वेडेपणा कमी. पोरवयात काही तरी जगावेगळं करून दाखवावंसं वाटतं. सनियानं जी चूक केली आहे त्यासाठी त्याला शिक्षा मिळायला हवी. ती शिक्षा द्यायची जबाबदारी मी माझ्यावर घेतो." सनियाला आमंत्रण पाठ-वण्यासाठी चितेई सोईनी हरी महांतीला खुणावलं.

निधी सोईना आनंद झाला. त्यांनीदेखील हरी महांतीला आग्रह केला, "लिहा ना..."

हरी महांतींनी लेखणी खाली ठेवली. म्हणाले, " हे गैर आहे. माझ्याच्यानं होणार नाही. बघा, विनशपूरचे मियाँ मुसलमान आहेत. पण आपल्या धर्माप्रमाणं सारी कामं करतात. कुणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही. कुणाची निंदानालस्ती नाही की कुणाचं नुकसान नाही. त्यांनाही आमंत्रण पाठवलं आहे. आपल्या सुदैवानं ते नक्की

येतील. कृष्णपूरच्या ख्रिश्चन सॉलोमन साहूलादेखील बोलावणं धाडलं आहे. फारच सज्जन गृहस्थ आहेत. सर्वजण त्यांची प्रशंसा करतात, त्यांचा मान राखतात. ते नेहमी धर्माचरण करतात. शास्त्रांप्रमाणंच वागतात. ते इथं आले तर किती चांगलं होईल. पीरपूरचे जमीनदार राजीव हरिजन जातीचे आहेत. पण त्यांचं आचरण इतकं शुद्ध, वर्तणूक इतकी गोड आहे की लोक तोंडात बोट घालतात. त्यांच्याकडं बघितलं म्हणजे वाल्मीकी ऋषींची आठवण होते. त्यांच्या जिभेवर सतत ' हरिनाम ' घोळत असतं. त्यांनाही मी आमंत्रण पत्र पाठवलं आहे. तेदेखील येतील ही किती आनंदाची गोष्ट आहे. पण या सर्वांसमोर सनिया म्हणजे किस झाडकी पत्ती ? आपला धर्म सोडून निधर्मी झाला आहे. सारं गैरवर्तन अगदी उघडउघड करतोय. अशा माणसाकडे आमंत्रणपत्र कसं धाडायचं ? छे, छे, माझ्याच्यानं नाही होणार हे काम."

प्रहराजनी पुस्ती जोडली, " हरिबाबूंचं म्हणणंच योग्य आहे. सनिया पठाण असो, ख्रिश्चन असो नाही तर हरिजन असो. तो याच गावचा पोर आहे. या गावात राहायचा त्यालाही हक्क आहे. सर्व लोक आपापल्या धर्मानुसार कामं करतील आणि जगतील यात कुणालाच काही आक्षेप नाही आणि तसा नसावाही. पण सनिया भलतंच काही तरी करायला निघाला आहे. तो म्हणतो, जगात जात राहणार नाही की धर्म राहणार नाही. सर्वजण समान होतील हे त्याचं वागणं काय योग्य आहे ?"

चिंतेई सोई उत्तरले, " योग्य नाही हे खरं. पण माश्या व डास खूप झालेत म्हणून घाबरून दारंखिडक्या लावून झोपण काय योग्य होईल ? सनिया काय वीतभर पोर आहे. आपण मनात आणलं तर सहज फुंकरीसरशी त्याला उडवून लावता येईल. त्याला आमंत्रण पाठवा. तो जर आला नाही व त्यानं आमचा अपमान केला तर मग आम्ही त्याला बघून घेऊ. मग त्याला सोडणार नाही. आणि तो जर आला तर मियाँ साहेब, सॉलोमन, राजीव जेना, गोविंद प्रधान, तुम्ही आणि मी—सर्वांसमोर त्याला उभा करू. आपलं सर्वांचं बोलणं धुडकावून लावून तो आपलं काम करीत राहील होय ? या जगात त्यालाही राहायचं आहे ना..."

हरी महांतींनी पुन्हा म्हटलं, " सनियाचा अधःपात झाला आहे. तो आता आला तरी कोणत्या समाजात बसणार ?"

चिंतेई सोई म्हणाले, " अगोदर त्याला येऊ तर देत. मग मी त्याला समजावीन. तो जर कबूल झाला तर पतितांना पुन्हा जातीत घेण्याची सोय आपल्या शास्त्रांमध्ये आहे. शास्त्राची पानं उलटली तर प्रहराजजींनादेखील हे सापडेल. आपल्यापाशी जोवर तुळशीची पानं, गायीचं शेण, गोमूत्र वगैरे आहे तोवर अपवित्र कायेला पवित्र करून घेण्यात आपल्याला कसलीच अडचण होणार नाही."

प्रहराज आपले केस ठीकठाक करीत होते. म्हणाले, " ब्राह्मणाच्या अंगावर जानवं

आणि जिभेवर संस्कृतचे श्लोक असले तर यजमानाच्या मांगल्यासाठी सारं काही करता येतं, पण सनिया हट्टी आहे. कुणाचं काही ऐकणार नाही. त्याला जातीत घेण्यासाठी मागे एकदा मी खूप मेहनत केली होती. पण झालं काय ? मला किती वाईट वाटलं ते कुणालाही कधी दिसणार नाही. शिवाय, लोक म्हणतील थोडक्यात आवरा सगळं. आता हे कसं शक्य आहे ?"

चितेई सोई म्हणाले, " तुम्ही खर्चाकडे काही बघू नका. पैशाची सोय होईल. त्याला अगोदर माझ्यापाशी येऊ देत. मग जे काही होईल ते बघता येईल. चांगल्या जातीतला मुलगा आहे तो. आज पतित, जातिभ्रष्ट झाला आहे. त्याला पुन्हा जातीत घ्यायच्या शुभकार्यासाठी थोडा खर्च करावा लागला तर आपण नाही का करणार ?"

प्रहराजनी म्हटलं, " मी एक गरीब ब्राह्मण आहे. देवपूजेसाठीच जिथं माझ्यापाशी पैसा नसतो तिथं दुसऱ्यांसाठी मी कुठून पैसा आणणार ?" तेवढ्यात निधीनी हरी महांतीना म्हटलं, " हरी बाबू ! लिहा पत्र. नाही तर लेखणी द्या मला. मीच लिहितो." ते ऐकून हरी महांतीनी निमूटपणे लेखणी व ताडपत्र उचललं. हुकुमाची अंमलबजावणी करणं हेच तर त्यांचं काम होतं.

प्रहराजनी शेरा मारला, " तुमच्या आमंत्रणावरून तो इथं येईलही कदाचित पण ज्या लोकांना त्यानं आपल्या घरात जागा दिली आहे त्यांना तो कदापि सोडणार नाही."

अचानक धोबीकडे प्रहराजचं लक्ष गेलं. त्यांनी धोबीला विनंती केली, " तुम्ही जरा आत जाल का ?"

डिवचलेल्या वाघिणीसारखी धोबी गरजली, " मी काही कुक्कुलं बाळ थोडीच आहे ? जे काही सांगायचं असेल ते माझ्यासमोर सांगा. माझ्या आईचं श्राद्ध आहे. कुणा-कुणाला आमंत्रण जातंय ते मला कळायलाच हवं. बोला काय बोलायचंय ते ?"

प्रहराज जरा कचरले. मग म्हणाले, " ती वेडी कई काय बडबडायची ते तुम्ही ऐकलं असेल. ती सांगायची सनिया तिचा नवरा आहे आणि ती त्याची नवरी. कईचं जे मूल होतं ते कुणाचं होतं ते गावकऱ्यांनीच सांगावं. ते मूल आता जिवंत नाही. पण लोक काही मूर्ख नाहीत. मूल कुणाचं होतं एवढी साधी गोष्टही त्यांना ठाऊक नाही की काय ? कईच्या बोलण्यावरून पत्ता लागला की ते मूल सनियाचंच..."

धोबी दचकली. हरी महांतीच्या हातून लेखणी खाली पडली. चितेई सोईदेखील एकटक बघू लागले. प्रहराज आवेशानं म्हणाले, " देव सगळं बघतो. माणसाचं पाप लपून राहत नसतं. दुष्काळात सनिया दारोदारी भीक मागायचा तेव्हा त्याला वाटलं असेल की कई जाईल मरून आणि पापाला वाचा फुटणार नाही. पण कई मेली नाही. मेलं तिच्या पोटातील पाप. कईला वेड लागलं. ती सर्वांना सांगत सुटली की सनिया तिचा नवरा आहे. आणि ती त्याची नवरी. सोईजी, सनियानं विधर्मी लोकांना, अस्पृश्यांना

आणि कईला आपल्या घरात थारा का दिलाय ते आपणाला ठाऊक आहे ? ते निव्वळ ढोंग आहे ढोंग ! आता त्याला धर्मात्मा व्हायचंय, समजलं ? कई सनियाच्या घरात राहू लागल्यापासून तिचं वेडही खलास झालंय. असो, आपण जे काही कराल ते विचार-पूर्वक करायला हवं. आमचं काय ? आम्ही आहोत पुरोहित. यजमानाच्या कल्याणाचंच आम्ही बोलणार."

सर्वजण स्तब्ध झाले.

धोबीच्या आईनं मरण्यापूर्वी जे काही सांगितलं होतं ते चितेई सोईंना आठवलं, " माझ्या धोबीचा हात सनियाच्या हातात द्या." त्यांनीदेखील वचन दिलं होतं, " तू निश्चित राहा धोबीची आई. तुझ्या मनासारखंच होईल." पण हे प्रहराजजी आज काय बोलताहेत ? ते खोटं कधी बोलत नाहीत. सनिया आहेच पापाच्या खातेऱ्यात लोळणारा. पण तो आहे मर्द ! नेहमी थोडाच असा राहणार आहे ? मन बदललं की सारं काही बदलेल. कलंकदेखील पुसला जाईल.

ही गोष्ट धोबीच्या कानावरही आली. कित्येक घटना तिला आठवल्या. तर काय... तर काय सनियानं हे सर्व माझ्यापासून लपवून ठेवलं होतं ? मला फसवायचं होतं ? पण का...?

चितेई सोईं म्हणाले, " निधी, सनियाला आमंत्रण पाठव. येऊ दे त्याला."

धोबी उठून उभी राहिली. किंचाळली, " नाही, नाही. सनियाला बोलवायची काही जरूर नाही बाबा. विसरलात का, त्याच्या वडिलांनी सर्वांदेखत तुमचा अपमान केला होता ? असा कोण मोठा लागून गेलाय तो ? सनिया आता बदलला आहे. तो पूर्वीचा सनिया राहिलेला नाही. आज तो नीती, धर्म वगैरे सारं काही सोडून हीन झाला आहे. त्याची अधोगती झाली आहे. आईच्या श्राद्धकार्याच्या दिवशी त्याला बोलावून आपल्या घरचं पावित्र्य घालवायला नको."

धोबी थरथरत होती. विस्मित होऊन सर्वजण तिच्याकडे पाहत होते. चितेई सोईंनी म्हटलं, " तू या कामात अडथळा आणू नकोस धोबी ! तुझ्या आईनं अखेरच्या वेळी काय सांगितलं होतं आठवतंय ?"

" आईला नीट समजलं नाही बाबा. ती स्वतः निर्मल, निष्पाप आणि अगदी साधी सरळ होती. तिला जगात सर्वत्र चांगुलपणाच दिसायचा. सारेच लोक भले वाटायचे. मी सुखात राहावं हीच तिची अखेरची इच्छा होती. मी जर सुखी राहिले तर ती असेल तिथं तिच्या आत्म्याला शांती मिळेल, तिला नक्कीच आनंद होईल. आज सनियानं जर माझ्या घरात पाऊल टाकलं तर त्यामुळं मला आनंद होणार नाही. माझ्या आईच्या आत्म्याचाही अपमान होईल, बाबा !"

निधींनी म्हटलं, " अग वेडे, हे काय बोलतेस ?"

धोबीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. म्हणाली, "होय काका, खरं बोलतेय मी. ज्या सनियावर माझं प्रेम होतं तो हा व्यभिचारी सनिया नव्हे."

चिंतेई सोईंना काही बोलायचं होतं. पण धोबीनं पुन्हा ओरडून म्हटलं, "प्रहराजनी जे काही सांगितलं ते सारं खरं आहे. सनियाला आमंत्रण पाठवायचं नाही—नाही—नाही—नाही."

डोळ्यातले अश्रू लपवण्यासाठी धोबी घरात पळाली. पण वडील आणि काकांपासून अश्रू कसे लपवणार ?

हे सर्व पाहून प्रहराज खूष झाले. म्हणाले, "बाळ, तुझ्या बुद्धिमत्तेची प्रशंसा केल्यावाचून राहवत नाही. तू जणू जितीजागती दुर्गादेवी आहेस."

सोई बंधूंकडे दृष्टिक्षेप टाकून हरी गुमास्ता म्हणाले, "अहो लेक कुणाची आहे— सून कुणाची आहे... !"

निधींनी दीर्घ निश्वास टाकला. चिंतेई सोई दचकले. म्हणाले, "हे काय वेडयासारखं बरळताय ? पुरे झाला आता हा वेडेपणा. सोडा हे सारं. निधी माझ्यातर्फे तूच पत्र लिही बघू."

काय चाललंय ते प्रहराजना उमजेना. असो, आणखी एक बैठक नक्कीच होणार एवढं मात्र ते समजले.

ज्या लोकांना आमंत्रणे गेली होती, त्या सर्वांनी काही ना काही सामान पाठवलं होतं. हरी महांति, राम प्रहराज, निधी सोई वगैरे सर्वजण आपापल्या कामात दंग होते आणि आता फक्त दोनतीन दिवसांचाच अवधी उरला होता. सर्व व्यवस्था अगोदर करून ठेवणं जरूर होतं, नाही तर इतकं मोठं कार्य सुरळितपणे कसं पार पडणार ?

सर्वजण कामात गुंतले होते. पण धोबी मात्र सतत अस्वस्थ असायची. घरात काकू सारं काही बघायची. धाकटया बहीणभावांशी खेळणं एवढंच काम फक्त धोबीला होतं. पण ते करूनसुद्धा तिचा वेळ जाता जात नसे. बाबांनी तिचं म्हणणं ऐकलं नव्हतं आणि सनियाला आमंत्रण पाठवलं होतं, हे तिला ठाऊक होतं. सनियानं त्या आमंत्रणाला उत्तर धाडलं होतं की सोईजी धनवान आहेत, त्यांच्यासारख्या थोरामोठयांच्या घरी सनिया-सारखा गरीब मजूर आलेला त्यांना चालेल का ? पण गडयाहाती हे गर्वोद्धत उत्तर पाठवूनही सनियानं आमंत्रण स्वीकारलं होतं. आता तो येतो की नाही ते बघायचं. पण तो कसलीही सूचना का नाही देत ? समजा, तो आला नाही आणि बाबांना त्यानं आणखी डिवचलं, त्यांचा अपमान केला, तर मग ? पुढचा विचार धोबीला करवेना.

प्रहराजनी सनियाविषयी जे काही सांगितलं ते खरं आहे का ? खरंच का

कईला बरबाद करून जगासमोर भला माणूस व्हायचा प्रयत्न सनिया करीत होता ? ह्य विचार मनात येताच धोबीचे डोळे भरून यायचे. असो. सनिया सुखात राहो, हीच धोबीची मनापासून इच्छा होती. पण आतल्या आत तिचं मन क्रंदन करीत असे. कुणाला सांगायची मनीची व्यथा ?

एके दिवशी धोबीनं पुनीला सारं काही सांगून टाकलं, " पुनी, सनिया जे काही करतोय ते योग्य नव्हे. त्यानं सुखात राहावं, परिडा वंशाचा लौकिक वाढवावा, हीच आम्हा सर्वांची इच्छा होती. त्यानं जर नावलौकिक मिळवला तर सर्वांना किती आनंद होईल !"

पुनीच्या मांडीवर तिचा तीन वर्षांचा मुलगा बना खेळत होता. बना अवघा तीन वर्षांचा असला तरी अतिशय खेळकर होता. पुनीचे कपडे ओढून तो तिला नुसता भंडावून सोडायचा.

बनाला बघून धोबीच्या मनात यायचं, आपल्यालाही असं एखादं गोजिरवाणं बाळ असतं तर ? तर अस्मान ठेंगणं झालं असतं. तिनंदेखील मग आपल्या बाळाला पुनी-सारखंच मांडीवर घेतलं असतं, दूध पाजलं असतं. कृष्णासारख्या बाळाला कडेवर घेऊन तिच्या जीवनाचं सार्थक झालं असतं. बनाला जवळ घेण्यासाठी, खेळवण्यासाठी ती आतुर होऊन जायची. पण क्षणात तिचा बेत पालटायचा. तो अस्पृश्य बाऊरीचा मुलगा आहे ना ? त्याला कसं कडेवर घ्यायचं ? लोक काय म्हणतील ?

पुनीनं उत्तर दिलं, " दादाला मी खूप समजावलं. मी तर त्याला माझ्या घरात येऊ द्यायलाच तयार नव्हते. लोकांनी त्याला माझ्या घरी बघितलं तर त्याची जात जाईल याचीच मला भीती वाटत होती. पण तो ऐकेल तर ना ? आता बघा. त्यानं वेडेपणानं काय पुन्हा करून ठेवलंय ? पुन्हा त्याची जात गेली. हरिजन, पठाण वगैरे माणसांना घरात घेतलंय. आता परिडा घराण्याचं नाव गेलं चुलीत. त्याच्या मनात आहे तरी काय ते देवालाच ठाऊक !"

धोबीच्या मनात आलं, सावित्री अमावस्येची घटना पुनीला सांगून टाकावी. तिच्याच-साठी सनिया स्वतःला इतका त्रास करून घेत आहे हे सांगून टाकावं. पण ती काही बोलली नाही. जणू तिला कुणी तरी अडवलं होतं.

पुनीनं म्हटलं, " धोबी ताई, एक गोष्ट विचारू ? मरताना तुमची आई जे काही बोलली होती ते तुम्ही ऐकलं होतं ? तुमचीदेखील तीच इच्छा आहे का ?"

धोबी मान खाली घालून उभी राहिली. तिच्या तोंडून शब्द फुटला नाही. स्वतःच्या शरीराकडे तिचं लक्ष गेलं. अरेच्या, किती अशक्त झाली आहे ती ! सर्वांगावर देवीचे वण... केसही तोकडे झाले. थोड्या वेळानं तिनं मान वर केली. म्हणाली, " माझ्या इच्छे अनिच्छेनं काय होणार आहे पुनी ? आपण स्त्री आहोत... दुसऱ्यांच्या हातातील

खेळणी... बरं पुनी, एक काम करशील ?"

" काय ?"

" सनियाच्या घरी जाशील ?"

पुनी दचकली. कसं जायचं विष्णुपूरला ? कसं तिथल्या लोकांना हे कलंकित तोंड दाखवायचं ? लोक हजारो प्रश्न विचारतील. ती ज्या दिवशी अस्पृश्य मधु भोईच्या घरी राहू लागली त्याच दिवशी तिनं ठरवून टाकलं होतं की पुनी आता विष्णुपूरला मेली, कायमची मुकली. विष्णुपूरशी तिचा आता काहीही संबंध नाही. आता कसं जायचं तिथं ?"

" पुनी, बोलत का नाहीस ? सांग ना, जाशील का ?"

" पण कशासाठी जायचंय ते तर सांगा."

" पुनी, सनियाला तुझ्याखेरीज कुणीही ताळ्यावर आणू शकणार नाही. तू जर तिथं गेलीस तर त्याच्या घरात ठाण मांडून बसलेले सर्व कंगाल आपसूकच निघून जातील. नाही तरी त्यांची काय गरज आहे ? त्यांना खायला प्यायला नि आरामात राहयला हवं ना ? ती सोय मी करीन. इतक्या लोकांना मी आश्रय दिला होता. आणखी पाच जणांची व्यवस्था करणं मला काही जड नाही. मी त्यांना उदरनिर्वाहासाठी जमीन देईन. माझ्यापाशी खूप जमीन आहे. वाटेल त्याला, वाटेल तितकी ती मला देता येईल. त्या जमिनीवर अन्य कुणाचा अधिकार नाही. हे सर्व तू सनियाला समजावून सांगशील पुनी ?"

पुनीनं सारं काही ऐकलं. तिच्या ओठावर स्मित झळकलं. डोळ्यात आनंदाश्रू भरून आले. आनंदानं ती म्हणाली, " मी जाईन धोबीताई ! मला वाटेल तितका अपमान सहन करावा लागला तरी तुमच्यासाठी जाईन, नक्कीच जाईन. 'बना'ला पण बरोबर घेऊन जाईन आणि बनाचे बाबादेखील सोबत जातील... लोक बघू लागले तर बघू देत. पण मी सनिया दादाला घेऊन नक्की येईन. त्याला तुमच्यासमोर आणून उभा करीन."

अवाक होऊन धोबी ऐकत होती. हे काय बोलतेय पुनी ?

पुनीने म्हटलं, " धोबी ताई ! तुम्ही बघाच. मी नक्की सनियादादाला घेऊन येते."

तेवढ्यात खांद्यावर कुऱ्हाड घेऊन मधु भोई तिथं पोचला. मधूला बघताच पुनीनं आपल्या बाळाला कडेवरून खाली सोडलं आणि थोडा घुंगट काढून म्हणाली, " ही काय भेटायची वेळ आहे ?

मधूनं उत्तर दिलं, " आईसाहेब, घरासमोर तिथं छप्पर घालायचं होतं ते टाकून झालंय. आपण एकवार येऊन बघून जा असं म्हाताऱ्या बाबूंनी सांगितलंय. म्हणजे मग

सारवणाचं काम सुरू करता येईल."

धोबीनं हसत हसत म्हटलं, " त्यांनी सांगितल्याप्रमाणं कर म्हणजे झालं. मी तरी आणखी काय करणार आहे ? आणि बघ, तुझ्या पोराला पण बरोबर घेऊन जा."

मधूनं 'बना'ला कडेवर घेतलं आणि तो निघून गेला.

मधु भोई निघून गेल्यावर धोबीनं म्हटलं, " मधू हरिजनाच्या घरी जन्मला असला तरी गेल्या जन्मी तो नक्कीच राजघराण्यातला असला पाहिजे. ते ऐकून पुनीला गर्व वाटला खरा. पण तो क्षणभरच ! लगेच तिला धोबीचा मत्सर वाटू लागला. आपल्या काळजावरच कुणी चराचरा सुरी फिरवीत असल्यासारखं तिला वाटू लागलं. पण मनातलं तिनं मनातच ठेवलं. म्हणाली, " बरं हे सांगा बघू धोबी ताई, माझ्या भावाच्या नखाची सर तरी आहे का दुसऱ्या कुणाला या जगात ?"

धोबीनं हसत उत्तर दिलं, " हात तुझी !"

धोबी जे काही करीत होती ते योग्य होतं का ? सनातन हिंदू धर्माच्या साक्षात अवतारासारखी धोबी आखून दिलेल्या ठराविक चाकोरीतून चालली होती. तिनं आपली सर्व मालमत्ता गोरगरिबांना वाटून टाकली होती. देवालय बांधलं होतं. ब्राह्मणांना भूमिदान दिलं होतं. घरसंसारात राहूनही ती संन्यासिनीसारखी वागत होती. जगरहाटी आहे ती. डोळ्यातून आसवं गाळली तरी त्या अश्रुधारांतच तिला विलक्षण आनंद आणि अपूर्व शांती जाणवत होती.

तिची चूक होती का ती ?

संध्याछाया दाटल्या होत्या. आभाळ गच्च भरून आलं होतं. सनिया आपल्या घरच्या ओसरीवर चुपचाप बसला होता. डोकं गुढघ्यात घालून कसला तरी विचार करीत होता. मनात असंख्य विचारतरंग उठत होते. चालीरीती, नियम वगैरेंपुढे मान तुकवून तसं वागलं म्हणजे लोक म्हणतात की नीट मार्गानं चाललाय. वाडवडिलांनी घालून दिलेल्या वाटेवरूनच चालायला हवं, मग ती वाट स्मशानाकडे जाणारी का असेना. पण नवीन मार्ग शोधणंही कठीण आहे. त्यावरून गाडीची चाकं धावत नाहीत. नव्या रस्त्यावरून चालण्यात अनेक अडचणी येतात. नव्या रस्त्यावर आपली गाडी अडल्याचं सनियाला जाणवत होते.

ऊनपाऊस कशाचीही तमा न बाळगता सनियानं रहीमसवे शेतात धान लावलं होतं. काशी बेज आणि भरत सामलना इतके कष्ट झेपत नव्हते. म्हातारा जॉन काकादेखील एक दिवस शेतावर गेला होता. पण एकाच दिवसाच्या श्रमानं तो आजारी पडला होता. रहीमनं त्याची मनापासून सेवाशुश्रूषा केली होती. आता तो बरा झाला होता. पण अशक्तपणा अजूनही होता. तो उठून चालायचा प्रयत्न करायचा पण पाय लटलट कापू लागत.

कई घरचं कामकाज करायची आणि सनिया व रहीम काम करीत असलेल्या शेतावरही जायची—त्यांच्यावर रागवायची—म्हणायची, " असं पावसात भिजलात तर ताप चढेल आणि सारंच काम राहून जाईल. जरा तब्येतीकडेही लक्ष देत जा."

सनिया कईला घरी जायला सांगायचा. पण ती कसली ऐकतेय ? कई पण पावसात भिजत शेतात काम करायची. पण आता कईची तब्येतही बिघडली आहे. दोन दिवसां-पासून ती तापानं फणफणली आहे. डोळे उघडवत नाहीत. रहीम तिची शुश्रूषा करतोय.

पण असं किती दिवस चालणार ? गावकऱ्यांनी त्याला पुन्हा वाळीत टाकलं. चौपट मजुरीवरदेखील कुणी मजूर त्याच्या शेतावर राबायला तयार होत नाही. जॉन काका खूप आजारी आहे. पण वैद्यानं त्याला औषध काही दिलं नाही. सर्वंजण सनियाच्या विरुद्ध झाले होते. गावकऱ्यांच्या मर्जीविरुद्ध गावात राहणं अतिशय कठीण होतं.

ओसरीच्या एका कडेला बसून भरत सामलनं एक भजन गायला सुरुवात केली—चका नयन कु चाहिं गरीब जणे... (एक गरीब माणूस चाकासारखे नेत्र असणाऱ्याची (जगन्नाथाची) प्रार्थना करतोय.)

सनिया लक्षपूर्वक भजन ऐकू लागला. भरत सामल तन्मय होऊन गात होता. पण ऐकतंय कोण ? भरत आजारी आहे. त्याच्या व्यथा कोण दूर करील ? दुसरीकडे आंधळा काशी बेज गात होता—' घट छुटिले तोते बोलिबे भूत रे' (हे शरीर जेव्हा उरणार नाही तेव्हा लोक—आपलेच लोक—तुला भूत म्हणतील.)

सनिया एकाग्रचित्त होऊन ऐकत होता. तो पुन्हा कसल्याशा विचारात गुंतला. चिंतेईं सोईंनी त्याला आमंत्रण पाठवलंय. चेष्टा करायला ? तो उपाशी होता. मजुराचं काम मागण्यासाठी त्यांच्या दारी उभा होता त्या वेळी त्याला मजुरी काही मिळाली नव्हती. निराधार गरीब मजुरांचं रक्त शोषण करून आज ते श्रीमंत झालेत. अशा माणसाच्या घरी जाणं योग्य होईल का ? छे, काही झालं तरी जायचं नाही. त्यानं निश्चय केला. चिंतेईंना राग आला तर येऊ देत. त्यांच्या घरी जाण्यापेक्षा शेतावर काम करता करता जीव गेला तरी बेहत्तर !

रहीमनं हाक मारली, " सनिया दादा ! कई आक्काचा ताप वाढलाय."

सनिया उठून उभा राहिला आणि रहीमच्या पाठोपाठ चालू लागला.

आत एका चटईवर कई निजली होती. जॉनकाका तिच्या उशाशी बसून तिच्या कपाळावर हात फिरवीत होता. सनियादेखील तिथंच बसला आणि जॉनकाकाप्रमाणंच तोदेखील कईच्या कपाळावर हात फिरवू लागला. ताप खूप वाढला होता.

सनियानं म्हटलं, " रहीम, तू खूप दमला आहेस खरा. पण आता एक जरुरी काम आहे. करशील ?"

" काय ?" रहीमनं उत्सुकतेनं विचारलं.

" तू वैद्याकडे जा आणि..."

वैद्याचं नाव ऐकताच रहीमचा चेहरा खर्रकन् पडला. त्याला अतिशय वाईट वाटलं. वैद्य येणार नाही याची त्याला खात्री होती. पण मग विचार केला की वैद्याचे पाय धरून त्याला सारं सांगायचं. तो आला नाही तर निदान औषध तरी देईल. रहीम लगेच तिथून निघाला.

सनियानं म्हटलं, " जॉनकाका, तुम्हाला अजून खूप अशक्तपणा आहे. दुसऱ्या खोलीत जाऊन जरा विश्रांती घ्या. तुम्ही आजारी पडलात तर सर्वांनाच त्रास होईल." जॉनचा तिथून पाय निघेना. पण सनियानं खूप समजावल्यावर तो दुसऱ्या खोलीत आराम करायला निघून गेला.

सनिया कईच्या आणखी जवळ सरकून बसला.

कईनं डोळे उघडले. सनिया जवळ बसला होता. डोक्यावरून हात फिरवीत होता. खोलीत दुसरं कुणी नव्हतं.

कईची सारी स्वप्नं जणू साकार झाली. हे तिचंच घर आहे. सनिया तिचा पती आहे. हे खोटं नांही, वेड नाही. आजवर ती जणू अंधारात होती. आता जे काही दिसतंय ते सत्य आहे. आता तिला लोकांची काय पर्वा ? जगात प्रलय आला तरी ती निश्चित राहील. आपलं हरवलेलं धन तिला पुन्हा गवसलं आहे. रात्रंदिवस ती ज्याच्या नावाचा जप करायची, ज्याच्यासाठी ती वेडी झाली होती तो आज तिला मिळाला आहे.

कईनं चारी बाजूला नजर टाकली. खरंच सनियाशिवाय दुसरं कुणी तिथं नव्हतं. तिचा हृदयेश्वर तिच्यासमोर बसला होता. जणू आज त्यांची प्रथम मीलनाची रात्र होती. असे मधुर क्षण आयुष्यात वारंवार येत नसतात.

कईनं आपला हात उचलला आणि सनियाच्या हातावर ठेवला. हळूहळू ती सनियाच्या हातावर हात फिरवू लागली आणि एकटक सनियाकडे बघू लागली. करुणेनं सनियाचं मन भरून आलं. त्यानं प्रेमळ स्वरात विचारलं, " कई, थोडी बार्ली घेतेस ?"

कईच्या शुष्क ओठांवर स्मितरेखा झळकली. डोळ्यांनी विचारलं, " हे घर कुणाचं आहे सनिया ?"

सनियानं उत्तर दिलं, " हे काय तुला ठाऊक नाही ? हे घर तर सर्वांचं आहे. तुझंही आहे हे घर."

कई क्षणभर गप्प राहिली. दोन्ही हातांनी सनियाचे हात दाबत म्हणाली, " हे घर सर्वांचं आहे ? माझं नाही ?"

सनियानं पाहिलं, कईचा ताप वाढतोय. तिच्या मनाला लागेल असं बोलता कामा

नये. अशा परिस्थितीत ती दुःखी झाली तर ताप आणखी वाढेल. तो म्हणाला, " कई तुझंच आहे हे घर ! दुसऱ्या कुणाचंही नाही. इथं राहणारे सर्वजण तुझेच आहेत. जॉन काका, रहीम, काशी, भरत सारे तुझेच आहेत ना ? हे घर खास तुझंच आहे."

कई हसली. हे घर माझं—माझं—माझं—ती गुणगुणत राहिली. सनियानं हळूच आपला हात सोडवून घेतला. म्हणाला, " तू धीर सोडू नकोस कई. बघ, तू अगदी लवकर बरी होशील."

कई खूष होऊन उठून बसली. डोळे विस्फारून सनियाकडे बघू लागली. म्हणाली, " सनिया, तूच माझा 'तो' आहेस. मरण्यापूर्वी माझ्या बाबांनी हेच सांगितलं होतं. माझा हात धरून त्यांनी पोटासाठी भीक मागितली होती. स्वतः उपाशी राहून मला खाऊ घातलं होतं. म्हणायचे, " कई, तू काळजी करू नकोस. देव सर्वांचा पाठीराखा आहे. आपण कधी कुणाचं वाईट केलेलं नाही, हे काय देवाला दिसत नसेल ? देव जरूर आपल्याला मदत करील." ते म्हणायचे, " आपण नक्कीच घरी परत जाऊ. तू तर परिडा घराण्याची सून आहेस. बनेई परिडांनी म्हटलंच होतं की हेही दिवस निघून जातील, पुन्हा चांगले दिवस येतील."

बोलता बोलता कई स्तब्ध झाली. तिचे डोळे भरून आले.

थोड्या वेळानं तिनं पुन्हा आपली कर्मकहाणी सुरू केली, " माझ्या बाबांचे गुडघे दुखू लागले. मग गुडघ्यांवर सूज आली. नाइलाजानं मी एका गावात देवळाच्या पाठीमागे बाबांना निजवलं. तिथं आमराई होती आणि तिच्यामागे विटांच्या ढिगाऱ्यात खूप साप होते. सनिया, भीक मागून मागून मी बाबांच्या तोंडी तांदळाची पेज घालीत राहिले. पण एक दिवस भीकही नाही मिळाली. त्या गावात एकच श्रीमंत घर होतं. त्यांच्यापाशी खूप संपत्ती होती. भुकेकंगालांना ते रोज थोडे थोडे तांदूळ द्यायचे. पण त्यांच्याकडचे तांदूळही संपले. अन्नछत्र बंद पडलं. भुकेले लोक थोडी वाट पाहून मग दुसरीकडे निघून गेले. पण मी जाऊ शकले नाही. बाबांची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली होती. त्यांच्या अंगी उठायची ताकद अजिबात नव्हती. अशा परिस्थितीत त्यांना एकटं टाकून जाणं मला कसं शक्य होतं ?

"—त्यानंतर... आई ग ! कसं सांगू त्यानंतर काय घडलं ते ?

" बाबांच्या तोंडी थोडी तांदळाची पेज घालण्यासाठी मी एका माणसाच्या घरात शिरले होते. तो कोण होता ते काही मला ठाऊक नव्हतं. त्यानं मला पकडलं आणि तांदूळ व तांदळाची पेज द्यायचं कबूल केलं. माझ्या कानात बाबांची व्याकूळ हाक घुमत होती. कई, बाळ, थोडी पेज दे ग... तो माणूस, छे तो माणूस कसला, राक्षसच तो... त्यानं मला कवटाळलं आणि म्हणाला, " अग कई, तुझं एकच तर पोट—किती भात खाशील ? किती मांड घेशील ?"

सनिया, त्या दिवशी जीव वाचवून मी परत आले होते. एका हातात होतं पाण्याचं छोटंसं मडकं आणि दुसऱ्यात थोडा गरम भात, मीठ आणि थोडी भाजी. बाबांना हे सर्व खाऊन खूप आनंद होईल असं मला वाटलं होतं. तो माणूस, ज्यानं मला तांदूळ दिले होते म्हणालादेखील होता, ' रोज संध्याकाळी येत जा आणि भात घेऊन जात जा.' तो माणूस काय भला होता ? मी भात घेऊन धावतपळत आले होते. वाटलं होतं, बाबांना खाऊ घालून त्यांना मृत्यूच्या पाशातून सोडवीन.

"—पण... पण परत येऊन बघितलं तर माझे बाबा झोपले होते—कायमचे झोपी गेले होते...

"मी हमसून हमसून रडले. निर्जीव बाबांच्या तोंडात भात घातला, पाणी घातलं पण ते उठले नाहीत. दिवस उजाडायच्या आत मी चालू लागले. पाय नेतील तिकडे चालत राहिले. कुठं जात होते ते माझं मलाच ठाऊक नव्हतं."

कईनं आपले डोळे पुसले. कईसमोर आपण क्षुद्र आहोत, अपराधी आहोत असं सनियाला वाटलं. कईनं आपल्या वडिलांना वाचवण्यासाठी सर्वस्वाचा होम केला. पण सनियानं ? त्यानं तर पोटासाठी आपल्या बापाचाही जीव घेतला होता.

कई पुढं म्हणाली, " पाप काय, पुण्य काय ते मला ठाऊक नाही. मी जे काही करतेय ते योग्य की अयोग्य हेदेखील मला समजलं नव्हतं. भुकेची आग मला सहन होत नव्हती. अशा वेळी ज्यानं मला मूठभर तांदूळ दिले, माझे प्राण वाचवले त्याला माझं हे शरीर दिल्याखेरीज राहणं मला कसं शक्य होतं ? तो माणूस माझी थोडी अवहेलना करू लागताच मी त्याला सोडून चालू लागत असे, दुसऱ्या गावाच्या दिशेनं. जगण्याची उमेद मनात घेऊन मी भुकेकंगालांच्याबरोबर भटकत होते.

" काळ उलटत गेला. जो कुणी मला बघायचा, विचारायचा—तुझा पती कोण आहे ? मी ओळखलं की आपल्या हातून चूक झाली आहे—पाप घडलं आहे. पती नसताना आई होण्याचा हक्क मला नव्हता. जो माझा पती असेल त्याचंच मूल माझ्या पोटात असायला हवं. ही समाजाची रीत आहे. सर्वजण म्हणायचे, सनिया माझा नवरा आहे. पण सनिया, तुझं मूल काही माझ्या पोटात नव्हतं. कुणाचं मूल माझ्या पोटात होतं ? मला स्वतःला ते ठाऊक नव्हतं. खरं सांगते सनिया, असं जगण्यापेक्षा मेले असते तर बरं झालं असतं."

कईचा श्वासोच्छ्वास जोरात चालू होता. ताप वाढला होता. सनिया दगडी पुतळ्यासारखा स्तब्ध होऊन तिच्यापाशी बसला होता. कईकडे एकटक बघत होता.

कईनं पुन्हा म्हटलं, " तो दिवस अजून मला आठवतो, ज्या दिवशी माझ्या पोटचं मूल पहिल्यांदा रडलं होतं. मी त्याच्या निष्पाप चेहऱ्याकडे नजर टाकली होती. खरं सांगते, त्याचं तोंड कायमचं बंद करायचं धैर्य माझ्यात नव्हतं. एकदा मनात आलं-

देखील की त्याच्या नरडीला नख लावून आपलं पाप कायमचं नाहीसं करावं. म्हणजे मग मी निष्कलंक होईन. मग परत फिरणं सोपं होईल. अशा स्थितीत मी तुझ्या दारी येऊ इच्छित होते. पण ते करणं कठीण होतं. मी ते करू शकले नाही. माझ्या पापाचा पुरावा असलेल्या माझ्या कलिजाला घेऊन मी इकडे तिकडे भटकत राहिले. अखेर एके दिवशी त्यानं कायमचे डोळे मिटले.

"—पण सनिया ? सजीव कलंक नाहीसा झाला तरी त्याचा डाग काही गेला नाही. मला वेड लागलं. लोकदेखील मला त्याच नावानं संबोधू लागले. मी गावोगावी भटकून स्वतःच्याच तोंडानं माझ्या पापाची गोष्ट सर्वांना सांगायची. आपल्या गावचा—माझ्या सनियाचा मला विसर पडला होता.

कई मोठ्यांदा हसली. म्हणाली, "निव्वळ योगायोगानंच मी या घरी आले. इथं येताच गतकाळच्या सर्व गोष्टी मला आठवल्या. आज तुझ्याच घरी मला आश्रय मिळाला आहे. मी वेडी नाही सनिया, वेडा तर तू आहेस. दुसऱ्यांसाठी जीवापाड श्रम करतो आहेस, दुसऱ्यांसाठी आपली जात, धर्म सारं काही घालवून बसला आहेस. गावकऱ्यांशी वैर धरलं आहेस आणि भरीला वेड्या कईला घरात घेतलं आहेस. तूच सांग आता मी वेडी आहे की तू वेडा आहेस ?"

सनियानं उसासा टाकला.

उत्तेजित झाल्यानं कईचा चेहरा लाल झाला होता. ती उठून उभी राहिली. ओरडून म्हणू लागली, "तू मला फसवतो आहेस सनिया. मी कंगाल आहे, भिकारीण आहे, माझी जात बुडाली आहे, अशा स्थितीत मला कोण आसरा देणार आहे ? कोण माझं होणार आहे ? हे सर्व खोटं आहे. खोटं–खोटं–खोटं. मी या घरात राहणार नाही. दूर कुठंतरी निघून जाईन—निघून जाईन..."

कई धडपडत चालू लागली. सनिया आ वासून बघत राहिला. त्यानं धावत पुढं जाऊन कईचे हात धरले, "हे काय करतेस कई ? तू अगोदर बस बघू. माझं ऐक—थोडं ऐक तरी." त्यानं बळजबरीनं कईला बिछान्यावर बसवलं. कई चकित होऊन सनियाकडे एकटक पाहत होती. सनियानं पुन्हा तिचे हात धरले. "तुला खूप ताप आहे. तुझी सगळी कथा मी ऐकली. पण तू कुठं अजून माझी कथा ऐकली आहेस ? जरा नीज बघू. रहीम औषध घेऊन येतच असेल. मग तू बरी होशील. लवकर बरी हो बघू. मग मी माझी हकीकत तुला सांगेन. खरंच सांगतो कई, तू कुठलंही पाप केलेलं नाहीस. पाप तर मी केलं आहे."

कईनं सनियाचं ऐकलं. ती झोपली. सनियानं तिच्या अंगावर पांघरूण घातलं. रात्रीच्या अंधारात रहीम कुठं बरं गेला ? भरतचं गाणंदेखील थांबलं होतं. जॉनकाका चक्क घोरत होता. काशी बेज अधून मधून भजनाचे तेच पद आळवीत होता—घट

छुटिले तोते बोलिबे भूत रे (हे शरीर जेव्हा राहणार नाही तेव्हा लोक तुला भूत म्हणतील).

सनियानं स्वतःच काही करायचं ठरवलं. कटोऱ्यात ठेवलेलं बार्लीचं पाणी तो घेऊन आला आणि कईला हलकेच म्हणाला, " कई, हे पाणी घे, पी." सनियानं बार्लीच्या पाण्याचा ग्लास कईच्या तोंडाला लावला. कईनं मस्तक किंचित उंचावून बार्ली घेतली आणि ती पुन्हा निजली. सनिया तिच्या कपाळावर हात फिरवू लागला.

रहीम बऱ्याच उशिरा घरी परतला. खूप अस्वस्थ होता तो. वैद्यानं औषध द्यायला नकार दिल्याचं त्यानं सांगितलं. तो खूप हातापाया पडला होता. पण वैद्यानं स्पष्ट शब्दांत सांगून टाकलं होतं की सनियाशी संबंध ठेवणाऱ्यांना वाळीत टाकायचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला होता. म्हणून तो काही औषध देणार नाही.

सनियानं म्हटलं, " ठीक आहे. तू जा. झोप. मी कईपाशी बसतो, जरूर वाटली तर तुला उठवीन."

रहीम दुसऱ्या खोलीत निघून गेला.

सनिया कईपाशी बसून राहिला. अनेक उलटसुलट विचार त्याच्या मनात येत होते. त्याच्या मनात आलं, "आपण जे काही केलं ते सारं चूक आहे. हा समाज अतिशय पुरातन आहे. जुनाट आहे. नानातऱ्हेच्या कुसंस्कारांनी, अंधश्रद्धांनी बरबटलेला आहे. या समाजात राहायचं असेल तर त्याचे काही नियम मान्य करून त्याप्रमाणं राहावं लागेल. काय योग्य आहे, काय अयोग्य आहे, ते कुणीही बघणार नाही. माणसाच्या मनाच्या स्वातंत्र्याविरुद्ध असंख्य बंधनं आहेत, अडचणी आहेत. चिंतेई सोईसारखे स्वार्थी श्रीमंत स्वातंत्र्याविरुद्ध पहाडासारखे उभे राहतात. हजारो वर्षांपूर्वी तत्कालीन समाज नजरेसमोर ठेवून जे नियम तयार करण्यात आले होते, त्या नियमांचे राम प्रहराज़ पुजारी आहेत." सनियानं काही नव्या सुधारणा करायचा प्रयत्न केला होता. पण जगाच्या दृष्टीनं त्याचं सर्व कार्य चुकीचं होत. आपल्या वडिलांचे प्राण वाचविण्यासाठी कईनं आपला देह विकला होता. आपला जीव जगवण्यासाठी परक्या माणसापाशी राहिली होती. आपल्या बाळाला उराशी कवटाळून ती खूप जागी भटकली. आपलंच बाळ असल्याचं तिनं जीव तोडून सांगितलं. पण या सत्याला काही किंमत नव्हती. तिनं खरं तेच सांगितलं, पण लोकांनी तिला पतिता, कलंकिनी ठरविलं. समाजात तिला स्थान नव्हतं. जो कुणी तिला आसरा देईल त्यालादेखील समाजाच्या नजरेत काही किंमत नाही.

सनियासमोर जणू धोबी उभी होती. शिवरात्रीच्या रात्री धोबी आली होती खरी. पण आज धोबी इथं नव्हती. जवळच कई झोपली होती. सनियानं तिच्याकडे निरखून पाहिलं. विवशता आणि लाचारीमुळे तिला दुसरीकडे कुठं जाणं शक्य नव्हतं. धोबीनं

तर सनियाला निरोप दिला होता. पण कई सनियासाठी वेडी झाली होती. सनिया ज्या मार्गावरून एकटा—अगदी एकटा चालला होता त्या मार्गावर आज त्याला फक्त कईचीच सोबत होती. धोबी सनियाच्या मनातून पार निघून गेली तरी त्यामुळं काय मोठासा फरक पडणार होता ? धोबीला जायचंच असेल तर जाऊ देत. कई तिची जागा घेईल. नाही तरी आज घडीला कईच या घरची गृहिणी होती. सनियावरून आपला जीव ओवाळून टाकायला ती तयार होती.

कईनं बेचैन होऊन कूस पालटली. चादर तोंडावरून बाजूला केली. डोळे उघडले. सनिया जवळच बसला होता. अतिशय प्रसन्न होता. सनिया कईच्या कपाळावर हात फिरवीत होता. सारं आंग घामानं चिंब झालं होतं. चादर पांघरून कई बराच वेळ निजून राहिली. घाम आला याचाच अर्थ ताप उतरणार. सनियानं चादरीवर आणखी एक कांबळं टाकलं.

गहन रात्र होती. साऱ्या वातावरणात निःस्तब्धता भरून राहिली होती. सनिया थोड्या वेळानं बाहेर आला. घरात सामान विखुरलेलं होतं. खरकटी भांडीदेखील अजून अंगणात तशीच पडली होती. कई आजारी पडल्यानं सारं काम थंडावलं होतं. सनियानं स्वैपाकघराचं दार लावून घेतलं. जॉनकाका दुसऱ्या खोलीत घोरत होते. रहीमदेखील त्यांच्यापाशीच झोपला होता. काशी बेज गाढ झोपला होता. पण भरत सामल मात्र अजून जागाच होता.

सनियानं चिमणी मधल्या खोलीत ठेवली. वर आभाळाकडे नजर टाकली. आभाळ भरून आलं होतं. वारा पडलेला होता. अंधारात उभा राहून त्यानं घराकडे नजर टाकली. हे घर धोबीच्या पैशांतून उभं राहिलं होतं. धोबीचा पैसा व तिच्या प्रेमामुळंच तरुण सनियाचं मन नव्या आशाआकांक्षांनी फुलून गेलं होतं. त्याचाच परिणाम म्हणजे हे घर !

सावित्री अमावस्येच्या रात्री धोबीनं जे काही केलं, ते जर तिनं केलं नसतं तर आज काय झालं असतं ? या घराची आज काय दशा झाली असती ? ज्यांनी या घरात आश्रय घेतला आहे त्यांची काय अवस्था झाली असती ? त्यानं जर धोबीला या घरात आणलं असतं तर त्याच्या जीवनाचा गाडा त्याच त्या जुन्या मळलेल्या वाटेवरून धावला असता. धर्म व संस्कृतीच्या नावाखाली जे काही चाललंय ते सर्व निमूटपणे मान्य करून, सर्वांसमोर मान तुकवून त्यानंही आपला घरसंसार थाटला असता.

पण सनियानं ते केलं नाही. आज तो जे काही करतोय ते सारं चूक आहे का ? माणसाला आपला स्वार्थ सोडून जगता येईल का ? माणूस अगोदर स्वतःच्या भल्यासाठी आणि नंतर मग समाजाच्या भल्यासाठी काम करीत असतो. सर्वजण माझे आहेत आणि मी सर्वांचा आहे हा विचार संन्याशांखेरीज अन्य कुणाला क्वचितच कधी सुचत असेल.

समाजात राहून परक्या लोकांना आपलंसं करून काम करणं अशक्य आहे. जो हे काम करून दाखवतो तो लोकांच्या दृष्टीनं वेडा ठरतो.

सनियाच्या मनात आणखीही विचार आला—सर्वांनी स्वतंत्र व्हावं, समान व्हावं—ही एक आदर्श गोष्ट आहे. पण प्रत्यक्षात तसं संभवत नाही. प्रत्यक्षात घडतं ते हेच की माणूस जगात उच्च वा नीच होऊनच राहतो. सारी माणसं भेदभावरहित समान होऊ शकत नाहीत. आपापल्या कर्मानुसारच सर्वांना फळ मिळतं. नाही तर माणूस काम तरी कशासाठी करील ? त्यानं कष्ट करावे आणि त्याच्या कष्टाचं फळ मात्र कुणा आळशी सोम्यागोम्यानं बसून खावं का ? मानव जातीच्या संस्कृतीचाच विनाश होणार का ?

माणूस आपल्यासाठी काम करील. आपल्या वंशजांसाठीदेखील काम करील. तेणे करून भावी पिढ्यांमध्ये अनंत कालपर्यंत जगण्याची इच्छा राहील. माणसानं धनसंचय करायला हवा—आपल्यासाठी व आपल्या वंशजांसाठी.

धोबीनं जे काही केलं होतं ते योग्यच होतं. पण सनियानं मात्र चूक केली होती. धोबीनं गरिबांच्या मनाला बळकट केलं होतं, एका महान आदर्शाची इमारत तिनं उभारली होती. सर्वजण असं करू लागले तर जगात कुणीही दुःखी राहणार नाही. जीवनात प्रगती करण्यासाठी सर्वजण श्रम करतील. या दृष्टीनं पाहता, आपली चूक झाल्याचं सनियाला वाटू लागलं.

सनिया बेचैन झाला. त्याच्या मनात जणू कुणी तरी आक्रोश करीत होतं—ही सर्व मालमत्ता माझी आहे. निढळाच्या घामानं व रक्त आटवून मी ही मिळवली आहे. माझ्या आश्रयानं जे लोक राहताहेत ते सर्व माझे आहेत—जॉनकाका, भरत सामल, रहीम, काशी—सर्वजण माझेच आहेत. या सर्वांसाठी मी वाटेल तो त्याग करायला तयार आहे. वेळप्रसंगी प्राण द्यायलाही मागेपुढे पाहणार नाही. मीच या सर्वांना खाऊ-पिऊ घालून जिवंत राखीन.

सनियानं आपल्या कपाळावरून हात फिरवला. हळूहळू तो घरासमोर येरझाऱ्या घालू लागला. धोबीच्या साश्रू नयनांचं चित्र त्याच्या नजरेसमोर तरळू लागलं. त्याच्या कानांना जणू धोबीची हाक ऐकू आली—'सनियादादा, तू लग्न कर.' सनियानं तिची विनंती ऐकली नव्हती. उलट आवेशानं तिलाच तो काही बोलला होता. पण आता परिस्थिती बदलली आहे. आता त्याला धोबीच्या विनंतीचा मान ठेवावा लागेल. सनियानं ठरवलं की आपण लग्न करायचं—घरसंसार थाटायचा.

कईशीच लग्न करायचं.

आजवर सनिया आपल्या वडिलांची इच्छा पुरी करू शकला नव्हता. पण आता तो वडिलांची इच्छा पूर्ण करणार. कईनं आपल्या वडिलांचे प्राण वाचविण्यासाठी सर्वस्व स्वाहा केलं होतं. पण त्याच्या वडिलांची इच्छा अजून पुरी होऊ शकली नव्हती. आता

दोघांच्या वडिलांची इच्छापूर्ती होणार.

कई सनियाची बायको होणार—सनियाच्या लेकरांची ती आई होणार. जगाच्या दृष्टीनं जी भिकारीण होती, पतिता होती ती आता या घरची घरधनीण होणार. सनिया मधल्या खोलीत आला. त्याला कई उभी असलेली दिसली, जणू ती कुणाची वाट पाहत असावी. सनिया लगेच तिच्यापाशी गेला.

" सनिया, तू अजून झोपला नाहीस ?" कईनं विचारलं.

सनियानं कईचे हात आपल्या हातात घेतले. हात कसे थंडगार लागत होते. ताप उतरला होता. कई बिछान्यावर बसली. म्हणाली, " घाबरण्यासारखं काही नाही. असा ताप कितीदा तरी आला होता. ताप आला की मी कुणाच्या तरी पडवीत अंग टाकायची. झोपायची. अन् ताप उतरला की उठून चालू लागायची. पण वारंवार ताप येऊनही मी काही मेले नाही. मला पाणी दे. खूप तहान लागली आहे."

सनियानं पाणी पाजलं. कईनं विचारलं, " दोन दिवसांपासून ताप आल्यानं मी काही करू शकले नाही. तुम्ही सर्वजण काय खाणार ?"

सनियानं म्हटलं, " रहीमनं भात केलाय. जॉनकाकाने मदत केली. पण तू का याची काळजी करतेस ? तू झोप. सकाळपर्यंत तू अगदी ठणठणीत बरी होशील."

" तू सारी रात्र झोपेचं खोबरं करून माझ्यापाशी बसला होतास ?"

सनियानं काही उत्तर दिलं नाही. तो टक लावून कईच्या चेहऱ्याकडे बघू लागला. कई पुन्हा म्हणाली, " सनिया, मी वेडी आहे हे तर तुला ठाऊक आहेच. तापाच्या भरात मी काही वेडंवाकडं बरळले असेन..."

सनियानं झटकन् कईचे हात धरले. म्हणाला, " कुणी तुला वेडी केलं ? या जगानंच ना ? बरं कई, एक उत्तर देशील ?" स्तिमित होऊन कई सनियाकडं बघत होती.

" बरं सांग बघू, मी तुझा कोण आहे ?"

कईच्या मनात काय आलं देव जाणे, तिनं काही उत्तर दिलं नाही. सनियाच्या हातातून आपला हात काढून घेतला.

सनियानं म्हटलं, " तापाच्या भरात तू सारं काही सांगून टाकलं होतंस कई. तू खूपच त्रास सहन केला आहेस. समाजानं तुला टाकलं. जगानं तुझा तिरस्कार केला. पण तुझ्या मनाची भाषा समजण्याचा प्रयत्न कुणीही केला नाही. तुझ्या बाबांची एक गोष्ट तुला आठवते ?... आठव बघू... माझ्या बाबांनीही तेच सांगितलं होतं. दोघांनी म्हटलं होतं की तू आमच्या घरची गृहस्वामिनी होणार. ज्या दिवशी त्यांनी हे म्हटलं होतं त्याच दिवसापासून जणू तू या घरची गृहिणी झाली होतीस. मध्यंतरी आपल्या आयुष्यात एक वादळ येऊन गेलं. पण त्यासाठी आपण जबाबदार नाही. तू आपल्याच घरी परतून आली आहेस कई. वेडी झाल्यावर तू जे काही सांगितलं होतंस, तापात जे

काही बडबडली होतीस, आज पुन्हा एकदा ते माझ्या कानात सांग बघू. सांगून टाक... सांगून टाक की... सनिया माझा नवरा आहे..."

हैराण होऊन कई सनियाकडे पाहत होती. हे स्वप्न तर नाही ना ? सनियाला वेड तर नाही ना लागलंय ? माणसाला ज्या गोष्टी अशक्य वाटतात त्या तो बेधडक बोलून टाकतो हे खरं आहे. पण मनात असलेल्या गोष्टीच ओठांवर येतात. सनिया आज जे काही बोलतोय तेच त्याच्या मनात इतके दिवस होतं का ? कईला आश्चर्य वाटलं. जॉनकाका, रहीम, काशी बेज व भरत सामल यांच्याप्रमाणेच तीदेखील सनियाच्या आधारानं जगत होती. पण आज हे काय ऐकतेय ती ? तिचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. ती गृहिणी होणार, या घरची गृहस्वामिनी होणार. याच ठिकाणी ती आपला जीव वाचवण्यासाठी आली होती. ती आता सनियाची बायको होणार ? असंभव नाही का हे ? कई सनियाची बायको आहे यावर कुणी विश्वास तरी करील का ?

सनियानं पुन्हा विचारलं, " गप्प का अशी ? मला तुझ्याच तोंडून उत्तर हवंय. तुला कदाचित माझ्या मनातली गोष्ट समजत नसेल कई, मी जातपात, धर्म, समाज इत्यादींची बंधनं मानत नाही. पण जीवनाचं बंधन, स्त्री आणि पुरुषाचं मीलन आणि त्या दोघांचा संमिलित प्रयास जीवनाला आवश्यक आहे आणि या गोष्टीवर माझी श्रद्धा आहे, दृढ विश्वास आहे. म्हणूनच तर भुकेकंगालांच्या जमावातून हा सनिया परिडा परत आला. त्यानं मृत्यूपासून दूर पळ काढला. ऐक कई, आज रात्रीच्या या एकांतात मी तुला सारं काही सांगून टाकणार आहे."

सनियानं गत जीवनाचा सारा पाढा कईसमोर वाचला.

सनियाचं कईशी लग्न झालं. या लग्नात ब्राह्मणांना मंत्रपठन करावं लागलं नाही की होमहवन काही करावा लागला नाही. विवाहाचे एखादे रजिस्टर तयार झाले नाही की कुणा साक्षीदाराची जरूर लागली नाही. फार काय, नवीन वस्त्रं, फुलांच्या माळा वगैरेंचीदेखील गरज वाटली नाही. नातेवाईक, बंधुबांधवांना आमंत्रणं गेली नाहीत की जेवणावळीची काही व्यवस्था झाली नाही.

अन्य दिवसांप्रमाणेच लग्नाचा दिवसही उगवला नि मावळला. सनिया आणि कई दोघेही होते दुष्काळपीडित. नव्या आशाआकांक्षांनी फुलून दोघांनी एकमेकांवर खरं प्रेम केलं. एकाच्या आत्म्यानं दुसऱ्याची निवड केली—जीवनाचे सहप्रवासी म्हणून ! नयनी अश्रू आणि ओठी हासू घेऊन दोघांचं मीलन झालं.

कई आणि सनिया दोघेही जॉनकाका, रहीम, भरत व काशी बसलेल्या खोलीत आले. जॉनकाका जीवनाची महत्ता सर्वांना समजावून सांगत होता. सनिया व कईनं आपल्या

मनातली गोष्ट त्यांना सांगितली. दोघेही त्याच्या पाया पडले. काकानं मोठ्या प्रेमानं उभयतांच्या मस्तकावर हात फिरवून त्यांना आशीर्वाद दिला, " तुम्ही दोघेही माझीच लेकरं आहात. तुमचं प्रेम चिरंतन राहो. तुम्हाला दीर्घायू लाभो. सुखासमाधानानं तुमचं आयुष्य सफल, सुफल होवो..." दोघांनी मग काशी बेज आणि भरत सामललादेखील नमस्कार केला. त्यांनीही मनापासून आशीर्वाद दिले.

रहीम उठून उभा राहिला. त्यानं सनिया व कईला नमस्कार केला. सनियानं रहीमचा हात धरून प्रेमानं म्हटलं, " रहीम, तू माझा लाडका धाकटा भाऊ आहेस. माझा तुला नेहमी आशीर्वाद आहे." कईनं रहीमचा दुसरा हात धरून म्हटलं, " छे, छे, हा तर माझा भाऊ आहे. तुझा नाही काही."

रहीम हसला. काही उत्तर द्यायच्या अगोदरच बाहेरचा दरवाजा उघडल्याचा आवाज आला. कोण ? सर्वांचं दाराकडे लक्ष गेलं. अरे पुनी ! कडेवर बाळाला घेऊन पुनी आली होती. तिच्या मागे होता मधु भोई.

पुनीकडून धोबीनं सारं काही ऐकून घेतलं. मग तिला दिलासा देत म्हणाली, " तू का अशी बेचैन होतेस पुनी ? तो एक वेडा आहे. पण त्याच्याबरोबर जग थोडीच वेडं होणार आहे ? तू सरळ इथं येऊन छान केलंस. सनियाच्या कल्याणाचीच आपली इच्छा होती पण तो जर हटवादीपणानं भलत्याच मार्गाला लागला तर त्याला आपण काय करणार ?"

उन्हं उतरणीला लागली होती. पुनी टक लावून धोबीकडे पाहत होती आणि कसलासा विचार करीत होती. तिला अतिशय वाईट वाटलं होतं. म्हणाली, " मला फार आशा होती की...पण हे काय झालं धोबी ताई ?"

" कसली आशा ?" धोबीनं तिला स्मित करून विचारलं, " माझी ? अग वेडे, माझ्या सर्व आशांचा तर केव्हाच चक्काचूर झाला आहे. एक काडी जशी पाण्यात वाहून जाते तशा माझ्या आशा वाहून गेल्या आहेत, आणि अजूनही वाहून जात आहेत. मला त्याचं काहीच सुखदुःख नाही."

धोबी पटकन् घरात निघून गेली. राधामाधवाच्या मूर्तीसमोर मस्तक टेकलं. डोळ्या-तून अश्रू ढाळीत प्रार्थना केली, " देवा, मलाही तुझ्यासारखं मूक आणि कठोर करून टाक."

चिंतेई सोईच्या पत्नीच्या श्राद्धाचं काम संपलं होतं. निमंत्रित पाहुणे मंडळी आपा-पल्या घरी निघून गेली होती. फक्त राम प्रहराज आणि गोविंद प्रधान काय ते अजून चिंतेई सोईंच्या आग्रहाखातर राहिले होते.

दुपारच्या वेळी सर्वजण बसले होते. चिंतेई सोई अतिशय अस्वस्थ दिसत होते. पण त्यांच्या मनातली गोष्ट लपून राहिली नव्हती. सनियाच त्यांच्या बेचैनीचं कारण होता. लहान तोंडी मोठा घास. सनियानं कुणालाच धूप घातला नव्हता. चिंतेई सोईंच्या पत्नीची अखेरची इच्छा पुरी करण्यात सनियानं सहकार्य दिलं नव्हतं. त्याला आमंत्रण पाठवलं होतं. पण तो आला नव्हता. उलट आमंत्रण घेऊन जाणाऱ्या न्हाव्यासमोर चिंतेई सोईंविषयी अनेक अपमानकारक अपशब्द बोलला होता. गेल्या दिवसातल्या घटना चिंतेई सोईंना आठवल्या. एक दिवस सनियाच्या बापानंदेखील हेच केलं होतं. चिंतेई सोईंनी कुठवर सहन करायचं ? जातबांधव सर्व हसताहेत. गावकरी चकित झाले आहेत.

प्रहराजनी तपकिरीची चिमूट ओढीत म्हटलं, "तुम्ही का इतकं मनाला लावून घेता ? तुमचा हुकूम व्हायच्या अगोदरच गावकऱ्यांनी आपलं कर्तव्य पार पाडलंय. सनियावर बहिष्कार घातलाय. आता तो कसा काय जगतो ते आपणही बघून घेऊ."

हरी महांतींनी म्हटलं, "जगात काय विष्णुपूर हा एकच गाव आहे ? आणखीही असंख्य गावं आहेत. पण कुठल्या दुसऱ्या गावची माणसं येऊन सनियाचं काम चालवणार आहेत ? त्याला अगोदरच बजावलं होतं की बाबारे या गावात राहायचं असेल तर दुसरी लोकं राहताहेत तसाच तूही राहा. नाहीतर आपला रस्ता धर."

सोईंनी म्हटलं, "एका माणसासाठी गावकऱ्यांना इतका विचार करायची काय जरूर ? त्याला जसं रहायचं असेल तसं राहू देत. आपल्याला काय त्याचं ? जगात आणखीही बरेच उडाणटप्पू लोक आहेत. हादेखील त्यांच्यातलाच एक समजा झालं. आता आपण गप्प राहावं हेच इष्ट !"

गोविंद प्रधान नाराज होते. म्हणाले, "तो सनिया तेवढा माणूस आणि बाकीचे सर्व पशू असं का आहे ? त्यानं जमीनदार छोटेराय साहेबांचा अपमान केला. चिंतेई सोईंजीचा पण अपमान केला आणि तरी ताठ मानेनं या गावात आरामात रहातोय. मधु भोई काय बोलला ते ऐकलं ?"

प्रहराजनी म्हटलं, "सर्व गावकऱ्यांनी जर एकजूट केली तर एका माणसाला काय करता येणार आहे ? त्याच्यापाशी चार बैल आहेत. दोन चार वेळा ते कोंडवाड्यात पाठवले, शेताचं कुंपण चार सहा ठिकाणी तोडलं की येईल वळणावर."

हरी महांतींनी या सूचनेला दुजोरा दिला नाही. म्हणाले, "ही फार क्षुद्र कामं आहेत प्रहराजजी. त्याच्याविरुद्ध काही करायचं असेल तर नीट विचारपूर्वक करायला हवं."

सर्वजण हरी महांतीकडे बघू लागले. महांती जरा हसले. "त्याचं घर जरा आडवळणीच आहे. इतर घरांशी त्याचा काही संपर्क नाही. तेव्हा चांगलासा मुहूर्त बघून

त्याच्या घराला आग लावून टाकली म्हणजे झालं. त्यानंतर त्याच्या घरात राहणारी भिकारखान्यातून आलेली मंडळी आपसूकच निघून जातील. घरच नसलं म्हणजे राहतील कुठं ?"

निधी सोईं दचकले. म्हणाले, "हे काय भलतंच बोलताय तुम्ही ? इतकं मोठं पाप करणार ? माणसांना समजलं नाही तरी देव वरून बघतो ना सर्व ?"

गोविंद प्रधानांनी आपल्या कपाळावरून हात फिरवला. म्हणाले, "एक माशी मारण्यासाठी ही इतकी कामं का करायला हवीत ? मला काही हे योग्य वाटत नाही. सनियाचं गर्वहरण होईल आणि सोईंजींचा सन्मान वाढेल अशी काही तरी युक्ती योजायला हवी."

"काय करायला हवं ?" सर्वजण उत्सुकतेनं प्रधानाकडे बघू लागले.

प्रधानांनी म्हटलं, "माझ्या मते थोडा दम धरा. त्यातच सर्वांचं कल्याण आहे."

चितेई सोईंनी एक सुस्कारा सोडला, "मलाही तसंच वाटतंय," ते म्हणाले. "निधी-चीही याला संमती होती. ते म्हणाले, "सनिया जर आपल्या ताब्यात आला तर त्याला फूस लावून भलत्या मार्गानं नेणारे सर्वजण पळून जातील. मग सनिया आपोआपच पुन्हा रुळावर येईल. आपण त्याचं हितच पाहातोय."

गोविंद प्रधानांनी पुन्हा आश्वासन दिलं, "सारं काही होईल हो. तुमच्या मनात असलेलं सारं काही होईल. पण त्यासाठी थोडा वेळ हवा. थोडा पैसा हवा."

"पैसा हवा ?" चितेई सोईंनी विचारलं.

"हो पैसा हवा. जमीनदार छोटेराय साहेबांनी तर सनियाची नाडी धरून ठेवलीय. ते काय खूप मोठे आहेत. तुम्ही जर त्यांना खूष केलं तर नुसत्या 'सलामी'वर काम भागेल."

"सलामी ?"

"हो, हो सलामी," प्रधानांनी म्हटलं. "त्याचं असं आहे की तुम्ही सलामीचे काही रुपये द्या. मग सनियाचं घरदार, शेतीवाडी, बागबगीचा सारं तुमच्या ताब्यात येईल. खरं म्हणजे या सर्वांची किंमत निदान दोन हजार तरी असेल. पण तुम्ही जर हजार दिलेत तर मी हे काम करून टाकीन."

"पण त्याचा ताबा कसा मिळणार ?"

"न मिळायला काय झालं ? ते काय सनियाचं घर आहे ? त्याच्याकडून अजून सारा आलेला नाही. कोर्टात तक्रार करणं, मालमत्तेचा लिलाव करणं आणि ताबा घेणं—पण त्यासाठी अगोदर जमीनदारबाबूंना रुपये मिळायला हवेत."

"तुमचं बोलणं नीट समजलं नाही प्रधानजी," चितेई सोई म्हणाले.

प्रधान हसले. म्हणाले, "जरा सबूर. मी सारं काही सांगतो."

प्रधानांनी सर्वांकडे नजर टाकली. काही तरी गुप्त रहस्य असल्याचं महांति, प्रहराज, निधीवगैरे मंडळींनी ओळखलं. सर्वजण बाहेर निघून गेले. प्रधानांनी मनातली गोष्ट सांगितली.

चिंतेई सोईंनी सारं काही ऐकून घेतलं. उत्तरले, " हे तर फारच नामी आहे. चला मीपण तुमच्याबरोबर जमीनदारबाबूंकडे येतो. पैसा खर्च करणं काही फार मोठी गोष्ट नाही. मुख्य बाब आहे ती ही की सनियाला कसं मुठीत आणायचं ! ते व्हायला हवं. मी त्याला माझ्या मुठीत ठेवीन प्रधानजी. फक्त तुमची मदत हवी."

चिंतेई सोईंदेखील गोविंद प्रधानाबरोबर निमपूरच्या जमीनदाराकडे गेले. दोन दिवस त्यांना तिथं मुक्काम करावा लागला. छोटेरायनी एक हजार रुपये घेतले. बिडी-काडीसाठी म्हणून प्रधानानंही दोनशे घेतले. त्यानंतर प्रधान व सोई दोघे जाजपूरला गेलेत. (जाजपूर शहरात सबडिव्हिजनची कचेरी होती.)

शेतसारा वेळेवर भरला नाही, थकबाकी ठेवली या आरोपाखाली प्रधानांनी सनिया-विरुद्ध एकतर्फी डिग्री घेतली. कचेरीत हजर होण्यासाठी सनियाच्या नावे जितकी समन्स धाडली होती ती सर्व त्याला मिळाली होती. समन्स मिळाल्याचे पुरावेही होते. जमीनदाराच्या आपल्याच माणसांनी साक्षीदार म्हणून सह्या केल्या होत्या. हे होतं गोविंद प्रधानाच्या कारस्थानाचं फलित !

न्यायाधीशांना संशय येण्याचं काही कारण नव्हतं. शिरस्तेदार गोविंद प्रधानाचाच माणूस होता. दोघांची मैत्री होती. दोघेही गळ्यात तुळशीची माळ घालायचे आणि ' चैतन्य चरितामृत ' वाचायचे. याखेरीज जाजपूरला जेव्हा ' अष्टौप्रहर कीर्तन ' व्हायचं तेव्हा गोविंद प्रधान व शिरस्तेदार दोघे त्यात भाग घ्यायचे आणि हात उंचावून ' हरे कृष्णा...हरे राम...' भजन गायचे.

एकतर्फी डिग्रीसारखाच लिलावाचा निकालही एकतर्फीच लागला. कोर्टाच्या बाबूंना ठाऊक होतं की भिकारखान्यातून परत आल्यावर सनियानं काही जमीन खरेदी केली होती. आता तो आपलं घरदार व जमीन टाकून कुठं पळून गेला होता. रयत अशी पळून गेली की रीतीप्रमाणं त्याची मालमत्ता जमीनदाराच्या कबजात येते. पण या वेळी खास कोर्टाच्या माध्यमानं हे काम करण्यात आलं होतं. हो, उगाच कुणी नंतर भांडण उकरून काढायला नको.

सनियाच्या जमिनीचा लिलाव झाला तेव्हा गोपीनाथ भगवानाच्यावतीनं चिंतेई सोईंनी ती अल्प किमतीत खरेदी केली. आता जमिनीचा ताबा घ्यायचा होता. त्याबाब-तीत सल्लामसलत करून चिंतेई सोई दुर्गापूरला परत आले. सनियाची मालमत्ता खरेदी केल्याची गोष्ट त्यांनी अजून जाहीर केली नव्हती. निधींनादेखील काही सांगितलं नव्हतं.

दुर्गापूरमध्ये चिंतेई सोईंचं सारं काम आटोपलं होतं. हरी महांती जमीन जुमल्याची

नीट देखरेख ठेवीत होते. त्यांचा भाचाही आता तयार झाला होता. तो हरी महांतींना त्यांच्या कामात मदत करू लागला होता. आता विष्णुपूरला परत जायला हवं असं चितेई सोईनी ठरविलं. आपला निर्णय त्यांनी सर्वांच्या कानांवर घातला. सर्वांनी तो मान्य केला. पण धोबी तयार होईना.

धोबी सारखी देवासमोर बसून राहायची. पूजेच्या वेळी पूजा करायची आणि उरलेला वेळ पुराणवगैरे वाचण्यात घालवायची. देवळात येणाऱ्या सर्वांना प्रसाद वाटायची आणि दिवसातून दोनदा कसेबसे दोन घास पोटात ढकलायची. एकादशी, पौर्णिमावगैरे किती तरी व्रतवैकल्ये करायची आणि त्या दिवशी निराहार कडकडीत उपास करायची. कुणाशी फारशी बोलतही नसे. काकूवरच कामाची बरीचशी जबाबदारी टाकून ती चुपचाप एकटी बसून राहायची.

धोबीला झालंय तरी काय ? तिच्या आयुष्यातला हा बदल सर्वांना दिसला होता. पण त्याबाबतीत तिला विचारायची कुणाची काही छाती होत नव्हती. जाजपूरहून परतल्यावर चितेई सोईनी धोबीला विष्णुपूरला परत जायचा सल्ला दिला होता. पण धोबीनं स्पष्ट शब्दात नकार दिला होता. " ही माझी कर्मभूमी आहे. माझे सासूसासरे, पती सर्वजण इथंच जगले, इथंच देवाघरी गेले. माझ्या आईनंदेखील इथंच अखेरचा श्वास घेतला. ही पावनभूमी सोडून दुसरीकडे जाणं मला शक्य नाही. बाबा, तुम्ही पण इथेच राहा. तिकडे दुर्गापूरला काका आहेतच. काकूंना मुलाबाळांना घेऊन तिकडे जाऊ देत. मी काही जाणार नाही."

चितेई सोईनी खूप समजावलं होतं. म्हणाले होते, " लेकीच्या घरी वडिलांनी राहणं शोभत नाही बाळ. माझं आता वय होत आलं. गोपीनाथ देवासाठी अजून मला काही करता आलेलं नाही. देवळाची भिंत पडायला लागली आहे. कदाचित देऊळच एखाद वेळेस पडायचं. त्यासाठी काही करायला हवं. तू चल माझ्याबरोबर. मग सारं ठीक होईल."

चितेईच्या मनात दुसरंच काही होतं. त्यांना वाटत होतं की गावकऱ्यांच्या मदतीनं सनियाला घराबाहेर काढता येईल. तसं केलं म्हणजे त्याच्या आश्रयानं असलेले भिकारखान्यातील भुकेकंगालदेखील निघून जातील. वेड्या कईलादेखील मारून हाकलून देता येईल. त्यानंतर सनिया कुठं राहील ? अखेर त्याच्या डोक्यातलं वेड नाहीसं होईल. तो पुन्हा जातीत येईल. प्रतिष्ठित माणसासारखा समाजात राहू लागेल. मग धोबीचं त्याच्याशी लग्न लावून शांतपणे राहता येईल. लग्नानंतर आपली निम्मी इस्टेट सनियाच्या नावे करून मग देवाघरच्या बोलावण्याची शांतपणे वाट बघायची असाही त्यांचा बेत होता.

पण धोबीच जर विष्णुपूरला गेली नाही तर या सर्व बेताला अक्षरशः सुरुंग लागणार

होता. अहंकारामुळे ती जे काही करीत आहे ते चूक आहे. हे करताना तिच्या मनाला यातना होत आहेत. असा विचार करून चिंतेई सोईंनी पुन्हा म्हटलं, " बाळ, तू जर माझ्यापाशी राहिली नाहीस तर मला जगणं कठीण होईल. या जगात तुझ्याशिवाय दुसरं कोण आहे मला ? तुझा हट्टच असेल तर राहा तू काही दिवस इथं. तुझ्या काकूला पण तुझ्यासोबत राहू दे. मी जातो विष्णुपूरला परत. काही दिवसांनी येऊन तुम्हा सर्वांना घेऊन जाईन."

चिंतेई सोई विष्णुपूरला निघून गेले.

काही दिवसांनी कोर्टाचा एक चपराशी विष्णुपूरला आला. त्याच्याबरोबर गोविंद प्रधानदेखील होते. गावात दवंडी पिटली गेली. दवंडीचा आवाज गावकऱ्यांनी ऐकला होता. पण त्यामागचं रहस्य कुणालाच समजलं नव्हतं. गोविंद प्रधानाच्या कारस्थानानं सनियाचं घरदार, शेत, जमीनवगैरे सारं चिंतेई सोईंच्या ताब्यात आलं. गावच्या चार वडीलधाऱ्या माणसांनी साक्षीदार म्हणून सह्या केल्या. आणि सनिया घरात असतानाही फरारी म्हणून जाहीर करण्यात आलं.

चिंतेई सोईंनी सुटकेचा श्वास टाकला नि प्रहराजला विचारलं, " प्रहराजजी, आता पुढे ?"

प्रहराजनं तपकीर ओढीत, शेंडी हलवून उत्तर दिलं, " जय गोपीनाथ भगवानकी. त्याच्या कृपेनं सारं ठीक होईल. आता आपल्या नुसत्या इशाऱ्यासरशी गावकरी सनियाला गावाबाहेर हाकलून देतील. उरली गोष्ट त्याच्याकडे राहणाऱ्या लोकांची ! ती काय नुसती चिलटं आहेत."

चिंतेई सोई काही बोलले नाहीत. प्रहराज पुन्हा म्हणाले, " भगवान गोपीनाथ रोज रात्री माझ्या स्वप्नात येतात. म्हणतात, " अरे, माझं देऊळ मोडकळीला आलंय. तू करतोयस तरी काय ? नैवेद्य प्रसादाचीदेखील नीट काळजी घेत नाहीस. आणखी किती दिवस मी उपाशी राहायचं ? सोईंजी माझ्याकडे दुर्लक्ष करताहेत. मला ना राहायला चांगलं घर, ना पोटभर जेवण. कपड्यांचीदेखील आबाळच चालली आहे."

सोईंजी मान हलवून म्हणाले, " हो, हो, सारं ठीक होईल, सारं ठीक होईल. जरा सबूर. अच्छा प्रहराजजी, एक गोष्ट सांगा बघू. सनियानं प्रायश्चित्त घेतलं तर त्याला पुन्हा जातीत येता येईल ना ?"

प्रश्न ऐकून प्रहराज थक्क झाले. अगोदर प्रश्नाचा रोख त्यांच्या लक्षातच येईना. ते थोडा वेळ सोईंकडे नुसते टक लावून बघत राहिले.

चिंतेई सोईंनी पुन्हा म्हटलं, " असे गोंधळून जाऊ नका प्रहराजजी ! गोपीनाथाचं देवस्थान तसंच राहील. तुम्हालाच त्या जमिनीचे विश्वस्त नेमण्यात येईल. ती संपत्ती मी स्वतः तुमच्या नावे रजिस्टर करीन. सनिया याच गावचा पोर आहे. तो जर

सुधारला, नीट मार्गाला लागला, जातीत परत यावंसं त्याला वाटलं तर मी त्याला जमीन देईन, घर बांधून देईन. त्याचं लग्नही लावून देईन, त्यानं सुखासमाधानानं संसार करावा हीच तर माझी इच्छा आहे."

चितेई सोईंच्या मनात काय आहे ते प्रहराजना समजेना. म्हणाले, "शास्त्रं धुंडाळली तर यावर काही ना काही तोडगा सापडेलच. पण एका परजातीच्या, वेड्या, मवाल्यासाठी हे सर्व करायची काय जरूर ?"

चितेई सोईनी उत्तर दिलं, "काय जरूर आहे ते मी तुम्हाला नंतर सांगीन. तुम्ही अगोदर उपाय शोधा. हो, देवळाच्या डागडुजीसाठी चांगल्या कारागिरांना बोलवा, सामान गोळा करा. खर्च सारा मी देईन. जा..."

आशीर्वाद देऊन प्रहराज घरी निघून गेले.

एक शुभ दिवस पाहून देवळाचं काम सुरू झालं. गावकरी मोठ्या उत्साहानं हातभार लावू लागले. कार्यक्रमाची आखणी सारी प्रहराजचीच. सोईनी मुक्त हस्तानं दान दिलं. कटकहून कुशल कारागिरांना व मिस्त्रींना पाचारण करण्यात आलं. रात्रंदिवस काम चालू झालं. ही बातमी कळताच धोबीदेखील दुर्गापूरहून विष्णुपूरला आली. गोपीनाथ देवाचं मंदिर उभारलं जात होतं. हा सोहळा स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्याखेरीज तिला कसं चैन पडणार होतं ? पिता-पुत्रीच्या सल्ल्यानुसार काम चाललं होतं.

आपल्या कामकाजाची जबाबदारी चितेई सोईनी धाकट्या भावावर, निधीवर, टाकली होती. दुर्गापूर आणि विष्णुपूर दोहोंकडचा कारभार निधीच पाहत. चितेई सोई निश्चितपणे देवळाच्या कामात गढून गेले. निधीची पत्नी महिन्यातून निम्मे दिवस विष्णुपुरात राहायची व बाकीचे दिवस दुर्गापूरला राहायची. दोन्हीकडच्या घरांची तीच गृहिणी होती. त्यातल्या त्यात दुर्गापूरच्या संपत्तीवर नजर ठेवायची विशेष जरूर होती. धोबी विष्णुपूरला राहायची तेव्हा तिची काकू दुर्गापूरला राहायची. चितेई सोईंच्या खाण्यापिण्याची, तब्येतीची काळजी घ्यायला दोघींपैकी एक ना एक जण अवश्य हजर असायची. सध्या धोबी होती विष्णुपूरला.

आज पहिली अष्टमी. ओडिसात दरवर्षी कार्तिक पौर्णिमेच्या सात दिवसांनंतर हा सण मोठ्या धामधुमीनं साजरा करण्यात येतो. घरातल्या सर्वात थोरल्या मुलासाठी व मुलीसाठी हा सण अतिशय महत्त्वाचा असतो. आज घरोघरी 'एंडुरी पिठा' (तांदळाचे पीठ, नारळ, गूळ इत्यादींपासून बनवलेला एक गोड पदार्थ) तयार केलेला होता.

मुलांसाठी नव्या कपड्यांची खरेदी झाली होती. पण सनियाच्या घरी मात्र आज आनंदाचा लवलेश नव्हता. भरत सामल आणि काशी बेजला काही कामासाठी घरी सोडून बाकीची मंडळी शेतावर गेली होती.

घरातलं कामकाज आवरून भरत आणि काशी भजन गात बसले होते. जॉन आणि रहीम गोठा साफसूफ करायला निघून गेले होते, ते परत आले होते. थकून भागून गेलेला जॉन भरतपाशी बसला होता. म्हणाला, " सनिया आणि कई किती जीवापाड कष्ट करतात. किती सांगितलं की इतके कष्ट करू नका तरी कुणाचं काही ऐकत नाहीत. अशानं आजारी पडायचे एखादवेळी !" भरतनं भजन थांबवून म्हटलं, " अरे हेच तर काम करायचं वय आहे. आता जर कष्ट केले नाहीत तर पुढे कधी करणार ?"

दुपारनंतर सेवा बेहेरा सनियाच्या घरी आला. घरापासून थोडं दूर कापणीच्या पिकाचे दोन लहान लहान ढीग रचलेले होते. अजून मळणी केलेली नव्हती. सेवा बेहेरा तिथंच गेला. काय आश्चर्याची गोष्ट होती ? गावकऱ्यांनी सनियाला वाळीत टाकलं होतं. कुणीसुद्धा त्याच्या घराकडे फिरकत नसे. त्याच्या दारात नुसतं पाऊल टाकलं तरी विटाळ होईल असं लोक बोलायचे. पण आज हा सेवा बेहेरा कसा काय आला बुवा ? सर्वजण चकित झाले.

" सनिया कुठाय ?" सेवानं विचारलं.

" शेतावर." रहीमनं उत्तर दिलं.

सेवानं म्हटलं, " चितेई सोईंनी त्याच्यासाठी निरोप पाठवलाय की कसंही करून आज भेटून जा. फार महत्त्वाचं काम आहे. त्याला आत्ताच्या आत्ता सांगा हा निरोप."

सेवा घाईघाईनं निघून गेला.

त्याच वेळी नेमकं सनिया आणि कई शेतावरून परत येत होते. तळ्यात हातपाय धुऊन ते जरा उसंत घेत होते. तलावापलीकडे हिरवीगार बाग होती. त्याला लागूनच एक वाट होती ती थेट महादेवाच्या देवळापर्यंत गेली होती. चार वर्षांपूर्वी जी शेतं ओस पडली होती तीच आज उभ्या पिकांमुळे सोन्याच्या ताटांसारखी भासत होती. ते बघून गावकरी तोंडात बोट घालायचे आणि कित्येक जण तर मत्सरानं जळफळू लागायचे.

आपल्याच या यशावर सनियाचा विश्वास बसेना. हे सर्व करायला त्याला कुणी उत्साह दिला होता ? कुणी पैसे दिले होते ? जिनं ही सर्व मालमत्ता दिली होती, जिच्या प्रेरणेमुळं त्यानं कईचा हात धरून संसार थाटला होता ती होती धोबी ! धोबी विष्णुपूरला आली होती. तिला भेटावंसं वाटत होतं. पण मनाच्या खोल गाभाऱ्यातून

जणू कुणी अडवत होतं—नको, नको, नको. त्याच्या बाळाची आई होणारी कईदेखील जणू त्याला थोपवीत होती. कईसमोर धोबीच्या भेटीचा विषय काढायचं धाडस त्याला होत नसे.

पण कई बेफिकीर होती. सनियाचं प्रेम तिला लाभलं होतं. ती सनियाची घरधनीण झाली होती. याखेरीज सनियाचं बाळ तिच्या उदरात होतं. आता आणखी काय हवं ? झालं गेलं विसरून तिनं नव्या आयुष्याला सुरुवात केली होती. लोकांनी तिची विचारपूस केली नाही तरी तिला त्याची पर्वा नव्हती. तिला जगाचं काही सोयरसुतक नव्हतं.

कई म्हणाली, " खूप उशीर झालाय. चल घरी जाऊ या. सर्वजण काही न खातापिता आपली वाट बघत असतील."

कईनं सनियाचा हात धरला. सनिया दचकला. टक लावून कईकडे बघू लागला. तिचे टपोरे डोळे व गोबरे गाल बघून क्षणभर सनिया देहभान विसरला. तीच का ही कई जी वेडचासारखी बडबडायची ? काय होतं ते ध्यान नि आता बघा काय रूप बहरलंय ते ! अन्नवस्त्राअभावी ती हडळीसारखी झाली होती. पण आज ? किती बदलली आहे कई !

" इतकं काय बघताय निरखून ?" कईनं विचारलं.

सनिया हसला. म्हणाला, " तुला एकांतात नीट बघावंसं वाटतं कई. आज आई-बाबा असते तर काय म्हणाले असते ठाऊक आहे ?"

" काय ?"

" हेच की तू घरची लक्ष्मी आहेस."

" पुरे, पुरे. चला आता. जेवायची वेळ होत आलीय."

लटक्या कोपानं आपला हात सोडवून कई पुढे निघाली. पण सनियानं तिला पुन्हा आपल्यापाशी ओढून छातीशी कवटाळलं. तिच्या गोऱ्यापान गालाचं चुंबन घेत तो म्हणाला, " बरं, बरं, चल..."

सनियाच्या वक्षावर मस्तक ठेवून कईनं इकडेतिकडे बघितलं.

" किती निर्लज्ज आहेस—कुणी बघितलं तर..."

तिचे शब्द पुरे व्हायच्या आत एक स्त्री तिच्या नजरेच्या टप्प्यात आली. ती तलावापलीकडे उभी होती. तिच्या हातात एक टोपली होती. मावळत्या सूर्याची किरणं तिच्या चेहऱ्यावर पडत होती. तिला बघताच कईनं सनियाला जरा दूर ढकललं. म्हणाली, " बघा तरी तिकडे-–ती उभी आहे." सनियानंदेखील पलीकडे नजर टाकली—अरे ! धोबी ! !

कईनंदेखील पुन्हा पाहिलं. धोबी निघून जात होती. एकदाही मागे वळून पाहत नव्हती. तिच्यापुढे दुसरी एक मुलगी चालली होती.

कईनं विचारलं, " कोण होती ती ? धोबी ताई ?" सनियानं काहीच उत्तर दिलं नाही. कदाचित देता येत नव्हतं. छातीत कुठंतरी कळ उठल्यासारखं वाटत होतं. कसंबसं म्हणाला, " हो धोबीच होती."

कईचे डोळे भरून आले. म्हणाली, " तुम्ही व्हा पुढे. जा घरी. मी जरा धोबी ताईला नीट डोळाभर बघून येते." एका अबोध मुलासारखी ती धोबीच्या पाठी धावली. सनियाच्या तोंडून शब्द उमटला नाही.

दिवस मावळण्यापूर्वीच कई सनियापाशी परत आली. तलावापाशी एका झाडाखाली सनिया तिची वाट पाहत उभा होता. कईचा चेहरा पार पडला होता. सनियानं तिच्या म्लान मुखाकडे पाहून अंदाज लावला की काही तरी घडलं आहे खास. पण त्यानं मनातलं बोलून दाखवलं नाही. म्हणाला, " भूक लागली असेल ना ? चल आता घरी जाऊ या."

कईनं उत्तर दिलं नाही. खूप काही बोलायचं होतं. पण बोलली नाही. निमूटपणे सनियाच्या पाठोपाठ थोडा वेळ चालत राहिली. पण मध्येच अचानक थबकली. सनिया थक्क झाला. सनियाचे दोन्ही हात धरून कईनं म्हटलं, " एक गोष्ट सांगू ?"

" काय ?"

" धोबीताईने मला ओळख दिली नाही. ओळखूनही ओळख नसल्यासारखं दाखवलं. मी किती तरी गोष्टी विचारल्या. पण तिनं कशाचंही उत्तर दिलं नाही. मी तिच्याजवळ गेले तशी तोंड वाकडं करून खेकसली—शिवू नकोस मला. दुरूनच बोल काय बोलायचं ते."

" मग ?"

" मग काय ? काही नाही."

कईच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. म्हणाली, " धोबीताई महादेवाला चाललीय हे माझ्या लक्षातच राहिलं नाही. ती दुसरी मुलगी होती प्रहराजजीची नात. ती ओरडून कुणाला तरी म्हणाली, " अरे, ही वेडी कई देवळात शिरेल. तिला हाकलून द्या बघू."

त्यानंतर धोबीताईनं माझ्याकडे साधं पाहिलंसुद्धा नाही."

सनियानं कईचे अश्रू पुसले. तिचा हात धरून म्हणाला, " तू चल माझ्याबरोबर. त्या लोकांशी तुला काय करायचंय् ? तू जगाचा खूप अनुभव घेतला आहेस. आता लोकांच्या बोलण्यापुढे हात टेकणार आहेस होय ? ते बोलताहेत—बोलू देत. त्यांचं बोलणं मनाला एवढं लावून घ्यायची अजिबात जरूर नाही. आपण मृत्यूच्या तावडीतून

सुटून आलोय. खूप सोसलंय, रडलोय. आता हसत जगू या. अखेरीस जिथून आलो होतो त्याच स्मशानात परत जायचंय. तरी पण कण्हत-कुंथत जाण्यात काय अर्थ आहे ? हसत हसतच जाऊ या."

कईनं उसासा टाकला. सनिया पुन्हा म्हणाला, " ए, अशी थांबलीस काय ? चल माझ्याबरोबर. घमेंड, बडेजाव बाळगून जगणाऱ्या लोकांपासून आपण दूरच राहू या— खूप दूर. आपण त्यांचा द्वेष करणार नाही."

कईनं काही उत्तर दिलं नाही. सनियाच्या पाठोपाठ चालू लागली.

संध्याकाळी रहीमने निरोप सांगितला, " सनियादादा, तुम्हाला सोईजींनी बोलावलं आहे."

जावं की जाऊ नये. सनियाच्या मनाचा निर्णय होत नव्हता. अखेर खूप विचारांती त्यानं जायचं ठरवलं.

सायंकाळ झाली होती.

महादेवाच्या देवळाहून परतल्यावर धोबी आपल्या देवघरात गेली. तिला जे काही दिसलं होतं ते विसरणं अशक्य होतं. द्वेषामुळं तिनं कईला चार गोष्टी सुनावल्या होत्या, तिला टाकून बोलली होती, याच गोष्टीची तिच्या मनाला टोचणी लागली होती.

धोबीनं तुपाचा दिवा देवापुढं लावला. देवापाशी तिनं क्षमा मागितली, " देवा माझ्याकडून मोठाच अपराध घडला—मला क्षमा कर. सनिया सुखी राहो. कईबरोबर घरसंसार थाटून राहो. देवा रागाच्या भरात मी काय तोंडाला येईल ते बोलले. माझ्या मनात सनियाविषयीच्या प्रेमाचा जो अंधुकसा प्रकाश आहे तोदेखील मालवून टाक देवा. माझं प्रेम, माझा स्नेह सारं संपवून टाक."

धोबीच्या मनात आलं, " कईनं माझं मुळीच वाकडं केलं नव्हतं. मला भेटायला ती धावत आली होती. किती आतुरतेनं आली होती. तिचं सर्वस्व लुटून, तिला अनाथ वेडी करून तिचा पती तिला टाकून गेला होता, त्याचं बाळ तिच्या पोटात होतं, तेदेखील तिला वाचवता आलं नव्हतं, तोच पती तिला परत मिळाला होता. ती सुखी राहो देवा !"

धोबीनं देवापुढं मस्तक टेकलं. वाटलं, सनियाच्या प्राप्तीची जी लालसा माझ्या मनात होती त्याला कई मुळीच जबाबदार नाही. सनियावर तिचं लहानपणापासून प्रेम होतं. त्यालाच तिनं पती मानलं होतं. मला हे अगोदरच ठाऊक होतं तरी मी सनियाकडे आकृष्ट झाले होते. माझं त्याच्यावर प्रेम बसलं होतं. माझीच चूक होती ती. आता त्याचे परिणामही मलाच भोगायला हवेत, मलाच ते दुःख सहन करायला हवं.

धोबीच्या मनात आलं, सनियानं मला फसवलं होतं. माझ्यापासून सारं काही लपवलं होतं. पण देवा तुझा महिमा अगाध आहे. तुझ्यापासून काही लपून राहिलं नाही. तू सनियाला मार्गावर आणलंस. त्यानं पुन्हा कईचा स्वीकार केला. त्यानं योग्य तेच केलं पण माझंच चुकलं देवा. मी उगाच कईला टाकून बोलले. मला क्षमा कर देवा.

धोबीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. ती पुन्हा पुन्हा म्हणत होती, " सनियानं ठीकच केलं. त्यानं धर्म टाकला. जात सोडून एका अस्पृश्यासारखा तो जगतोय. तरीदेखील तो महान आहे. त्याचं मन विशाल आहे. आपलं कर्तव्य त्याला चांगलं ठाऊक आहे. खरंच त्यानं जे काही केलं ते योग्यच केलं. माझीच चूक झाली.

धोबी उठून बसली.

वारंवार पुसूनही अश्रू ओघळत होते. तिनं पुन्हा हात जोडले. "देवा, किती अश्रू दिलेस तू ? घेऊन टाक. हवे तितके घेऊन टाक. मलादेखील दगडासारखं कठीण, निर्जीव करून टाक देवा. सनियानं योग्य तेच केलं, माझंच चुकलं हे मी मान्य करते. मला कबूल आहे, मीच चुकले."

धोबीनं पुन्हा मस्तक टेकलं.

•

सनिया थक्क झाला होता. चिंतेई सोईं आपल्याशी इतकं चांगलं वागतील याची स्वप्नातही त्याला कल्पना नव्हती. चिंतेई सोईं त्याला कुत्र्याहूनही हीन लेखत असत या गोष्टीला फार काळ उलटला नव्हता. पण आज त्यांना काय झालंय ? त्याला बघताच ते ओसरीवरून उतरून खाली आले. म्हणाले, " अरे सनिया ? ये बाळ ये. आत ये."

सनियाच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. काय बोलावं हेच त्याला समजत नव्हतं. त्याची मती गुंग होऊन गेली होती. निर्जीव दगडी पुतळ्यासारखा तो चिंतेई सोईंचा हात धरून आत गेला. चिंतेई सोईं त्याला आपल्या झोपायच्या खोलीत घेऊन गेले आणि त्यांनी त्याला आपल्या पलंगावर बसवलं. मग दार लावून सोईंनी एक कपाट उघडलं आणि त्यातून काही कागदपत्र बाहेर काढले. ते कागद घेऊन ते सनियाच्या अगदी जवळ येऊन बसले.

सनिया आश्चर्यचकित झाला होता. सोईंजींच्या या उसन्या प्रेमामागचं रहस्य त्याला उलगडत नव्हतं. त्या दिखाऊ प्रेमाचा परिणाम काय होणार या विचारानं तो भेदरून गेला होता. चिंतेई सोईंनी चहूकडे नजर फिरवली नि म्हटलं, " कुठवर तुझा हा वेडे-पणा चालणार आहे सनिया ? समाजाबाहेर किती दिवस राहता येईल ? माणसाला राग येतो हे खरं. साहजिकच आहे ते. तुझ्या वडिलांवर मी नव्हतो का रागावलो ? त्यांनी सर्वांदेखत माझा अपमान केला होता. पण झालं गेलं गंगेला मिळालं. कोळसा

उगाळण्यात काय अर्थ आहे ? मागल्या गोष्टी आठवत बसल्यानं उगाच राग वाढत जातो. ते तर या जगातून गेले. आता मी कुणाशी नि कशासाठी वैर ठेवायचं ? तू या गावात परत आल्यापासून बरंच काही घडलं आहे. तुला जगाचा अनुभव नाही. कालचा पोर तू. पण तू आपलं पाणी दाखवून दिलंस. मीदेखील माझा दरारा राखला. व्हायचं होतं ते होऊन गेलं. आता त्या गोष्टीचा विचार करायची काही जरूर नाही. माझेही आता फार दिवस उरलेले नाहीत. कधी देवाघरचं बोलावणं येईल त्याचा काही नेम नाही. मी तुझ्या मनाला फार यातना दिल्या सनिया, मला क्षमा कर."

चिंतेई सोईंनी सनियाचा हात धरला. आज सनियासमोर त्यांचा वचक नाहीसा झाला होता. दबदबा संपला होता. सनियासमोर त्यांनी खाली मान घातली होती. जणू आपलं बोलणं त्यांना स्वतःलाच उमगत नव्हतं. चिंतेई सोई हरले होते. त्यांचे स्वतःचे डोळेही जणू त्यांचाच उपहास करीत होते.

आपल्या मनाचा कमकुवतपणा त्यांना जाणवत होता. पण हे असं व्हायचं कारण काय होतं ?

आपल्या बायकोची अखेरची इच्छा होती की धोबीचं सनियाशी लग्न...बायको जोवर हयात होती चिंतेई सोई तिच्याशी कधी धड बोलत नसत. पण आज त्यांना सारखी बायकोची आठवण येत होती. शिवाय धोबीचं म्लान मुखही त्यांच्या जिवाला डागण्या देत होतं. याच दोन कारणांमुळे चिंतेई आज इतके दुबळे बनले होते. लेकीच्या कल्याणाचा त्यांनी कधी विचार केला नव्हता. पैसा व प्रतिष्ठा या दोहोंच्या फेऱ्यातच त्यांनी आपलं उभं आयुष्य घालवलं होतं. पण आपण जे काही केलं ते चूक होतं हे त्यांना आज जाणवत होतं. म्हणूनच आज त्यांनी निश्चय केला होता की जग काय वाटेल ते बोलू देत. पण आपलं सारं काही देऊन धोबीला सुखी करायचंच.

सनियानं म्हटलं, " माझी क्षमा मागण्यासारखं काही गैरवर्तन आपण केलेलंच नाही. मी कशासाठी क्षमा करायची ? आपण मला वडिलांसारखे. माझ्याच हातून जे काही वावगं घडलं असेल त्याची क्षमा आपण मला करावी. लोकांच्या दृष्टीनं मी अस्पृश्य आहे. पतित आहे. तरी आपण मला बोलावलंत, आपल्यापाशी बसवलंत, हेच माझ्यासाठी खूप आहे. आता आपण मला का बोलावलं ते सांगावं..."

सोईजी म्हणाले, " मी तुझ्या वडिलांसारखा आहे हे खरं आहे. मुलानं दांडगाई केली तर वडील नाही का त्याला शिक्षा करीत ? मुलगा वाट चुकला तर वडील नाही का त्याला नीट मार्गावर आणीत ?"

सनिया उत्तरला, " मी कुठं नाही म्हणतोय ? तरीदेखील पिता असो वा पुत्र, प्रत्येकाची एक सदसद्विवेक बुद्धी असते. माझं जर काही चुकलं असेल तर त्यासाठी मी जरूर आपणासमोर नाक घासून माफी मागीन. पण माझं कुठं चुकलं ते आपणच सांगा."

चिंतेई सोईं म्हणाले, " तुझी हीच चूक होती की तारुण्याच्या भरात तू जगाला धुडकावीत होतास. तुझ्यासारखे असंख्य उद्दाम तरुण या जगात आहेत. आपलं भलं बुरं त्यांना काही समजत नाही. मागचा पुढचा कसला विचार न करता ते थेट निखाऱ्यावरच पाय ठेवतात. परिणामी त्याच निखाऱ्यानं पोळून ते मरतात, पण मी काही त्या सर्वांना वाचवण्याचा मक्ता घेतलेला नाही. तू मला चांगला ओळखतोस. माझ्या मनातलं तुझ्यापासून लपवण्याची माझी इच्छा नाही."

" ठाऊक आहे " सनिया म्हणाला.

सोईंनी सुस्कारा टाकला. " तुझ्या वडिलांनी आपल्या पोराबाळांसकट गाव सोडला होता, त्या दिवशी मला त्याचं अजिबात वाईट वाटलं नव्हतं. उलट मला त्या दिवशी आनंदच झाला होता. कारण त्या वेळी माझ्या मनात सुडाची भावना होती. तू भुकेकंगाल होऊन विष्णुपूरला परत आलास त्या दिवशीही माझ्या मनात कुठलीही सहानुभूती निर्माण झाली नव्हती. त्यानंतर तू वारंवार आमच्या घरी आलास. दर वेळी मी तुला घालूनपाडून बोलून घालवून दिलं होतं. त्यावेळी तुझी दशा बघून मला आनंदाच्या उकळ्या फुटायच्या. आज तू जात, धर्म सर्व सोडून गावकऱ्यांपासून अलिप्त होऊन राहत आहेस. गावकरीदेखील तुझ्याकडे ढुंकून बघत नाहीत. खरं तर या वेळी गावकऱ्यांना पाठिंबा देऊन तुझा सूड घेण्याची किती नामी संधी माझ्यापाशी आली आहे, ठाऊक आहे तुला ?"

" ठाऊक आहे." सनियानं उत्तर दिलं.

चिंतेई सोई हसून म्हणाले, " पण प्रत्यक्षात तुला काही वेगळंच दिसतंय. त्यालाही काही कारण आहे सनिया. मी नावाचा चिंतेई सोई आहे. स्वार्थाखेरीज मी काही करीत नसतो. मालमत्ता हेच जेव्हा माझं ध्येय होतं तेव्हा मी त्यासाठी सारं काही केलं. त्या कामी माणुसकीचे नियमही धाब्यावर बसवले. पण आज संपत्तीची तृष्णा राहिली नाही. माझ्या बायकोनं मरताना अखेरची इच्छा व्यक्त केली होती. तिनं तुझंच नाव घेतलं होतं..."

" माझं नाव ?"

" हो तुझंच नाव. धोबीचं तुझ्याशी लग्न लावून मग जगाचा निरोप घ्यायची तिची इच्छा होती."

सनियाचं डोकं गरगरू लागलं. जणू त्याच्या उरावरच कुणी घाव घालत होतं. स्तिमित होऊन तो चिंतेई सोईंकडे पाहत राहिला.

चिंतेई सोईंनी म्हटलं, " ती तर गेली या जगातून. पण त्यानंतर मी बराच विचार केला. धोबीच्या चेहऱ्याकडे पाहून मला समजलं की मी जे काही केलं ते चूक होतं. कितीही झालं तरी मीदेखील माणूस आहे. माझंही माझ्या मुलीवर प्रेम आहे. तुझ्या वागणुकीचा मी खोलवर विचार केला. माझ्या मते तुम्ही दोघंही स्वाभिमानी आहात.

या अभिमानापायीच तुम्ही दोघे आत्महत्या करीत आहात. धोबीची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली आहे. ती फार दिवस जगायची नाही. मी बाप आहे सनिया. उघड्या डोळ्यांनी लेकीचा मृत्यू बघणं मला कसं शक्य आहे ? त्याचसाठी तुला मी आज बोलावलं आहे. माझा मानमरातब, अब्रू, सारं आज मी तुझ्या हाती सोपवीत आहे. आणि—आणि तुझी क्षमा मागत आहे. मला माफ कर सनिया."

हतबुद्ध होऊन सनिया सोईकडे बघत होता. त्याच्या तोंडून अवाक्षर उमटलं नाही.

चितेई सोई म्हणाले, " आता मी तुझा एक शब्द ऐकणार नाही. हे घे माझं मृत्युपत्र. माझी सर्व मालमत्ता मीच कमावलेली आहे. संपत्तीच्या अर्ध्या वाट्याचा मालक मी आहे. मृत्युपत्रान्वये ही सर्व संपत्ती मी तुझ्या नावे करून टाकली आहे."

" माझ्या नावे ?"

" हो, तुझ्या नावे. तू माझं ऐकशील याची खात्री आहे मला."

धोबी कधीची बाहेर उभी होती. रात्र गहन होत होती. एव्हाना रोज चितेई सोई खाऊनपिऊन झोपी जात. धोबी स्वतःच त्यांना वाढायची. म्हाताऱ्या वडिलांची काळजी घ्यायची. तिनं देवापुढे शपथ घेतली होती की आता यापुढे अन्य कुणाचा विचार करणार नाही. उगाच दुःख उगाळण्यात अर्थ नाही. शेवरीचा कापूस जसा वाऱ्यावर उडत राहतो तशीच तीदेखील काळाच्या हवेवर नुसती भरकटत राहील.

बाबा जरा वरच्या सुरातच कुणाशी तरी बोलत होते. त्यांचा आवाज ऐकून ती दारापाशी आली. हे काय ? तिचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. हे स्वप्न तर नाही.

चितेई सोई बोलत होते—" काही बिघडणार नाही. ज्या अनाथांना तू आश्रय दिला आहेस त्यांचं काहीही नुकसान होणार नाही. त्यांना मदत करायचं कार्य तुला चालू ठेवता येईल. त्यांच्यासाठी तू वेगळं घर बांधून दे. त्यांना जमीनही दे...तुला कसली कमतरता ? माझं ऐक, तुला वाटेल ते तू करीत राहा. मला दोन मुठी तांदूळ दिवसातून दोनदा मिळाले म्हणजे झालं. मी काही तुझ्या कामात लुडबूड करणार नाही. त्या दोन मुठी तांदळाचीही मी सोय करून ठेवली आहे."

थक्क होऊन धोबी ऐकत होती.

सनियानं मान वर करून म्हटलं, " आपणाला कदाचित ठाऊक असेल— "

चितेई सोईनं त्याला पुढं बोलूच दिलं नाही. मध्येच म्हणाले, " सारं ठाऊक आहे मला. हे मृत्युपत्र बघ जरा तू, घे हे. म्हणजे मग मला सुखानं जगता येईल. तू पुन्हा जातीत समाजात सामील होशील. पैशा-अडक्याची काळजी नको. जो काय खर्च व्हायचा तो होऊ दे. खूप पैसा खर्च कर नि बघ लोकांची तोंडं कशी गप्प होतात ते !"

थोडं थांबून चितेई सोई पुन्हा म्हणाले, " कईचा विचार करतो आहेस का ? अरे वेड्या ती जाईल तिच्या वाडवडिलांच्या जमिनीवर. तिला वाटल्यास आपण तिथं घर बांधून देऊ. राहील बापडी तिथं. यात एवढा विचार करण्यासारखं काय आहे ? तू चांगला मुलगा आहेस याची खात्री आहे मला. तुझ्या मनात कसलंही पाप नाही, तुझी काही चूक नाही, या बाबतीत माझ्या मनात कसलीही शंका नाही. धोबीला तुझ्या हाती सोपवून मी निश्चिंत होईन. मग सुखानं देवाघरी जायला मी मोकळा."

सनियाची अस्वस्थता वाढू लागली. बाहेर धोबीदेखील बेचैन झाली होती. तिच्या सर्वांगाला कंप सुटला होता. भिंतीच्या आधारे ती उभी होती. बाबा असेच आणखी बोलत राहिले तर आपला जीव जाईल असं तिला वाटलं. तिचं मन तिला टोचत होतं—" छे, छे, हे अशक्य आहे, असंभव आहे. तिनं जे काही पाहिलं होतं ते आयुष्य-भर तिला विसरता येणार नव्हतं. संपत्ती आणि प्रतिष्ठेच्या मोहापायी कदाचित सनिया चितेई सोईचं म्हणणं कबूल करील पण सनिया चारित्र्यहीन आहे, कृतघ्न आहे. अशा माणसाला धोबीच्या मनात स्थान नाही.

" गप्प का ? बोल ना."

सनियाचे डोळे आसवांनी डबडबले. म्हणाला, " क्षमा करा मला. आपलं हे प्रेम, हे दान घेण्यास मी अपात्र आहे."

चितेई सोई दचकले.

धोबीदेखील दचकली. भिंतीआड उभी राहून ती सर्व ऐकत होती. सोईच्या हातून मृत्युपत्र गळून पडल्याचं आणि ते पलंगावरून उठून पाषाणवत उभे राहिल्याचं तिला दिसलं.

सनियादेखील उभा राहिला होता. धोबीला वाटत होतं की दार उघडून आत जावं आणि बाबांचे हात धरून त्यांना विचारावं, " हे काय करताय तुम्ही ? विधवा लेकीसाठी सारा स्वाभिमान गुंडाळून ठेवून एका धर्महीन माणसापुढे असे लाचार होताय ? माझ्याही धमन्यांतून तुमचंच रक्त वहातंय. त्या रक्तातही काही सामर्थ्य आहे. त्याच रक्ताच्या बळावर आज मी सांगतेय की हा एक चारित्र्यहीन कंगाल आहे, खरंच हा माणूस, सनिया तुमचा जावई व्हायच्या लायकीचा नाही."

पण तिच्या तोंडून शब्द उमटला नाही. पुढे व्हायचा प्रयत्न तिनं केला पण पाय जडशीळ झाले होते, सरकलेच नाहीत.

मान वर करून चितेई सोईंनी सनियाकडे बघितलं. मनात जणू आग भडकली होती आणि त्यात ते दग्ध होऊन जातील. बनेई परिडाच्या मुलानं सनेई परिडानं आपला

भयंकर सूड घेतला असं त्यांना वाटलं. त्यांची मोत्यासारखी अब्रू आज मातीमोल झाली होती.

तरीपण मन ऐकायला तयार नव्हतं. सनिया कदाचित ऐकेल, होकार देईल या अपेक्षेनं त्यांनी पुन्हा विचारलं, " सनिया बाळ, माझ्या आयुष्यातली ही शेवटची इच्छा तू पुरी नाही का करणार ? त्यासाठी माझं सर्वस्व मी तुझ्या हाती द्यायला तयार आहे. मी घायाळ झालो आहे—आयुष्याशी झगडण्याचं बळ आता माझ्या अंगी राहिलेलं नाही. अशा वेळी तू मला आणखी छळणार का ? बोल बाळ."

चितेईनी पुन्हा सनियाचे हात धरले.

सनियानं म्हटलं, " मी आपला एक नालायक मुलगा आहे. माझ्या मनात जे काही आहे ते मला नीट व्यक्त करता येत नाही. मी आपल्या पाया पडतो. क्षमा मागतो. खरं तर क्षमा मागायचीही माझी लायकी नाही. आपण द्याल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे. पण आपलं हे प्रेम, आपलं हे दान मला घेता येत नाही. मी असमर्थ आहे."

चितेई सोईंच्या पायांवर सनियानं डोकं ठेवलं. धोबीला आता आणखी सहन होईना. दार ढकलून ती क्रुद्ध वाघिणीसारखी आत खोलीत शिरली.

सनिया उठून उभा राहिला. त्याच्यासमोर धोबी उभी होती—त्याचा आत्मा, त्याच्या प्रेरणेचा मूलाधार—त्याचे डोळे भरून आले.

सनिया उभा होता. धोबीच्या डोळ्यात जणू स्फुल्लिंग फुलले होते. क्षणभर नजरेला नजर भिडली. धोबीला दिसले, सनिया तिच्यासमोर उभा होता. त्याच्याचसाठी ती जगत होती. त्याच्यापायी तिनं आपल्या सासुसासरे, पती यांच्या मानमर्यादेला काळोखी फासली होती. त्याच्याचसाठी आज तिच्या वडिलांची मान खाली झाली होती ती स्वत: दग्ध होत होती.

धोबीनं आपल्या बाबांच्या गळ्यात हात टाकले आणि विचारलं, " हे काय करताय बाबा ?"

चितेईनं मुलीला जवळ घेतलं. तिच्या कपाळाचं चुंबन घेऊन म्हणाले, " माझी चूक झाली बाळ." त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले.

लहान मुलासारखं धोबीनं आपल्या वडिलांच्या छातीवर मस्तक ठेवलं. तिच्या तोंडून व्यथित हाक बाहेर पडली, " बाबा..."

चितेईनी धोबीच्या केसांवरून हात फिरवीत म्हटलं, " मी तुझा म्हातारा मुलगा आहे. मला क्षमा कर, मां !" धोबी स्तब्ध उभी राहिली.

हे सर्व सनियाला असह्य होत होतं. मान खाली घालून तो निमूटपणे खोलीतून निघून गेला. कईचे अश्रूभरले डोळे त्याला दिसत होते. वाटत होतं, आता आपण धोबीच्या प्रेमास अपात्र आहोत. ही गोष्ट दुसऱ्या कुणाला समजली नाही तरी धोबीला

मात्र नक्कीच समजेल.

धोबीला नक्कीच समजेल—नक्की समजेल.

चूक आपलीच असल्याचं धोबीनं ओळखलं. देवाची सोबत घेऊन ती या जगात आली होती. तिनं सर्वांना रडवलं, स्वत:ही रडली. जगापासून दूर राहायचे शेकडो प्रयत्न तिनं केले. पण प्रत्येक प्रयत्न निष्फळ ठरला होता. हाडामांसाचं शरीर असताना या जगाच्या प्रभावांपासून तिला दूर कसं राहता येईल ? ते अशक्य आहे.

देवाच्या मूर्तीसमोर बसून धोबीनं हात जोडले—" देवा, तुझ्या चरणी मला आसरा दे. माझे सासुसासरे व पतीनं आसरा घेतला, त्याच जागी मलाही आसरा दे."

दिवसेंदिवस धोबीची दशा खालावत गेली. चिंतेई सोई चिंतातुर झाले. वैद्यांनी सांगितलं—" रोग शरीराचा नसून मनाचा आहे."

धोबी पार सुकून गेली. गालफडं वर आली. हातपाय काटकुळे झाले. बोलायला-देखील तिला जड जात होतं. नेहमी अंथरुणात पडून राहायची आणि मधून मधून उठून देवाची प्रार्थना करायची. कुणाच्याही प्रश्नाला उत्तर देत नसे.

धोबीला झालंय तरी काय ? चिंतेई सोई व्याकुळ झाले. दुष्काळातल्या कित्येक गोष्टी आठवल्या. त्यांच्याच घरासमोर मूठभर तांदळासाठी लोकांनी डोकं आपटलं होतं. रडले होते. पण त्यांना पाझर फुटला नव्हता, त्यांनी कधी मदत केली नव्हती. आज धोबी त्याच भुकेकंगालांसारखी दिसत आहे. इतकी तिची तब्येत बिघडली आहे. कंगालांमध्ये चिंतेई सोईंचा कुणी मित्र वा नातलग नव्हता. म्हणून त्यांच्या सुखदु:खाचं त्यांना सोयरसुतक नव्हतं आणि त्यांनी सहानुभूती दाखवली नव्हती. उलट जे लोक भुकेपायी रस्त्याच्या काठी मरण पावले त्यांच्याकडे त्यांनी तिरस्कारानंच पाहिलं होतं. जिल्ह्यात दुष्काळानं इतके लोक पटापट मरत असताना ते मात्र आपली मालमत्ता वाढवण्यात गुंतले होते. कुणासाठी ?

त्या वेळी हा प्रश्न मनात उभा राहिला नव्हता. आज धोबीच्या सुखासाठी ते सारं काही करायला तयार होते. सारी संपत्ती खर्चायला तयार होते. पण आपली सर्व धन-दौलत देऊनदेखील ते धोबीसाठी आनंद विकत घेऊ शकत नव्हते. त्यांचा सर्व स्वाभि-मान, घमेंड वाया गेली होती. त्यांनी सनियाचा तिरस्कार केला होता. गावी परत येऊन सनियानं आपल्या प्राणांची भीक मागितली होती. मृत्यूच्या तावडीत तो तड-फडत होता. पण त्याच सनियानं आज चिंतेई सोईंसारख्या धनवानाच्या संपूर्ण संपत्तीला

लाथ मारली होती.

आई...

धोबीनं मान वर करून सर्वत्र नजर टाकली. चिंतेई सोई जवळच बसले होते. चिंतेई सोईनी धोबीच्या कपाळावर हात फिरवला. म्हणाले, " मां, तुला काहीदेखील झालेलं नाही. सर्वजण म्हणताहेत तुला कुठलाही रोग झालेला नाही. कसला विचार करते आहेस तू ? मला नाही सांगणार ? मी तुझा म्हातारा पोर आहे. तुझ्या मनातलं माझ्यापासून नको लपवूस, सांगशील ना ?"

धोबीनं आपल्या कृश हातांनी वडिलांचे हात धरले. जराशी हसली. म्हणाली, " बाबा, तुम्ही उगाच काळजी करता. मीच दुर्दैवी आहे. या दुर्दैवी मुलीसाठी तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागला !"

धोबीनं डोळे मिटले. चिंतेई सोई आणखीनच उद्विग्न झाले. विचार करू लागले, " या परिस्थितीला कोण जबाबदार ? सनिया ? हो, सनियाच या सर्वांच्या मुळाशी आहे. धोबीच्या आकांक्षांवर त्यानंच बोळा फिरविला. तिच्या मनावर आघात केला. त्या आघाताची प्रतिक्रिया धोबीला सहन होण्यासारखी नव्हती. चिंतेई सोईंनी ठरविलं, या कृत्याचा सूड म्हणून सनियाला खाली पाहायला लावायचं. विष्णुपुरातून सनियाचं नाव-निशाण कायमचं पुसून टाकायचं. तरच धोबीच्या जिवाला चैन पडेल.

सनिया उदास होता. चिंतेई सोईच्या घरून आल्यापासून तो उदास होता. सनिया हल्ली खिन्न, विरक्त असे, कामातूनही त्याचं चित्त उडालं होतं. या गोष्टी गाव-कऱ्यांच्याही लक्षात आल्या होत्या.

झालंय तरी काय सनियाला ? सनियाच्या विमनस्कतेचं कारण काय हे विचारावंसं कईला कितीदा तरी वाटायचं. पण तिनं विचारलं नाही. काही तरी अघटित घटना घडली असल्यानं सनियासारख्या धैर्यशाली माणसाचा धीर खचला असल्याचं तिनं ओळखलं.

'धनु संक्रांती'च्या आदल्या रात्री सनियानं कईला जवळ बोलावलं. म्हणाला, " कई, एक गोष्ट विचारू ?"

कईनं सनियाकडे अर्थपूर्ण नजरेनं पाहिलं. जणू म्हणाली, " विचारा काय विचा-रायचं ते."

" हे घर, ही मालमत्ता कुणाची आहे ?"

" तुमची नाही काय ?"

सनियानं थोडं थांबून उत्तर दिलं, " नाही, ही सर्व मालमत्ता माझी नाही. दुसऱ्यां-

पासून पैसे घेऊन मी ही जमीन विकत घेतली होती, हे घर बांधलं होतं. माझ्या निढळाच्या घामानं ही ओसाड जमीन सुपीक झाली. पण ज्यांच्या पैशानं हे सर्व केलं होतं, ज्यांच्या उत्साहामुळं मी माझे सर्व कष्ट, व्यथावेदना विसरलो होतो त्यांच्याप्रति मी अन्याय केला आहे. त्यांच्या मनावर घाव घातला आहे."

उत्सुकतेनं कईनं विचारलं, " कोण आहेत ते ? तुम्ही त्यांच्यावर का म्हणून अन्याय केला ?"

सनियानं थोडा विचार केला. मग म्हणाला, " कई, एक गोष्ट मी तुझ्यापासून लपवून ठेवलीय. त्याचा मला आज पश्चात्ताप होतोय. पण ते माझ्या मनातच राहू दे."

" तुम्ही जी काय चूक केली असेल ती आता नाही का सुधारता येणार ? ज्यांच्या मनावर तुम्ही आघात केला त्यांची क्षमा नाही का मागता येणार ?"

" या बाबतीत मी खूप विचार केला. मी जाणूनबुजून त्यांच्या मनाला दुखावलं आहे. आता गोष्टी हाताबाहेर गेल्या आहेत. त्यात सुधारणा करायला गेलो तर आणखी एखादी भलतीच चूक माझ्या हातून होईल. माझ्या स्वतःच्या नजरेत, माझ्या माणुसकी-समोर मी गुन्हेगार ठरेन कई. म्हणून गप्प राहणंच..."

सनिया गप्प झाला.

कईनं विचारलं, " अहो, असे गप्प का झालात ? सांगा ना..."

सनिया उत्तरला, " आता या घरात एक मिनिटभरही थांबणं मला योग्य वाटत नाही. आपण जिथून आलो तिथंच रस्त्यावर परत जावंसं मला वाटतंय. आपलं रक्त आटवून आपण पुन्हा एक नवा संसार उभारू या."

" पण कुठं ?"

" ते नाही ठाऊक. माणसाच्या कल्पनेतलं जग लहान का असेना पण माणसाचं पोट भरण्यासाठी हे जग फार मोठं आहे. नजर पोचेल, पाय नेतील तिथं आपण निघून जाऊ या."

कई म्हणाली, " ठीक आहे, पण त्यासाठी इतकं वाईट वाटून घ्यायची काय गरज आहे ? तुमचा हात धरून क्षितिजापर्यंत चालायची माझी तयारी आहे. पण ज्या लोकांना तुम्ही या घरात आसरा दिला आहे, त्यांचं कसं होणार ?"

" त्यांचाच विचार करतोय मी. ज्या आदर्शाच्या पाठी मी लागलो होतो आणि सर्वांना आपलंसं केलं होतं तो माझा आदर्श आज असफल झाला आहे. तरीपण मी त्यांना मरू देणार नाही. माझं रक्त देऊन का होईना मी त्यांना जिवंत राखीन."

" मीदेखील तेच करीन." कई ठामपणे म्हणाली.

सनियाचं हृदय कृतज्ञतेनं भरून आलं. आपली प्राणप्रिय कई कर्तव्याच्या मार्गावरही अयोग्य ठरणार नाही हे त्यानं ओळखलं. धोबीसाठी त्याला खरंच वाईट वाटत होतं. त्यानं धोबीला ओळखलं नव्हतं. तिला समजून घेण्यात त्याची चूक झाली होती आणि कईवर त्यानं प्रेम केलं होतं. परिणामी कईला त्याच्या मनात स्थान प्राप्त झालं होतं. कईवर प्रेम करण्यात त्याची कसलीच चूक झाली नव्हती.

कईकडे बघता बघता सनियानं तिचं मस्तक धरून आपल्याकडे ओढलं आणि तो तिच्या गालांची चुंबन घेऊ लागला. लज्जेमुळं कईला फार वेळ तिथं थांबवलं नाही.

सनियाला भास झाला जणू खूप लांबून धोबीचे दोन अश्रुभरले नेत्र त्याच्याचकडे पाहत आहेत. जणू तक्रार करीत आहेत—" किती कृतघ्न आहेस तू !"

उरात काही तरी खुपल्यासारखं सनियाला वाटलं. म्हणाला, " कई—"

" काय ?"

" या घरात आता एक मिनीटही थांबावंसं वाटत नाही. यापेक्षा एखाद्या रस्त्याच्या कडेला, एखाद्या झाडाखाली जाऊन राहिलेलं पत्करलं. या घरात जणू आगडोंब उसळला आहे."

" रस्त्याच्या काठी राहायला मी डरत नाही."

" जा, जॉन काका, रहीम, भरत आणि काशी बेजना बोलाव."

कई दार उघडून आत निघून गेली.

जॉननं सारं ऐकून घेतलं. किंचित स्मित करून म्हटलं, " माणूस म्हणजे नुसता हाडा-मांसाचा प्राणी नव्हे. शारीरिक बाजूखेरीज त्यात आणखीही बरंच काही असतं नि ते पार्थिव डोळ्यांना दिसत नसतं. ते आहे माणसाची बुद्धी, ज्ञान, प्रेम इत्यादी. शारीरिक सुखासाठी आवश्यक तेच केल्यानं सर्व मानव समान होत नसतात. जगातील सर्व मानव कधीही समान होऊ शकत नाहीत. समान न होणं हा निसर्गाचा एक नियमच आहे. म्हणूनच प्रत्येक जण एकमेकापासून भिन्न आहे. सर्वत्र एक पातळी असती तर पाणीसुद्धा वाहिलं नसतं. जगात जडता आली असती. पहाडाच्या दगडासारखी मानवजातदेखील अचल झाली असती."

जॉननं जरा श्वास घेतला. म्हणाला, " म्हणूनच तर जगात उच्च नीच, जात, धर्म वगैरे आपोआप तयार झाले. जगात जर नवं काही करायचं असेल तर अडचणींना तोंड द्यायलाच हवं. नीट विचार केला तर नवं असं आहेच काय ? ज्याला आपण नवीन समजतो, ते जुन्याच गोष्टीचं नवं रूप असतं, म्हणून माझं हेच म्हणणं आहे की या समाजात आम्हाला स्थान नसलं तरी समाजाशी दोन हात करायची शक्ती काही

आमच्यात नाही. म्हणून याच समाजात आम्हाला राहावं लागेल. समाजात राहूनच हळूहळू नवे नियम प्रचलित करावे लागतील. हे जर आपल्याला करता येत नसेल तर आपण हा समाज सोडून निघून जायला हवं."

सनिया म्हणाला, " पण काका, इथं तर आता आणखी एक मिनीटही थांबणं कठीण आहे."

जॉननं म्हटलं, " ठाऊक आहे मला. हे घर सोडावं लागेल. प्रत्येकाला आपापल्या वाटेनं जावं लागेल."

रहीम म्हणाला, " जॉन काका ! मी निघून जायला तयार आहे. मी इथं राहायला आलो नव्हतोच मुळी. पण सनियादादानं मला जाऊ दिलं नाही आणि कई ताईनं प्रेमाची ही बंधनं अधिक दृढ केली. आता मात्र ही बंधनं कुणालाही तोडता येणार नाहीत. मीदेखील सनियादादाचा हात धरून जाणार. तो नेईल तिकडे मीपण जाणार."

सनियानं म्हटलं, " पण काका, तुम्ही आम्हाला सोडून कुठं जाणार ? तुमच्याच आशीर्वादानं तर मी माझ्या जीवनाची निरगाठ कईच्या जीवनाशी बांधून टाकली. रहीम तुमचा एक हात धरील आणि मी दुसरा. तुम्ही आम्हाला वाट दाखवा आणि आम्ही चालत राहू."

जॉनला अतिशय आनंद झाला. त्याचे डोळे भरून आले. आनंदाच्या आवेगात म्हणू लागला, " तुम्ही दोघं माझी दोन मुलं आहात, माझे दोन नेत्र आहात. मी तुम्हा सर्वांना सोडून कुठं जाणार ?"

काशी व भरतच्या चेहऱ्यावर औदासीन्य होतं. कईनं म्हटलं, " ही माझी दोन दुबळी लेकरं आहेत. मी स्वतःच्या हातांनी जोवर यांना भरवीत नाही, ही उपाशी राहतात. यांचे हात धरून मीदेखील तुमच्याबरोबर येणार काका."

काशी व भरतचे चेहरे फुलले. त्यांना खूप आनंद झाला.

सनियानं विचारलं, " केव्हा निघायचं काका ?"

" उशीर कशाला ?" जॉननं उत्तर दिलं.

पहाट उजाडणार होती. रात्रीच्या अखेरच्या प्रहराचा तारा आकाशात लपंडाव खेळत होता. हा तारा प्रकाश देत राहिला आहे—अनादी कालापासून, आपल्या या पृथ्वीचा जन्म झाला—या मानव जातीचा जन्म झाला तेव्हापासून या पहाटताऱ्यानं सारं काही पाहिलं आहे आणि पुढंही नेहमी पाहत राहील. अखेर एक दिवस असाही उगवेल ज्या दिवशी आमची ही लहानशी पृथ्वी केन्द्रापासून विलग होऊन महाशून्यात कुठंतरी अदृश्य होऊन जाईल—या जगाचा विनाश होईल—त्या वेळीही हा तारा असाच लकाकत राहील.

धोबी दचकली.

त्या दिवशी संध्याकाळी जो प्रकार घडला होता, तो आठवला. कईनं सनियाच्या खांद्यावर आपलं मस्तक विसावलं होतं. प्रेमानं, भयानं तिचे डोळे व्याकुळले होते. नकळत धोबीच्या तोंडून उद्‌गार निघाले—' कृतघ्न.'

धोबीनं खिडकीतून बाहेर नजर टाकली. अंधार पसरला होता. बाहेरचं वातावरण भयंकर होतं. आभाळात पूर्वेला एकुलता एक तारा चकाकत होता. जणू उपहास करीत होता.

दिव्याची वात पुढे सारून चिंतेई सोई धोबीपाशी आले.

" काय आहे बाळ ? त्रास होतोय का कसला ?" त्यांनी विचारलं. धोबीच्या कपाळावर त्यांनी हात फिरवला. " मानवजातच अती कृतघ्न आहे. माणसाला उपकाराच्या ओझ्याखाली दडपून टाकायला फार मोठ्या ताकदीची जरूर लागते. सनिया येईल पुन्हा. मग मान खाली घालून आमच्या विनवण्या करील. तू मुळी काळजी करू नकोस." त्यांनी म्हटलं.

धोबी अस्वस्थ होती. घरात चहूबाजूंना तिनं दृष्टी टाकली—"बाबा." तिनं हळूच हाक मारली.

" काय बाळ ?"

" सनियाला क्षमा नाही का करणार ?"

चिंतेई सोईंनी थोडा वेळ विचार केला. म्हणाले, " क्षमा करता येईल की बाळ ! पण एकदा तरी निदान त्यानं आपल्या घरी यावं—तुझ्यासमोर उभं राहून तुझ्याशी बोलावं; तो येईल, नक्कीच येईल, याची खात्री आहे मला. त्याला काय शिक्षा द्यायची तेदेखील मी ठरवून टाकलं आहे."

" शिक्षा ?"

" हो, हो, शिक्षा ! पण तुला त्याची काळजी करायचं काही कारण नाही. बाप नाही का आपल्या मुलाला शिक्षा देत ? मी जे मृत्युपत्र तयार केलं आहे ना ते नीट सांभाळून ठेव बरं. सनिया फार चांगला मुलगा आहे. मी देईन ती शिक्षा खालच्या मानेनं मान्य करायचं त्यानं कबूल केलं आहे. तो नक्कीच कबूल करील. मी त्यालाच माझी सारी संपत्ती देणार आहे...आणि..."

" नको, नको, बाबा ! तो इतका कृतघ्न आहे की त्याला शिक्षाच व्हायला हवी, बक्षीस मिळता कामा नये. त्याला शिक्षा करा, बाबा ! तो इतका कृतघ्न आहे की त्याला शिक्षाच व्हायला हवी, बक्षीस मिळता कामा नये. त्याला शिक्षा करा बाबा ! '

बोलता बोलता धोबीनं उशीत तोंड लपवलं. तिचे डोळे रडत नव्हते तर तिचा आत्माच रडत होता.

चिंतेई सोईं तिच्या मस्तकावर हात फिरवीत होते.

धोबीनं मान वर करून विचारलं, " काका नाही आले ?"

" सगळ्या पोराबाळांना बरोबर घेऊन येणार आहे ना तो ? उद्या येईल. मी निरोप पाठवला आहे."

जरा थांबून धोबीनं म्हटलं, " बाबा, मी विदेईला दत्तक घेईन. तुम्ही याची व्यवस्था करा. तुम्ही सांगाल तसं करायला मी तयार आहे."

चिंतेई सोईंच्या तोंडून अस्फुट उद्‌गार बाहेर पडला, " वेडी !"

धनुसंक्रांती !

सकाळची वेळ होती. चिंतेई सोईंनी गावकऱ्यांना बोलावलं होतं. सर्वांदेखत ते म्हणाले, " देवासाठी देऊळ तयार आहे पण देवळाचा कारभार चालवण्यासाठी काही पैशांची व्यवस्था करायला हवी."

प्रहराजच्या हाती कागदपत्र देत चिंतेईंनी पुढे सांगितलं, " सनियाची सर्व मालमत्ता देवळासाठी खरेदी केलेली आहे. कायद्याप्रमाणं ती ताब्यात घ्यायचा हुकूम मिळालेला आहे. तो आपल्याच गावचा मुलगा असल्यानं मी त्याला वळणावर आणायचा खूप प्रयत्न केला. पण यश मिळालं नाही. अन्याय करीत तो असा किती दिवस आपल्या गावात राहणार ? आपण काही शेळ्यामेंढ्या थोडीच आहोत ? आपण काही पशू नाही, त्याचा अन्याय कुठवर सहन करणार ? आता गावकऱ्यांनीच आपल्या देवाची संपत्ती ताब्यात घ्यावी. पण तसं करताना थोडं सावध राहायला हवं. कुणाशी भांडणतंटा करू नका. मारपीट करू नका. पण जितके फुकटखाऊ तिथं असतील त्या सर्वांना हाकलून लावा."

सेवा बेहेरानं शंका व्यक्त केली, " पण कोर्टाची भीती आहे ना ?"

" अरे, तुम्ही का उगाच काळजी करता ? कोर्टाचं सारं मी बघून घेईन. " सोईंजींनी आश्वासन दिलं." जमीन ओस पडली होती. लोकांनी त्यावर घर बांधलं. शेती केली. निम्मं पीक तुम्ही कापून घेतलं. निम्म्याची कापणी आज होईल."

एकूण प्रकार काय आहे ते सेवा बेहेऱ्याच्या आता कुठं लक्षात आलं. बिनी कांडीनं विचारलं, " पण त्यांनी आमच्या कामात अडथळा आणला तर ? ते जर मारायला आले तर काय करायचं ?"

सोईंनी उत्तर दिलं, " तसं झालं तर तुम्हीही पाहून घ्या. सोडू नका त्यांना. पण त्यांनी जास्तच गोंधळ घातला तर मात्र मला कळवा."

जरा थांबून सोईंनी म्हटलं, " सनियाच्या जमिनीतून जे काही मिळेल त्यावर देवळाचा वर्षाचा खर्च काही भागणार नाही. म्हणून माझ्या जमिनीपैकी पंधरा एकर जमीन मी देवळाच्या नावं रजिस्टर्ड केली आहे. या जमिनीवरच्या पिकाची अजून कापणी केलेली नाही. सनियाच्या जमिनीवरचं धान कापून झाल्यावर माझ्या जमिनीतलं धानही कापून घ्या. सारं धान सनियाच्या घरापाशीच गोळा करून ठेवा."

फारच चांगला प्रस्ताव होता हा. गावकरी खूष झाले. ' हरिबोल ' चा गजर झाला. प्रहराजनी आनंदातिशयानं अधीर होऊन म्हटलं, " धन्य आहे सोईंजी ! आपण अमर व्हाल ! एका धर्मात्म्याच्या रूपात नाव अमर राहील."

सोईं म्हणाले, " आज धनु संक्रांती आहे. देवाला लाह्यांचा प्रसाद लावण्यात येईल. आज रात्री जेवणावळीची व्यवस्था करा प्रहराजजी ! आपल्या गावच्या गावकऱ्यां-व्यतिरिक्त जो कुणी बाहेरूनही येईल त्या सर्वांना जेवण घालायचंय. जो काही खर्च येईल तो मी देईन. एक चांगली तिथी पाहून चोवीस तासांच्या अखंड कीर्तनाचीदेखील व्यवस्था करा. त्याचा खर्चही मीच करीन. याच वर्षापासून ही प्रथा सुरू व्हायला हवी. पुढचा खर्च मग मंदिराच्या कोषातून दिला जाईल."

प्रहराजजी पुन्हा म्हणाले, " सोईंजी एक महान धर्मात्मा आहेत." लोकांनी पुन्हा ' हरिबोल 'चा गजर केला. सोईंजींच्या आदेशावरून गावकरी निघन गेले. घरात फक्त प्रहराज उरले.

सोईंनी प्रहराजना आणखी जवळ बोलावले, म्हणाले, " हे पाहा, सनिया आपल्याच गावचा मुलगा आहे. त्याला मी का म्हणून अडचणीत टाकू ? त्याच्याविरुद्ध काही बोलायची खरंच माझी इच्छा नाही. मला त्याचा द्वेष नाही. अन्नछत्रातून येऊन त्याच्या घरी ठाण मांडून बसलेले लोकच त्याला चिथवतात. ते लोक जर त्याचं घर सोडून गेले तर सनियाला मजेत आपल्या गावात राहता येईल. कितीही झालं तरी अखेर तो आपल्याच गावचा मुलगा आहे. त्यानं घरसंसार थाटावा, सुखासमाधानात राहावं हीच तर माझी इच्छा आहे."

प्रहराज बुचकळ्यात पडले. काय उत्तर द्यावं ते त्यांना समजेना. चिंतेईंनी त्यांच्या मनातलं ओळखलं. म्हणाले, "पण हो, ठाकुरद्वारच्या संपत्तीतून त्याला कपर्दिकही मिळणार नाही. तुम्ही जाऊन त्याला माझा निरोप सांगा की त्यानं जर येऊन माझी क्षमा मागितली, माझं म्हणणं कबूल केलं तर देवालयासाठी त्याची जितकी जमीन घेतली आहे त्याच्या दुप्पट जमीन मी माझ्या संपत्तीतून त्याला देईन. खेरीज त्याच्या वडिलांची जमीनही त्याला परत देईन."

हे ऐकून प्रहराज चांगलेच गोंधळले.

सोईंनी पुन्हा म्हटलं, " हे पाहा, तुम्ही त्याला एकांतात सारं काही समजावून सांगा.

तो आपल्याच गावातला मुलगा आहे. तुमच्या सांगण्यावरून तो जर सुधारला, नीट मार्गाला लागला तर मी तुम्हालाही चांगल्यापैकी पाच एकर जमीन बक्षीस म्हणून देईन. माझ्या संपत्तीतून मी या जमिनीची रजिस्ट्री तुमच्या नावे करून टाकीन. समजलं ?"

प्रहराज खूष झाले. जमिनीचं नाव ऐकताच त्यांचा चेहरा उजळला. सोईंजी बोलल्यासारखं केल्यावाचून राहणार नाहीत याची खात्री होती त्यांना. थोडीशी तपकीर ओढून ते म्हणाले, " हे छोटंसं काम काय मी सहज करून दाखवीन. माझा शब्द सनिया खाली पडू देणार नाही."

" निघा तर मग आता. " चिंतेई सोई म्हणाले.

प्रहराजजी प्रसन्न चित्तानं निघाले. सोईंनी दीर्घ उसासा टाकला आणि विचारात दंग झाले.

सकाळी, नऊ वाजता...

पूजा संपवून धोबी आपल्या खोलीतून बाहेर आली. किती रोड झाली होती ती. डोकं भयंकर दुखत होतं. रक्तमांसहीन शरीराचा थरकाप होत होता. डोळ्यांसमोर अंधेरी येत होती.

ठाकुरद्वारचा दरवाजा धरून ती क्षणभर उभी राहिली. डोळे धड उघडत नव्हते. दाराला डोकं टेकून तिनं पुन्हा डोळे मिटले, " हे राधामाधवा ! आणखी किती माझा अंत पाहणार आहेस ? माझ्या अपराधांची मला मिळाली तेवढी शिक्षा पुरेशी नाही का ?"

बल्ली मोलकरणीनं धोबीला पाहिलं होतं. " औषध घ्यायची वेळ झाली ताई !" तिनं सांगितलं, " पाहा ना किती उशीर झालाय."

बल्लीच्या आधारानं धोबी हळूहळू आपल्या खोलीकडे निघाली. आपल्या बिछान्यावर जाऊन बसली. त्याच बिछान्यावर ती किती तरी दिवसांपासून तळमळत होती. पण त्याच अंथरुणावर पडल्या पडल्या तिला व्यथेबरोबरच थोडी शांती पण वाटत होती. मरण पावलेल्या लोकांच्या स्मृती तिच्या मनाचं सांत्वन करीत असत. तिच्या आजूबाजूला वावरणारे, तिचा मान राखणारे, तिच्याशी हसून बोलणारे ते लोक आता राहिले नाहीत. त्यांचे चेहरे तिच्या नजरेसमोर तरळून जायचे. किती सुंदर स्वप्न होतं ते. ते बघताच या जगाची विरक्ती वाटून मन हळूहळू त्या दुसऱ्या दुनियेकडे वळू लागायचं.

प्रहराजची नात पार्वती कधीची येऊन खोलीत चुपचाप उभी होती. धोबीचं तिच्याकडे लक्ष गेलं. पार्वती जवळ येऊन धोबीच्या हातावर हात फिरवू लागली. बल्ली औषधाचा पेला घेऊन आली. धोबीच्या ओठांना पेला लावीत म्हणाली, " औषध घ्या ताई !"

धोबीनं तोंड फिरवलं, " ताई, औषध नाही घेणार ?" पार्वतीनं विचारलं.

" मला नको औषध. फार कडू आहे. मी नाही घेत."

" असं करू नये, घ्या ना..."

" कशाला घ्यायचं औषध ? माझी तब्येत ठीक आहे आता." धोबी पुन्हा कूस बदलून झोपली. बल्लीनं म्हटलं, " बाबूजींना बोलावते. नाही तर ताई औषध घ्यायची नाही."

औषधाचा पेला ठेवून बल्ली बाहेर निघून गेली.

खोलीत पुन्हा निःस्तब्धता पसरली.

दुरून गावच्या काही लोकांचा गोंगाट ऐकू येत होता. धोबी कान देऊन ऐकत होती. काही लोक 'हरिबोल'चा गजरही करीत होते. विचारलं, " पारो, तुलाही काही ऐकू येतंय का ग ?"

" तुम्हाला नाही ठाऊक ?" पारो म्हणाली. " आज माझे आजोबा तुमच्या घरी आले होते. परत आल्यावर आमच्या शिवा गड्याला बरोबर घेऊन पुन्हा बाहेर गेले. एक काठीसुद्धा घेऊन गेले. मी विचारलं तेव्हा इतकंच म्हणाले की आज सनियाचं घर ताब्यात घेणार आहोत. मी याचं कारण विचारलं तशी त्यांनी काही उत्तरच दिलं नाही."

धोबी हतबुद्ध झाली.

बल्लीच्या पाठोपाठ चिंतेई सोईं खोलीत आले. म्हणाले, " औषध का नाही घेत बाळ ? घे. पिऊन टाक बघू."

वडिलांच्या आग्रहाखातर धोबीनं औषध घेतलं. सनियाची चौकशी करावी असं तिला खूप वाटत होतं, पण शब्द फुटत नव्हता. ओठ नुसतेच थरथरले. विचारलं, " काका नाही आले बाबा ?"

चिंतेई सोईं बिछान्यावर बसून लेकीच्या पाठीवरून हात फिरवू लागले. पार सुकून गेली होती. नुसता सांगाडा उरला होता. चिंतेईंना गतकाळातल्या घटना आठवल्या. लोक अस्थिपंजर मात्र उरले होते. त्यांच्या दारी भीक मागायला आले होते. पण सोईंनी सर्वांना हाकलून दिलं होतं.

तरीदेखील चिंतेई सोईंना आशा वाटत होती की सनिया परत येईल. प्रहराज त्याला घेऊन येतील. धोबी पुन्हा हसू लागेल. ती बरी होईल.

" बाबा, काका का नाही आले ?"

" येतील बाळ !" चिंतेईंनी उत्तर दिलं. " तो अजून नदीपलीकडे आहे. नदीवर नावाडी नव्हता. मी एक माणूस पाठवला आहे. तो नदी पार करवून देईल. येईलच इतक्यात तुझा काका."

धोबी गप्प राहिली. तिच्या मनात आलं, " ज्यांनी दुसऱ्यांसाठी आपले प्राण वेचले त्यांचे अमर आत्मे आज त्या परलोकातून व्याकुळपणे माझ्याकडे बघताहेत. आता ते कसे येणार ? कुणाच्या मांडीवर झेप घेणार ? त्यांच्या स्वागतासाठी वक्षातून अमृताचा झरा कुठे स्रवला होता ? आज जर माझे डोळे मिटले तर पूर्वजांच्या या आत्म्यांची तहान कोण भागवणार ?"

धोबीनं म्हटलं, " दत्तक विधानाची तयारी झाली का बाबा ? मी विदेईला दत्तक घेईन."

काय उत्तर द्यावं ? चिंतेई सोई विचारात पडले, धोबी जणू उपहास करीत होती.

प्रहराज अतिशय प्रसन्न होते. चिंतेई सोईंच्या खोलीत ते आले तेव्हा सोईंजी उठून उभे राहिले. दुरून गावकऱ्यांचा गजर ऐकू येत होता—" हरिबोल !"

सोईंनी उत्सुकतेनं विचारलं, " काय झालं प्रहराजजी ? इतक्या लवकर परत आलात ?"

" गावकरी धान कापण्यात गुंतले आहेत. काही जणांनी तर सनियाचं घर कबजात घेतलं आहे. सारं काम कसं सुरळितपणं पार पडलं." प्रहराजनी सोईंना सारं काही सांगून टाकलं.

धोबी लक्षपूर्वक ऐकत होती. सोईंनी विचारलं, " सनिया कसा काय आहे ?"

" सनिया घरी नव्हता. कुठं गेला देवास ठाऊक ! घर रिकामंच होतं." प्रहराजनी उत्तर दिलं.

चिंतेई सोई अत्यंत अस्वस्थ झाले. त्यांनी धोबीकडे नजर टाकली. दगडी पुतळ्या-सारखी ती निजली होती. तिचे डोळे स्थिर होते. थरथरणाऱ्या ओठांतून अथांग वेदने-सारखा काही आवाज निघत होता...

सनिया निघून गेला—आपलं घर सोडून ? आपण सनियाला शिक्षा करू शकलो नाही हे सोईंजींना उमगलं. चिंतेई सोईंच्या गर्वोन्नत वक्षावर सनिया जणू एक कधीही न पुसता येणारा डाग लावून गेला. अस्वस्थ होऊन त्यांनी विचारलं, " गेला कुठं सनिया ? सांगा ना प्रहराजजी !"

कुणालाही ठाऊक नाही ते ! मी कित्येकांपाशी चौकशी केली. पण त्याचा काही पत्ता लागला नाही. त्याचं घर मोकळंच होतं. दाराच्या कडीत हा कागद अडकवलेला होता. " प्रहराजनी कागदाचा एक तुकडा पुढे केला."

" कागद ?"

" हो. हा घ्या. यात लिहिलं आहे की हे घर, ही सारी मालमत्ता धोबीच्या पैशांतूनच

निर्माण झालेली आहे."

धोबी किंचाळली, " नाही, नाही, नाही."

चितेई सोईंच्या थरथरणाऱ्या हातातून कागदाचा कपटा खाली पडला. धोबीनं उठायचा प्रयत्न केला. डोळयांतून अश्रुधारा वाहत होत्या. तिला उठवलं नाही. पुन्हा उशीत तोंड खुपसलं. ओठातून दोन शब्द निसटले, " अरे देवा !"

धोबीचे डोळे मिटत होते—सावकाश—अगदी सावकाश.

ते पाहून चितेई सोईंची काळजी आणखीनच वाढली. धोबीच्या कपाळावर हात ठेवून त्यांनी मोठ्या प्रेमानं हाक मारली, " धोबी, बाळ—"

धोबीनं काहीच उत्तर दिलं नाही. ती देवाची प्रार्थना करीत होती, " मला दगडा-सारखं घट्ट करून टाक देवा, मला मूक करून टाक, अगदी तुझ्यासारखं."